**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**वाढदिवसा निमित्त अभिष्टचिंतन**

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांचा आज वाढदिवस आहे. मी आपणा सर्वांच्यावतीने त्यांना मनापासून वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सर्वांना मनापासून धन्यवाद.

....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**राज्यात वार्षिक योजनेसाठी मंजूर केलेला सन 2011-12 या आर्थिक वर्षाचा निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(1) * 30107 श्री.विनोद तावडे , श्री.नितीन गडकरी , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.चंद्रकांत पाटील** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सन 2011-12 या नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षाच्या वार्षिक योजनेसाठी मंजूर करण्यात आलेल्या 42 हजार 500 कोटी रुपये निधीपैकी सुमारे 1 हजार कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिल्याचे माहे मे, 2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्य शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध न होणे, विभागाच्या कामांना अर्थसंकल्पीय मंजुरी न मिळणे, इत्यादी कारणांमुळे निधी खर्च होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, निधी खर्च न झाल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे?

**श्री. अजित पवार** : (1) होय. वार्षिक योजना 2011-12 करिता मंजूर करण्यात आलेल्या रु. 42,000 कोटीपैंकी रु. 33,126 कोटीचा खर्च झाल्याचे दिसून येत आहे.

(2) सन 2011-12 मधील साधनसंपत्तीची सुधारित उपलब्धता विचारात घेऊन त्यानुसार तरतुदी वितरित करणे भाग पडल्याने वार्षिक योजनेतील एकूण खर्च कमी झालेला आहे हे एक मुख्य कारण आहे. याशिवाय तरतूदी खर्च न होण्याची प्रत्येक योजनेतील प्रत्येक बाबीची विशिष्ट कारणमिमांसा त्या त्या विभागाने त्यांच्या अर्थसंकल्पीय तरतुदींच्या आदेशामध्ये नमूद केलेली असते.

(3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, राज्याच्या आर्थिक योजनेचे एकूण काय वास्तव आहे हे जाणून घेण्यासाठी व त्यासंबंधी सभागृहात चर्चा व्हावी म्हणून मी प्रश्न दिला होता. गेल्या 4-5 वर्षात राज्य शासनाचा योजनांतर्गत खर्च होतो त्याची प्रत्यक्ष काय अवस्था झाली आहे हे मला जाणून घ्यायचे आहे. एका बाजूला निधी उपलब्ध नसल्यामुळे विकासात्मक कामावर खर्च होत नसल्याचे दिसून येते, तर दुसऱ्या बाजूला आपण निधीची तरतूद करतो पण तो खर्च करण्यात येत नाही ही देखील वस्तुस्थिती समोर येत आहे. राज्य शासनावर 2 लाख 53 हजार कोटी रूपयांचे कर्ज आहे. या कर्जातून विकासाची कामे झाली आहेत काय ? सदर कर्जाची रक्कम ही नॉन प्लॅनवरच खर्च होते काय ? यावर देखील थोडी चर्चा होणे आवश्यक आहे. गेल्या 10 वर्षात 2 लाख 15 हजार कोटी रूपयांचे अतिरिक्त कर्ज उचलण्यात आले आहे. या कर्जाचा उपयोग

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ MMP/ 11:00

ता.प्र.क्र.30107......

श्री.विनोद तावडे...

भांडवली गुंतवणूक करण्यासाठी केल्याचे अर्थसंकल्प वाचल्यावरून कळते. पण त्यातून तसे केल्याचे काहीच जाणवत नाही. माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी वित्त खात्याचा कारभार स्वीकारल्यानंतर आर्थिक शिस्त लागेल अशी आमची अपेक्षा होती. मी आकडेवारी सांगून माझे प्रश्न विचारणार आहे. सन 2007-2008 मध्ये योजनेवरील खर्च 96 टक्क्यांपर्यंत गेला. त्यानंतर सन 2012-2013 मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारित अंदाज, प्रत्यक्ष खर्च यामध्ये ती रक्कम उतरतच गेली. नॉन प्लॅनवर खर्च का होतो हे आपल्याला माहिती आहे. विकासकामावर खर्च झाला पाहिजे. तो दिवसेंदिवस कमी होत आहे. मार्च महिन्यामध्येच अनेक कामांचे पैसे काढले जातात. नियोजन आयोग योजना मंजूर करताना साधनसंपत्तीची उपलब्धता काय आहे याचा विचार करूनच ती योजना मंजूर करते. आपण येथे उत्तर दिले आहे की, त्यानुसारच खर्च झाला आहे. तेव्हा नियोजन आयोगाचे चुकले की, आपण नियोजन आयोगाला चुकीचे भासविले म्हणून अधिकचा खर्च केला आहे काय ? असा माझा पहिला प्रश्न आहे. आपल्या राज्याच्या आर्थिक स्थितीचा खरोखरच आढावा घ्यायचा असेल तर आपण कुठे चुकतो आहोत हे पाहण्यासाठी त्यासंबंधातील श्वेतपत्रिका शासन काढणार आहे काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी या विषया संबंधी अत्यंत महत्वाची माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. मी सदनाला सांगू इच्छितो की, सन 2011-12 च्या सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे आपल्या वार्षिक योजनेवर 37054 कोटी रूपयांची साधनसंपत्ती उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे 42000 कोटी रूपयांच्या वार्षिक योजनेच्या तुलनेत 4945 कोटी रूपयांची घट दिसून येत आहे.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30107....

श्री. राजेंद्र मुळक....

या व्यतिरिक्त आपण लक्षात घेतले तर आपल्या महसुली जमेचे उद्दिष्ट 1 लाख 21 हजार 503 कोटी होते ते सुधारित अंदाजानुसार 1 लाख 25 हजार 312 कोटी इतके झाले. त्यामध्ये 3 हजार 809 कोटींची वाढ झाली. साधारणत: ही वाढ लक्षात घेण्याचे कारण असे की, विक्री कर विभागाचे 46 हजार कोटी रुपयांचे लक्ष्य होते, परंतु त्या विभागाकडून 50 हजार कोटी रुपये मिळाले. म्हणजेच त्यामध्ये 4 हजार कोटी रुपयांची वाढ झाली. माल व इतर उतारावरील कर, विक्री वस्तू सेवा यांवरील कर, व्याजाची जमा रक्कम या सर्व गोष्टींमुळे 6 हजार 937 कोटी रुपयांची वाढ या आर्थिक वर्षामध्ये झाली. त्यानुसार जिल्हा प्रशासन, निवृत्ती वेतन, नैसर्गिक आपत्ती निवारण व सार्वजनिक बांधकाम यासाठी हा खर्चही झाला.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, प्लॅन वरील खर्च होत नाही हे आपण उत्तरामध्ये मान्य केले आहे. त्याचे कारण आपण सांगितले पाहिजे आणि ते कारण कसे दुरुस्त करता येईल तेही सांगा. महाराष्ट्राचे अर्थ खाते पेट्टी कॅशसारखे वापरावयास लागले आहे असे ही आकडेवारी पाहिल्यानंतर लक्षात येते. तेव्हा याच्या पाठीमागची कारणे आपण सांगणार काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पहिला प्रश्न उपस्थित केला. संपूर्ण देशामध्ये जेवढी राज्ये आहेत त्या सर्वांचा आम्ही नियमितपणे आढावा घेत असतो. परंतु बहुतेक ठिकाणी अशी वस्तुस्थिती पहावयास मिळते की, एखादे राज्य करते त्या प्रमाणे दुसरे राज्य करते. परंतु त्याप्रमाणे आपण केले पाहिजे असे आम्ही अजिबात करीत नाही. मी आपल्या लक्षात एक गोष्ट आणून देतो की, सन 2011-12 करिता 42 हजार कोटी रुपयांचा प्लॅन मंजूर होता त्यामध्ये 33 हजार 126 कोटी रुपये खर्च झाले. हे पैसे खर्च होत असतांना सन 2011-12 करिता 38 हजार 380 कोटी रुपये वितरीत करण्यात आले होते. हे पैसे वितरित केल्यानंतर काही विभागांकडून कमी निधी खर्च झाला ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, आपण देखील मंत्री म्हणून काम केले असल्यामुळे आपल्याला पाठीमागच्या काळातील परिस्थिती माहीत आहे. मंत्रालयामध्ये 31 मार्चला मोठया प्रमाणात गर्दी होत असे आणि त्या दिवशी फार मोठया प्रमाणात देयके मंजूर करण्याचे काम सातत्याने चाले. त्यामध्ये काही तरी गौडबंगाल आहे की काय, अशाप्रकारची सर्वसामान्य लोकांमध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/ 11:05

ता.प्र.क्र. 30107....

श्री. अजित पवार ....

चर्चा होत असे. परंतु माननीय मंत्री श्री. जयंत पाटील हे अर्थमंत्री झाल्यानंतर त्यांनी यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये मंजूर केलेल्या प्लॅननुसार पहिल्या तिमाहीसाठी 25 टक्के, दुसऱ्या तिमाहीसाठी 50 टक्के आणि तिसऱ्या तिमाहीसाठी 75 टक्के आणि त्यानंतर राहिलेले 100 टक्के अशाप्रकारे पैसे खर्च होऊ लागले. जेणेकरुन सर्व विभागांना सुरुवातीपासून पैसे मिळू लागल्यानंतर 31 मार्चला सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये जे प्रश्न उपस्थित होत होते ते होऊ नयेत अशी त्या मागची कल्पना होती. त्यामध्ये आम्हाला बऱ्यापैकी यश मिळाले.

यावेळी सुध्दा आम्ही प्लॅन तयार करीत असतांना कुठेही अव्वाच्या सव्वा प्लॅन वाढविण्याचा प्रयत्न केला नाही. आम्ही वेगवेगळया विभागामार्फत उत्पन्न वाढविण्याचा आणि रिसोर्सेस वाढविण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतो. त्याचा उल्लेख माननीय राज्यमंत्र्यांनी केला. त्यामध्ये विक्री कर किंवा माल व उतारावरील कर इत्यादी बाबींमध्ये उत्पन्न वाढविण्यामध्ये आम्ही यशस्वी झ ाालो. त्याचप्रमाणे मी ही गोष्ट देखील बघितली आहे की, काही काही विभागांना जेवढा निधी दिला होता तो का खर्च झाला नाही? माझ्याकडे अनेक विभागांची माहिती असल्यामुळे त्यामधील फक्त मेजर आकडे आपणास देतो. उदा. नगर विकास विभागाच्या बाबतीत नियतव्यय 4 हजार 19 कोटींचा होता तो 4 हजार 109 कोटींचा अर्थसंकल्पीत केला आणि 4 हजार 55 कोटी इतका वितरीत केला.परंतु प्रत्यक्षात 2277 कोटी रुपये खर्च झाले. म्हणजेच 1777 कोटी का खर्च झाले नाहीत?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30107 ...... श्री. अजित पवार ...

आपल्याकडून जे पैसे द्यावयाचे होते ते आपण दिले परंतु प्लॅनमध्ये केंद्र शासनाच्या काही योजना 90:10 च्या प्रमाणातील असतात. उदा. जलसंपदा विभागामध्ये एआयबीपीची योजना 90:10 च्या प्रमाणानुसार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत मोठ्या शहराकरिता जी रक्कम मिळते त्यामध्ये 50 टक्के रक्कम केंद्र शासनाची असते, 20 टक्के रक्कम राज्य सरकारची असते आणि 30 टक्के रक्कम महानगरपालिकांची असते. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर अशा मोठ्या शहरांसाठी आपण संपूर्ण देशामध्ये अधिकचा निधी आणण्यामध्ये यशस्वी ठरलो. हा निधी आम्ही प्लॅनमध्ये दाखविला परंतु 31 मार्चपर्यंत केंद्र सरकारकडून आम्हाला तेवढा निधी मिळाला नाही. राज्य सरकारकडून जो प्लॅन दाखविला जातो त्यामध्ये केंद्राकडून मिळणारा निधी गृहीत धरुन प्लॅन दाखवावा लागतो. पण कधी कधी 31 मार्चपर्यंत पैसे येत नाहीत.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी आपण ज्या पुरवणी मागण्या मंजूर केल्या त्यामध्ये गेल्या वर्षी 31 मार्चला सार्वजनिक आरोग्य विभागाला आलेले एकूण 90 ते 100 कोटी रुपये आता दाखवावे लागले. कारण त्यांनी ते पैसे मार्चला रिलीज केले. दुसरी गोष्ट अशी की, केंद्र शासन जेवढा निधी देते त्याला पूर्ण मॅचिंग ग्रँट द्यावी लागते. डीपीसीचा प्लॅन असेल त्या संदर्भात प्रत्येक पालकमंत्र्यांना सांगितले आहे की, तुम्हाला कृषी करिता किंवा वेगवेगळ्या विभागांकरिता जो निधी डायरेक्ट जिल्ह्याला येतो त्यामध्ये केंद्राकडून कधी कधी 75 टक्के निधी येतो आणि 25 टक्के निधी आपल्याला द्यावा लागतो त्याऐवजी तो निधी जिल्हा वार्षिक आराखड्यामध्ये 100 टक्के दाखवावा आणि आपला जो निधी आहे तो बाकीच्या बाबतीत खर्च करावा. अशा पध्दतीचे आमचे धोरण आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारले की, यामध्ये तफावत का दिसते ? केवळ आपल्याच राज्याच्या बाबतीत नाही तर केंद्र सरकारला जर वाटले आणि त्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पात जर दुसऱ्या कामाला निधी दिला तर त्या ठिकाणी सुध्दा कट लागतो. गेल्या वर्षी आपल्याकडे सुध्दा आपण कट लावला होता. गेल्या वर्षी एकंदर खर्च करीत असताना आपल्या लक्षात आले की, आपण डीपीसीला कट लावता कामा नये, आमदारांकरिता जो स्थानिक विकास निधी असतो त्याला कट लावता कामा नये, महत्वाचे जे विभाग असतात त्यांना कोणत्याही प्रकारचा कट न लावता काही बाबतीत मात्र कट लावण्यात आला होता. आपण सुरुवातीला जो 42 हजार

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

ता. प्र. क्र. 30107 ...... श्री. अजित पवार ...

कोटी रुपयांचा प्लॅन दिला होता तो प्लॅन नंतर 43134 कोटी रुपयांचा केलेला आहे. काही बाबतीत आम्ही काही विभागांना प्रश्न विचारला की तुम्ही खर्च का केला नाही. त्यामध्ये काही गोष्टी पुढे आलेल्या आहेत. उदा. जलसंधारण व कडा विभागामध्ये कडाच्या कार्यक्रमामध्ये समाविष्ट असलेल्या राज्यातील 9 प्रकल्पांपैकी पाच प्रकल्पांसाठी केंद्र सरकारकडून 21 कोटी 48 लाख रुपये एवढा निधी मार्च, 2012 ला म्हणजे उशिराने प्राप्त झाल्याने ते पैसे खर्च होऊ शकले नाहीत. शेवटी पैसे आले तर ते खर्च करीत असताना अडचणी निर्माण होतात. हे देखील खर्च न होण्याच्या मागचे कारण आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या एका प्रश्नाशी मी सहमत आहे. कारण आपण राज्याच्या जनतेकरिता जो प्लॅन देतो, विभागाला जे पैसे देतो तेवढे पैसे आर्थिक शिस्त लावण्याकरिता दिलेच पाहिजेत. माननीय मुख्यमंत्र्यांची सुध्दा तीच भूमिका आहे. माझी सुध्दा तीच भूमिका आहे. परंतु कधी कधी अशी नैसर्गिक संकटे येतात, दुष्काळा सारखे सावट येते आणि कधी कधी सीएफ ॲडव्हान्स काढावा लागतो. आपण दिलेल्या प्लॅन व्यतिरिक्त या खर्चाला टॉप प्रायोरिटी द्यावी लागते. एक महिन्यापूर्वी आग लागली होती. अशा प्रकारचे खर्च सुध्दा कधी कधी वाढतात. अशा प्रकारची नैसर्गिक संकटे आल्यानंतर थोडे खर्च वाढतात अशा गोष्टींना सुध्दा संपूर्ण राज्याचा कारभार चालवित असताना राज्य सरकारला तोंड द्यावे लागते, ही वस्तुस्थिती आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या उत्तरातून दोन गोष्टींची स्पष्टता झाली पाहिजे. आपल्या राज्याला केंद्राकडून जो निधी यावयाचा आहे तो निधी आणण्यामध्ये आपली नोकरशाही कमी पडते हे वारंवार आकडेवारीवरुन सिध्द झालेले आहे. आपल्या मंत्री महोदयांनी दोन वर्षापूर्वीच्या अधिवेशनामध्ये ते मान्य सुध्दा केले होते. दिल्लीमध्ये आपण पाहतो की, आपल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून या योजनांचे पैसे आपल्या राज्याकडे वळविण्यामध्ये कॉंग्रेसचे सरकार असलेले आंध्र प्रदेश राज्य असेल, गुजरात असेल किंवा मध्य प्रदेश राज्यात दिग्विजयसिंग मुख्यमंत्री असताना किंवा आताचे सरकार असताना सुध्दा ही राज्ये तेथील योजनांचे पैसे अधिक प्रमाणात आणतात.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30107... श्री.विनोद तावडे...

आता उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री.अखिलेश यादव यांनी त्या राज्यासाठी 55 हजार कोटी रुपये किंवा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री श्रीमती ममता बॅनर्जी यांनी काही हजार कोटी रुपये आपापल्या राज्यासाठी केंद्र सरकारकडून मिळविले आहेत. त्याची राजकीय कारणे असू शकतील. ही नेते मंडळी केंद्र सरकारकडून प्रत्यक्षात निधी आणतात. आपल्याकडील नेते मंडळी केंद्र सरकारवर प्रेशर आणण्यासाठी केवळ राजीनामा देण्याची धमकी देत असतात. याबाबतची बातमी आपण सर्वांनीच वर्तमान पत्रातून वाचली असेल. ते सोडून द्यावे. नगरविकास विभागाच्या योजनांचा पैसा आणण्यामध्ये अधिकारी अपयशी ठरले आहेत. हे खरेच आहे. एफ.आर.बी.एम.ॲक्टनुसार दर 3 महिन्यांनी योजनोंतर्गत आढावा घेतला जातो.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही.

श्री.विनोद तावडे : एफ.आर.बी.एम.ॲक्टनुसार दर 3 महिन्यांनी योजनांतर्गत आढावा घेतला जातो. अशा प्रकारचा आढावा घेण्यासाठी राज्यात किती बैठका झाल्या आहेत. त्या बैठकांमध्ये समोर आलेल्या माहितीच्या आधारावर काही विभागांच्या बजेटबाबत फेरविचार करण्याची योजना आखली आहे काय ? केंद्र सरकारकडून निधी वेळेवर न मिळाल्यामुळे काही विभागांचा नियोजित खर्च होऊ शकला नाही हे मी कारण समजू शकतो. केंद्र सरकारकडून राज्यासाठी निधी येण्यासाठी विशेष एफर्डस् वाढविण्याची गरज आहे. असे प्रयत्न करुनही हा निधी अखर्चित राहिला आहे काय, केंद्र सरकारकडून मॅचिंग ग्रँट वेळेवर मिळू शकला नाही की, विभागांच्या अपयशामुळे ही रक्कम अखर्चित राहिली आहे ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांचा आज वाढदिवस आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी विरोधी पक्षाचे नेतृत्व केले होते. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विरोधी पक्ष नेते म्हणून काम केलेले आहे. आता सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे हे विरोधी पक्षाचे नेतृत्व करीत आहेत. सभागृहात प्रश्न मांडत असताना एखाद्यावेळी तो मिश्कीलपणे मांडला तर ते मी समजू शकतो. पण ते कधी कधी कारण नसताना नको तो मुद्दा उपस्थित करुन सभागृहातील वातावरण खराब करतात

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30107... श्री.अजित पवार....

हे बरोबर नाही. अशा अनेक गोष्टींचा येथे उल्लेख करता येईल. पण आपण सर्वजण सभागृहात राज्यातील जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी एकत्र बसतो. त्यादृष्टीने प्रश्नोत्तराचा तास अत्यंत महत्वाचा असतो. दोन्ही बाजूच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रश्नोत्तराच्या तासाचे गांभीर्य लक्षात घ्यावे अशी मी विनंती करतो.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असे सांगितले की, केंद्र सरकारकडून राज्यासाठी पैसा आणण्यात नोकरशाही कमी पडत आहे. मी या प्रश्नाच्या निमित्ताने सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला सांगू इच्छितो की, यु.पी.ए.सरकारमध्ये आपल्या राज्यातील प्रमुख मान्यवर काम करीत आहेत. मग सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार साहेब असतील, सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे साहेब असतील, सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.विलासराव देशमुख साहेब असतील, सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.मुकुल वासनिक साहेब असतील अशी अनेक मान्यवरांची नावे घेता येतील. या सर्व मान्यवरांची केंद्र सरकारकडून अधिक मदत मिळण्यासाठी मदत होत आहे. त्याची आकडेवारीही देण्यास मी तयार आहे. राष्ट्रीय फलोत्पादन योजनेसाठी देशातील राज्यांची तुलना करता सर्वाधिक निधी आपल्या राज्याला मिळत आहे. केंद्र सरकारच्या जे.एन.एन.यु.आर.एम. या योजनेसाठी ज्या राज्यांनी अधिक निधी नेला आहे त्यामध्ये आपले राज्य आघाडीवर आहे. ए.आय.बी.पी. या योजनेसाठी केंद्र सरकारकडून निधी दिला जातो. या योजनेसाठीही सर्वात जास्त निधी आपल्या राज्याला मिळत आहे. टेंभू, ताकारी व म्हैसाळ ही दुष्काळी भागासाठी वरदान ठरलेली उपसा सिंचन योजना आहे. या उपसा सिंचन योजनेसाठी केंद्र सरकारकडून कधीही निधी मिळाला नव्हता. परंतु ती योजना ए.आय.बी.पी.च्या 90 : 10 या निकषात बसविण्याचे काम केंद्रातील सर्व मान्यवरांनी केलेले आहे. या राज्यांचे ज्यांनी अनेकदा मुख्यमंत्री पद भुषविलेले आहे त्यांचा या कामासाठी उपयोग झालेला आहे.

सभापती महोदय, गेल्या वर्षी असेच एक संकट आले होते. त्यावेळी आम्ही या सर्व मान्यवरांना घेऊन माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांना भेटण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी त्यांनी तातडीने 400 कोटी रुपयांची मदत जाहीर केली होती. त्याचप्रमाणे माननीय केंद्रीय कृषी

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30107...                                        श्री.अजित पवार....

मंत्री श्री.शरदराव पवार साहेबांनी फलोत्पादनाच्या माध्यमातून 200 कोटी रुपयांची भर घातल्यामुळे एकूण 600 कोटी रुपयांची मदत आणण्यामध्ये आपण यशस्वी झालो होतो. केंद्र सरकारकडून राज्यासाठी अधिकचा पैसा आणण्यासाठी प्रयत्न केला जातो. या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान कार्यालयात काम केलेले असल्यामुळे त्यांची तेथे चांगली ओळख आहे. तसेच राज्याच्या प्रश्नांची बारकाईने जाण असलेले दिग्गज नेते आज देश पातळीवर काम करीत असल्यामुळे त्यांचीही वेळोवेळी मदत झालेली आहे. त्याप्रमाणे या वर्षीही मदत होईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30107.... श्री. अजित पवार....

गेल्यावर्षी सार्वजनिक आरोग्य खात्यासाठी एनआरएचएममधून केन्द्राने 1400 कोटी रु. दिलेले होते. हे पैसे मिळण्यासाठी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी प्रयत्न केला, माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रयत्न केला. या वर्षी एनआरएचएममधून 1930 कोटी रु. आपल्या राज्याला मिळालेले आहेत. तेव्हा माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी, आम्ही केन्द्रातून पैसे आणण्यास कमी पडतो का अशी जी विचारणा केली त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, आम्ही केन्द्राकडून पैसे आणण्यास कुठेही कमी पडत नाही. बाकीची राज्ये पॅकेज घेऊन जातात ती पॅकेज कशा प्रकारची असतात ती कर्जाची असतात का ही सर्व वस्तुस्थिती नंतर पुढे येईल. परंतु राज्य सुस्थितीमध्ये चालविण्याचा प्रयत्न हे आघाडी सरकार करीत आहे. मी सुरुवातीला सांगितले की केन्द्रातील काही निधी मिळण्यास उशीर होतो. केन्द्रातून निधी रिलिज झाल्यापासून नियम क्रमांक 91 प्रमाणे तो 18 महिन्यामध्ये खर्च करावा लागतो. म्हणून हा निधी लॅप न होता तो खर्च करण्याचे काम आपण करीत असतो. त्यामुळे केन्द्राकडून येणा-या निधीच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मनामध्ये वेगळी भावना बाळगण्याची गरज नाही. जेव्हा काही विभागांचा आढावा घेतला जातो त्यावेळी केन्द्राकडून मिळालेला निधी खर्च करण्याकरिता संबंधित विभागाच्या अधिका-यांनी जे टीमवर्क केले पाहिजे त्यामध्ये काही प्रमाणात आपण कमी पडतो. अशा प्रकारचा आढावा दर तीन महिन्यानी घेऊन ते पैसे वेळेवर ट्रेझरीमधून काढून खर्च केले जातील यादृष्टीने नियोजन विभागाचे प्रयत्न चालू असतात.

----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-2

MSS/ MMP/ D/ पूर्वी श्री. खंदारे 11:20

## सिंधुदुर्ग जिल्हयातील मायनिंग प्रकल्पामुळे नद्यांचे पाणी दूषित होत असल्याबाबत

**(२) * ३०७००** **श्री.परशुराम उपरकर** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) सिंधुदुर्ग जिल्हयातील कळणे व साटेली मायनिंगमुळे नदयांचे पाणी दूषित होत असल्याची तक्रार गोव्यातील खासदारांनी संबंधित विभागाकडे नुकतीच सन २०१२ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

२) असल्यास, सदर खनिज प्रकल्पामुळे नदीचे पाणी दूषित होवून पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे, हे ही खरे आहे काय,

३) असल्यास, याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार करुन केंद्रीय वन, पर्यावरण मंत्रालयास चौकशी करण्याबाबत विनंती केली आहे काय,

४) असल्यास, तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सचिन अहिर, श्री.संजय देवतळे यांच्याकरिता** : (१) नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : कळणे व साटेली मायनिगमुळे नद्यांचे पाणी दूषित होते यासंबंधी जनसुनावणी घेऊन जेव्हा पर्यावरण अहवाल सादर करण्यात आला त्यामध्ये नद्यांचा उल्लेख करण्यात आलेला नाही. तेव्हा हा पर्यावरण अहवाल माननीय मंत्री महोदय पुनश्च तपासणार आहेत काय ? तसेच प्रश्न भाग 2, 3, 4 आणि 5 यांना "प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर दिलेले आहे. कळणे लगत असलेली कळणे आणि कोलवाड तसेच साटेली लगत असलेली तेरेखोल नदी या नद्या गोवा आणि महाराष्ट्र राज्यातील नळ पाणीपुरवठा योजनेची उद्‌भवस्थाने आहेत. या नद्यांचे पाणी दूषित झालेले आहे याची तपासणी पर्यावरण विभागामार्फत करण्यात येईल काय ?

श्री. सचिन अहिर : या दोन्ही मायनिंगच्या परिसरामध्ये असलेल्या नद्या एक ते दीड कि.मी. अंतरावर आहेत. त्यामुळे पाणी दूषित झाल्याची तक्रार आलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी गोव्यातील काही खासदारांनी तक्रार केली आहे काय असा प्रश्न विचारलेला असल्यामुळे त्याला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक तक्रार दिली तर त्याची तपासणी करुन योग्य ती कारवाई केली जाईल.

----

...3...



## नागपूर जिल्ह्यातील १८ गावांना कुपोषण मुक्त जाहीर केल्याबाबत

**(३) * ३११४३** **श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली** : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(१) नागपूर जिल्ह्यातील १८ गावांना राज्य शासनाच्या जिजाऊ कुपोषण मुक्त ग्रामयोजनेअंतर्गत कुपोषण मुक्त जाहीर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त १८ गावांमधील मागील पाच वर्षातील कुपोषणाची आकडेवारी काय आहे,
(३) सदरील योजना उपरोक्त १८ गावांमध्ये कधी पासून सुरु करण्यात आली होती व शासनाने या १८ गावात सदरील योजना राबविण्याकरिता किती निधीचा वापर केला आहे ?

**प्रा.वर्षा गायकवाड :** (१) होय.
नागपूर जिल्ह्यातील १७ गावे राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्राम अभियानामध्ये आणि १ गाव अभियानापूर्वी कुपोषणमुक्त झालेले आहे.
(२) नागपूर जिल्ह्यातील १८ गावांमधील मागील पाच वर्षातील कुपोषणाची आकडेवारी सोबत जोडली आहे.
(३) महाराष्ट्र कुपोषणमुक्त करण्यासाठी राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्रामअभियान दिनांक १४.११.२०११ ते दिनांक ७.४.२०१२ या कालावधीत राबविण्यात आले. सदर अभियान राबविण्याकरिता निधीचा वापर करण्यात आलेला नाही. तथापि, या अभियानांतर्गत कुपोषणमुक्त झालेल्या १७ गावांच्या संबंधीत ग्रामपंचायतींना पुरस्कारासाठी प्रति गाव रुपये ५०००/- प्रमाणे रुपये ८५,०००/- प्राप्त निधीतून खर्च करण्यात आलेले आहेत.

..४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**18 गावांची मागील 5 वर्षाची कुपोषणाची आकडेवारी**

| जिल्हा | प्रकल्पाचे नाव | गावाचे नाव | वर्ष | सर्वेनुसार बालके | वजन घेतलेली बालके | % | सामान्य श्रेणीतील बालके | % | श्रेणी I | % | श्रेणी II | % | श्रेणी III | % | श्रेणीI V | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वेनुसार बालके | वजन घेतलेली बालके | % | सामान्य श्रेणीतील बालके | % | कमी वजनाची बालके | % | तिव्र कमी वजनाची बालके | % | | | | |
| नागपूर | कामठी | नान्हा | २००७-०८ | ५८ | ५८ | १००.०० | ४९ | ८४.४८ | ९ | १५.५२ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | ६३ | ६३ | १००.०० | ४८ | ७६.१९ | १२ | १९.०५ | ३ | ४.७६ | ० | ०.०० | ० | ०.०० |

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २००९-१० | ६४ | ६३ | ९८.४४ | ४० | ६३.४९ | २० | ३१.७५ | ३ | ४.७६ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | ६२ | ६२ | १००.०० | ६१ | ९८.३९ | ० | ०.०० | १ | १.६१ | | | | |
| | | | २०११-१२ | ६२ | ६२ | १००.०० | ६२ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | कामठी | मांगली | २००७-०८ | ६८ | ६८ | १००.०० | ४२ | ६१.७६ | २३ | ३३.८२ | ३ | ४.४१ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | ६३ | ६२ | ९८.४१ | ४० | ६४.५२ | २० | ३२.२६ | २ | ३.२३ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | ६२ | ६२ | १००.०० | ३५ | ५६.४५ | २५ | ४०.३२ | २ | ३.२३ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | ५५ | ५५ | १००.०० | ५४ | ९८.१८ | १ | १.८२ | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | ५६ | ५६ | १००.०० | ५६ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | कळमेश्वर | हरदोली | २००७-०८ | १७ | १७ | १००.०० | ८ | ४७.०६ | ९ | ५२.९४ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | १६ | १६ | १००.०० | १३ | ८१.२५ | ३ | १८.७५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | १३ | १३ | १००.०० | १२ | ९२.३१ | १ | ७.६९ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | ११ | ११ | १००.०० | १० | ९०.९१ | १ | ९.०९ | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | ११ | ११ | १००.०० | १० | १००.०० | १ | ९.०९ | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | कळमेश्वर | खानगांव | २००७-०८ | ४ | ४ | १००.०० | ४ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | ४ | ४ | १००.०० | ४ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | ५ | ५ | १००.०० | ५ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | ६ | ६ | १००.०० | ६ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | ६ | ६ | १००.०० | ५ | ८३.३३ | १ | १६.६७ | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | कळमेश्वर | झिल्पी | २००७-०८ | १२ | १२ | १००.०० | ९ | ७५.०० | २ | १६.६७ | १ | ८.३३ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | १७ | १७ | १००.०० | १३ | ७६.४७ | ३ | १७.६५ | १ | ५.८८ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | १७ | १७ | १००.०० | १३ | ७६.४७ | ३ | १७.६५ | १ | ५.८८ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | १६ | १६ | १००.०० | १४ | ८७.५० | २ | १२.५० | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | १४ | १४ | १००.०० | १३ | ९२.८६ | १ | ७.१४ | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | नागपूर | परसोडी | २००७-०८ | ५३ | ५३ | १००.०० | ४२ | ७९.२५ | ११ | २०.७५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | ५१ | ५१ | १००.०० | ३८ | ७४.५१ | १३ | २५.४९ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | ६० | ६० | १००.०० | ५४ | ९०.०० | ६ | १०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | ५७ | ५७ | १००.०० | ५४ | ९४.७४ | ३ | ५.२६ | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | ४७ | ४७ | १००.०० | ४७C | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**18 गावांची मागील 5 वर्षाची कुपोषणाची आकडेवारी**

| जिल्हा | प्रकल्पाचे नाव | गावाचे नाव | वर्ष | सर्वेनुसार बालके | वजन घेतलेली बालके | % | सामान्य श्रेणीतील बालके | % | श्रेणी- I | % | श्रेणी- II | % | श्रेणी- III | % | श्रेणी- IV | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वेनुसार बालके | वजन घेतलेली बालके | % | सामान्य श्रेणीतील बालके | % | कमी वजनाची बालके | % | तिव्र कमी वजनाची बालके | % | | | | |
| नागपूर | नागपूर | जयपूर (पठार) | २००७-०८ | | | | | | | | | | | | | |
| | | | २००८-०९ | | | | | | | | | | | | | |
| | | | २००९-१० | | | | | | | | | | | | | |
| | | | २०१०-११ | २० | २० | १००.०० | १६ | ८०.०० | ४ | २०.०० | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | २४ | २० | १००.०० | २४ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | नागपूर | बोढाळा | २००७-०८ | | | | | | | | | | | | | |
| | | | २००८-०९ | | | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २००९-१० | | | | | | | | | | | | | |
| | | | २०१०-११ | ३१ | ३१ | १००.०० | २९ | ९३.५५ | २ | ६.४५ | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | ३४ | ३४ | १००.०० | ३४ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | नागपूर | मांगली | २००७-०८ | ३६ | ३६ | १००.०० | २६ | ७२.२२ | १० | २७.७८ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | ३१ | ३१ | १००.०० | २७ | ८७.१० | ४ | १२.९० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | ३२ | ३२ | १००.०० | ३१ | ९६.८८ | १ | ३.१३ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | २८ | २८ | १००.०० | २७ | ९६.४३ | १ | ३.५७ | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | २७ | २७ | १००.०० | २७ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | नागपूर | आलागोंदी | २००७-०८ | ४८ | ४८ | १००.०० | ३९ | ८१.२५ | ९ | १८.७५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | ४७ | ४७ | १००.०० | ४१ | ८७.२३ | ६ | १२.७७ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | ४१ | ४१ | १००.०० | ४१ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | ४४ | ४४ | १००.०० | ४३ | ९७.७३ | १ | २.२७ | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | ४७ | ४७ | १००.०० | ४७ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | नागपूर | टेंभरी | २००७-०८ | ३६ | ३६ | १००.०० | ३१ | ८६.११ | ४ | ११.११ | १ | २.७८ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | ३८ | ३७ | ९७.३७ | २६ | ७०.२७ | ११ | २९.७३ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | ३६ | ३६ | १००.०० | ३६ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | ३१ | ३१ | १००.०० | ३१ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | ३३ | ३३ | १००.०० | ३३ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | कुही | पिंपरी | २००७-०८ | १० | १० | १००.०० | ८ | ८०.०० | २ | २०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | १७ | १७ | १००.०० | १० | ५८.८२ | ७ | ४१.१८ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | १३ | १३ | १००.०० | ७ | ५३.८५ | ६ | ४६.१५ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | १० | १० | १००.०० | ८ | ८०.०० | २ | २०.०० | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | ८ | ८ | १००.०० | ८ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |

**18 गावांची मागील 5 वर्षाची कुपोषणाची आकडेवारी**

| जिल्हा | प्रकल्पाचे नाव | गावाचे नाव | वर्ष | सर्वेनुसार बालके | वजन घेतलेली बालके | % | सामान्य श्रेणीतील बालके | % | श्रेणी- I | % | श्रेणी- II | % | श्रेणी- III | % | श्रेणी- IV | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सर्वेनुसार बालके | वजन घेतलेली बालके | % | सामान्य श्रेणीतील बालके | % | कमी वजनाची बालके | % | तिव्र कमी वजनाची बालके | % | | | | |
| नागपूर | कामठी | नान्हा | २००७-०८ | ३० | ३० | १००.०० | २५ | ८३.३३ | ४ | १३.३३ | १ | ३.३३ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | ३० | ३० | १००.०० | २६ | ८६.६७ | ४ | १३.३३ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | ३० | ३० | १००.०० | २७ | ९०.०० | ३ | १०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | २९ | २९ | १००.०० | २७ | ९३.१० | २ | ६.९० | ० | ०.०० | | | | |

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०११-१२ | २४ | २४ | १००.०० | २४ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | कामठी | मांगली | २००७-०८ | २० | २० | १००.०० | १५ | ७५.०० | ३ | १५.०० | २ | १०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | २० | २० | १००.०० | १६ | ८०.०० | २ | १०.०० | २ | १०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | २० | २० | १००.०० | १८ | ९०.०० | २ | १०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | २० | २० | १००.०० | १९ | ९५.०० | १ | ५.०० | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | १८ | १८ | १००.०० | १८ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | कळमेश्वर | हरदोली | २००७-०८ | १२ | १२ | १००.०० | ६ | ५०.०० | ४ | ३३.३३ | २ | १६.६७ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | १२ | १२ | १००.०० | ६ | ५०.०० | ४ | ३३.३३ | २ | १६.६७ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | १२ | १२ | १००.०० | ७ | ५८.३३ | ४ | ३३.३३ | १ | ८.३३ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | १० | १० | १००.०० | ८ | ८०.०० | २ | २०.०० | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | ८ | ८ | १००.०० | ८ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | कळमेश्वर | खानगांव | २००७-०८ | २१ | १९ | ९०.४८ | १३ | ६८.४२ | ६ | ३१.५८ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | २१ | १९ | ९०.४८ | १३ | ६८.४२ | ६ | ३१.५८ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | १८ | १८ | १००.०० | १३ | ७२.२२ | ५ | २७.७८ | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | १६ | १६ | १००.०० | १० | ६२.५० | ६ | ३७.५० | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | १७ | १७ | १००.०० | १७ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | कळमेश्वर | झिल्पी | २००७-०८ | ३१ | ३१ | १००.०० | १७ | ५४.८४ | ७ | २२.५८ | ७ | २२.५८ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | ३१ | ३१ | १००.०० | १३ | ४१.९४ | १४ | ४५.१६ | ४ | १२.९० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | ३० | ३० | १००.०० | २१ | ७०.०० | ८ | २६.६७ | १ | ३.३३ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | ३१ | ३० | ९६.७७ | २७ | ९०.०० | २ | ६.६७ | १ | ३.३३ | | | | |
| | | | २०११-१२ | २६ | २६ | १००.०० | २६ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |
| नागपूर | नागपूर | परसोडी | २००७-०८ | १८ | १८ | १००.०० | १४ | ७७.७८ | ३ | १६.६७ | १ | ५.५६ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००८-०९ | १८ | १८ | १००.०० | १४ | ७७.७८ | ३ | १६.६७ | १ | ५.५६ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २००९-१० | १९ | १९ | १००.०० | १५ | ७८.९५ | ३ | १५.७९ | १ | ५.२६ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | | २०१०-११ | १७ | १९ | १११.७६ | १७ | ८९.४७ | २ | १०.५३ | ० | ०.०० | | | | |
| | | | २०११-१२ | १५ | १५ | १००.०० | १५ | १००.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | | | | |

----------

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. ३११४३.......

प्रा. सुरेश नवले : कुपोषणाची व्याख्या राज्य शासनाने केलेली आहे काय, कुपोषित बालके कशी गृहीत धरली जातात ?

प्रा. वर्षा गायकवाड : डब्ल्यूएचओच्या निकषानुसार कुपोषणाची व्याख्या केलेली आहे. यामध्ये सर्वसाधारण बालके, मध्यम वजनाची बालके आणि तीव्र कमी वजनाची बालके अशी वर्गवारी केलेली आहे.

डॉ. नीलम गो-हे : ही गावे कुपोषण मुक्त झाल्याचा दावा शासनाने केला असला तरी ॲकेडमी ऑफ न्युट्रीशन इम्प्रुव्हमेंटचे अध्यक्ष डॉ शांतीलाल कोठारी यांनी हा दावा खोटा असल्याचे म्हटलेले आहे. या कुपोषित बालकांना जे खाद्य दिले जाते ते ती मुले खात नाहीत अशा तक्रारी या भागातून आलेल्या होत्या. तेव्हा या संदर्भात काही आक्षेप घेण्यात आलेले आहेत काय, असल्याचे त्याचे निराकरण शासनाने केलेले आहे काय ? जिजाऊ कुपोषणमुक्त ग्राम अभियानाची कार्यपध्दती काय आहे ?

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31143....

डॉ.नीलम गोऱ्हे....

कारण या अभियानाचे कार्यालय संभाजीनगर येथे आहे. ही यंत्रणा भंडारा आणि गडचिरोली येथे जाऊन देखरेख करते किंवा एखाद्या बाबीचा पाठपुरावा करते असे चित्र दिसत नाही. तेव्हा हे मिशन फक्त कागदोपत्री आहे की काय अशी मला शंका येते. तेव्हा कार्यप्रणाली बाबत मंत्री महोदया प्रकाश टाकतील काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी डॉ.शांतीलाल कोठारी यांच्या बरोबर मिटींग घेतली काय असा प्रश्न विचारला. त्या बाबत सांगू इच्छिते की, यापूर्वी देखील त्यांच्या सोबत माझी बैठक झालेली आहे. पुन्हा दिनांक 28 जुलै रोजी त्यांच्या सोबत माझी बैठक आहे.

सन्माननीय सदस्यांनी कार्यप्रणाली बाबत उल्लेख केला. त्या बाबत सांगू इच्छिते की, आपल्याकडे एकूण 40 हजार 845 गावे आहेत. एकूण 86 हजार 166 अंगणवाड्या आहेत. सॅन मॅन फ्री अशी एकूण 20 हजार 033 गावे आहेत तर 50 हजार 332 अंगणवाड्या सॅन मॅन फ्री आहेत. सॅन मॅन फ्री आणि एस.यु.डब्ल्यू व एम.यु.डब्ल्यू म्हणजेच अंडरवेट मुले नाहीत अशी जवळपास 4 हजार 852 गावे आहेत. 10 हजार 978 अंगणवाड्या आहेत. महिला व बाल विकास विभाग आणि आरोग्य विभागाचे जिल्हापातळीवर सीडीपीओ आणि डीएचओ अधिकारी असतात. या दोघांच्या माध्यमातून तसेच अंगणवाडी सेविका, एएनएम व आशा यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम राबविण्यात येतो. विभागामार्फत विविध कार्यक्रम आयोजत करण्यात आले आहेत. यामध्ये माता व कुटुंब सक्षमीकरण हा एक केंद्रबिंदू आहे. तसेच किशोरी मुली, गर्भवती महिला, स्तनदा माता, कमी वजनाची बालके इत्यादी संबंधी समुपदेशन करण्याचे काम सुरु आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, लेखी उत्तरात नमूद केले आहे की, " महाराष्ट्र कुपोषणमुक्त करण्यासाठी राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्रामअभियान दिनांक 14.11.2011 ते दिनांक 7.4.2012 या कालावधीत राबविण्यात आले." पुढे असे म्हटले आहे की, "सदर अभियान राबविण्याकरिता निधीचा वापर करण्यात आलेला नाही." माझा प्रश्न आहे की, हे अभियान कोणत्या निधीतून राबवियात आले, कोणासाठी राबविण्यात आले, या अभियानाचा किती विद्यार्थ्यांना फायदा झाला ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मानननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या हस्ते दिनांक 2 ऑक्टोबर 2011 रोजी "राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्राम अभियान" सुरु करण्यात आले. महिला बाल विकास विभाग, आरोग्य विभाग, ग्राम विकास विभाग व आदिवासी विकास विभाग या विभागांनी एकत्र येऊन हे अभियान राबवावे अशी संकल्पना होती. या अभियानाच्या माध्यमातून जी गावे कुपोषण मुक्त होतील त्या गावांना पुरस्कार देण्यात येतील. त्यानुसार दिनांक 14.11.2011 ते 7.4.2012 या कालावधीत ज्या ज्या गावांनी चांगले काम केले त्या गावांना पालक मंत्री महोदयांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. लेखी उत्तरामध्ये मी 18 गावांचा उल्लेख केलेला आहे. 18 गावांपैकी 17 गावे या अभियानांतर्गत कुपोषण मुक्त झाली. तर एक गाव त्या पूर्वीच कुपोषण मुक्त झाले होते. नागपूर जिल्ह्यामध्ये एकूण 105 गावे कुपोषण मुक्त झाली आहेत. त्यातील 12 गावे अभियाना पूर्वी कुपोषण मुक्त झालेली आहेत. यातील 91 गावे बिगर आदिवासी विभागातील आहेत तर 4 गावे आदिवासी विभागातील आहेत. या गावांना पालक मंत्री महोदयांच्या हस्ते पुरस्कार दिलेला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, रॅन्डम सर्व्हे करण्यात आला काय, हा सर्व्हे कोणत्या महिन्यात करण्यात आला, लोकांचे स्थलांतर झाल्यानंतर हा सर्व्हे करण्यात आला काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, ज्या वेळी हे अभियान सुरु झाले त्यावेळी आपण गावात कमिट्या केल्या होत्या, त्यामुळे रॅन्डम सर्व्हे होऊ शकत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नाचे वेगळेच उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे.

------



अमुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**राज्यातील दुष्काळी स्थितीमुळे लाखो हेक्टर क्षेत्रावरील फळबागा उध्वस्त झाल्याबाबत**

**(4) * 31174 श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.केशवराव मानकर** : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील दुष्काळी स्थितीमुळे किमान 1 लाख हेक्टर क्षेत्रावरील फळबागा उध्वस्त झाल्याचे कृषी विभागाने केंद्र शासनाला कळविले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, गेल्या दोन महिन्यात दुष्काळाची तीव्रता अधिक तीव्र झाल्याने तब्बल तीन लाख हेक्टर वरील फळबागा नष्ट झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, फळबाग शेतकऱ्यांना केद्र सरकार व राज्य सरकारकडून किती मदत जाहीर झाली आहे वा जाहीर करण्यात येणार आहे?

**डॉ.विजयकुमार गावित** : (1) राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे अंदाजे 1 लाख हेक्टर क्षेत्रावरील फळबाग उध्वस्त झाल्याचे राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागास कळविण्यात आले आहे.

(2) दोन जिल्ह्यातील टंचाईमुळे फळबागांच्या बाधित क्षेत्रात 65138.60 इतकी वाढ झाल्याने एकूण बाधित क्षेत्र 169564 हेक्टर इतके झाले.

(3) फळबागांच्या बाधित क्षेत्राकरीता राज्य शासनाने अल्प आणि अत्यल्प भूधारकांना दोन हेक्टरच्या मर्यादेत व मोठ्या शेतकऱ्यांना एक हेक्टरच्या मर्यादित प्रती हेक्टरी रुपये 8,000/- या प्रमाणे मदत जाहीर केली आहे.

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.अजित 11:30

ता.प्र.क्र.31174...

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील प्रमाणे दुरुस्ती करीत आहे.

अनुक्रमांक 1 मध्ये " राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे अंदाजे 1 लाख हेक्टर क्षेत्रावरील फळबाग "उध्वस्त" झाल्याचे या ऐवजी " राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे अंदाजे 1 लाख हेक्टर क्षेत्रावरील फळबाग "बाधित" असे वाचावे.

त्यानंतर अनुक्रमांक 2 मध्ये "दोन जिल्हयातील टंचाईमुळे फळबागांच्या बाधित क्षेत्रात 65138.60 इतकी वाढ झाल्याने एकूण बाधित क्षेत्र 169564 हेक्टर इतके झाले" या ऐवजी " दोन जिल्हयातील टंचाईमुळे फळबागांच्या बाधित क्षेत्रात 37632 इतकी वाढ झाल्याने एकूण बाधित क्षेत्र 147159 हेक्टर इतके झाले असे वाचावे. उर्वरित उत्तर छापल्या प्रमाणे.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात दिलेल्या आकडेवारीत सुधारणा केली व खरे बोलले म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो. द्राक्ष, संत्रा, चिंच, आंबा,मोसंबी, जांभूळ, केळी इत्यादी फळपिके लावण्यासाठी एकरी खर्च किती येतो, या फळपिकांना फळे येण्यासाठी किती काळ लागतो, या फळझाडांची वयोमर्यादा किती, फळपीकवाईज शेतकऱ्यांचे किती नुकसान होत आहे, फळबाग बाधित शेतकऱ्यांना 80 कोटी रुपयांची मदत देण्याचे शासनाने जाहीर केलेले आहे. परंतु पुरवणी मागण्यांमध्ये या तरतुदीचा कोठेही उल्लेख दिसून आलेला नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांना सांगू इच्छितो की, आपण उप प्रश्न पाच वर आलात आणि पुन्हा प्रश्न फिरवावयास लागला आहात. जेवढे उप प्रश्न विचारले आहेत, त्यासंबंधी माननीय मंत्री महोदयांना उत्तर देऊ द्यावे.

श्री.सय्यद पाशा पटेल : शेतकरी आणि दुष्काळ याच्यांशी संबंधित हा प्रश्न आहे.

**सभापती** : आहे, हा प्रश्न शेतकऱ्यांशी संबंधित आहे ही गोष्ट मलाही मान्य आहे. सन्माननीय सदस्यांनी जास्तीत जास्त दोन उप प्रश्न विचारावेत. जास्तीत जास्त तीन उप प्रश्न विचारावेत, वेळ प्रसंगी चार उप प्रश्न विचारावेत. उप प्रश्न विचारण्याच्या बाबतीत कोठे तरी थांबले पाहिजे.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, आपण उप प्रश्न विचारण्यासाठी दुसऱ्यांदा संधी देणार असाल तर मी दोन,दोन प्रश्न विचारतो.

2...

ता.प्र.क्र.31174.....

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी उप प्रश्नांची उत्तरे देण्यास सुरुवात करावी.

डॉ. विजयकुमार गावित : सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी एकाच वेळी पाच प्रश्न विचारले आहेत, त्यामुळे त्यांचे उप प्रश्न मला समजले नाहीत. सन्माननीय सदस्यांना पुन्हा उप प्रश्न विचारावेत अशी माझी त्यांना विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी पुन्हा उप प्रश्न विचारावेत.

श्री.सय्यद पाशा पटेल : चिंच, आंबा, द्राक्ष, संत्रा, मोसंबी, केळी, जांभूळ या फळझाडांची लागवड करण्यास एकरी किती खर्च येतो, या फळझाडांना फळ येण्यास किती काळ लागतो, या फळझाडांची वयोमर्यादा किती, ही फळझाडे किती वर्षे फळे देतात, तुम्ही मोठया बाधित शेतकऱ्याला 8 हजार रुपये मदत देत आहात. लहान शेतकऱ्याला 2 हेक्टर क्षेत्रासाठी 8 हजार रुपये मदत देत आहात, ही रक्कम देणे शासनाला शोभते काय ?

यानंतर श्री. कानडे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 31174....

श्री. अजित पवार : सभापती महोदय, राज्यामध्ये अनेक प्रकारची फळझाडे आहेत. प्रत्येक झाडाचे आयुष्य हे वेगवेगळे असते. चिंचेचे झाड 50-60 वर्षापर्यंत जगू शकते. आंब्याच्या झाडाचा विचार केला तर कलमी आंब्यापेक्षा गावठी आंब्याचे झाड जास्त वर्षे जगते. द्राक्ष लागवडीसाठी मंडप टाकणे, फवारणी करणे आदी गोष्टी कराव्या लागतात. काही बहाद्दर शेतकरी तर दीड वर्षात सुध्दा द्राक्षाचे पीक घेतात. एखादा शेतकरी झाडाकडे दुर्लक्ष करीत असेल तर 2/2 किंवा 3/3 वर्षे फळ येण्यासाठी लागू शकतात. झाडाला फळे येण्यासाठी तो शेतकरी कष्ट किती करतो यावर बरेच काही अवलंबून आहे. तसेच निसर्गाच्या लहरीवर सुध्दा काही प्रमाणात झाडांना फळे येणे अवलंबून आहे. पाऊस चांगला झाला असेल, दरवर्षी व्यवस्थितपणे शेतकऱ्याने मशागत केली असेल, खते आणि फवारणी व्यवस्थितपणे केली असेल तर दरवर्षी झाडाला फळे येतात हेसुध्दा आपल्याला पहावयाला मिळेल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितल्याप्रमाणे हेक्टरी 8 हजार रुपयांची मदत दिली जाणार आहे ती कमी आहे. यासंदर्भात निर्णय करण्यासाठी मंत्रिमंडळातील माझ्या सहकाऱ्यांसोबत मी चर्चा केली. संपूर्ण देशपातळीवर याबाबतीत काही निकष ठरविण्यात आलेले आहेत. हेक्टरी 8 हजार रुपयांची मदत म्हणजे एकरी तीन ते सव्वातीन हजार रुपये मदत मिळू शकेल. माननीय सदस्यांनी यासंदर्भात हेक्टरी मदत अतिशय कमी आहे असा जो मुद्दा मांडला त्या आधारेच मंत्रिमंडळातील माझे सहकारी श्री.पाचपुते, श्री. आर.आर.पाटील आम्ही चर्चा केली. त्यावेळी अशी माहिती देण्यात आली की, महिना-दोन महिन्या काळामध्ये बागांना पाणी मिळावे मग ते ठिबक सिंचनाने असेल, टँकरने असेल, बैलगाडीने असेल त्यासाठी जो पैसा लागणार आहे त्यामध्ये शेतकऱ्याला मदत होईल हे पाहिले जाणार आहे. शेतकऱ्याला 100 टक्के मदत देणे अशक्य आहे.शेतकऱ्याचे जे क्षेत्र बाधित होते त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार 100 टक्के मदत देऊ शकत नाही. ही मदतीची आकडेवारी काढली तर ती हजारो कोटी होईल आणि त्याचा अर्थसंकल्पावर परिणाम होऊ शकेल. माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी जे मत व्यक्त केले त्या मताशी राज्य शासन सहमत आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) H-1

ता.प्र.क्र. 31174.... श्री. अजित पवार....

परंतु या ना त्या कारणाने शेतकऱ्याला मदत कशी देता येईल याचा विचार केला जाईल. पीक कर्ज कसे मिळेल किंवा कर्जाचे पुर्नगठन कसे होईल त्यासाठी त्याला पात्र ठरविणे, व्याजात सवलत देणे अशा बाबी आहेत त्याचा विचार राज्य शासन करीत असून शेतकऱ्याला अडचणीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात आहे.

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यात 2 लाख 47 हजार हेक्टर क्षेत्रातील फळबागांचे नुकसान झालेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, दुष्काळ संपेपर्यंत किती नुकसान झाले आहे याचा सर्व्हे करुन,अंदाजपत्रके करुन ,पाणी टंचाई आहे तोपर्यंत जे शेतकरी बाधित होतील त्यांचा मदतीमध्ये समावेश केला जाईल काय व त्याप्रमाणे नुकसान भरपाई दिली जाणार आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, सध्या हेक्टरी 8 हजार रुपयांची मदत शासनाने जाहीर केली आहे त्यामध्ये वाढ केली जाईल काय ?

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, ज्येष्ठ सदस्य श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी विचारल्याप्रमाणे निश्चितपणाने दुष्काळी परिस्थिती आहे तोपर्यंत जे जे बाधित क्षेत्र होईल त्यातील शेतकऱ्यांचा मदतीसाठी समावेश केला जाईल. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे नव्याने कर्ज देणे किंपर असलेले कर्ज पुनरुज्जीवित करणे इ.बाबतीत सूट देण्याबाबत निश्चितपणाने विचार करण्यात येईल.

श्री. पाशा पटेल :सभापती महोदय, लेकरु मेल्यानंतर जेवढे दु:ख होत नाही तेवढे झाड वाळल्यावर होते. झाडाच्या उंचीपेक्षा जास्त उंचीचे उत्तर माननीय उपमुख्यमंत्री यांनी दिले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. शेतकऱ्यांची झाडे वाळली आहेत. महाराष्ट्रातील शेतकऱ्याला परत उभा करण्यासाठी शासन काय मदत करणार आहे ? आज मदत जाहीर करावी अशी शासनाला विनंती आहे. महाराष्ट्रातील शेतकरी दुवा देतील. नुकसान भरपाई देता येत नाही तर निदान शेतकऱ्याला संकटातून उभे करण्यासाठी पुन्हा कर्ज तरी द्यावे अशी माझी विनंती आहे.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री. खर्चे...

ता. प्र. क्र. 31174.........

श्री. अजित पवार : महोदय, रोजगार हमी योजनेशी निगडित फलोत्पादन योजना आपण राज्यात सुरु केली. त्यामुळे संपूर्ण राज्याचे चित्र बदलले ही गोष्ट खरी आहे. सध्याच्या टंचाईच्या काळात देखील जर शेतकऱ्याची संपूर्ण बाग जरी नष्ट झाली तरी आपण फलोत्पादन योजनेच्या माध्यमातून त्या शेतकऱ्याला नवीन कर्ज घेण्यास पात्र ठरवून कर्ज देण्याचे काम करता येते व तसे शासन निश्चितपणे करील.

श्री. विनोद तावडे : महोदय, आज फळबागांचे नुकसान झाले म्हणून माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा यांनी जी घोषणा केली अशाच प्रकारे कोकणातील आंबा नुकसानीच्या संदर्भात मागील अधिवेशनात शासनाने सांगितले होते की, आंब्याच्या नुकसानीबाबतचा सर्व्हे करुन मदतीबाबतची घोषणा करण्यात येईल. माझी अशी विनंती आहे की, किमान या वर्षी ही घोषणा अपेक्षित आहे, ती शासन करणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, आंब्याच्या नुकसानीचा सर्व्हे करुन त्याबाबत मदत करण्याची भूमिका शासन घेणार आहे.

श्री. विनोद तावडे : महोदय, मागील अधिवेशनातच सांगण्यात आले होते की, आंबा नुकसानीबाबत सर्व्हे करण्यात येईल पण त्याबाबत काय परिस्थिती आहे हे सांगितले पाहिजे.

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, आता आंब्याचा सर्व्हे करण्यासारखी परिस्थिती नसली तरी एकंदरित आंबा नुकसानीच क्षेत्र किती होते हे विचारात घेऊन काय मदत करता येईल हा विषय मंत्रिमंडळासमोर आहे.

--------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे येथील खडकवासला धरणाच्या कालव्यातून होणारी पाणी गळती व मुळा मुठा कालव्यातून होणारी पाण्याची चोरी थांबविण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(5) *30782 श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे, श्री.मोहन जोशी, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव** : सन्माननीय **जलसंपदा ( कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

1) पुणे शहरातील खडकवासला धरणात पाण्याचा साठा कमी असताना तसेच धरणाच्या कालव्याला सिंहगड रस्त्यावर तडा गेल्याने धरणातून पाणी गळती तसेच मुठा कालव्यातून पाण्याची चोरी होत असल्याचे माहे मे, 2012 च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

2) तसेच पाण्याचा साठा कमी असताना पाटबंधारे विभागाकडून पाण्याची गळती आणि चोरी याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

3) असल्यास, प्रश्न भाग (1) व (2) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार खडकवासला धरणाच्या कालव्यातून होत असलेली पाण्याची गळती आणि चोरी थांबविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

5) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री.रामराजे नाईक निंबाळकर यांच्याकरिता** : (1) कालव्यास तडा गेला नाही. परंतु कालव्याच्या काही भागात गळती आहे.

(2) नाही

(3) क्षेत्रीय कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(4) कालव्यातून होणाऱ्या गळतीचे प्रमाण खूपच कमी आहे. तथापि, गळती प्रतिबंधाचे काम हाती घेण्यात येत आहे. पाणी चोरीबाबत संबंधितांवर दंडनीय कारवाई केली आहे.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. अनिल भोसले: महोदय, पुणे शहरात ज्या धरणातून पाणीपुरवठा केला जातो त्यात मोठ्या प्रमाणावर गळती होत आहे. खडकवासला ते पर्वती जलशुध्दीकरण केंद्रांबाबत जो अहवाल आला होता त्यात असे म्हटले होते की, 2200 मि.मि.व्यासाची नवीन जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे. तशी नवीन जलवाहिनी टाकून पाणी पुरवठ्याची क्षमता वाढविण्याचा शासनाचा विचार आहे काय, तसेच या कामासाठी शासन आर्थिक मदत देण्याबाबत विचार करणार काय ?

श्री. अजित पवार : महोदय, एक गोष्ट खरी आहे की, वरसगांव, पानशेत, टेमघर आणि फुरसुंगी या चार धरण क्षेत्रातून पुणे शहराला पाणीपुरवठा केला जातो. त्याचबरोबर हवेली, इंदापूर आणि दौंड या तीन तालुक्यांना शेतीसाठी सुध्दा पाणी याच धरणांमधून दिले जाते. खडकवासला धरणातून फुरसुंगीकडे कॅनॉल निघतो त्यात एक कॅनॉल रेस कोर्सच्या खालून गेला

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ......... ता.प्र.क्र.30782.......

आहे. जलसंपदा विभागाने याबाबतचा सर्व्हे केला होता त्यावेळेस ही गोष्ट लक्षात आली. तसेच येथे सन्माननीय सदस्यांनी सांगितले की या पाईपलाईनला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या, पण तसा एवढा मोठा प्रकार नाही. एक गोष्ट खरी आहे की, जर आपण टनेलच्या माध्यमातून डायरेक्ट खडकवासला कॅनॉलला सुटणारे पाणी फुरसुंगीला काढले तर जवळपास 3 टीएमसी इतक्या पाण्याची बचत होते. याउलट एखादे नवीन धरण घ्यावयाचे असेल तर त्याला 100-150 कोटी एवढा खर्च येतो, त्यात पुन्हा पुनर्वसनाचे व इतर वेगवेगळे प्रश्न या बाबी समोर येतात. तसेच निधीची उपलब्धता लक्षात घेऊन पाईपलाईनचे काम प्राधान्याने करावे व नवीन धरणाबाबतचा विचार नंतर करावा अशीही तेव्हा चर्चा झाली होती. पूर्ण पुणे शहराच्या हद्दीतून जो कॅनॉल गेला त्याची जागा, दोन्ही बाजूच्या भरावाची जागा व त्यातून रस्ता काढला तर असे सर्व प्रश्न लक्षात घेऊन काही जागा विकासकासाठी दिली व त्या बदल्यात कार्पोरेशनने जलसंपदा विभागाला टीडीआर दिला तर त्याच पैशातून हा टनेल करावयाचा यासाठी दोन वेळा बैठका झाल्या पण त्या बैठकांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची चर्चा उपस्थित झाल्यामुळे सध्या तरी तो विषय बाजूला ठेवला आहे. एक गोष्ट मात्र निश्चितपणे केली पाहिजे की, यातून शेतकऱ्यांसाठी पाणी उपलब्ध होईल आणि पुण्याचे नागरिकरण मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने या वाढत्या लोकसंख्येची पाण्याची गरज भागविण्यासाठी देखील मदत होणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 30782......

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणेकरांच्या व पुणे ग्रामीण भागातील जनतेचा हा महत्वाचा प्रश्न आहे. या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी टनेलच्या माध्यमातून पाणी देण्याचा उल्लेख केलेला आहे. गेल्या 4-5 वर्षापासून टनेलच्या माध्यमातून पाणी पुरवठा करण्याची चर्चा आम्ही ऐकत आलेलो आहोत परंतु त्यामध्ये पुढे काहीही हालचाल झालेली दिसत नाही. पाणी टनेलच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले जाणार आहे परंतु टनेलसाठी कशा प्रकारे निधी उभारला जाणार आहे ? या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, पाणी गळती प्रतिबंधाचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे पाणी गळती प्रतिबंधाच्या कामाला कधी सुरुवात करण्यात आली होती ? काही उड्डाण पूल कंत्राटदार यातून पाणी चोरत असल्याची बाब दिसून आलेली आहे. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून टीडीआर देणे हा भाग तांत्रिक दृष्टया योग्य आहे की, नाही तो जरुर तपासून घेतला जावा. यामध्ये जे लोक काम करणार आहेत त्यासंदर्भातील सर्व माहिती जनतेसमोर पारदर्शकपणे आली तर यासाठी सर्व पक्षांचे सहकार्य मिळू शकेल.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, राज्य सरकारने ई-टेंडरींगचे धोरण स्वीकारलेले आहे त्यामुळे यासंदर्भात जेव्हा टेंडर काढले जाईल तेव्हा ते ई-टेंडरींगनेच काढले जाईल. यासंदर्भातील जो काही निर्णय घ्यावा लागेल तो सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच करावा लागणार आहे. खडकवासला धरणातून बंद पाईपलाईनद्वारे पुण्यातील 100 टक्के नागरिकांना पाणी दिले जाऊ शकत नाही. खडकवासल्यातून पुण्याला पाणी पुरवतांना कॅनॉल सुध्दा सुरु ठेवावा लागत असतो. कॅनॉल बंद करावयाचा म्हटले तर पुणे शहराच्या पिण्याच्या पाण्यावर त्याचा परिणाम होत असतो. त्यामुळे कॅनॉल सुरु ठेवून गळती काढण्याचे काम करणे अवघड होऊन बनते. कृष्णा खोरे महामंडळाने काही महिन्यापूर्वी कॅनॉलमधील गाळ काढण्याचे काम केले होते. कॅनॉल झाल्यापासून कॅनॉलमधील गाळ काढणे किंवा कॅनॉलमधील लिकेजेस काढण्याचा प्रयत्न या अगोदर झाला नव्हता. परंतु या कॅनॉलमधील गाळ काढण्यासाठी कॅनॉल काही काळासाठी बंद करण्यात आला होता. रात्रंदिवस काम करुन कॅनॉलमधील गाळ काढण्याचे काम करण्यात आले होते. परंतु गाळ काढतांना 100 टक्के गाळ काढला गेलेला नाही हे मी मान्य करतो. त्यामुळे पुन्हा या कॅनॉलमधील गाळ व लिकेजेस काढण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 30782......

श्री. अजित पवार ....

या कामासाठी पैसे उभे करीत असतांना ते पैसे बजेटमधून उभे करणे व हे सर्व पैसे याच कामावर खर्च करणे यासंदर्भात माननीय राज्यपाल महोदयांनी जे निर्देश दिलेले आहेत त्यानुसार असे करणे शक्य होणार नाही. दुसरी बाब अशी आहे की, हे काम बीओटी तत्वावर केले तर त्यासंदर्भात वेगळया प्रकारची चर्चा होत असते. टीडीआर देऊन हे काम करण्याची चर्चा सुरु आहे परंतु वॉटर बॉडीवर टीडीआर देता येत नाही असे नगरविकास खात्याचे म्हणणे आहे. त्यामुळे यासंदर्भात मार्ग काढावयाचा असेल तर त्यासंदर्भातील धोरण आपल्याला बदलावे लागणार आहे. वेळ पडली तर नियम बदलावे लागतील, स्पेशल केस करावी लागेल व हे सर्व काम माननीय मुख्य मंत्र्यांच्या स्तरावरच होऊ शकते. या प्रश्नाच्या निमित्ताने मी माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन मार्ग काढण्याचा निश्चित प्रयत्न करेन.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या पुणें शहराच्या पाण्याच्या संदर्भात वारंवार गळती होत असते. पाण्याची गळती किंवा पाण्याची चोरी किती प्रमाणात होते यांसदर्भात मोजमाप करणारी यंत्रणा उपलब्ध आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, यासंदर्भातील नेमकी माहिती घेऊन सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येईल.

-------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सांगली येथील वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयात सेवासुविधा उपलब्ध करून तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करणेबाबत**

**(6) * 30019 श्री.भगवान साळुंखे , श्री.रामनाथ मोते , श्री.चंद्रकांत पाटील** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सांगली येथील वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयात सेवासुविधांचा अभाव असून अत्याधुनिक उपकरणे, यंत्र सामुग्री, तज्ञ डॉक्टर, रुग्णवाहिका, औषधासाठी पुरेसा निधी नसणे, डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या असलेल्या रिक्त जागा अशा अनेक सुविधांचा अभाव असून रुग्णालयाचे स्थलांतर होणार असल्याने जिल्ह्यातील गोरगरिबांसाठी असलेल्या या रुग्णालयामध्ये अनेक सुविधांची कमतरता असल्याचे माहे मे, 2012 च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रुग्णालयाची व्यवस्था सुधारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.विजयकुमार गावित** : (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, सांगली जिल्हयातील वसंतदादा पाटील शासकीय रुग्णलयाच्या संदर्भातील प्रश्न असून हा प्रश्न या सदनात वारंवार येत असतो. या हॉस्पिटलच्या स्थलांतराच्या बद्दल संशय असून त्याची वस्तुस्थिती काय याचे स्पष्टीकरण माननीय मंत्रीमहोदयांनी करावे अशी विनंती आहे. वसंत दादा सिव्हील हॉस्पिटल्स बद्दल शासनाची उदासीनता वारंवार दिसून येत असते. या हॉस्पिटलच्या संदर्भात दोन तीन वेळा बैठका सुध्दा झालेल्या आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.कं.30019

श्री.भगवान साळुंखे...

त्या बैठकीमध्ये प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय, असल्यास त्याचे स्वरूप काय आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी प्रश्न विचारलेला आहे. स्थलांतराबाबत मी आजच सभागृहाला सांगू इच्छितो की, सन 2007 मध्ये स्थलांतरा संबंधीचे आदेश काढले होते ते रद्द करण्यात येतील. त्यांनी प्रस्तावासंबंधी देखील विचारणा केली आहे. पूर्वी मेडिसीनसाठी बरेच पैसे देणे बाकी होते. त्यामुळे त्यांना प्रस्ताव पाठवावा मी पैसे देतो असे सांगितले होते. आज तेथे सीटी स्कॅन आणि एमआरआय मशीन नाही. ते बसवायचे असल्यामुळे प्रस्ताव पाठवावा असे सांगितले होते. सीटी स्कॅन आणि एमआरआय सेवा आऊट सोर्सिंगद्वारे करणार आहोत. त्यामुळे ते मशीन बसवायचे थांबले आहे. लवकरच आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून सीटी स्कॅन आणि एमआरआय मशीन बसविले जाईल.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात परिचारिकांची रिक्त पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही**

**(7) * 31338 डॉ.सुधीर तांबे , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , श्रीमती अलका देसाई , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.उल्हास पवार , श्री.मनीष जैन , श्री.अनिल भोसले , श्री.हेमंत टकले , श्री.जयवंतराव जाधव** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील आरोग्य सेवा सांभाळण्यासाठी अजून 60 हजार परिचारिकांची आवश्यकता असून ग्रामीण भागात लसीकरण, प्रसूती कुटुंब कल्याणाचा बोजाही या परिचारिकांवर टाकला जात आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच खाजगी रूग्णालयातील परिचारिकांची पिळवणूक होत असून किमान वेतनाचा कायदा खाजगी रूग्णालयातील परिचारिकांना लागू केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, राज्यातील परिचारिकांची रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(4) खाजगी रूग्णालयातील परिचारिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री.सुरेश शेट्टी** : (1) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय रुग्णालयामध्ये परिचारिकांची 1014 पदे रिक्त आहेत. लसीकरण, प्रसूती, कुटुंब कल्याण इ.बाबी परिचारिकांच्या कर्तव्याचा भाग आहे.

(2) हे खरे नाही.

खाजगी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदा लागू करण्यात आलेला आहे.

(3) सरळ सेवेतील 1041 पदे भरण्यासाठी डिसेंबर, 2011 मध्ये जाहिरात देण्यात आली होती. त्यामधून 671 उमेदवार उपलब्ध झाले असून त्यांचे नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे. पदोन्नतीची 9 पदे भरण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्राथम्याने करण्यात येत आहे.

(4) या संदर्भात विभागास निवेदन प्राप्त झाल्यास त्यावर विचार करण्यात येईल.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, अनेक रिक्त पदे भरण्याचा प्रयत्न केला आहे असे शासनाचे म्हणणे आहे. तरी देखील आज महापालिकेतील रूग्णालयांसाठी परिचारिका मिळालेल्या नाहीत. परिचारिका कमी मिळालेल्या आहेत. परळ येथे एमजीएम रूग्णालय आहे. तेथे मिडवाईफ कोर्स केलेल्या परिचारिका आहेत, त्यांना अद्यापही नोकरीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. महापालिका आणि सरकारी रूग्णालयातून कोर्स उत्तीर्ण केलेल्या परिचारिकांना त्याच विभागामध्ये नोकरीत सामावून घेतले जाते. तेव्हा परळ येथील एमजीएम रूग्णालयातून कोर्स पूर्ण केलेल्या नर्सेसना कधी नोकरीवर घेण्यात येणार आहे ? ..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31338...

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छोजेड हे मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी संबंधित असलेला प्रश्न विचारत आहेत.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, हा मुंबई महानगरपालिकेशी संबंधित प्रश्न नाही.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी परळ येथील एमजीएम रूग्णालयासंबंधी प्रश्न विचारलेला आहे. शासनाने आता धोरणात्मक निर्णय घेतला आहे. शासनातर्फे नर्सिंग स्कूल चालविण्यात येते. त्यातून पास आऊट होणाऱ्या नर्सेसना आपण दोन वर्षांचा बाँडेडने आपल्या सेवेत घेतो. शासकीय सेवेत राहण्याची आवड असली तरी त्यांना ओपन मेरिटमधून परीक्षा देऊन यावे लागते. त्यामुळे आम्ही असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, जे दोन वर्षाचा बाँडेड पिरिएड पूर्ण करतील त्यांना या वर्षी डॉक्टर्सना जसे रिक्रूट केले आहे त्याप्रमाणे रिक्रूट करण्यात येईल. डॉक्टरांनी शासकीय सेवेत 1 वर्ष, 2 वर्षे, 3 वर्षे काम केले तर त्यांना 2 गुण, 5 गुण जादा देऊन, प्राधान्य देऊन शासकीय सेवेत सामावून घेतले आहे. त्याच पद्धतीने नर्सेसना ज्यांनी 2 किंवा त्या पेक्षा जास्त काम केले आहे त्यांना अतिरिक्त गुण देऊन रिक्रूटमेंट प्रोसेसमध्ये मदत करणार आहोत. आता 600 ते 650 नर्सेस मुली पास आऊट झाल्या आहेत. त्यापैकी ज्या शासनाच्या आरोग्य खात्यामध्ये काम करीत आहेत, ESI रूग्णालयामध्ये काम करीत आहेत DEMR मध्ये काम करीत आहेत त्यांना आपण घेणार आहोत. आता आपण 1014 पदांसाठी जाहिरात काढणार आहोत. त्यात अशा सर्व नर्सेसना प्राधान्य देऊन सिलेक्शनमध्ये मदत करणार आहोत.

.....

**<u>ता.प्र.क्र.30215</u>**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

...4

**दौंड (जि. पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या महिलेचा झालेला मृत्यू**

**(9) * 31269 डॉ.नीलम गोऱ्हे** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दौंड (जि. पुणे) येथील ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या गर्भवती ऊसतोडणी मजूर सुनिता लक्ष्मण खाडे (वय 26, रा. पाटोदा, जि. अहमदनगर) ह्या महिलेचा दिनांक 21 मार्च, 2012 रोजी वा त्या सुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, रुग्णालयाच्या बेशिस्त कारभारामुळे माता व बालकाचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(4) असल्यास, तद्नुसार उक्त रुग्णालयावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे तसेच मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना शासनाने आर्थिक मदत दिली आहे काय,

(5) नसल्यास, याची कारणे काय आहेत?

**श्री.सुरेश शेट्टी** :(1) होय.

(2) हे अंशत:खरे आहे.

सदर रुग्णालयाचे रक्त साठवण केंद्र प्रशिक्षित वैद्यकीय अधिकाऱ्यांची बदली झाल्यामुळे बंद असल्याने ससून हॉस्पिटल, पुणे येथे रुग्णास हलविण्याचा सल्ला नातेवाईकांना देण्यात आला होता. तथापि, नातेवाईकांकडून त्यास लेखी स्वरुपात नकार दिलेला आहे.

(3) होय, चौकशी केली आहे.

(4) संबंधित वैद्यकीय अधिक्षक (प्रभारी) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना शासनाने आर्थिक मदत दिलेली नाही.

(5) माता मृत्यू रुग्णास आर्थिक मदत देण्याची तरतूद नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, श्रीमती सुनिता खाडे ह्या ऊस तोड कामगार होत्या. त्यांना प्रसववेदना होऊ लागल्यामुळे रूग्णालयामध्ये नेण्यात आले. तेथे नेल्यावर प्रायव्हेट डॉक्टरकडे जाऊन सोनोग्राफी करावी असे सांगण्यात आले. प्रायव्हेट डॉक्टरकडे सोनोग्राफी केल्यानंतर बाळ मृत आढळलले. उत्तरात आपण म्हटले आहे की, "नातेवाईकांकडून त्यास लेखी स्वरूपात नकार दिलेला आहे."

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 31269....

डॉ. नीलम गोऱ्हे....

प्रश्न असा आहे की, गरीब वस्तीमध्ये राहणाऱ्या एका बाईला दौंड सारख्या ठिकाणाहून पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये जाण्याचा सल्ला दिला जातो. तसेच, रक्त साठविण्याचे केंद्र बंद होते व वैद्यकीय अधिकाऱ्याची बदली करण्यात आली असे उत्तरामध्ये सांगितले आहे. या वैद्यकीय अधिकाऱ्याची बदली केव्हा करण्यात आली व हे पद केव्हापासून रिक्त आहे? प्रभारी वैद्यकीय अधीक्षक यांना कारणे दाखवा नोटिस दिली आहे. दौंडमध्ये सोनोग्राफी मशिनची व्यवस्था का करण्यात आली नाही. परवा माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देतांना सांगितले की, महाराष्ट्रातील सर्व सोनोग्राफी मशिन चांगल्या स्थितीत आहेत. तर मग हे मशिन किती दिवसापासून बंद अवस्थेत आहे? किती डॉक्टरची पदे रिक्त आहेत. नातेवाईकांनी लेखी नकार दिल्याचे उत्तरात म्हटले आहे. हे लोक अल्पशिक्षित असल्यामुळे डॉक्टरने सांगितल्यानंर ते कुठेही सही करतात. तेथील स्थानिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आरडा ओरड केल्यानंतर हे डॉक्टर रेकॉर्ड क्रिएट करतात. त्या डॉक्टरांवर आपण कारवाई करणार काय, तसेच सोनोग्राफी सेंटर केव्हा पूर्ण होणार आहेत?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रश्न विचारला असल्यामुळे मी आज सकाळी या प्रश्नाचा पूर्णपणे अभ्यास केला. यामधील विषय फार गंभीर असल्यामुळे त्यांनी दोन-तीन मुद्दे उपस्थित केले आहेत. मला त्यांना सांगितले पाहिजे की, उप जिल्हा रुग्णालयांमध्ये सोनोग्राफी मशिन देण्याची तरतूद करण्यात आलेली नाही. या प्रकरणामध्ये एक महिला डिलिव्हरीसाठी हॉस्पिटलमध्ये दाखल झाली होती. त्या हॉस्पिटलमध्ये डॉ.शिंदे या गायनाकॉलॉजिस्टना प्रभारी सुपरिटेंडेंटचा चार्ज दिला होता. परंतु ते त्या ठिकाणी उपस्थित नव्हते. त्या महिलेला आपल्या ॲम्बुलन्समधून प्रायव्हेट सोनोग्राफी सेंटरमध्ये नेऊन तिची सोनोग्राफी करुन पुन्हा आणण्यात आले. त्या नंतर त्या महिलेचा सोनोग्राफी रिपोर्ट प्राप्त झाला असता त्यामध्ये फीट्स डेड झाल्याचे आढळले. ते फीट्स काढण्याचे काम गायनाकॉलॉजिस्टचे असते परंतु ते त्या हॉस्पिटलमध्ये उपस्थित नव्हते. याबाबत मी माहिती घेतली असता डॉ. शिंदे यांना अगोदर शो-कॉज नोटिस देण्यात आली होती. परंतु त्यांनी या कामामध्ये अत्यंत निग्लिजन्सी दाखविली असल्यामुळे त्यांना तत्काळ निलंबित करुन त्यांची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. डॉ. शिंदे हे यामध्ये जबाबदार असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

ता.प्र.क्र. 31269....

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, वाशिम जिल्ह्यातील 7 रुरल हॉस्पिटलपैकी 5 रुरल हॉस्पिटलमध्ये मेडिकल सुपरिटेंडेंट नाहीत. त्या जिल्हा रुग्णालयामध्ये जनरल सर्जन, फिजिशिएन, गायनाकॉलॉजिस्टची पदे भरलेली नाहीत. जनरल हॉस्पिटलचा पेशंट सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यासाठी येत असेल आणि त्या ठिकाणी फिजिशिएन, गायनाकॉलॉजिस्ट हे डॉक्टर नसतील तर कसे काम करणार आहात? याही पुढे जाऊन मी असे विचारु इच्छितो की,...

**सभापती** : माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील मी आपणास सांगू इच्छितो की, हा प्रश्न फक्त दौंडपुरता मर्यादित असल्यामुळे आपण त्या मर्यादेत राहून प्रश्न विचारावा.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, आरोग्य विभागामध्ये डॉक्टर्सचा निग्लिजन्सीपणा खूप आहे. अमरावतीच्या डेप्युटी डायरेक्टरचे पद अनेक दिवसांपासून रिक्त आहे. चार वर्षापासून प्रभारी अधिकारी होते आता तर त्या ठिकाणी नागपूर परिमंडळाचे अधिकारी प्रभारी म्हणून काम करीत आहेत. अशी वरच्या पातळीवर परिस्थिती असेल तर खालच्या पातळीवर चुका होत राहणार. या बाबी एकमेकांशी संबंधित असल्यामुळे मी हा प्रश्न विचारीत आहे.

**सभापती** : माननीय सदस्यांना मी पुन्हा सांगू इच्छितो की, आपण दिलेल्या माहितीसंबंधी स्वतंत्र प्रश्न विचारावा. आपल्याला त्या विषयावर अन्य माध्यमाचा वापर करुन चर्चा उपस्थित करता येईल. आता आपण फक्त दौंड येथील ग्रामीण रुग्णालयाच्या बाबतीत प्रश्न विचारावा.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागामधील रिक्त पदासंबंधी वारंवार चर्चा उपस्थित केली जाते. माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, गेल्या दोन वर्षामध्ये 3 हजार 100 वैद्यकीय अधिकाऱ्यांची नव्याने भरती करण्यात आली. तसेच दहा दिवसापूर्वी 550 स्पेशालिस्ट डॉक्टर्सना नेमणुकीची पत्रे दिली आहेत. यापूर्वी सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये स्पेशालिस्टची पदे भरली जात नव्हती फक्त वैद्यकीय अधिकाऱ्यांची वर्ग-1 ची पदे भरली जात होती. परंतु पहिल्यांदाच सामान्य प्रशासन विभाग व नियोजन विभागाची परवानगी घेऊन 550 स्पेशालिस्टची पदे क्रिएट केली आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 31269..... श्री. सुरेश शेट्टी...

त्याचप्रमाणे सर्व आदिवासी जिल्ह्यात, कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग या ठिकाणी वैद्यकीय अधिकाऱ्यांसह स्पेशालिस्टची पदे 100 टक्के पूर्ण केलेली आहेत.

आता आपल्याला काही ठिकाणी 1 हजार वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरावयाची आहेत. त्याची जाहिरात या महिन्यात आम्ही काढणार आहोत. यामध्ये 226 डॉक्टर्स ॲब्स्काँडींग होते. ते एक दोन वर्षे कामच करीत नव्हते. आपण पंधरा दिवस अगोदर त्यांच्या नावासह अशी जाहिरात दिली की, जर पंधरा दिवसात तुम्ही सेवेत रुजू झाला नाहीत तर तुम्हाला सेवेतून काढण्यात येईल. त्याची मुदत संपलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे 226 पैकी फक्त एक दोन डॉक्टर्स रुजू झाले. बाकीच्या सर्व डॉक्टरांना काढण्यात येईल. आता आमच्याकडे 3 हजार वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रतिक्षा यादी उपलब्ध आहे त्या यादीतून आम्ही 226 डॉक्टर्स घेणार. बाकीची 700 पदे रिक्त राहतील ती सुध्दा आम्ही तीन महिन्यात पूर्ण भरणार आहोत. हे वर्ष पूर्ण होण्याच्या अगोदर आरोग्य खात्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची सर्व पदे भरण्यात येतील. फक्त वर्ग एकच्या पदांमध्ये सह संचालक, उप संचालक ही पदे एमपीएससी मार्फत भरण्यात येतात. त्या संदर्भातील प्रोसेसच्या बाबतीत मॅटची स्टे ऑर्डर आहे. त्यामुळे त्या संदर्भात मी या ठिकाणी काही सांगू इच्छित नाही. पण वर्ग 2 चे वैद्यकीय अधिकारी, नर्सेस यांची जेवढी रिक्त पदे असतील ती 100 टक्के पदे डिसेंबरपर्यंत भरण्यात येतील.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, अधीक्षकाची चौकशी करण्यात येईल. कर्तव्यदक्ष मंत्री म्हणून माननीय मंत्री महोदयांची ख्याती आहे. त्याला सस्पेंड केले पाहिजे. गोरगरिबांनी कोठे जावे...

काही सन्माननीय सदस्य : त्यांना सस्पेंड केले आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत की त्याला सस्पेंड केले आहे त्यामुळे माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्यादित यांचा सन 2007-2008 या वर्षाचा अडतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. सचिन अहिर ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा सन 2009-2010 चे वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

--

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन 2010-2011 या वर्षाचा तेहतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांचा सन 2010-2011 या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन एकोणचाळीसावा अहवाल सन 2009-2010 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा परिषदांचे सन 2010-2011 चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.धनंजय मुंडे :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मंत्रालयास दि.21.6.2012 रोजी लागलेली भीषण आग, या आगीत शासनाच्या नगरविकास, महसूल, गृह व इतर खात्यातील फाईल्स जळून झालेले नुकसान, या आगीमुळे मंत्रालयाच्या सुरक्षेचा ऐरणीवर आलेला प्रश्न, लष्कर-ए-तोएया व इंडियन मुजाहिद्दीन आदी दहशतवादी संघटनांनी दक्षिण मुंबईत घडवून आणलेले बॉम्बस्फोट व दहशतवादी हल्ले, यामुळे मंत्रालयासह अनेक महत्वाच्या शासकीय इमारतींवर हल्ल्याची असलेली टांगती तलवार, या बाबी विचारात घेऊन मंत्रालयाची सुरक्षा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता, मंत्रालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या डावीकडे 100 मीटर अंतरावर कार्यरत असलेला पेट्रोल पंप तसेच आकाशवाणी गेटकडेही अंदाजे 150 मीटर अंतरावर असलेला पेट्रोल पंप यामुळे मंत्रालयास असलेला संभाव्य धोका पाहता हे दोन्ही पेट्रोल पंप सुरक्षित ठिकाणी हलविण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, हा विषय अतिशय गंभीर व मंत्रालयाच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने मी तो औचित्याच्या मुद्याद्वारे उपस्थित करीत आहे.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

करुण शिक्षण संस्था, वडगाव दादाहरी, ता.परळी, जिल्हा बीड ही शैक्षणिक संस्था असणे, श्री संचारेश्वर माध्यमिक विद्यालय, वडगाव, ता.परळी, जिल्हा बीड या शाळेस शासनाने 100 टक्के अनुदान दिले असून अनुदान प्राप्त करण्यासाठी संस्थेने बनावट कागदपत्रे व बोगस बी.पी.एल.धारक पालकांच्या शिधापत्रिका तयार करुन शासनाची फसवणूक करणे, शासनाकडे असंख्य तक्रारी प्राप्त होऊनही कोणतीही कारवाई न करणे, याच संस्थेची यमाईदेवी माध्यमिक विद्यालय, इंजेगाव येथे दुसरी शाळा सुरु असणे, या शाळेतील वर्षानुवर्षे काम करीत असलेल्या शिक्षकांना दमदाटी करणे, शाळेत येण्यास प्रतिबंध करणे, नवीन शिक्षक भरतीचा प्रयत्न करणे, शिक्षकांकडे लाखो रुपयांची खंडणी मागणे, संस्थेकडून गंभीर स्वरुपाचे गैरप्रकार होणे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यमाईदेवी माध्यमिक विद्यालय, इंजेगाव या शाळेची चौकशी लावणे, चौकशी करण्यासाठी जिल्ह्याचे उपशिक्षणाधिकारी श्री.देविदास बोरसे यांनी शाळेत प्रवेश केला असताना संस्थेच्या पदाधिका-यांनी शाळेत प्रतिबंध केला आहे. एवढेच नाही तर त्यांना शिवीगाळ केली आहे, मारहाण केली आहे. या प्रकरणी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. म्हणून मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, या संस्था चालकांनी शासकीय अधिकाऱ्यांना शिवीगाळ करुन मारहाण केलेली आहे, शासकीय कामात अडथळा निर्माण केलेला आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करावी यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे. याबाबतची सर्व कागदपत्रे मी आपल्यामार्फत शासनाकडे पाठवित आहे.

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महाराष्ट्र पोलीस यांचेसाठी कुटुंब आरोग्य योजना सुरु केलेली आहे. सदर योजनेचा पोलिसांना सेवेत असेपर्यंतच लाभ होणे, सदर योजना ही पोलिसांच्या सेवानिवृत्ती नंतर बंद होणे, सेवानिवृत्ती नंतर पोलिसांना गंभीर आजार झाल्यानंतर कोणत्याही सुविधा नसणे, तसेच कुटुंब आरोग्य योजनेमध्ये टायफाईड, फ्रॅक्चर, मलेरिया इत्यादींचा समावेश नाही. परंतु वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना सर्व आरोग्य सेवा उपलब्ध आहे. 12-14 तास उभे राहून जनतेची सेवा करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्ती नंतर सदर कुटुंब आरोग्य योजना सुरु करावी असा मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

-----

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अकराव्या विधानसभेच्या अखेरीस सन 2009 मध्ये सार्वत्रिक निवडणुकांच्या पूर्वी मंत्रिमंडळाने झोपडपट्टी पुनर्वसनाकरिता दि. 1 जानेवारी, 1995 ही पात्र झोपडपट्टीवासीयांची अर्हता मुदत वाढवून दि.1 जानेवारी, 2000 करण्याचा निर्णय घेतला आहे. मा.उच्च न्यायालयाचा सन 2006 चा निर्णय केवळ मुंबई शहरातील झोपडपट्टी पुनर्वसनाकरिता होता. मा.उच्च न्यायालयाच्या सदरहू निर्णयामुळे राज्यातील इतर शहरांमधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना प्रतिबंध केलेला नाही. तरी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे अशी विचारणा करतो की, सन 2009 ची झोपडपट्टी पुनर्वसनाकरिता असलेली पात्रता 1995 वरुन 2000 करण्याच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयाची अंमलबजावणी राज्यातील इतर शहरांमध्ये का करण्यात येत नाही, याबाबत शासनाने स्पष्टीकरण करावे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:10

श्री. मोहन जोशी....

तसेच पिंपरी-चिंचवड प्राधिकरणाच्या संबंधात नियमावली करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन शासनाने देऊनही अद्याप ती नियमावली तयार केली गेली नाही. तेव्हा ही नियमावली लवकरात लवकर करण्यात यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महाराष्ट्र राज्यातील टप्पा नं. 1 मधील ग्रामपंचायतीच्या निवडणुका सप्टेंबर/ऑक्टोबर 2012मध्ये प्रस्तावित असणे, परंतु त्यासाठी आरक्षित जागांसाठी लागणारे जात पडताळणी प्रमाणपत्राची मुदत संपलेली असणे, वास्तविक मुदत केव्हापर्यंत होती हे लोकांना माहीत नसल्याने मुदत वाढवून मिळण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने तत्काळ निर्णय घेऊन मुदतवाढ देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका यासंबंधी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही


MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:10

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

बीड जिल्ह्यातील माजलगाव शहरात एप्रिल 2012 पासून रॉकेल पुरवठ्यातील कपात कायम ठेवण्यात आली आहे. तालुक्यातील नागरिकांच्या आवश्यकते पेक्षा तीन महिन्यापासून साठ हजार लिटर रॉकेल कमी पुरवठा होत आहे. त्यामुळे पावसाळयाच्या दिवसात सामान्य नागरिकांपुढे इंधनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. तालुक्यात 73000 शिधापत्रिका आहेत. मार्च 2012 पर्यंत 22 टँकरने रॉकेलचा पुरवठा होत होता. एकूण 264 के.एल. रॉकेल उपलब्ध असल्याने शिधापत्रिकाधारकांना पाच लिटर प्रमाणे रॉकेल दिले जात असणे. परंतु एप्रिल पासून फक्त 17 टँकरने रॉकेलचा पुरवठा होत असणे, त्यातही घाऊक, अर्धघाऊक, हॉकर्स विक्रेत्याकडून भ्रष्टाचार होत असणे, 60 के.एल. रॉकेल कमी मिळत असणे, सद्या पावसाळा सुरु असणे, त्यात पुन्हा भारनियमन असणे, अशा वेळी रॉकेलची गरज वाढणे, दिवसेंदिवस मागणी वाढणे व पुरवठा कमी होणे त्यामुळे समाजात पसरलेली असंतोषाची भावना व शासनाने करावयाची तातडतोबीची उपाययोजना.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

गुरुवार दिनांक 21 जून 2012 रोजी मंत्रालयीन जळीतावेळी काही अपवाद वजा जाता सर्वच अधिकारी व कर्मचारी तसेच राज्यातून विविध कामानिमित्ताने आलेल्या सर्वच अभ्यागतांनी आग विझविण्यासाठी वैयक्तिक किंवा सामुदायिकरित्या लक्षणीय प्रयत्न केल्याचे दिसून आले नाही, याउलट सर्वजण स्वत:च्या संरक्षणासाठीच विशेष प्रयत्नशील राहिले, असाच अनुभव अपघात, नैसर्गिक आपत्ती, दंगली इत्यादी प्रसंगी सर्वत्र येताना दिसून येतो. ही संवेदनहीनता फारच गंभीर स्वरुपाची आहे. या निमित्ताने शासनास अशी विनंती करतो की, अशा बिकट प्रसंगी प्रत्येकाने त्या संकटावर मात करण्याची मानसिकता दाखवणे, आवश्यक ती तातडीने उपाययोजना निर्धाराने करणे, वैयक्तिक व सामुदायिकरित्या सत्वर जे जे करावे लागेल ते करण्याची सिद्धता सर्वांमध्ये निर्माण करणे, या दृष्टीने लोकशिक्षण, लोकप्रबोधन, लोकप्रशिक्षण, व्यापक आचारसंहिता, शालेय अभ्यासक्रमात समावेश, वैधानिक तरतुदी इत्यादी उपाययोजना करण्यासाठी आवश्यक कारवाई, सर्वांच्या व्यापक चर्चेतून लवकरात लवकर करुन या जळीत प्रकरणातून बोध घेऊ या अशी मी शासनास या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

----

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, एका धोरणात्मक मुद्यासंबंधी माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, समाजामध्ये मोठया प्रमाणात आंतरजातीय विवाह होत असताना आतापर्यन्त वडिलांची जी जात असते तीच मुलांची जात असे कायम गृहीत धरण्यात आलेले आहे. परंतु जेथे वडील बिगर मागासवर्गीय आणि आई मागासवर्गीय असेल अशा केसेसमध्ये मागील काही वर्षापूर्वी गाजलेल्या बलसम्मा केसमध्ये जो निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिलेला होता त्याच निर्णयाची अंमलबजावणी राज्य सरकारने केलेली आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, 13 जून 2012 रोजी माननीय सर्वोच्च न्यालयाने रमेशभाई नायका केसमध्ये बलसम्मा केसचा निकाल ओव्हर रुल केलेला आहे. आई जर मागासवर्गीय असेल तर मुलगा किंवा मुलीला इच्छा असल्यास त्यांना मागासवर्गीयांचे फायदे मिळू शकतील. तेव्हा अशाप्रकारचा धोरणात्मक निर्णय शासनाला घेता येईल आणि त्याप्रमाणे शासन भूमिका घेऊ शकते असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितलेले आहे. .

सभापती महोदय, हा अतिशय गुंतागुंतीचा प्रश्न आहे. विधी व न्याय विभागाकडे हा प्रश्न प्रलंबित असल्याचे आम्हाला समजले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आईची जात मुलगा किंवा मुलीला लावता येईल. तेव्हा या संदर्भात समाजकल्याण विभाग, विधी व न्याय विभाग आणि महिला व बाल विकास विभाग यांनी एकत्रित बसून एक समिती नेमावी. या ठिकाणी पुरुष प्रधान संस्कृती सुरु आहे. तेव्हा आईची जात मुलाला किंवा मुलीला स्वीकारावयाची असेल तर त्या संदर्भात एक क्रांतिकारी पाऊल उचलण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मुंबईची खरी ओळख असलेल्या तसेच गोल्डन नेकलेस म्हणून ओळख असलेल्या मरीन ड्राईव्ह रस्त्यावर रात्रीच्या वेळी बहुतांश ठिकाणी अपघात होतात. मरीन ड्राईव्ह परिसरात सकाळी फेरफटका मारण्यासाठी तसेच रात्रीच्या वेळेस फिरण्यासाठी त्या परिसरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. मात्र या नागरिकांच्या हितासाठी चर्नीरोड येथे एकच पादचारी पूल आहे. या पुलावर ड्रग्ज घेणारे नशेबाज बसलेले असल्यामुळे रात्रीच्या वेळी पादचाऱ्यांना त्यांचा उपद्रव होतो. त्यामुळे पादचारी पुलाचा वापर न करता रस्ता ओलांडतात. तेव्हा त्या ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी भुयारी मार्ग करावा. तसेच सकाळी फेरफटका मारण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्याच्या एका बाजूला तात्पुरत्या स्वरुपाचे बॅरिकेट लावण्यात यावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यात कळणे बहुचर्चित खाण प्रकल्पा संदर्भात तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने 9 लाख 99 हजार 447 इतके जादा उत्खनन झाल्याचा अहवाल शासनाला दिनांक 7.1.2012 रोजी प्राप्त झाला. परंतु माननीय राज्यमंत्री महोदयांनी या सभागृहात दिनांक 11 एप्रिल रोजी तसा अहवाल प्राप्त न झाल्याचे सांगितले. या प्रकरणी फेरतपासणी करण्यात आली. तेव्हा 9 लाख 34 हजार क्युबीक मीटर टन इतके अतिरिक्त उत्खनन झाल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे त्या लगतच्या जमिनीमध्ये जादा उत्खनन झाल्याचा अहवाल दिनांक 24.5.2012 रोजी शासनास प्राप्त होऊनही जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तेव्हा या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"चंद्रपूर जिल्ह्यातील मूल नगरपालिका अंतर्गत आस्थापनेतील कर्मचारी ( त्यात कनिष्ठ लिपिक-8, शिपाई-8, सफाई मजूर-26 ) असे 42 कर्मचारी 1993 पासून नियमित कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांना दिनांक 3.5.2011 च्या आदेशान्वये आस्थापनेत नियमित सामावून घेण्यात आले. परंतु सदर कर्मचाऱ्यांना अदा करावयाचे असलेले थकीत वेतन माहे एप्रिल 2010 पासून त्यांना देण्यात आलेले नाही. तसेच नियमित वेतनाकरिता सहाय्यक अनुदानाची आवश्यकता आहे. थकित वेतनाकरिता 1 कोटी 67 लाख रुपयांची आवश्यकता आहे. तेव्हा शासनाने नियमित सेवेत सामावून घेतलेल्या 42 कर्मचाऱ्यांच्या थकित वेतनाकरिता व दरमहा वेतनाकरिता सहाय्यक अनुदान मंजूर करावे अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करीत आहे.

--------

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.
सभापती महोदय, या औचित्याचा मुद्याव्दारे मी माननीय मुख्यंमत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. मी औचित्याच्या मुद्यांच्या अनुषंगाने काही बाबींचा उल्लेख करणार आहे, त्याच्याशी आपण देखील सहमत असाल. मौजे तुगाव, ता.उमरगा, जि.लातूर येथील श्री.बळीराम नागनाथ माने, वय वर्षे 60, सेवानिवृत्ती नंतर पेन्शन मिळत नसल्याने या निवृत्त तलाठ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. श्री.माने हा दिनांक 24 जून,2004 ते 30 जून, 2010 या कालावधीत चाकूर येथील तहसील कार्यालयात तलाठी म्हणून कार्यरत होता. दिनांक 30 जून, 2010 रोजी सेवानिवृत्त झाला. त्याने शासनाची 27 वर्षे प्रामाणिकपणे सेवा केली. सेवानिवृत्तीनंतर त्याने आत्महत्येपूर्वी चिठ्ठीत लिहिले आहे की, मला उपासमार, अपमानीत, हीन जीवन सहन न झाल्याने मी आत्महत्या करीत आहे. असा मजकूर लिहिलेली चिठ्ठीवर 14 जुलै, 2012 तारीख नमूद केलेली आहे. दोन वर्षापासून पेन्शन व अन्य लाभ नाही. मी व माझे कुटुंब सामाजिक व अन्य दृष्टीकोनातून हीन जीवन जगत आहोत. माझ्या आत्महत्ये प्रकरणी कोणाचाही संबंध नाही. माझा आत्महत्येस सर्वस्वी शासन जबाबदार आहे. माझ्या नंतर माझ्या कुटुंबाची जबाबदारी शासनावर राहील. तपास अधिकाऱ्यांनी ही चिठ्ठी माहितीस्तव आमदार श्री.गणतपराव देशमुख, सांगोला यांना द्यावी, अशी विनंती त्यांनी आपल्या चिठ्ठीव्दारे केलेली आहे.

सभापती महोदय, हा हजेरी सहाय्यकांचा प्रश्न या सभागृहात मी चार, पाच वेळा उपस्थित केला आहे. सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात आपण आपल्या दालनात बैठक बोलाविली होती. या अनुषंगाने आपण शासनाला निर्देश दिले. परंतु हजेरी सहाय्यक हे शासनाची 30-30 वर्षे सेवा करुनही त्यांना कोणत्याही प्रकारचे सेवा निवृत्ती वेतन मिळत नाही. त्याचा परिणाम म्हणून एका सेवानिवृत्त तलाठ्याने आत्महत्या केली आहे. माननीय श्री. शरद पवार यांच्या नावाने देखील त्यांनी एक पत्र लिहून ठेवले आहे. श्री.माने यांच्या बाबतची माझ्याकडे उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे मी आपल्याकडे सादर करतो. ही आत्महत्या लक्षात घेऊन शासनाने या हजेरी सहाय्यकांचा विषय विचारात घेऊन त्यांना योग्य तो न्याय द्यावा अशा प्रकारची मागणी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

-------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी सार्वजनिक महत्वाच्या आणि निकडीच्या बाबतीत औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. राज्यातील काही जिल्हा सहकारी बँका दिवाळखोरीत निघालेल्या असल्यामुळे त्यांना व्यवहार करण्याची बंदी घालण्यात आली. राष्ट्रीयकृत बँकांकडे शेतकरी गेले तर त्यांना कर्ज मिळत नाही. राज्यात भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. हवालदिल झालेले शेतकरी त्यांच्याकडे असलेले सोने गहाण ठेवून कर्ज घेत आहेत. एकटया बुलढाणा अर्बन बँकेच्या 150 शाखांकडून 900 कोटी रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांनी घेतलेले आहे. आता परिस्थिती अशी आहे की, या बँका उघडण्या अगोदरच कर्ज घेण्यासाठी शेतकऱ्यांचा रांगा लावत आहेत. गेल्या वर्षीचे शासनाकडून मिळणारे ड्रीपचे पैसे शेतकऱ्यांना अजूनपर्यंत मिळालेले नाहीत. अशा वेळेला राज्य सरकारने आणि राज्य सहकारी बँकेने त्वरेने कार्यवाही करुन राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी विनंती मी औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंत जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, दिनांक 5 जुलै, 2012 रोजी मुंबई शहर पोलीस नियंत्रण कक्षामध्ये अज्ञात व्यक्तीने पाकिस्तानी अतिरेकी असल्याचे सांगून मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील पाण्यात विष टाकण्याची धमकी दिली आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये अप्पर वैतरणा, उर्ध्व वैतरणा, भातसा, तानसा या धरणांचा समावेश होत असणे, त्यामुळे या धरणांवर जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रात व पाईप लाईन भागात विशेष सुरक्षा व्यवस्था तैनात करण्याची शासनाकडून पोलीस यंत्रणेला आदेश मिळणे, मात्र अद्यापही या धरणांवर सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आलेली नसल्यामुळे या धमकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांना विशेष सुरक्षा व्यवस्था तैनात करण्याची आवश्यकता आहे. मात्र पोलीस यंत्रणेकडून होत असलेली दिरंगाई व चालढकलपणा, विष प्रयोगाच्या या अतिरेकी धमकीला गंभीरपणे घेऊन पोलीस यंत्रणे बरोबरच मुंबई महानगरपालिकेने सुध्दा स्वतंत्र सुरक्षा व्यवस्था तैनात करुन या धरणाच्या ठिकाणी खास उपाययोजना करावी, अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनास विनंती करीत आहे.

-----

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ D/ पूर्वी श्री.गिते 12:25

**सभापती** : माननीय सदस्यांनी जे औचित्याचे मुद्दे सभागृहात मांडले आहेत ते अत्यंत महत्वाचे आहेत. हे सर्व मुद्दे विधानसभा सचिवालयामार्फत संबंधित मंत्र्यांकडे पाठविले जातील. या मुद्यांवर शासनाकडून तातडीने कार्यवाही कशी होईल यादृष्टीने प्रयत्न करावेत.

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी मांडलेला औचित्याचा मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कर्जपुरवठा होत नाही ही वस्तुस्थिती आहे. माननीय मुख्यमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी जर यासंदर्भात खुलासा केला तर कर्जपुरवठा होण्यास मदत होईल. वेळेत कर्जपुरवठा झाला नाही तर शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, काल ठाण्याजवळ मोठा रेल्वे अपघात झाला होता. तसेच मुंबईमध्ये मोनोरेलचा गर्डर कोसळून अपघात झाला होता. या दोन्ही अपघातांसबंधी नेमकी परिस्थिती काय आहे यासंबंधीची माहिती शासनाने सभागृहाला द्यावी अशी माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, रेल्वे अपघातासंबंधी आणि मोनोरेलच्या ठिकाणी झालेल्या अपघातासंबंधी माहिती गोळा करण्यात येत आहे. संपूर्ण माहिती आल्यानंतर दिवसभरामध्ये शासनाच्या वतीने दोन्ही घटनांबाबत निवेदन करण्यात येईल.

**सभापती** : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत त्या सदनात मांडायच्या नाहीत असे कालच ठरविण्यात आलेले आहे. अनवधानाने तो विषय येथे आता मांडण्यात आलेला आहे. आता नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने चर्चेला घेण्यात येतील.

----

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : शंकरराव मोहिते-पाटील संस्थेला शाळेसाठी पर्यायी जागा देण्याबाबत याबाबत सर्वश्री कपिल पाटील वि. प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 9 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ MMP/ D/ पूर्वी श्री.गिते 12:25

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सर्वप्रथम माननीय मुख्यमंत्री आणि माननीय राज्यमंत्री यांना धन्यवाद देतो की त्यांनी शंकरराव मोहिते-पाटील शिक्षण संस्थेला पर्यायी जागा उपलब्ध करुन दिली. पण यानिमित्ताने मी सांगू इच्छितो की, पुनर्वसित वसाहती किंवा संक्रमण शिबिरे आहेत त्याठिकाणी म्हाडाकडून मोठया प्रमाणावर कामे सुरु आहेत.आपण या वस्त्या हलवतो त्यांना राहण्यासाठी घर देतो परंतु मुलांसाठी शाळा मात्र देत नाही. म्हणून अशा पुनर्वसित वसाहतींमध्ये शाळेसाठी स्वतंत्र आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. हजारो कुटुंबे या वसाहतीमध्ये रहात असतात. त्यामुळे त्यांच्या मुलांसाठी त्वरित शाळा सुरु करणे आवश्यक असते. केवळ प्लॉट देऊन चालणार नाही. यासंबंधात धोरणात्मक निर्णय शासन घेईल काय ? पुनर्वसन करतान त्यामध्ये शाळा हा एक भाग म्हणून अंतर्भाव करण्यात येईल काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, "सजेशन फॉर ॲक्शन "

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शंकरराव मोहिते-पाटील विद्यालयाचा विषय आहे त्याप्रमाणेच चेंबूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयातील विद्यार्थ्यांचा विषय आहे. रस्ता रुंदीकरणासाठी इमारत पाडली आहे.सध्या त्यांना 16गाळे दिलेले आहेत. म्हाडाने लेखी स्वरुपात सांगितले होते की आम्ही जागा बांधून देणार आहोत. परंतु अद्याप त्यांनी यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही. मी मंत्रीमहोदयांना पत्र दिलेले आहे. म्हणून या विद्यालयाच्या बाबतीत सुध्दा तातडीने कार्यवाही होईल काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, ही बाब निश्चितपणे तपासून कार्यवाही केली जाईल. एमएमआरडीएकडे हा विषय असेल तर त्यांना तसे कळवावे लागेल.म्हाडाच्या अखत्यारित हा विषय असेल तर ती बाब निश्चितपणे तपासली जाईल.

-------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 चे निवेदन आणि लक्षवेधी सूचना एकत्रित चर्चेला घेण्याबाबत.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 93 अन्वये 18नंबरची सूचना दिलेली आहे. त्याच विषयावर आज सदनात लक्षवेधी सूचना सुध्दा आलेली आहे. त्यामुळे 93 च्या सूचनेवरील निवेदन आणि लक्षवेधी सूचना एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येईल.

-----

नंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थानांमध्ये होत असलेली अनियमितता

**मु.शी.** : पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थानांमध्ये होत असलेली अनियमितता यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय विधी व न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या सचिवांनी देवस्थांनाच्या अनेक जमिनी नियमबाह्य व बेकायदेशीरपणे 99 वर्षाचे कराराने (लिजवर) कमी रकमेने दिलेल्या असणे, यामध्ये करारावर भाड्याची रक्कम हजारात मात्र, प्रत्यक्ष व्यवहाराची रक्कम लाखात व कोटीत असणे, पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचा व्यवहार, सचिवांनी मनमानीपणे, एकतर्फी चालवला असणे, याबाबत अनेक तक्रारी वर्तमानपत्रातून येत असणे, देवस्थानच्या प्रसादाच्या लाडू बाबतीत बुरशी येणे, ते खराब असणे, असे पेपरमधून छापून येणे, तरीही या सचिवांनी त्याच ठेकेदाराला ठेका देणे, या सचिवांनी कोल्हापुरात इंडियन ओव्हरसिज बँकेत देवस्थान समितीचे खाते वैयक्तिक नावाने उघडणे, त्यात लाखो रुपयांचा अपहार करणे, अशा अनेक तक्रारी असताना जिल्हाधिकारी व पोलीस प्रशासन व शासनाने त्यांच्यावर कोणतीही चौकशी अथवा कारवाई न करणे, याविषयी भाविकांच्या व जनतेच्या मनात शासनाविषयी निर्माण झालेली संतप्त व संशयाची भावना, यावर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. भास्कर जाधव (विधी व न्याय राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ MMP/ पूर्वी श्री. कानडे ....... 12:30

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, आज शुक्रवार आहे, अंबाबाईचा दिवस आणि अंबाबाईच्या संदर्भातीलच ही लक्षवेधी सूचना आहे. पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थानांच्या अंतर्गत एकूण 3067 मंदिरे आहेत. या मंदिरांच्या ताब्यात एकूण 15 हजार एकर जमीन आहे. या मंदिरांचे व्यवस्थापन करण्यासाठी ट्रस्टला दोन वर्षांपासून अध्यक्षांची नियुक्ती झालेली नसल्याने सचिव श्री. हनुमंत सूर्यवंशी हेच सर्वेसर्वा झालेले आहेत. ते ज्या पध्दतीने कारभार करीत आहेत तो पाहता शासन मात्र उत्तरात अशा प्रकारे काहीच झालेले नाही असे सांगत आहे. या प्रश्नाला योग्य न्याय मिळाला पाहिजे अशी माझी मागणी आहे. श्री. हनुमंत सूर्यवंशी यांनी स्वत:च्या नावाने कोणतेही खाते ओपन केलेले नाही असेही आपण निवेदनात म्हटले आहे. मुळात धर्मादाय संस्थेच्या बाय-लॉजमध्ये अशा प्रकारे खाते ओपन करण्यासाठी परवानगीच नाही. पण श्री. हनुमंत सूर्यवंशी यांनी संस्थेच्या नावाने खाते असताना वेगळे खाते स्वत:च्या नावे ओपन करुन त्यातून 10 लाखाचा व्यवहार केल्याचे सिध्द झाले आहे. त्याचबरोबर त्यांच्या कालावधीत कोणत्याही जमिनीचा व्यवहार झाला नसल्याचा उल्लेख निवेदनात केला आहे पण एक आठवड्यापूर्वी त्यांनीच मला माहितीच्या अधिकाराखाली दिलेल्या माहितीनुसार श्री. हनुमंत सूर्यवंशी यांच्या खात्यातून असा व्यवहार झालेला आहे की, केदारलिंग देवस्थान, कोल्हापूरची 27 एकर जमीन वार्षिक भाडे रु. 10373 प्रमाणे झाडे लावण्यासाठी अभिनव कमलाकर देसाई यांना दिली होती, नंतर ती जमीन त्यांच्याकडून परत घेतली पण जमीन भाडेपट्टयाने दिली हे मान्य केले आहे. अशा प्रकारचा मनमानी कारभार या ट्रस्टला अध्यक्ष नसल्यामुळे या संस्थानांमध्ये चालू आहे. मी या निमित्ताने शासनाला विनंती करु इच्छितो की, या 15 हजार एकर जमिनी नव्याने भाडेपट्टयाने देणे आवश्यक आहे त्या शासन देणार काय ?. तसेच सचिव श्री. हनुमंत सूर्यवंशी यांना पदावरुन निलंबित करुन 3067 मंदिरे असणाऱ्या पश्चिम महाराष्ट्र देवस्थानच्या अध्यक्षांची नियुक्ती शासन केव्हा करणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन वर्षांपासून या संस्थानाच्या अध्यक्षांची नियुक्ती झाली नसल्याने ही नियुक्ती कधी करणार हा प्रश्न विचारला. ही गोष्ट खरी आहे की, या संस्थानांसाठी सध्या चेअरमन नेमलेले नाहीत. तरी सुध्दा या संस्थानांचे इतर व्यवहार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे देण्यात आले आहेत. दुसऱ्या प्रश्नात सन्माननीय सदस्यांनी या संस्थांनांचे सचिव श्री. हनुमंत सूर्यवंशी यांच्यावर काही आक्षेप घेतलेले आहेत. परंतु

.......3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव.......... ल. सूचना. क्र. 1......

त्यांनी असा प्रश्न जरी विचारला नसला तरी प्रश्न डेव्हलप करताना सांगितले की, अशा प्रकारे स्वत:च्या नावे खाते सचिवांना काढता येत नाही. याबाबत मी स्पष्ट करु इच्छितो की, पूर्वीपासून या देवस्थानांची दोन खाती होतीच, नव्याने कोणतेही खाते काढलेले नाही. त्यात एक कोषाध्यक्ष, अध्यक्ष आणि समितीवरील एक सदस्य या तिघांच्या सहीने व्यवहार केला जातो आणि दुसरे म्हणजे किरकोळ खर्च भागविण्यासाठी अथवा दुरुस्ती करण्यासाठी समितीच्या बैठका होतात व त्यात बैठकात काही दुरुस्त्या करण्यासाठी खर्च लागेल अशी सूचना केली जाते. किंवा डे-टू-डे खर्च भागविण्यासाठी अथवा पेटीतील ठराविक रक्कम काढून खात्यावर जमा करण्याची व्यवस्था केली जाते. यामध्ये सचिवांमार्फत कोणत्याही प्रकारचा व्यवहार केलेला नाही.

श्री. जयप्रकाश छाजेड : महोदय, करवीरच्या महालक्ष्मी देवस्थानबाबत, मंत्री महोदयांनी तेथे काम करणारे सचिव हे कायदेशीर काम करतात, त्यात काही दोष नाही अशा प्रकारचे उत्तर दिले.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड .....

या लक्षवेधी सूचनेमध्ये शेवटी असे उत्तर दिलेले आहे की, "सचिव देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र यांच्या विरुध्द प्राप्त झालेल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडून सविस्तर चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. याचा अर्थ असा आहे की, देवस्थानाच्या संदर्भात गंभीर स्वरुपाच्या तक्रारी आलेल्या असल्यामुळेच सदर मंदिराच्या देवस्थान समित्या चौकशीचे काम जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेले आहे. या विषयाच्या संदर्भात माझे तीन प्रश्न आहेत. या मंदिराच्या आवारात लेझर शो करण्याकरिता जागा उपलब्ध नसतांना देखील लेझर शो चे टेंडर काढण्यात आले होते. देवस्थानात जमा झालेल्या वर्गणीतून 4 लक्ष रुपये लेझर शोच्या जाहिरातीची बिले अदा करण्यासाठी देण्यात आले होते. जागा उपलब्ध नसतांना लेझर शोचा अनावश्यक खर्च करण्यात आलेला आहे तो सचिवांकडून भरुन घेतला जाणार आहे काय ?

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी देवस्थानामध्ये दोन खाती असतात व ही खाती सचिव देवस्थान समितीच्या माध्यमातून असतात असे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे यासंदर्भातील तरतूद या मंदिराच्या व्यवस्थापन समितीमध्ये आहे काय ? या ठिकाणी जे खाते आहे त्यामधून जर नियमित खर्च केला जात असेल तर या ठिकाणी "सेल्फ अकाऊंटच्या" माध्यमातून लाखो रुपये बँकेतून काढण्यात आलेले असून त्याची चौकशी शासन करणार आहे काय ? या मंदिराच्या संदर्भात सर्व चौकशी सुरु असल्यामुळे या ठिकाणच्या सचिवांना सचिव पदावर ठेऊ नये. चौकशी सुरु असतांना सचिव त्या ठिकाणी असेल तर तो चौकशीवर दबाव आणण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे सचिवांची बदली करुन या मंदिराच्या चौकशीचा संपूर्ण अहवाल किती कालावधीत सादर करण्यात येईल व संबंधित दोषींवर कोणती कारवाई व किती दिवसात कारवाई केली जाणार आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सदनाच्या लक्षात एक गोष्ट विनम्रपणे आणून देऊ इच्छितो की, ज्या ज्यावेळेस अशा प्रकारचे प्रश्न सदनात उपस्थित होतात त्यावेळी प्रशासनावर अंकुश ठेवण्यासाठी जेथे म्हणून कठोर होण्याची वेळ येते त्या त्यावेळी मी माझ्या अधिकाराच्या मर्यादेत राहून कठोर भूमिका बजावत असतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील साहेब हे आज सकाळी माझ्या दालनात आले होते व त्यावेळी त्यांनी या मंदिराच्या संदर्भातील सर्व माहिती मला दिली होती. ज्यांनी चूक केली असेल त्यांना बिलकुल पाठीशी घातले जाणार नाही असे मी त्यांना सकाळीसच सांगितले होते. मी दोन तीन महिन्याने अंबाबाईच्या दर्शनासाठी कोल्हापूरला जात असतो. मध्यंतरी संबंधित सचिवांकडून देवस्थानाच्या संदर्भातील सर्व माहिती घेतली होती. या मंदिराची एकंदरीत प्रॉपर्टी किती आहे,प्रॉपर्टीवर कंट्रोल कोणाचा आहे, आज ही प्रॉपर्टी कोणाच्या ताब्यात आहे या सर्वांची माहिती मी घेतली होती. माझी त्याच वेळेस खात्री झाली होती की, मंदिराच्या ताब्यात, मंदिराच्या नावावर कोल्हापूर जिल्हयातील जवळपास 15 हजार एकर जागा असली तरी ही जागा वापरण्यासाठी दुसऱ्याला देण्यात आलेली असल्यामुळेच सर्व कंट्रोल करण्याचा सचिव प्रयत्न करीत आहेत.

सदर सचिव या मंदिरातून जाण्यापूर्वी 18 कोटी रुपयांच्या ठेवी मंदिराकडे असल्याची माहिती मला मिळालेली आहे. परंतु या सचिवांच्या अगोदर या मंदिराकडे 42 कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. हे सचिव असतांना या मंदिराचे वर्षाचे उत्पन्न 8-10 लाख रुपये होते परंतु हे सचिव गेल्यानंतर या मंदिराचे उत्पन्न दुपटीने-तिपटीने वाढलेले आहे. या मंदिरामध्ये काही उमेदवारांची भरती शिक्षण न पाहता करण्यात आली होती. परंतु अशा कर्मचाऱ्यांना मंदिराच्या सेवेतून काढल्यामुळेही आकसाने तक्रारी आता होत आहेत ही सुध्दा बाब लक्षात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी सांगितल्याप्रमाणे बायलॉजमध्ये नसतांनाही अकाऊंट ओपन केलेले आहे ते पूर्वीच्या सचिवांनी केले की, नंतरच्या सचिवांनी केले, ते अकाऊंट समितीच्या संमतीने झाले की, नाही याची माहिती निश्चितपणे घेतली जाईल.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

येथे लेझर शो चा देखील उल्लेख केला आहे. याबाबत तिथल्या समितीने एप्रिल 2012 मध्ये निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे तेथील सचिवाने स्वत:च्या अधिकारात, इच्छेने तो निर्णय घेतल्याचे मला दिसत नाही. याबाबत चौकशी करण्यात यावी असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. चौकशी सुरू झाल्यामुळे ते दोषी नाहीत काय ? असे देखील सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. प्रजासत्ताक सामाजिक संस्था, कोल्हापूर यांचे निवेदन आले आहे. ते निवेदन आपण बारकाईने बघितले तर ते मुद्देसूद नाही हे लक्षात येते. तरी देखील हा विषय जिल्हाधिकाऱ्यांकडे चौकशी करण्यासाठी सोपविला आहे. यासंबंधीचा अहवाल एका महिन्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडून मागविला जाईल. यात सचिव खरोखरच दोषी असतील तर त्यांना बिलकूल पाठीशी घातले जाणार नाही. ते प्रामाणिकपणे काम करीत असतील तर त्यांचे मॉरल आपण वाढविले पाहिजे असे मला वाटते.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. एकच निवेदन आलेले नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपणास एक उप प्रश्न विचारण्यास मी जरूर संधी देईन.

डॉ.नीलम गोऱ्हे : कोल्हापूरचे अंबाबाई मंदिर हे पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या अखत्यारित आहे. 3067 देवस्थाने या समितीच्या अखत्यारित आहेत. याबाबत आम्ही साक्ष घेतली होती. ती बाब आम्ही येथे रेकॉर्डवर घेऊ शकत नाही. 3067 देवस्थानांची जमीन सुरक्षित ठेवणे, त्यांचे व्यवहार बघणे यासाठी या समितीकडे किती स्टाफ आहे ? असा माझा पहिला प्रश्न आहे. आपण म्हटलेले आहे की, कुठलीही जमीन कोणालाही देण्यात आलेली नाही. आमच्या माहिती प्रमाणे साताऱ्या मधील महाबळेश्वर देवस्थानची जमीन परस्पर विकल्यामुळे सातारा जिल्हाधिकारी, सातारा जिल्हा न्यायाधीश यांनी केस दाखल केली असून हायकोर्टामध्ये ही केस प्रलंबित आहे. या केसमध्ये खूप धनदांडगे गुंतलेले आहेत. तेव्हा आपण या देवस्थानांचे कशा प्रकारे संरक्षण करीत आहात, असा माझा दुसरा प्रश्न आहे. तिसरा आणि शेवटचा प्रश्न असा आहे की, कोल्हापूरच्या अंबाबाई मंदिरात महिलांना गाभाऱ्यात पूजेसाठी प्रवेश मिळू नये म्हणून उच्च न्यायालयात देवस्थानचे पिटीशन प्रलंबित आहे. महिलांना गाभाऱ्यामध्ये प्रवेश मिळण्यास आमचा प्रतिबंध नाही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

असे प्रतिज्ञापत्र आपण कोर्टात दाखल कराल काय ? पश्चिम महाराष्ट्र देवस्थान विरूद्धचे हे सर्व दावे सुरू आहेत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या देवस्थान समितीची खूप मोठ्या प्रमाणावर व्याप्ती आहे. मात्र त्यासाठी अत्यंत अपुरा असा स्टाफ आहे. एक कारकून आहे. तो सावंतवाडी येथे असतो. जोतिबा महालक्ष्मी मुख्य कार्यालयामध्ये आणखी एक कारकून आहे. येथे अपुरा स्टाफ आहे. साधारणत: 90 ते 100 स्टाफ आहे. येथे सन्माननीय सदस्यांनी सातारा येथील प्रश्न उपस्थित केला की, तेथील स्थानिक कोर्टाने केसेस दाखल केल्या आहेत. त्यामुळे हायकोर्टामध्ये केस प्रलंबित आहे. ही लक्षवेधी सूचना कोल्हापूरशी संबंधित असल्यामुळे या क्षणाला माझ्याकडे साताऱ्या संबंधातील माहिती नाही. त्या संबंधातील माहिती मी जरूर घेईन व त्याबाबत सन्माननीय सदस्यांना अवगत करण्यात येईल. वाटल्यास, सभागृहाला देखील अवगत करण्यात येईल, ती माहिती सभागृहासमोर देखील ठेवता येईल.

महिलांना गाभाऱ्यामध्ये प्रवेश करण्यास मज्जाव करण्यासंबंधीची याचिका दाखल झाली आहे काय, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. सध्या तेथे महिलांना दर्शनाकरिता मज्जाव केला जात नाही. ही बाब कोर्टामध्ये गेली असल्याचे आपण सभागृहाच्या लक्षात आणून दिले आहे. कायदा, रितीरिवाज, प्रथा, परंपरा आणि सामाजिक भावना या सर्वांचा आदर ठेवून समन्वय साधण्याचे काम शासनाला नेहमीच करावे लागते. त्या अनुषंगाने शासन योग्य ती भूमिका घेईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, श्री.सूर्यवंशी हे माननीय मंत्र्यांना नीट माहिती देणारच. कारण त्यांनीच त्यांच्या दर्शनाची व्यवस्था केलेली आहे. आज तेथे नागरिकांचे 4 दिवसांपासून उपोषण आहे. आपण सांगितले की, एकच निवेदन आले. पण तसे नाही.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

यानंतर श्री.सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

माझ्याकडे मोरेवाडी, तालुका करवीर येथील साडे सात एकर जमीन शासनाची परवानगी नसतांना विकल्याचे खरेदी खत आहे. या जमिनीची किंमत 50 कोटी असतांना ती फक्त 4 कोटी 79 लाख रुपयांना दि. 14.3.2011 रोजी विकण्यात आली आहे. त्यावेळी श्री. सूर्यवंशी हे सचिव होते काय? या जमीन विक्रीच्या व्यवहाराला विभागीय आयुक्तांनी मान्यता दिली नाही. त्यामुळे शासनाची परवानगी न घेता ही जमीन विकली हे खरे आहे काय? असल्यास, आपण त्यांना कां निलंबित करीत नाही?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे ही जमीन विकली ही गोष्ट खरी आहे. तसेच, दि.14.3.2011 रोजी जमीन विक्रीचा व्यवहार झाला त्यावेळी हेच सचिव होते.परंतु हे प्रकरण सन 2003 पासून सुरु होते. आज श्री. हनुमंत सूर्यवंशी हे सचिव आहेत, त्या काळात श्री. भरत सूर्यवंशी हे सचिव होते. त्यामुळे हा घडलेला प्रकार श्री. भरत सूर्यवंशी या सचिवांच्या काळात घडला आहे. हे प्रकरण सन 2011 मध्ये कोर्टामध्ये गेले. त्यावेळी हायकोर्टाच्या निर्देशानुसार धर्मादाय आयुक्त म्हणून असलेले जॉईंट कमिशनर यांनी पहिल्यांदा जाहीर निविदा मागविल्या. त्यामध्ये 3 कोटी 51 लाख रुपये इतकी रक्कम आली. त्यानंतर पुन्हा जाहीर निविदांची किंमत जाहीर करुन त्या जमिनीचे ओपन ऑक्शन करण्यात आले असता 4 कोटी 59 लाख रुपयांना ती जमीन देण्यात आली. त्यामुळे या प्रकरणाशी श्री. हनुमंत सूर्यवंशी यांचा काही संबंध नाही. हा कोर्टामध्ये निर्णय झाला तो त्यांच्या पातळीवर झालेला नाही. कोर्टाने जरी निर्णय दिला असला तरी शासनाने आपला हक्क गमावलेला नाही. म्हणून यामध्ये असा प्रश्न निर्माण होतो की, अशाप्रकारे ट्रस्टची जागा चॅरिटी कमिशनरने विकण्याचे कारण काय? याचा शोध घेणे आवश्यक आहे. आता हा प्रश्न उपस्थित होत नसला तरी या पुढील काळात या कारणांचा शोध घेणे शासनाला उचित वाटते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विभागीय आयुक्त म्हणतात की, ही जमीन विकता येणार नाही. हे प्रकरण ज्यावेळी कोर्टामध्ये गेले आणि आपण म्हणता त्याप्रमाणे कोर्टाच्या आदेशानुसार हे काम केले. खरे म्हणजे यामध्ये मिलीभगत झाले आहे. विभागीय आयुक्त म्हणतात की, करवीर निवासिनी हे कोल्हापूर येथे प्रसिध्द देवस्थान असून त्या देवस्थानाच्या जमिनीच्या विक्रीला परवानगी देणे सार्वजनिक हिताचे होणार नाही. त्यामुळे या बाबत जनतेमध्ये संताप उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी शिफारस केल्यामुळे प्रस्तावित विक्रीला

20-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) V 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

परवानगी देण्यात येऊ नये" असे विभागीय आयुक्तांनी म्हटले आहे. तर मग कोर्टाने दिलेला निर्णय विभागीय आयुक्त ओव्हर रुल करु शकतात काय? विभागीय आयुक्तांनी हे दि. 27.6.2012 रोजी म्हटले आहे. जर विभागीय आयुक्तांनी हे सर्व नाकारले असेल तर कोर्टाने ऑक्शन करुन ही सर्व जमीन विक्री करा असे त्यांनी सांगितल्यांनतर सुध्दा विभागीय आयुक्तांनी निर्णय दिला आहे काय? याची आम्हाला माहिती मिळाली पाहिजे. या बाबतीत चौकशी करुन यामध्ये जे कुणी दोषी सापडतील त्यांच्यावर आपण कारवाई करणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, जमीन विक्रीचा व्यवहार दि.14.3.2011 रोजी झ ाला. त्यावेळच्या आयुक्तांनी त्याला संमती दर्शविली होती. या प्रकरणामध्ये कुणालाही पाठीशी घालण्याचे कारण नाही. तसेच, या प्रकरणाशी माझे देणे घेणे देखील नाही. माझे चुकत असेल तर मी माघार घेण्यास तयार आहे, जो कुणी चुकत असेल तर त्याला शिक्षा देण्यात येईल असे मी सांगितले आहे. परंतु दि.14.3.2011 रोजी हा व्यवहार झालेला असतांना विभागीय आयुक्तांनी जून 2012 मध्ये मत व्यक्त केल्याचे माननीय विरोधी पक्ष नेते सांगत आहेत. त्यावेळच्या आयुक्तांच्या काळात म्हणजे दि.14.3.2011 रोजी जमिनीची विक्री झाली.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

त्यानंतर काही लोक अपिलात गेले, त्यानंतर काही लोकांनी तक्रार केली आणि त्या तक्रारीवर विद्यमान आयुक्तांनी आपले मत नोंदविले आहे. पण त्यापूर्वीच हा व्यवहार झाला होता. त्यामुळे विभागीय आयुक्तांचे मत विचारात घेतले नाही असा जो सन्माननीय सदस्यांचा दावा आहे तो चुकीचा आहे.

श्री. विनोद तावडे : शासनाची परवानगी घेतलेली नाही. शासनाच्या परवानगी शिवाय जमीन विकता येते का ? शासनाची परवानगी घेतली होती का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 च्या सेक्शन 36 मध्ये हे सर्व अधिकार जॉइन्ट कमिशनर आणि कमिशनरला दिलेले असल्यामुळे त्यांच्या पातळीवर हा निपटारा झाला.

**उप सभापती** : यानंतर क्रमांक 2 वरील लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

श्री. चंद्रकांत छाजेड : सभापती महोदय, मला पहिल्या लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारावयाचा होता.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, विभागीय आयुक्तांनी परवानगी दिलेली नाही.

श्री. विनोद तावडे : शासनाची परवानगी नसताना देवस्थानची जमीन विकण्याचे कारण काय आहे ? या संदर्भात चौकशी करुन कारवाई करु असे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, किमान त्या सचिवाला आज दीर्घ रजेवर पाठवून चौकशी करण्यात येईल असे तरी उत्तर द्यावे. चौकशी नेमलेली आहे असे आपण शेवटी म्हटले आहे. ते त्या पदावर असताना चौकशी करता येईल का ? माननीय मुख्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, त्या सचिवाला दीर्घ रजेवर पाठवून नंतर आपण चौकशी करावी. हे उत्तर त्यांना पूर्ण पाठीशी घालण्यासारखे आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, या विषयामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचे काहीही कारण नाही. पण सन्माननीय सदस्यांनी

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

माझ्यावर राजकीय आरोप केलेला आहे, हेत्वारोप केलेला आहे त्यामुळे मला आता बोलावे लागेल. हा वाद कोठून सुरु झाला ? हे सचिव त्या ठिकाणी गेल्यानंतर तेथे तोफ उडविण्याचे काम श्री. धनाजी जाधव नावाच्या सातवी पास असलेल्या माणसाला 2007 साली दिले होते. त्याला तोफ उडविण्याचे काम दिलेले असतानाच महालक्ष्मी मंदिरातील व्यवस्थापकीय कारभार बघण्याचा सुध्दा अधिकार त्याच्याकडे होता. वास्तविक क्वालिफिकेशनप्रमाणे हा त्याचा अधिकार नाही. तो भारतीय जनता पक्षाचा पदाधिकारी होता. त्याला या सचिवाने काढले म्हणून या विषयाला राजकीय स्वरुप देण्यात येत आहे. जर चुकीचे असेल तर शिक्षा केली जाईल आणि चुकीचे नसेल तर उगीचच शिक्षा करण्याच्या बाबतीत मला या ठिकाणी जाहीर करता येणार नाही. माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी जर निर्णय घेतला तर माझे काही म्हणणे नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी आता जो उल्लेख केला तो रेकॉर्डवरुन काढला पाहिजे.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर मागता आणि त्यांनी उत्तरात जर एखादी खरी गोष्ट सांगितली तर कामकाजातून काढण्यास सांगता हे बरोबर नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

**उप सभापती** : मी आपल्याला नंतर परवानगी देतो.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, कोणत्याही देवस्थानची जमीन विक्री करण्याच्या संदर्भात जर हायकोर्टाचा आदेश असेल तर ती जमीन विकू नये यासाठी शासन अपिलात का गेले नाही ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी मघाशी जे उत्तर दिले ते सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार तसेच सर्व सभागृहाने ऐकले असेलच. जरी कोर्टाने निर्णय दिला तरी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

श्री. भास्कर जाधव ....

शासनाचा हक्क अबाधित आहे असे विधान मी केले आणि ते रेकॉर्डवर आहे. वास्तविक अशा पध्दतीने सह आयुक्तांनी ही जमीन विकायला काढण्याचे कारणच काय याच्या कारणाशी जावे लागेल असे मी म्हणालो पण त्याकडे सन्माननीय सदस्यांनी दुर्लक्ष केलेले दिसते. म्हणून जरी निर्णय झाला असला तरी शासनाच्या वतीने याची कारणे शोधण्याची आमची तयारी आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, हे कसे काय झाले याबाबत आपण शंका सुध्दा व्यक्त करता आणि शासनाचा हक्क सुध्दा अबाधित ठेवता. ही बाब सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांना तसेच इतर सन्माननीय सदस्याना चुकीची वाटते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, चौकशी केली पाहिजे. सर्व सन्माननीय सदस्यांना जे वाटते ते कोणाला तरी एकाला काढल्यामुळे वाटते का ? कोणी तरी एखादी चिट्ठी पाठवितात आणि त्यावरुन माननीय मंत्री महोदय सांगत आहेत. म्हणून मी आपल्याला विनंती केली होती. शासनाची असणारी जमीन विकली गेल्यानंतर सरकारकडे जमीन राहिली पाहिजे असा आग्रह आम्ही धरत आहोत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

ही जमीन सरकारच्या ताब्यात राहिली आहे असे आमचे मत आहे. यामध्ये अनावश्यक राजकारण आणणे हे बरोबर नाही. मंत्री महोदयांनी जे राजकीय वक्तव्य केले आहे ते रेकॉर्डवरुन काढण्यात यावे. मंत्री महोदयांनी चौकशी करण्याचे कबूल केले आहे. परंतु ते अधिकारी तेथेच काम करीत असतील तर चौकशी नि:पक्ष होऊ शकणार नाही. शासनाला या प्रकरणाची चौकशी नि:पक्ष करावयाची आहे की, ते अधिकारी आपल्याला दर्शनाला बोलवितात म्हणून त्यांची सेवा करावयाची आहे, त्या अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवून चौकशी केली जाईल काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना कळून चुकले आहे की, मी दिलेले उत्तर बरोबर आहे. मी आपल्यामार्फत सभागृहाला विन्रमपणे सांगतो की, मी वर्षातून एकदा पंढरपूरला किंवा महालक्ष्मीच्या दर्शनाला जातो. मी माघ महिन्यातील एकादशीला पंढरपूर येथे जातो आणि रांग लावूनच दर्शन घेत असतो. आम्ही पिढ्यान्‌पिढ्या त्या दिवशी दर्शनाला जात आहोत. त्यावेळी दोन तास किंवा चार तास लागले तरी रांग लावूनच दर्शन घेतो. त्याच प्रमाणे महालक्ष्मीचे दर्शन सुध्दा मी रांग लावूनच घेतो. या प्रकरणात त्या अधिका-यांचा दोष आहे असे मला वाटत नाही. सन्माननीय सदस्यांचा आग्रहच असेल तर मी जिल्हाधिकाऱ्यांकडून 15 दिवसामध्ये अहवाल मागवून घेतो. दरम्यानच्या काळात सन्माननीय सदस्यांकडे अधिकची माहिती उपलब्ध झाली तर तीही माझ्याजवळ द्यावी. तीही संधी दिली जाईल, पूर्वीच्या निवेदनावर अवलंबून राहणार नाही. त्यामध्ये जर ते अधिकारी दोषी असल्याचे दिसून आले तर त्यांना तत्काळ रजेवर पाठविण्यात येईल.

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/ MMP/ D/

**पृ. शी.** :होमगार्ड संघटनेने होमगार्ड सेवकांना कायम सेवेत घेण्याची केलेली मागणी

**मु. शी.** :होमगार्ड संघटनेने होमगार्ड सेवकांना कायम सेवेत घेण्याची केलेली मागणी यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, सुभाष चव्हाण, भाई जगताप,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयप्रकाश छाजेड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 6 डिसेंबर, 1946 रोजी देशात होमगार्ड संघटनेची स्थापना करण्यात येणे, निवडणुका, जयंती, मिरवणुका, गणेशोत्सव, नवरात्रोत्सवात होमगार्ड सेवकांना राबवून घेणे मात्र, त्यांना मध्य प्रदेश, छत्तीसगड, पंजाब, गुजरात या राज्यांप्रमाणे कायम सेवेची अथवा सुरक्षेच्या मागणीबाबत कोणताच निर्णय किंवा कार्यवाही करण्यात न येणे, सोलापूर वगळता राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये होमगार्डला वर्षातील 365 दिवसापैकी 60 ते 70 दिवस काम मिळते, पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनाच्या वर्षातील चार महत्वाच्या वाऱ्यांना भाविक येतात त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील होमगार्डला किमान 80 ते 90 दिवस काम मिळते, वर्षातील एकूण दिवसांच्या पन्नास टक्के दिवसही त्याना रोजगार मिळत नसणे, आज ग्रामीण भागात मजुराला किमान 200 रुपयांच्या आसपास रोजगार मिळतो, होमगार्डला मात्र मानधन फक्त रु. 175 असणे, तो मिळण्यासाठी तब्बल पाच ते सहा महिने वाट पाहावी लागणे, या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मुंबईत उपोषण करण्यात आले परंतु याची दखल शासनाने घेतलेली नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, ज्या ज्यावेळी पोलीस कमी पडतात त्यावेळी प्रशासनाकडून होमगार्डची मदत मागितली जाते. राज्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो त्यावेळी हातामध्ये कोणतेही हत्यार न घेता होमगार्ड राज्यभर काम करीत असल्याचे पाहत असतो. या होमगार्डची दुरवस्था झालेली आहे. त्यांना पुरेसे काम मिळत नाही, त्यांना कमी वेतन मिळते. होमगार्ड सेवकांनी 10 तासापेक्षा जास्त काम केले तर त्यांना 15 रुपये उपाहार भत्ता दिला जातो. आता चहा सुध्दा 10 रुपयात मिळत नाही. सरकारने त्यांची इतकी दयनीय अवस्था का करावी असा मला प्रश्न पडलेला आहे. देशातील इतर राज्यात ज्यांनी होमगार्ड म्हणून काम केलेले आहे ते इतर सेवेसाठी पात्र असतील तर त्यांना नोकरीत घेतले जाते. त्या प्रमाणे आपल्या राज्यात शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, 1946 सालापासून होमगार्डची मानसेवी सेवा म्हणून ओळखली जाते. त्या सेवकांनी इतर काम करुन होमगार्डचे काम करावे अशी संकल्पना आहे. होमगार्ड सेवकांना उपाहार भत्ता 25 रुपये दिला जातो. त्याच प्रमाणे 150 रुपये कर्तव्य भत्ता दिला जातो. या होमगार्डसची संख्या 53 हजार आहे. त्यांना शासकीय सेवेत घेण्याबाबत शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझी नियम 93 अन्वयेची सूचना आणि सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांची ही लक्षवेधी सूचना एकाच विषयावर आधारित आहे. राज्यातील 53 हजार होमगार्ड सेवकांचा हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी सांगितल्या प्रमाणे ज्यावेळी राज्यात दंगली सारख्या घटना घडतात त्यावेळी पोलीस दल कमी पडत असते. त्यावेळी होमगार्डकडून मदत घेतली जाते. आपल्या राज्यातील होमगार्ड सेवकांना वर्षातून 6 महिनेही काम मिळत नाही. मंत्री महोदयांनी आताच सांगितले की, त्यांना 150 रुपये कर्तव्य भत्ता दिला जातो. 2008 सालातील दरानुसार ही कर्तव्य भत्त्याची रक्कम दिली जात आहे. त्याशिवाय त्यांना केवळ 6 महिने काम मिळत असेल तर त्यांच्यावर हा अन्याय आहे. माझ्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेत मंत्री महोदयांनी भत्त्याचे दर दिलेले आहेत. या होमगार्ड संघटनेचे असे म्हणणे आहे की, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात या राज्यांमध्ये त्यांना कायम सेवेत घेण्यात आलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

श्री. पांडुरंग फुंडकर...

इतर राज्याप्रमाणे गेली 30-40 वर्षे महाराष्ट्र शासन या होमगार्डची सेवा घेत आलेले आहे. आता मजुराला देखील दिवसाला 200रुपये आणि सरासरी महिन्याला 150 रुपयापेक्षा कमी मजुरी मिळत नाही. या होमगार्डनी शासकीय सेवेमध्ये सामावून घेण्याची मागणी केलेली आहे. त्यांना शासकीय सेवेमध्ये सामावून घेण्यात येईल काय ? निवेदनामध्ये होमगार्डना 565 रुपये देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या प्रस्तावित दराप्रमाणे त्यांना केव्हापासून मानधन देण्यात येणार आहे ? राज्यामध्ये कोतवालांना चतुर्थश्रेणीचा दर्जा दिला गेला. परंतु होमगार्डना दर्जा दिला गेला नाही. हे होमगार्ड रात्रंदिवस काम करीत असताना त्यांना वेतन मात्र सहा-सहा महिन्या नंतर दिले जाते. तेव्हा त्यांना महिन्याला वेतन देण्यात येईल काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : या होमगार्डना महिन्याला वेतन दिले जावे अशा प्रकारचा जी.आर. 12 जून रोजी काढण्यात आलेला आहे. जवळ जवळ 43 हजार लोक या होमगार्ड सेवेमध्ये आहेत. सर्वसाधारणपणे 138 ते 150 दिवस विविध कारणासाठी, बंदोबस्तासाठी यांचा उपयोग करुन घेण्यात येतो. ही मानसेवी सेवा आहे. आपले काम करुन राहिलेल्या वेळेत समाजसेवेच्या दृष्टीने काम करावे अशा प्रकारची होमगार्डची संकल्पना आहे. म्हणून त्यांना मानधन देण्याची योजना सुरु करण्यात आली. त्यांना विविध भत्तांद्वारे 565 रुपये देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री. एस.क्यू.जमा : सभापति महोदय, होमगार्ड की सेवा हमारे देश में आजादी से पहले से ही शुरु है. महाराष्ट्र राज्य में करीब 53-54 हजार लोग होमगार्ड का काम कर रहे हैं. पूरे महाराष्ट्र में होमगार्ड की केवल एक ही संघटना है. उस संघटना के साथ माननीय गृह मंत्री, माननीय गृह राज्य मंत्री, माननीय डायरेक्टर जनरल ऑफ होमगार्ड की कई मीटिंग हो चुकी हैं. शुरु से ही होमगार्ड और हमारे सभी जनप्रतिनिधि यह मांग कर रहे हैं कि होमगार्ड को कम से कम क्लास फोर का दर्जा दिया जाये तथा उनका डिपार्टमेंटेलाइजेशन किया जाये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

20-07-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Y-2

MSS/ MMP/ MMP/ D/ D/ पूर्वी श्री. खंदारे 13:00

श्री एस. क्यू. ज़मा.....

सभापति महोदय, जो लोग दारिद्रय रेखा के नीचे जीवन व्यतीत कर रहे हैं, जीवनदायी योजना में उनके इलाज पर दो-ढाई लाख रुपए तक खर्च किया जा सकता है. लेकिन होमगार्ड के जो लोग अपने राज्य और देश की सेवा करते हैं, उनका इलाज कराने की कोई व्यवस्था सरकार की ओर से नहीं की गयी है. हमारे सभी माननीय सदस्यों की काफी पहले से यह मांग है कि होमगार्ड के लोगों का डिपार्टमेंटेलाइजेशन किया जाये. उनको क्लास फोर का कर्मचारी समझा जाये. इस बारे में शासन ने समय-समय पर आश्वासन भी दिया है. पिछले बजट अधिवेशन के समय होमगार्ड के लोगों का आजाद मैदान पर एक मोर्चा भी आया था, हम ने उनको संबोधित भी किया था. उन सब की एक मांग यह है कि उनको क्लास फोर का कर्मचारी सभझा जाये, उनका डिपार्टमेंटेलाइजेशन किया जाये, यदि डिपार्टमेंटेलाइजेशन नहीं किया जाता तो उनको पेंशन तथा ग्रॅच्युईटी इत्यादि की सुविधा दी जायें. इसके अलावा सरकार ने एक पुलिस कारपारेशन भी बनायी है तथा अब आप जो भर्ती इस कारपोरेशन के माध्यम से कर रहे हैं, उस भर्ती में होमगार्ड के पुराने लोग, जिनकी संख्या महाराष्ट्र में 53-54 हजार के करीब है और उन नौजवानों में काफी लोग बहुत पढ़े-लिखे हैं, उनको इस भर्ती में प्राधान्य दिया जाये. इसलिए मेरा प्रश्न है कि होमगार्ड के इन लोगों की ये सभी मांगें सरकार कब तक मान्य करेगी ?

( इसके बाद Z-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, ही मानसेवी सेवा आहे. पोलीस भरतीमध्ये होमगार्डना संधी दिलेली आहे. सुरक्षामंडळामध्ये देखील त्यांना प्राधान्य द्यावे अशाप्रकारच्या सूचना निश्चितपणे देण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या औषधोपचारासंबंधी उल्लेख केला. शासनाने राजीव गांधी जीवनदायी योजना आणलेली आहे. या योजनेंतर्गत अल्प उत्पन्न धारकांना या सेवेचा लाभ घेता येणार आहे. तेव्हा या योजनेचा लाभ त्यांना देखील लाभ मिळू शकतो.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी समाजातील एका महत्वाच्या घटकाकडे या लक्षवेधी सूचनेद्वारे लक्ष वेधलेले आहे. या ठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, होमगार्डना भत्ता वगैरे मिळून 500 रुपयांपेक्षा जास्त पैसे मिळतील असा प्रस्ताव केलेला आहे. होमगार्डना फक्त 175 रुपये मानधन मिळते. होमगार्ड आणि सिव्हील डिफेन्स हे दोन्ही घटक समाजाची सेवा करतात. स्व.वसंतदादा पाटील हे सुध्दा सुरुवातीला होमगार्ड होते. समाजसेवेची राष्ट्रीय चळवळ म्हणून याकडे पाहिले जाते. आपण सर्वांना किमान वेतन देतो. परंतु या होमगार्डना किमान वेतन मिळत नाही. पुण्यातील होमगार्ड मला भेटले. त्यांनी मला सांगितले की, "आम्हाला डयुटीवर जाण्या-येण्यासाठी बससाठी 40 रुपये खर्च करावे लागतात." होमगार्डना वर्षातून फक्त 90 ते 100 दिवस काम मिळते. माननीय राज्यमंत्री महोदयांनी त्यांचे मानधन वाढविण्याचे आश्वासन दिलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्यांचे मानधन 200-300 रुपये करण्यात येईल असे मागील 15-20 वर्षापासून असे सांगण्यात येत आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता ते लवकर करतील काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी सांगितले की, होमगार्डना पी.एम.टी.च्या बसने जाण्या-येण्याकरिता पैसे द्यावे लागतात. माझा प्रश्न आहे, ज्या प्रमाणे पोलिसांना बसमध्ये उभे राहून पैसे न देता प्रवास करण्याची परवानगी दिलेली आहे तशी परवानगी होमगार्डना देण्यात येईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या होमगार्डसंबंधी ज्या भावना आहेत तशाच प्रकारच्या भावना आमच्या देखील आहेत. कोणताही बंदोबस्त असला तरी पोलिसांना मदत करण्याची भूमिका होमगार्ड सातत्याने घेत आहे. गेल्या पाच वर्षात पोलिसांची भरती झाली त्यामुळे पोलिसांवरील ताण थोड्या प्रमाणात कमी झालेला आहे. तरी सुध्दा पोलिसांना मिळणारी होमगार्डची मदत निश्चितपणे महत्वपूर्ण आहे. तेव्हा या विषयावर अधिक चर्चा न करता मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, होमगार्डच्या वाढीव भत्त्याबद्दलचा विषय एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळापुढे आणण्यात येईल. ज्याप्रमाणे पोलिसांना डयुटीवर असताना बसमधून प्रवास करण्याची सवलत आहे तशी सवलत होमगार्डना देण्याची भूमिका शासन घेईल.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील माध्यमिक शाळेतील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्ण वेळ ग्रंथपाल करणे

**मु.शी.** :राज्यातील माध्यमिक शाळेतील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्ण वेळ ग्रंथपाल करणे या संबंधी सर्वश्री विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग-शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील माध्यमिक शाळेतील अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित राहणे, राज्यभरात माध्यमिक शाळांमध्ये 1 हजार 67 शैक्षणिक पात्रताधारक ग्रंथपाल गत् 15 वर्षापासून अर्धवेळ म्हणून कार्यरत असतांना त्यांना अद्याप पूर्णवेळ करण्यात न येणे, त्यामुळे त्यांची होत असलेली उपासमार, माहे एप्रिल, 2006 मधील अधिवेशनात सदर ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपाल करण्याचे आश्वासन देऊन तसेच प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवण्यासाठी वित्त विभाग तपासणी करुन कार्यवाही करीत असल्याचे सांगूनही अद्याप अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करण्यात न येणे, त्यामुळे अर्धवेळ ग्रंथपालांमध्ये पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.फोजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, जीवनामध्ये पुस्तक वाचनाला किती महत्व आहे हे आपण जाणता. आपण देखील पुस्तक प्रेमी आहात हे मला माहीत आहे. पुस्तक वाचल्यामुळे माणसाचे मस्तक संपन्न होते आणि संपन्न झालेले मस्तक कोणाही पुढे नतमस्तक होत नाही म्हणून आपण पुस्तक वाचले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यातील किती माध्यमिक शाळांमध्ये ग्रंथालये आहेत आणि किती ग्रंथपालांची पदे भरली आहेत ? सन 2006 पासून आमच्या शिक्षक प्रतिनिधीपैंकी कोणी ना कोणी नेहमीच हा प्रश्न उपस्थित करीत असतात. प्रत्येक शाळेत ग्रंथालय आणि ग्रंथपाल पद द्या असे आमचे म्हणणे नाही. परंतु जे अर्धवेळ ग्रंथपाल आहेत त्यांना पूर्णवेळ ग्रंथपाल करावे अशी मागणी आम्ही सन 2006 पासून करीत आहोत. अर्धवेळ ग्रंथपालांची संख्या फक्त 1067 आहे. आम्ही हा प्रश्न उपस्थित केल्या नंतर प्रत्येकवेळी आम्हाला आश्वासन देण्यात येते की, आम्ही मंत्रिमंडळापुढे हा प्रश्न मांडू, प्रस्ताव विचाराधीन आहे. मंत्री आणि मंत्रिमंडळ यामध्ये किती अंतर आहे हे आम्हाला माहीत नाही.

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

ग्रंथालयासारख्या महत्वाच्या विषयाकडे शासन डोळेझाक करीत असेल तर हे बरोबर नाही. अधिवेशन संपण्यास अजून काही दिवस शिल्लक आहेत. अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ करावे अशी आमची साधी मागणी आहे. हा प्रस्ताव शासन दरबारी 2006 पासून प्रलंबित आहे. हा प्रस्ताव तातडीने मंत्रिमंडळाच्या समोर आणावा व त्यास मंजुरी घेण्याचे काम माननीय मंत्री महोदया करतील काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितले की, वाचन करणे महत्वाचे आहे, त्यांच्या मताशी मी सहमत आहे. शाळेत शिक्षण घेत असताना वाचन करणे खूप गरजेचे आहे. ग्रंथालय आणि त्यातील पुस्तकांना सांभाळण्यासाठी ग्रंथपाल असणे आवश्यक आहे. किती ग्रंथपाल असावेत, ग्रंथपाल नेमताना कोणत्या निकषांचे पालन करावे, यासंबंधी अनेक वेळा सभागृहात निर्णय झालेले आहेत. एस.एस.कोडप्रमाणे विद्यार्थी संख्या 1001 ते 1500 पेक्षा असेल तर एक पूर्णवेळ ग्रंथपाल असला पाहिजे असा निकष होता. विद्यार्थी संख्या 1500 पेक्षा जास्त असेल तर तेथेही पूर्ण वेळ एक ग्रंथपाल असला पाहिजे. तसेच 501 ते 1000 विद्यार्थी संख्येला अर्ध वेळ ग्रंथपालाचे पद मान्य करण्यात आले आहे. चिपळूणकर समिती जेव्हा अस्तित्वात आली, त्यांनी काही सूचना दिल्या आहेत. 501 ते 1001 विद्यार्थी असतील त्या ठिकाणी एक अर्ध वेळ ग्रंथपाल आणि 1001 ते 1500 पर्यंत विद्यार्थी संख्या असेल तेथे एक पूर्ण वेळ ग्रंथपाल असला पाहिजे अशा सूचना चिपळूणकर समितीने दिलेल्या आहेत.

दिनांक 25.1.2012 रोजी शासनाने नवीन जी.आर.काढला आहे. त्या जी.आर.नुसार अधिकचे ग्रंथपाल निर्माण करण्याचा निर्णय घेतला. 101ते 1001 विद्यार्थी संख्या असली तरी तेथे अर्धवेळ ग्रंथपाल असला पाहिजे आणि 1001 पेक्षा विद्यार्थी संख्या असेल तेथे पूर्ण वेळ ग्रंथपाल असावा अशा प्रकारचा जी.आर काढला होता, परंतु त्या जी.आर.आपण स्थगिती दिली. सध्या चिपळूणकर समितीच्या सूचनेप्रमाणे ग्रंथपालांच्या नियुक्त्या देण्याचे काम चालू आहे. या बाबतचा आकृतीबंध विचाराधीन आहे. हा आकृतीबंध एन्डॉस करण्यासाठी अपर मुख्य सचिवांच्या हायपॉवर कमिटी समोर आहे. या बाबतचा अभ्यास पूर्ण झालेला आहे. आकृतीबंध निश्चित होण्याच्या मार्गवर आहे. दरम्यानच्या काळात परिस्थिती बदलली. विद्यार्थ्यांची पट पडताळणी झाली. विद्यार्थी संख्येचा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान....

प्रश्न नव्याने समोर आलेला आहे. त्यामुळे या बाबतीत पुन्हा अभ्यास होणे गरजेचे आहे. पट पडताळणीच्या अनुषंगाने नवीन परिस्थिती निर्माण झालेली आहे, त्यामुळे या बाबतचा नव्याने अभ्यास होऊन तद्नंतर नवीन आकृतीबंध तयार होईन, त्यानंतर या संदर्भातील निर्णय घेणे आवश्यक आहे.

श्री. रामनाथ मोते : सन्माननीय मंत्री महोदयांनी पट पडताळणीचा उल्लेख या ठिकाणी केला. पट पडताळणीचा या प्रश्नाशी काहीही संबंध नाही. हा प्रश्न 2006 पूर्वीचा आहे. अर्ध वेळ ग्रंथपालांना पूर्ण वेळ ग्रंथपालात समावेश करावा अशी आम्ही शासनाकडे 2006 पासून मागणी करीत आहोत. हा विषय नवीन आकृतीबंध येण्यापूर्वीचा आहे असे मला या ठिकाणी नम्रपणे सांगावयाचे आहे. दिवसें दिवस मराठी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी संख्या कमी होत आहे. हा विषय आताच्या आणि जुन्या त्या निकषामध्ये बसणारा नाही. विषय एवढा होता की, 1991 पैकी 924 पदे काढली. या शाळांची संख्या कमी झाली म्हणून 924 पदांचा हा प्रश्न आहे. अनेक वेळा हा विषय सभागृहात आला. अनेक वेळा हा विषय सभागृहात उपस्थित झालेला आहे. मागे या विषयाबाबत सभागृहात चर्चा झाली होती त्यावेळी माननीय उल्हासदादा पवार यांनी देखील चर्चेत सहभाग घेतला होता. शाळा तेथे ग्रंथालय आणि ग्रंथालय तेथे ग्रंथपाल ही संकल्पना त्यावेळी शासनाने मान्य केली होती. म्हणून विद्यार्थी संख्येचा निकष न लावता ज्यांनी पाच-पाच, दहा-दहा वर्षे सेवा केलेली आहे. या विद्यार्थी संख्येच्या निकषाशिवाय जे कर्मचारी अर्ध वेळ म्हणून अनेक वर्षापासून काम करीत आहेत, त्यांना पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून नियुक्त्या दिल्या जातील काय ? 21 मार्च, 2011 रोजी माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे, ते उत्तर मी या ठिकाणी वाचून दाखवितो. या अनुषंगाने विचार करण्यात येईल, 1067 ग्रंथपालांचा जो विषय आहे, तो मंत्रिमंडळासमोर आहे. तो प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागेल. हा विषय घेऊन मंत्री मंडळासमोर गेला नाहीत काय, मंत्री मंडळासमोर हा विषय कधी घेऊन जाणार आहात आणि या अनुषंगाने कधी निर्णय घेतला जाणार आहे ?

श्रीमती फौजिया खान : मंत्री मंडळापुढे जाण्यासाठी फाईल रुटवर होती. या बाबतीत संचालकांकडून अभ्यास व्हावा, म्हणून ती फाईल परत पाठविण्यात आली. नवीन परिस्थिती नुसार या बाबतचा अभ्यास होणे गरजेचे आहे. संचालकांचा अभ्यास झाल्यानंतर त्या बाबतीत निर्णय होईल.

यानंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांना मी धन्यवाद देतो. जेथे शाळा आहेत तेथे ग्रंथपाल असला पाहिजे असे शासनाचे धोरण आहे. 150 पेक्षा अधिक शाळा अशा आहेत की जेथे अर्धवेळ ग्रंथपाल आहे. म्हणून माझी सूचना अशी आहे की 2/3 शाळा एकत्र करुन त्याठिकाणी एक पूर्णवेळ ग्रंथपाल देण्याबाबत शासन विचार करील काय ? तशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे विचारार्थ आहे असे माननीय शिक्षणमंत्र्यांनी सांगितले होते हे खरे आहे काय ?

सभापती महोदय, 1067 पदे ही पूर्वीची आहेत. त्यांना पूर्णवेळ ग्रंथपाल केव्हा करणार हा माझा दुसरा प्रश्न आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, पूर्णवेळ ग्रंथपाल देण्याचा विषय उच्चस्तरीय समितीपुढे विचारार्थ आहे. माननीय सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. राज्यामध्ये काही शाळा अशा आहेत की जेथे 2/3/4 सुध्दा विद्यार्थी आहेत. परंतु 4/4 शिक्षक आहेत. यासाठी शासनाला निर्णय घेताना सर्वंकष विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे याचा निर्णय उच्चस्तरीय समितीमध्ये होईल. माननीय सदस्यांना शासनाकडून अपेक्षेप्रमाणे उत्तर मिळेलच असे नाही.

**उपसभापती** : याविषयाबाबत माननीय सदस्यांनी मतप्रदर्शन केलेले आहे. 3/4 एकत्र करुन एक पूर्णवेळ ग्रंथपाल नियुक्त करावा ही माननीय सदस्य श्री. खोटरे यांनी केलेली सूचना मलाही मान्य नाही. कारण ग्रंथपाल एका शाळेतून दुसऱ्या शाळेत गेला आहे असे सांगितले जाईल आणि प्रत्यक्षात तो कोणत्याच शाळेत उपलब्ध होणार नाही. मी अनुभव सांगत आहे. सर्व माननीय सदस्यांची मते ऐकल्यानंतर याबाबतीत मी निर्णय देत आहे.

प्रस्ताव उच्चस्तरीय समितीकडे अंतिम निर्णयासाठी ठेवावा असा मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार हा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीपुढे ठेवण्यापूर्वी कार्यप्रणालीनुसार वित्त विभागाकडे पाठविला. यामध्ये वित्त विभागाने शालेय शिक्षण विभागाकडून अधिकची माहिती मागितली असता शिक्षण संचालकांकडून नस्ती प्रलंबित आहे हे लक्षात घेता विलंब होत आहे. याबाबत एक महिन्याच्या आत यासंदर्भातील सर्व प्रक्रिया पूर्ण करुन शासनाने निर्णय घ्यावा त्याप्रमाणे सदनाला अवगत करावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, "होय".

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सर्व शिक्षक प्रतिनिधींच्या वतीने मी आपले आभार मानतो.

-----

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचनांबाबत**

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये मी एकूण 10 लक्षवेधी सूचना दिलेल्या होत्या. त्याचप्रमाणे मागील बजेट अधिवेशनात व तत्पूर्वीच्या हिवाळी अधिवेशनात देखील मी 10 लक्षवेधी सूचना आपल्याकडे दिल्या होत्या. यासंदर्भात मी माननीय सभापतींना भेटलो होतो.त्यांनी सांगितले की, सह सचिव श्री. चव्हाण यांना भेटा.

सभापती महोदय, मी ज्या लक्षवेधी सूचना दिलेल्या होत्या त्यातील एकही लक्षवेधी सूचना आजपर्यंत सदनामध्ये चर्चेला आलेली नाही. माझ्यावर अन्याय होत आहे असे माझे मत आहे. राज्यातील दलित जनतेवर अन्याय आणि अत्याचार होत आहेत त्याबाबत मी लक्षवेधी सूचना दिलेल्या होत्या. या सर्वोच्च सदनात दीड कोटी मागासवर्गीयांच्या वतीने त्यांच्यावर जो अत्याचार होत आहे त्याबाबतीत संवेदना व्यक्त करण्यासाठी लक्षवेधी सूचना दिलेल्या आहेत. माझ्यानंतर ज्या सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिलेल्या आहेत त्यांच्यापैकी काही सदस्यांच्या लक्षवेधी सूचना चर्चेला आलेल्या आहेत. काही माननीय सदस्यांच्या तर 2/2 लक्षवेधी सूचना चर्चेला आलेल्या आहेत. आपण संवेदनशील असून दलित समाजाबद्दल आपल्या मनात आस्था आहे. माझ्यावर जो अन्याय होत आहे त्याबाबत आपण चौकशी करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांच्या लक्षवेधी सूचना स्वीकृत झाल्या असून योग्य वेळी त्या सदनामध्ये चर्चेला येतील.

----

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील पट पडताळणीत आढळून आलेल्या अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन.

मु. शी: माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील पट पडताळणीत आढळून आलेल्या अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन यासंबंधी श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

------

यानंतर श्री. खर्चे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी./मु.शी.** : राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना वेतनवाढ देणे याबाबत श्री.वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, "दरवर्षी शिक्षक दिनाच्या दिवशी शासनामर्फत राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा आदर्श शिक्षक म्हणून सन्मान केला जातो. त्यांना प्रशस्ती पत्र, रोख पारितोषिक व दोन वेतनवाढी दिल्या जातात व लेखी पत्र दिले जाते, परंतु 1 जानेवारी, 2006 पासून ज्या शिक्षकांना आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार मिळाला या सर्व शिक्षकांना अजूनपर्यंत दोन वेतनवाढी मिळाल्या नाहीत. लातूर येथे झालेल्या शिक्षक दिनाच्या समारंभात माननीय नामदार श्री. पृथ्वीराजजी चव्हाण, मुखमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी आपल्या भाषणात आदर्श शिक्षकांना दोन वेतनवाढी ताबडतोब देण्यात येतील असे घोषित केले होते. सभागृहात अनेक सदस्यांनी तारांकित प्रश्नाद्वारे प्रश्न विचारले असता एकच उत्तर येते की, ही बाब विचाराधीन आहे.

महोदय, काही शिक्षकांना अकोला जिल्ह्यात वेतनवाढी दिल्या होत्या पण त्या शासनाने त्यांच्याकडून वसूल करुन घेतल्या आहेत. हा आदर्श शिक्षकांचा सन्मान आहे की अपमान की दुर्दैव हेच समजत नाही. या निमित्ताने मी विनंती करतो की, 1 जानेवारी 2006 पासून आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना वेतनवाढी देण्यात याव्यात."

-------

......2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कोल्हापूर येथील प्रमिलाराजे रुग्णालयातील हृदय शस्त्रक्रिया विभाग निधीअभावी बंद पडणे याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, "कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयातील हृदय शस्त्रक्रिया विभाग निधीअभावी बंद होण्याच्या मार्गावर असणे, छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय हृदय शस्त्रक्रिया विभागाची शासनाकडे सुमारे 5.50 कोटी रुपयांची देयके बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित असून पैकी सुमारे 2 कोटी रुपये जीवनदायी योजने अंतर्गत निधी उपलब्ध व्हावा व उर्वरित 3.50 कोटी रुपयांसाठी विशेष अनुदान सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाकडून उपलब्ध होण्याची आवश्यकता असणे, या विभागातील यंत्रसामुग्री दहा वर्षापेक्षाही जुनी झाली असल्याने त्वरित बदलणे अत्यावश्यक असणे, त्यासाठी अनुदान मिळणे गरजेचे असणे, या विभागातील मानसेवी तज्ज्ञांचे मानधन गेले 8 महिने मिळालेले नसणे, हे मानधन छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयाच्या खात्यातून मिळण्यासाठी कायम स्वरुपी तरतूद करण्याची शक्यता असणे, या विभागाला शासनाकडून कुठल्याही प्रकारचे अनुदान मिळत नसल्याने या विभागाकरिता कायम स्वरुपी शासनाने तरतूद करण्याची गरज निर्माण होणे, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेऊन निधीची उपलब्धता करुन हृदय शस्त्रक्रिया विभाग निधी अभावी बंद पडू नये यासाठी शासनाची प्रतिक्रिया, कार्यवाही व उपाययोजना."

-----------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : संत रामदास बोट स्मारकाची उभारणी करणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, "भाऊच्या धक्क्याहून रेवसकडे येत असताना काशाच्या खडकाजवळ 17 जुलै, 1947 रोजी बुडालेल्या "संत रामदास बोट" दुर्घटनेस आज 65 वर्षे पूर्ण होत आहेत. 17 जुलै, 1947 रोजी आषाढ अमावस्या आणि कोकणातील ग्रामीण भाषेतील गटारी अमावस्येचा दिवस होता. मुंबईहून अवघ्या 12 मैलाच्या अंतरावर असलेल्या रेवस बंदरात जाण्यासाठी "संत रामदास बोट" ही तीन मजली बोट 700 प्रवाशांना घेऊन सकाळी 8 वाजून 5 मिनिटांनी निघाली. काशाच्या खडकाजवळ बोट आली आणि वातावरण बदलले. मोठमोठ्या लाटांचा मारा सुरु झाला. वातावरण धुरकट झाले. बोट हेलकावे खाऊ लागली आणि एका मोठ्या लाटेने या तीन मजली रामदास बोटीला समुद्रात गिळंकृत केले. बोटीवरील संपर्क यंत्रणेअभावी बोट बुडाल्याची बातमी बंदरावर पोहचण्यास खूप वेळ लागला आणि 600 प्रवासी मृत्युमुखी पडले. मुंबईसह अलिबाग, पनवेल, रेवस, धरमतर, सासवणे इ. गावात हाहा:कार उडाला. काशाच्या खडकासमोर मांडवा बंदर (जेट्टी) उभारुन रामदास बोट स्मारकाची उभारणी करावी, अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

----------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : पुणे शहर व ग्रामीण भागासाठी एकच न्यायालय सुरु करणे याबाबत श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महोदय, "पुणे शहरातील व जिल्ह्यातील दहा हजार महिला गेल्या काही वर्षांपासून घटस्फोट अथवा पोटगीच्या दाव्यासाठी न्यायालयात लढा देत असल्याची धक्कादायक बाब जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस येणे, अपुऱ्या न्याय व्यवस्थेमुळे या परित्यक्त्या व निराधार महिलांचा लढा कमी पडत आहे. परिणामी त्यांच्या खटल्यांचे प्रलंबिकरण दिवसेदिवस वाढत आहे, महिला सबलीकरणाच्या काळातही महिलांना न्यायासाठी टाहो फोडावा लागत आहे, महिलांना राजकारणात आरक्षण देऊन महिला सक्षम झाल्याचा डांगोरा पिटला जाणे, पुण्यासारख्या एका जिल्ह्यात घटस्फोटाचे दहा हजार खटले प्रलंबित असतील तर एकूण राज्याच्या प्रलंबित प्रकरणांची संख्या लाखापेक्षा अधिक असण्याची शक्यता, दुर्दैवाने ही प्रकरणे चालविण्याकरिता न्यायालयच उपलब्ध नसणे, केवळ पाच न्यायालये असून त्यातील एक काही महिन्यापासून रिक्त आहे, शिवाजी नगर येथील कौटुंबीक न्यायालयाच्या इमारतीचे संथगतीने बांधकाम चालू आहे, ग्रामीण भागातील कौटुंबीक खटल्यांबरोबर इतरही खटले प्रलंबित असल्यामुळे शहरी व ग्रामीण भागाकरिता एकच न्यायालय करण्याची होत असलेली मागणी तसेच न्यायालयांची संख्या तातडीने वाढविण्याची आवश्यकता, परिणामी जनतेत पसरलेली नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने न्यायालयांची संख्या वाढवावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

-----------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : खाजगी शाळांमध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याच्या निर्णयास शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून होत असलेली जबरदस्ती याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"शिक्षण हक्क विधेयकाची अंमलबजावणी राज्यात सुरु झाली असून या विधेयकातील तरतुदीनुसार प्रत्येक शाळेत स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्यात यावी अशी अपेक्षा आहे. ही तरतूद जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगर पालिकांच्या शाळांना लागू आहे.

सभापती महोदय, ही तरतूद स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये असून ज्या शाळांमध्ये शाळा समिती किंवा व्यवस्थापन समिती नसते अशा शाळांसाठी आहे. जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका या शाळांसाठी हा नियम लागू आहे.

खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळेसाठी व्यवस्थापन समिती व शालेय समिती 1981 च्या शिक्षण कायद्यानुसार बंधनकारक आहे. मा. न्यायालयाने खाजगी शाळांमध्ये स्थानिक व्यवस्थापन समिती गठीत करण्याच्या निर्णयास स्थगिती असूनही शिक्षण विभागातील अधिकारी खाजगी शाळांवर जबरदस्ती करुन कारवाई करतात.

अनेक खाजगी शाळांवर स्थानिक व्यवस्थापन समिती नेमण्याचे बंधन टाकले जाते व कारवाई केली जाते.

खाजगी शाळांना स्थानिक व्यवस्थापन समितीचे बंधन लागू नसल्याने त्यांना वगळण्यात यावे व याबाबत कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यास तातडीने प्रतिबंध करावा." अशी विनंती मी विशेष उल्लखाच्या माध्यमातून करीत आहे.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : विनाअनुदानित शाळेत शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शुल्क अद्यापही न भरणे याबाबत
ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, "विना अनुदानीत शाळेत शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शुल्क राज्य शासन भरणार असल्याचा अध्यादेश राज्य शासनाने 1973 मध्ये काढला होता. मात्र सन 2007-2010 या काळात मागास वर्गीय विद्यार्थ्याचे शुल्क शासनाने भरले नाही. यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असणे, या विरुध्द नरेश गोसावी यांनी जनहित याचिका उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केली होती. मुंबईतील विना अनुदानीत शाळांमधील 1:3 रक्कम म्हणजे 350 रु. शालेय फी शासनाने भरावी असे निर्देश उच्च न्यायालयाने शासनास दिले आहेत. तसेच उत्पन्न मर्यादा तीन लाखावरुन साडेचार लाख करावी असेही निर्देश दिले आहेत. पंधरा दिवसात शासनास आपली भूमिका न्यायालयात मांडावी लागणार आहे. यासाठी समाजात निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण व शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : राज्यात श्वान दंशाच्या लसींच्या खरेदीतील अटी व शर्तींमध्ये परस्पर बदल करणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "मुंबईसह राज्यात श्वानदंशाच्या घटनांमध्ये मोठया प्रमाणात होत असलेली वाढ लक्षात घेवून या लसीचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांद्वारे या लसीच्या किंमती कमी करण्यात येणे, बी.एम.सी. आरसीवर (मुंबई महानगरपालिका दरकरारावर) ही लस 1342 रुपयांना उपलब्ध असतांनाही राज्याच्या सार्वजनिक आरोग्य तसेच वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाशी संलग्न रुग्णालयांकडून डि.एम.ई.आर.दरकराराप्रमाणे प्रती लस रु. 198/-रुपयांप्रमाणे वीस लाखा पेक्षाही अधिक लसीचे खरेदी आदेश देण्यात येणे, दरम्यानच्या काळात या लसींचा पुरवठा करण्याचा एका कपंनीने मध्यप्रदेशात पुरवठा करतांना 142 रुपये प्रमाणे पुरवठा केल्याचे निदर्शनास येणे, वैद्यकीय शिक्षण संचालनालयातील दरकरार विभागाने श्वानदंशावरील लसींच्या खरेदी आदेशातील अटी व शर्तीत परस्पर बदल केल्यामुळे शासनाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान झालेले असणे, यापुढे दरकरार अटी शर्तीमध्ये देशातील कोणत्याही राज्यात औषध पुरवठा करतांना असलेल्या दरापेक्षा महाराष्ट्राला पुरवठा करण्यासाठी अधिक दर असता कामा नये ही अट दरकरारांमध्ये टाकण्याची तसेच दरकरार करतांना बाजारभावाशी तुलना करण्याची आवश्यकता खरेदी अटीमध्ये बदल केल्यामुळे शासनाचे कोटयावधी रुपयांचे झालेल्या नुकसानीबाबत जबाबदारी निश्चित करण्यासाठी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करीत आहे.

----

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : नागपूर जिल्हा परिषदेमधील माध्यमिक शिक्षणाधिकारी पद मागील पाच महिन्यांपासून रिक्त असणे याबाबत श्री.नागो पुंडलिक गाणार वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

नागपूर जिल्हा परिषदेमधील श्री.बा.ह.पाटील, शिक्षणाधिकारी, माध्यमिक यांची 6 महिन्यापूर्वी बदली होणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी पदे 6 महिन्यांपासून वंचित असणे, माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांचा अतिरिक्त कार्यभार श्री.सोमेश्वर नैताम, शिक्षाधिकारी, प्राथमिक, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडे सोपविण्यात येणे, दोन्ही शिक्षण विभागाचा कार्यभार, वाढलेला कामाचा बोजा यामुळे दोन्ही विभागातील अनेक शैक्षणिक कामे प्रलंबित पडून असणे, शिक्षणाधिकारी, माध्यमिक पदाचा कार्यभार उप शिक्षणाधिकारी श्री.ठामके यांच्याकडे सोपविण्याबाबत जिल्हा परिषदेकडे मागणी करणे, जिल्हा परिषद, नागपूर मधील स्थायी समितीने नुकतीच एक बैठक घेऊन श्री.सोमेश्वर नैताम यांच्याकडील माध्यमिक विभागाचा अतिरिक्त कार्यभार काढण्याचा ठराव मंजूर करणे, श्री.ठामके यांच्याकडे शिक्षणाधिकारी, माध्यमिक या पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्काळ सुपूर्द करावा असा आदेश शासनाने देणे, त्या आदेशाची अवहेलना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी करणे, उक्त प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.

.........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड यासह महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांची व वास्तुंची दुरूस्ती करणे याबाबत श्रीमती अलका देसाई, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडते.

महाराष्ट्रात असलेले प्राचीन किल्ले व वास्तू यांचे योग्य रितीने संगोपन व जतन करण्यात यावे आज सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुप्रसिद्ध किल्ला "सिंधुदुर्ग", रत्नागिरी जिल्ह्यातील "जयगड" किल्ल्यासह महाराष्ट्रतील सर्वच किल्ल्यांची व वास्तुंची दूरवस्था झालेली आहे. जयगड किल्ल्यांची दूरवस्था तर झालीच आहे शिवाय हा किल्ला व परिसरात कोणत्याही प्रकारची सुरक्षा नाही. जयगड हा किल्ला 15 व्या शतकातीला असून किल्ल्यांच्या संरक्षणाकडे व झालेल्या दूरवस्थेकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे. यामुळे या किल्ल्यांकडे पर्यटकांची गर्दी दिवसेंदिवस घटत असल्याचे आढळून येणे, यामुळे या अतिशय प्राचीन व समुद्र किनारी असलेल्या अतिशय प्रसिद्ध किल्ल्यांची त्वरित दुरूस्ती करण्याची व किल्ल्याला संरक्षण मिळण्याची आवश्यकता तसेच किल्ल्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागावर कारवाई करण्याची आवश्यकता, प्राचीन किल्ले व वास्तुवर विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

.........

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये समाजकल्याण विभागात 10 पदे रिक्त असणे याबाबत श्री.दीपक साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.दीपक साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागामध्ये 15 पदे मंजूर आहेत. त्यापैकी केवळ पाच पदे भरलेली आहेत. त्या ठिकाणी एकूण 10 पदे रिक्त असून ही पदे दहा दिवसात न भरल्यास सोलापूर जिल्हा परिषद येथील समाजकल्याण कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा तेथील जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती यांनी पुणे येथील समाजकल्याण आयुक्तांना पत्राद्वारे दिलेला आहे. सदर पदे अनेक दिवसांपासून रिक्त असून जिल्ह्यातील गोरगरीब नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास होत असून त्यांना ये-जा करण्यासाठी त्यांची आर्थिक व मानसिक अवस्था अत्यंत बिकट होऊन त्यांच्या मध्येही नैराश्याचे वातावरण पसरलेले आहे. तेव्हा राज्य शासनाने याप्रकरणी तातडीने कार्यवाही करण्यासाठी मी हा विशेष उल्लेख उपस्थित करतो.

.........

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित करण्यात येत असलेल्या मुद्यांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि. प. स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो. महाराष्ट्र विधान परिषदेच्या कामकाजामध्ये "विशेष उल्लेख" या वैधानिक आयुधाचा उपयोग सर्वच सदस्य सामाजिक समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी फारच उत्तम प्रकारे करीत असतात. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या समस्या सबंधित विभागाकडे पाठविल्या जातात व त्यावर काहीना काही कार्यवाही केली जाते. काही विभाग त्यांच्याकडे दाखल समस्यांची दखलही घेत नाहीत असेही दिसून येत आहे. मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास विनंती करतो की,

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे...

प्रत्येक अधिवेशनामध्ये सादर करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाव्दारे मांडण्यात आलेल्या समस्यांवर शासनाने केलेल्या कारवाईचा अहवाल पुढील अधिवेशनामध्ये सर्व माननीय सदस्यांना वितरित करण्याची पध्दत या अधिवेशनापासून सुरु करण्यात यावी. त्यादृष्टीने माननीय सभापतींनी शासनाला आज निदेश द्यावेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : सर्व शिक्षा अभियानांतर्गत भरती करण्यात आलेल्या साधन व्यक्ती/विषयतज्ज्ञ यांची पुर्नपरिक्षेची अट रद्द करणे याबाबत श्री.निरंजन डावखरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सर्व शिक्षा अभियानातील साधन व्यक्ती/विषयतज्ज्ञ यांना 2005-2006 पासून आजतागायत एक दिवसाचा खंड देऊन त्यांची नियुक्ती शासनाच्या नियमाप्रमाणे जाहिरात देऊन लेखी व तोंडी परीक्षा घेऊन विविध आरक्षणानुसार व गुणवत्ता यादीनुसार करण्यात आली. महाराष्ट्रातील एकूण 22 जिल्हा परिषदेतून व महानगरपालिका क्षेत्रातून काम करणारे साधन व्यक्ती/विषयतज्ज्ञ यांनी सदर उपक्रम वाडया वस्त्यांमध्ये चांगल्या प्रकारे पोहचविला आहे. शाळाबाह्य मुलांना प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी केले आहे. गुणवत्ता वाढीसाठी तसेच शैक्षणिक सर्व उपक्रम व प्रशिक्षण यामध्ये त्यांचे मोलाचे सहकार्य आहे. सद्य स्थितीत केंद्र शासनाने शिक्षणाचा बाल हक्क कायदा लागू केला असून सदर कायद्यान्वये साधन व्यक्तींच्या पदांमध्ये वाढ केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्रात 6021 पदे भरावयाची आहेत. परंतु संपूर्ण महाराष्ट्रातून फक्त 2168 एवढीच पदे भरण्यात आली आहेत. भरती करण्यात आलेल्या लोकांची महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी पुन्हा परिक्षा घेण्याची अट लादलेली आहे. जर अशा प्रकारची अट घालण्यात आली असेल तर अनुत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कुटुंब उद्ध्वस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर उच्च शिक्षित तरुणांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने उपाय योजना व कार्यवाही करावी. एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाकडे करीत आहे".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : श्रीमती सुंदरी सालीयन यांच्या मालकीची जमीन हडप करण्याचा होत असलेला प्रयत्न याबाबत श्रीमती अलका देसाई, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"श्रीमती सुंदरी सालीयन या वयोवृध्द विधवा महिला आपल्या मुलीसमवेत श्री. निवास, सर्व्हे क्र. 7754, ताडवाडी, वडवली सेक्शन, अंबरनाथ (पूर्व), जिल्हा ठाणे येथील रहिवाशी असून त्या सिटी सर्व्हे क्र.7754 ही 259.2 स्क्वे.मी. या मिळकतीची मालक असून ही संपूर्ण मिळकत श्रीमती सालीयन यांच्या कब्जेवहिवाटीमध्ये आहे. त्या बाबतची नोंद 7/12 च्या उताऱ्यामध्ये व प्रॉपर्टी कार्ड तसेच महसूल विभागातील कार्यालयामध्ये आहे. माहे 22 जुलै, 2011 रोजी कुलकर्णी कुटुंबीय व इतर यांनी आपसात संगनमत करुन श्रीमती सालीयन यांच्या मालकीची जमीन हडप करण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या घरासमोर जमाव करुन अत्यंत गलिच्छ भाषेमध्ये शिवीगाळ करुन जीवे ठार मारण्याची धमकी दिली व अवैधरित्या जागेत शिरकाव करुन गेटला कुलुप लावण्यात आले तसेच घरावर दगडफेक केल्याने त्यांनी घडलेल्या प्रसंगाला घाबरुन 2603168 या क्रमांकावरुन शिवाजी नगर, पोलीस स्टेशन, अंबरनाथ (पूर्व) येथे तक्रार करुनही पोलिसांनी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही कलेली नाही.त्यामुळे कुलकर्णी कुटुंब हे निर्धास्तपणे श्रीमती सालीयन यांची जागा हडप करण्यासाठी त्यांचा व त्यांच्या मुलीचा मानसिक छळ करुन धमक्या देत आहेत, पोलीस बिल्डरचे दबावाखाली कोणतीच कारवाई करीत नसल्याने त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. तरी या प्रकरणाची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर हल्ले करणाऱ्या श्री. कुलकर्णी कुटुंब व इतर यांच्यावर त्वरित कारवाई करण्याची आवश्यकता अशा या गंभीर विषयी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मांडण्यात आलेला विषय खरोखरच गंभीर स्वरुपाचा आहे. वयोवृध्द विधवा महिला श्रीमती सुंदरी सालीयन आणि त्यांच्या मुलीवर होत असलेल्या अन्यायाबाबत पोलिसांकडे तक्रार करुन देखील पोलीस कारवाई करीत नसतील तर ही गोष्ट निश्चितपणे पोलीस खात्याला लांच्छनास्पद आहे. त्यामुळे मी शासनाला असे निर्देश देतो की, सोमवार दि. 23 जुलै, 2012 रोजी सभागृह भरल्यानंतर एक तासाच्या आत या प्रकरणाबाबत केलेल्या कारवाईचा संपूर्ण तपशील सभागृहाला सादर करावा असे पोलीस आयुक्त, ठाणे यांना कळविण्यात यावे.

श्री. राधाकृष्ण विखे पाटील (कृषी मंत्री) : सभापती महोदय, होय.

-----

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचा मुद्दा

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, काल या सदनामध्ये एक इतिहास घडला. हे सदन सुरु झाल्यापासून आजपर्यंत कधी घडले नाही अशा प्रकारचे निदेश माननीय सभापती महोदयांनी दिले. काल प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भातील तारांकित प्रश्न क्रमांक 30079 होता त्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये शेतकऱ्यांच्या संदर्भामध्ये उद्वेग आणि चीड आणणारे जे उल्लेख होते त्याबाबत आदरणीय सभापती महोदयांनी सांगितले की, मी माझ्या अधिकारात ते उल्लेख काढत आहे. यापूर्वी असे कधी घडले नव्हते. ते उल्लेख काढल्यामुळे जी परिस्थिती निर्माण झाली त्या संदर्भात माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, काल गुरुवार, दिनांक 19 जुलै, 2012 रोजी विधान परिषदेच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 5 वरील तारांकित प्रश्न क्रमांक 30079 उत्तरित झाला. त्यावेळी उत्तर क्रमांक 3, 4 व 5 यामध्ये मौजे वडनेर, ता. केळापूर, जि. यवतमाळ येथील श्रीमती कमलाबाई चव्हाण या रागीट स्वभावाच्या होत्या व चीडचीड करीत असत, त्यातच त्यांनी विषारी औषध घेऊन आत्महत्या केली असे माननीय मंत्री महोदयांनी नमूद केले. त्यावेळी सदर मृत्युमुखी पावलेल्या श्रीमती चव्हाण यांच्या स्वभावाच्या उल्लेखावरुन आपण रागीट स्वभाव, चीडचीड हे शब्द कार्यवाहीतून वगळून टाकण्याचे आदेश दिले आहेत. हे उल्लेख काढल्यामुळे आत्महत्येचे कारण बदलले. त्या उत्तरामध्ये विष पिऊन आत्महत्या केली हे शब्द राहिल्यामुळे आता श्रीमती कमलाबाई चव्हाण यांची आत्महत्या कर्जामुळे विष प्राशन करुन झाली असा त्याचा अर्थ झाला. म्हणून मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून आपल्याला विनंती करतो की, श्रीमती कमलाबाई चव्हाण यांच्या आत्महत्येच्या संदर्भामध्ये बाकीचे सर्व संदर्भ आता बाजूला गेलेले आहेत आणि त्यांची आत्महत्या शेतीच्या कर्जामुळे विष पिऊन झाली असे उत्तर पटलावर आल्यामुळे त्यांना एक लाख रुपये जे देय आहेत ते देण्यात यावेत.

आता पंचनामा वगैरेचा विषय नाही. कारण सभागृह सार्वभौम आहे. त्या शेतकऱ्याच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. दिवाकर रावते ....

आत्महत्येच्या संदर्भात 1 लाख रुपये द्यावेत अशा प्रकारची घोषणा आजच सभागृहात होणे आवश्यक आहे. आपण शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात संवेदना दाखविली. सदनातील आपण सर्वच सदस्य संवेदनशील आहोत. आपल्याला विधेयके मंजूर करावयाची आहेत ते सर्व आम्ही करु पण ही घोषणा मात्र त्वरित व्हावी अशी माझी विनंती आहे. मध्यंतरानंतर जेव्हा सभागृहाचे कामकाज सुरु होईल तेव्हा त्वरित या संदर्भात घोषणा व्हावी अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो. त्याप्रमाणे आपण संबंधित मंत्री महोदयांना निरोप देऊन ते करुन घ्यावे. कारण आपणच दिलेल्या निदेशातून एका दुर्दैवी शेतकरी कुटुंबाला मदत होईल. आपल्या माध्यमातून सभागृहामध्ये हा एक नवीन पायंडा पडलेला आहे त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. प्रश्नाच्या गांभीर्यातून एक चांगली घटना घडत आहे त्याला आम्हा सर्व सन्माननीय सदस्यांची साथ आहे. पण ती घोषणा आजच आणि ताबडतोब होणे आवश्यक आहे अशा प्रकारची विनंती मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

**उप सभापती** : या सदर्भात एका तासात शासनाने घोषणा करावी अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, मध्यंतराच्या सुट्टीनंतर तासाभरात शासनाने या संदर्भात आपला निर्णय जाहीर करावा.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, होय.

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.15 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 1.43 ते 2.15 पर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.परशुराम उपरकर )**

**तालिका सभापती** : माननीय सभापतींनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव प्रथम चर्चेसाठी घेण्यात येणार आहे. या प्रस्तावासाठी अडीच तासांचा अवधी निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानंतर शासकीय विधेयकांचे कामकाज सुरु होईल.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेले मुंबई मोटार वाहन कर सुधारणा विधेयक छोटे आहे. त्यामुळे त्या विधेयकावरील चर्चा प्रथम सुरु करण्यात यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, पर्यावरणाचा हा महत्वाचा विषय आहे.

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

सभापती महोदय, माननीय सभापतींच्या आदेशांचे आपण नेहमीच पालन करता. त्यामुळे आपणच प्रथम कोणते कामकाज सुरु करावे ते सांगावे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय परिवहन राज्यमंत्री श्री.गुलाबराव देवकर यांनी मुंबई मोटार वाहन कर सुधारणा विधेयक चर्चेसाठी प्रथम घ्यावे अशी आपल्याला विनंती केली आहे. परंतु आम्हाला त्या विधेयकाची प्रतच अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. मंत्री महोदय, हे विधेयक प्रथम चर्चेसाठी घ्यावे असा आग्रह धरत असताना सन्माननीय सदस्यांना विधेयकाची प्रत न मिळणे योग्य आहे काय ? या सरकारचे काम कशा प्रकारे चालले आहे त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. हे सरकार सभागृहाबाबत असे वागत असेल तर बाहेर कसे वागत असेल याची कल्पना येते.

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील भाषणाला सुरुवात करावी.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पर्यावरणावर दुष्परिणाम घडविणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यास शासनास आलेले अपयश

**मु.शी.**: पर्यावरणावर दुष्परिणाम घडविणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यास शासनास आलेले अपयश या विषयावर सर्वश्री दिवा□र रावते, पांडुरं□ फुंड□र, रामदास □दम, जयंत प्र.पाटील, चंद्र□ांत पाटील, डॉ.दीप□ सावंत, श्रीमती शोभा फड□वीस,डॉ.□ीलम □ोऱ्हे, सर्वश्री राम□ाथ मोते, □शवराव मा□□र, पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील श्री. □ा□ो पुंडलिक □ा□ार यांचा प्रस्ताव

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"विविध प्राणी, वनस्पती, मानव, हवा व सुर्यप्रकाश इत्यादी मिळून आपल्या सभोवतालचे पर्यावरण निर्माण होणे, पर्यावरणाचे संतुलन बिघडू नये याकरिता पर्यावरण मंत्रालयाची स्थापना करण्यात येणे, परंतु शासनाच्या पर्यावरण मंत्रालयास पर्यावरणावर दुष्परिणाम घडविणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यास अपयश येणे, शासनास आलेल्या अपयशामुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढणे, पर्यावरणातील प्रदूषण वाढण्यामागे विविध बाबी जसे की कळणे, जिल्हा सिंधुदुर्ग, भद्रावती, जिल्हा चंद्रपूर, येथील अवैध उत्खनन कारणीभूत असणे, अनिर्बंध वाळू उत्खननामुळे भूगर्भातील जलसाठ्यांसह (समुद्र) वर दुष्परिणाम होणे, पश्चिम घाटाला युनेस्कोने जागतिक वारशाचा दर्जा देण्याचे घोषित केले असताना व गाडगीळ समितीने देखील पश्चिम घाटाला पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित केलेले असताना, महाराष्ट्र शासनाने मुळशी तालुक्यात 3 गिरीस्थाने तत्वत: मंजूर करणे, तसेच विविध उद्योगधंदे, साखर कारखाने तसेच महापालिकांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाणी व मलमूत्र प्रक्रिया न करता सोडल्यामुळे नद्यांचे प्रदूषणात वाढ होणे, ई-कचरा तसेच रुग्णालयातून बाहेर पडणाऱ्या जैविक कचऱ्याच्या गंभीर समस्येवर आवश्यक त्या उपाययोजना करण्यास शासनास अपयश येणे, राज्यातील पर्यावरणाच्या नियमांचे उघडपणे

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

उल्लंघन होत असतांना अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे स्मारक तयार करण्याबाबत व शिवाजी पार्क मैदान सभांसाठी नेत्यांना उपलब्ध करण्याबाबतच्या प्रश्नाकडे राज्य शासनाचे झालेले दुर्लक्ष, पर्यावरणाच्या संतुलनात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या तिवरांची अपरिमीत हानी करण्यात येणे, निसर्गाचे संतुलन बिघडल्यामुळे तापमानातील वाढ तसेच "एल निनो" व "ला निनो" या समस्यांना सामोरे जावे लागून सतत अवर्षण अथवा अतिवृष्टीचा सामना करावा लागणे, प्लास्टिकच्या अतिवापरामुळे पर्यावरणातील ओझोनचे प्रमाण कमी होऊन मानवी शरीरावर त्याचा दुष्परिणाम होणे, यातून मार्ग काढण्यासाठी भविष्यातील आव्हानांचा विचार करिता शाश्वत विकास होईल अशा रितीने उद्योगधंद्यांची वाढ करीत पुढील पिढीचे आयुष्य सुखकर करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेत शासनास आलेले अपयश व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, दिनांक 5 जून, 2012 रोजी पर्यावरण दिन साजरा केला जातो. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहामध्ये एक कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री,मी आणि सन्माननीय पर्यावरण राज्यमंत्री श्री.सचिन अहिर हेही उपस्थित होते. मंत्री महोदयांनी त्यावेळी भाषण करीत असताना असे विचार मांडले होते की, विधिमंडळात सर्व विषयांवर चर्चा होते परंतु पर्यावरण या विषयावर चर्चा होत नाही. मंत्री महोदयांचे या विषयावर सभागृहात चर्चा होण्याचे स्वप्न होते आणि त्यांचे स्वप्न आजच्या चर्चेच्या निमित्ताने पूर्ण होत आहे असे मला वाटते. या प्रस्तावावर कमीत कमी 3 तास चर्चा होणे अपेक्षित आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

नियम 260 अन्वये विरोधी पक्षाने हा पर्यावरणाच्या संदर्भातील प्रस्ताव दिलेला असला तरी या प्रस्तावावर सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना देखील चांगले कॉण्ट्रीब्युशन निश्चितच करता येईल. आपल्या राज्यात कोणकोणत्या गोष्टी पर्यावरणाला बाधक आहेत यावर या ठिकाणी उहापोह होणारच आहे. परंतु या पर्यावरणाच्या संदर्भात ठोस असे धोरण ठरविण्याची गरज आहे. आपण जेव्हा राज्याच्या विकासाच्या गोष्टी करतो त्यावेळी त्या गोष्टी करीत असताना सामान्य माणसाचे जीवन भकास होत असेल तर त्याचा शासनाने अत्यंत गांभीर्याने विचार केला पाहिजे. नवनवीन गोष्टी होत असताना त्यांच्या होणा-या साईड इफेक्टस्कडे दुर्लक्ष केले जात आहे.

सभापती महोदय, गरम पाण्यातील एका बेडकाची गोष्ट मी आपणास सांगतो. त्या बेडकाप्रमाणे आज आपली पर्यावरणाच्या संदर्भात स्थिती निर्माण झालेली आहे. बेडकाला गरम पाण्यात टाकले तर तो टुणकन उडी मारुन बाहेर येतो. परंतु जर त्याला थंड पाण्यात ठेवून ते पाणी हळूहळू गरम केले तर पाणी किती गरम होते याची त्याला जाणीव होत नाही आणि त्या गरम पाण्यामध्ये तो मृत्यू पावतो. आज आपली सर्वांची स्थिती ही त्या बेडकासारखी झालेली आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. शहरातील सांडपाण्यामुळे होणारे प्रदूषण, कारखान्यातील दूषित पाण्यामुळे होणारे प्रदूषण, त्याच बरोबर वाळू उत्खनन, वृक्षतोड, ई कचरा अशा अनेक गोष्टी प्रदूषणाला कारणीभूत आहेत. आता पावसाळा सुरु झालेला असला तरी राज्यातील शेतकरी पावसाकडे नजर लावून बसलेला आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पर्जन्यमानावर परिणाम होतो असे बोलले जाते. या पर्यावरणाच्या संदर्भात मी प्रामुख्याने चार-पाच गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी करणार आहे.

या सभागृहामध्ये लवासाची चर्चा झाली. लवासाच्या फाईल्सवर कोर्टाचा निर्णय आल्यानंतर सह्याद्री अतिथीगृहावर माननीय मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय नेत्यांची चर्चा झाली. त्यानंतर मुळशी तालुक्यात तीन नवे प्रकल्प उभारण्यास शासनाने तत्वत: मान्यता दिली. ही मान्यता देताना पर्यावरणाचा -हास होणार नाही याची दक्षता घेण्याची अट घातली होती.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

या संदर्भात माननीय उच्च न्यायालय आणि समितीच्या स्ट्रीक्चर्स काय आहेत ते मी वाचून दाखविणार आहे. पहिल्या प्रकल्पात मुळशी तालुक्यातील सालता, माजगाव, बार्पे, भांबर्डे, एकोले, घुटके आणि आडगाव या गावांचा समावेश आहे. दुसऱ्या प्रकल्पामध्ये ताळबेळे, साकरण आणि माझगाव या गावांचा समावेश आहे. तिसऱ्या प्रकल्पामध्ये वरसगाव, मुळशी, मुगाव, लावर्डे, वेगरे, पानशेत इत्यादी गावांचा समावेश आहे. पहिल्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र व्हॅली व्हयू प्रा.लि. दुसऱ्या प्रकल्पासाठी सॅटींग इन्फ्रास्ट्रक्चर आणि तिसऱ्या प्रकल्पासाठी ॲक्वालॅन्ड इंडिया प्रा.लि. या कंपन्यांनी गिरीस्थान प्रकल्पाची कामे मागितली आणि त्यांना ती देण्यात आली.

सभापती महोदय, मी आपणास महाराष्ट्र व्हॅली व्हयू प्रा.लि.कंपनीची पार्श्वभूमी सांगतो. या कंपनीने सन 2006 पासून परवानगी न घेता जमीन संपादनाच्या प्रक्रियेस सुरुवात केली. या कंपनीने त्या पट्टयात तीन हजार एकर जमीन घेतली आहे. सदर कंपनी ही मॅक्रो इन्फ्रास्ट्रक्चर आणि होल्डिंग प्रा.लि.या कंपनीची उप कंपनी असून वापी स्थित बिलकिया होल्डिंग प्रा.लि.या कंपनीशी संबंधित आहे. मध्यंतरी या कंपनीने गुजरात राज्यामध्ये आय.टी.सेझ उभारण्याचा प्रयत्न केला होता, परंतु तो यशस्वी झाला नाही. महाराष्ट्र व्हॅली व्हयू प्रा.लि. या कंपनीचे कार्यकारी संचालक श्री.हितेश पारीख आहेत. पहिल्या प्रकल्पासाठी शासनाच्या नगरविकास विभागाने "In order to promote tourism and orderly development of the land, the modification ( to declare the area as a township) is necessary and should be sanctioned subject to conditions." या सबबीखाली दिनांक 29 मे 2012 रोजी अधिसूचना काढली. उक्त अधिसूचनेत काही अटींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी ही अट घातलेली आहे ही बाब खरी आहे. परंतु विविध विभागांच्या ना हरकत प्रमाणपत्रे घेतल्यानंतर ती प्रमाणपत्रे नगरविकास विभागाला सादर केल्यानंतर शासनाला तीनही प्रकल्प उभारण्याची तत्वत: मान्यता देता आली असती. परंतु या ठिकाणी तसे झालेले नाही. सदरहू कंपन्यांना घाईघाईने परवानगी देण्यात आली. तेव्हा अशी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

घाईने परवानगी देण्याचे कारण काय ? या मागील कारण सांगितले जाते की दिल्लीतील एका ज्येष्ठ नेत्याने, ज्याला आजकाल हायकमांडचे चाणक्य म्हटले जाते त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे आग्रह धरला. त्यातून ही घाई झाली अशी चर्चा मंत्रालयातील कॉरीडोरमध्ये आहे आणि मला वाटते ती चर्चा खरी आहे.

सभापती महोदय, युनोस्कोने नुकताच पश्चिम घाटाला जागतिक वारसाचा दर्जा दिलेला आहे. पश्चिम घाट पर्यावरणाच्या दृष्टीने संरक्षित करावा असा आग्रह स्थानिकांनी अनेकवेळा धरला होता. परंतु सरकारला त्यांचे महत्त्व जाणवले नाही. युनिस्कोने पश्चिम घाटाला जागतिक वारसाचा दर्जा दिलेला आहे त्यामध्येच ही शहरे येत आहेत. तरी देखील आपण त्यांना तत्त्वत: मान्यता देत आहोत. ही मान्यता नगर विकास विभागाकडून मिळत आहे आणि या विभागाचा कार्यभार माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे आहे म्हणजे त्यांच्याकडून मिळत आहे.

सभापती महोदय, पश्चिम घाट पर्यावरण तज्ज्ञ समितीचे प्रमुख श्री.माधव गाडगीळ यांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे की, "मुळशी हे ठिकाण पौड आणि वडगाव या वनक्षेत्रांमध्ये म्हणजेच ई.एस.झेड.1 मध्ये येते. पश्चिम घाट समितीने सादर केलेल्या अहवालानुसार ई.एस. झ ेड.1 मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र आणि नवीन हिल स्टेशनचे बांधकाम करता येणार नाही. राज्य शासनाने किंवा केंद्र शासनाने नवीन हिल स्टेशन उभारण्याचा निर्णय घेताना तळागाळातील आणि स्थानिक जनतेला सामावून घेऊन त्यांचे मत विचारात घ्यावे."

सभापती महोदय, मुळशी प्रकल्पास पर्यावरणवाद्यांनी विरोध केलेला आहे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

यामध्ये पर्यावरणवादी डेबी गोयंका आहेत पर्यावरणवादी डेबी गोयंका यांच्या मते, घाट क्षेत्रात आणखी एका हिल स्टेशनची भर पडल्यास या घाटाचे उत्तर आणि दक्षिण असे दोन भागात विभाजन होईल जे पर्यावरणाच्या दृष्टीने हानीकारक असेल.

त्याच प्रमाणे पर्यावरणवादी सुमेरा अब्दुलाली यांच्या मते शासनाने अशा प्रकारचा प्रकल्प हाती घेण्यापूर्वी पश्चिम घाट समितीचा अहवाल विचार घ्यावयास हवा होता असे त्यांनी मत मांडले आहे. वन शक्ती या स्वयंसेवी संस्थेचे स्टॅलीन डी यांच्या मते, आणखी एका हिल स्टेशनची उभारणी पूर्णत: अनावश्यक आह.

सभापती महोदय, State Level Expert Appraisal committee ची 52 वी बैठक दिनांक 12 ते 14 मार्च, 2012 या दरम्यान झाली. या बैठकीत महाराष्ट्र व्हॅली व्हयू प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत विकसित होणाऱ्या प्रकल्पाबाबत चर्चा झाली. या चर्चेमध्ये त्यांनी काय मत मांडले गेले त्यासंबंधी मी माहिती देतो. गिरीस्थान असल्याचे नमूद करुन घेतले. पर्यटकांसाठी कोणत्याही सुविधा करण्याचे नियोजित नाही असे State Level Expert Appraisal committee ने स्पष्टपणे म्हटले आहे. प्रकल्पाचे काम कडक सुरक्षेखाली होणार असल्याने आरखडयाप्रमाणे प्रकल्पाचे काम होते की नाही हे पाहणे अवघड होईल. त्याचप्रमाणे गिरीस्थान विकसित करताना रहिवासी क्षेत्रावर व श्रीमंत लोकांच्या मनोरंजनाच्या सुविधांवर भर देण्यात आलेला आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रामध्ये हे गिरीस्थान विकसित होत असल्याने धरणातील पाणीसाठयावर परिणाम होऊ शकतो. पुणेकर आता पाणी टंचाईस तोंड देत आहेत. पश्चिम घाट समितीने दिलेल्या शिफारशींचा प्रकल्पांना मान्यता देताना विचार केला पाहिजे, तो विचार केला जात नाही. या भूभागाच्या सछिद्र स्वरुपामुळे पाण्याचे पर्क्युलेशन खूप मोठया प्रमाणात होईल व त्यामुळे पाणी साठवणूक व सांडपाण्याच्या व्यवस्थापनावर दुष्परिणाम संभवतो असे State Level Expert Appraisal committee ने अधिकृतपणे म्हटल्यावर सुध्दा आपण त्यांना परवानगी देतो. त्याला कारण शासनावर चाणक्यांचा वरुन दबाव आहे असे म्हटले जाते.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, पुण्यातील धरणांवर जो दुष्परिणाम होत आहे त्या बाबतची माहिती मी या ठिकाणी देऊ इच्छितो. मुळशी तालुक्यातील प्रस्तावित गिरीस्थान पुण्यातील धरणांचे कॅचमेंट एरियात आहे. त्या प्रकल्पास आपण परवानगी दिलेली आहे. पुणे धरणांच्या कॅचमेंट एरियात हा प्रकल्प होणार असल्यामुळे पुण्यातील धरणांच्या पाणीसाठयावर दुष्परिणाम होणार आहे. किंबहुना लवासा सारख्या प्रकल्पामुळे पुण्याला कृत्रिम पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे ही वस्तुस्थिती आहे. वास्तविक पाहता या धरणांसाठी ज्या ज्या शेतकऱ्यांना विस्थापित व्हावे लागले त्यांचे पुनर्वसन अद्याप झालेले नाही.

सभापती महोदय, लवासा प्रकरणी नेमण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीने शिफारशी केलेल्या आहेत. लवासा प्रकरणी आकारावयाच्या दंडाच्या तीव्रतेचे परिक्षण करण्यासाठी आणि Environment Restoration Fund स्थापन करण्यासाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने तज्ज्ञ समिती गठीत केली होती. समितीने जे मुद्दे मांडले त्याची मी माहिती देऊ इच्छितो. पर्यावरण कायद्याचे उल्लंघन केल्यास आकारावयाची तीव्रता, Environment Restoration Fund, उपरोक्त बाबींशी संबंधित इतर कोणतेही विषय. तज्ज्ञ समितीच्या एकूण 4 बैठका झाल्या. समितीने असे अंतरिम निष्कर्ष काढले आहेत त्या बाबतची देखील माहिती मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो.

पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 च्या कलम 15 चे जी कोणी व्यक्ती उल्लंघन करेल त्यास 5 वर्षाकरिता वाढविता येईल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा 1 लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही, अपराधसिध्दीच्या तारखेनंतर जो कोणी 1 वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता उक्त कामाचे उल्लंघन करीत राहिला तर अशा व्यक्तीस 7 वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल. Environment Restoration Fund च्या अनुषंगाने माहिती देऊ इच्छितो की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सर्वसाधारण निधी उभारणे, स्थानिक पातळीवर झालेल्या पर्यावरणाचा ऱ्हास सौम्य करण्यासाठी विशिष्ट निधी उभारणे, उपरोक्त 2 निधी निर्धारित करताना प्रकल्प किंमतीशी सांगड घालणे. उपरोक्त बाब लक्षात घेता लवासा प्राधिकरणावर कारवाई करता येईल व ही कारवाई काय असेल याबाबत समितीने सूचित केले आहे. परंतु प्रत्यक्षात कारवाई केलेली नाही. त्यामुळे या समितीने दिलेल्या मताप्रमाणे लवासा प्रकल्पाच्या

3...



ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.अजित 14:30

श्री.विनोद तावडे...

संचालकांवर कारवाई करावी अशी मागणी मी करीत आहे.

सभापती महोदय, पश्चिम घाट विकास कार्यक्रमाच्या बाबतीत काही ठळक मुद्दे मी या ठिकाणी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. देशाच्या डोंगराळ प्रदेशाच्या विकासाला चालना देण्यासाठी 1974-75 पासून पश्चिम घाट विकास कार्यक्रम राबविण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी महाराष्ट्र शासनाला 40 कोटी रुपये एवढी रक्कम प्राप्त होत आहे. आजपर्यंत जवळपास 1400 कोटी रुपये या योजने मार्फत राज्य शासनाला प्राप्त झाले आहेत. पश्चिम घाटातील नैसर्गिक विविधतेचे जतन करणे हा योजनेचा प्रमुख उद्देश आहे. असे असताना राज्य शासनाने 1974-75 पासून आलेल्या 1400 कोटी रुपयांचा वापर करुन कोणत्या योजना राबविल्या या बाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर हे कळणे, जिल्हा सिधुदुर्ग येथे होत असलेले अवैध उत्खनन बाबतीत सभागृहात नेहमी मुद्दा उपस्थित करीत असतात.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

मिनरल ॲन्ड मेटला , कळणे यांना दोडामार्ग येथील 32 हेक्टर जमीन दिली. या कंपनीने अवैध उत्खनन केल्याचे आढळून आल्याबाबत तक्रार केल्यानंतर चौकशी करण्यात आली. चौकशीचा तपासणी अहवाल देखील सादर झाल्याचे शासनाने मागील अधिवेशनात सांगितले होते. त्यानंतर डायरेक्टर ऑफ मायनिंग यांनी जागेची पाहणी करुन फेरतपासणी केली. स्थळ पाहणी करताना गुगल अर्थ मॅपचा वापर करण्यात आला. श्री. सादिगळे यांनी त्यांचा अभिप्राय दिला आहे. त्यात असे म्हटले आहे की, प्रत्यक्ष खाण तपासणीत खाणपट्टीधारकाकडून खाणी सिमांकन क्षेत्राबाहेर अतिक्रमण करुन खाणकाम केल्याचे आढळून आले असून एमएलआरसी 1966 मधील नियम 48 (7) व (8) आणि एमएमआरडीए 1957 मधील सेक्शन 21 तसेच एमसीडीआर 1988 च्या नियम क्र, 13,33,37 व 53 चे उल्लंघन झाल्याचे आढळून आले आहे. सदरबाबत आपल्या स्तरावरील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर असा अहवाल दिला आहे. स्पष्टपणे नियमांचे उल्लंघन झाल्याचे म्हटले आहे.

सभापती महोदय, या स्थळ पाहणीमध्ये सर्व्हे क्रमांक 57(3) (4) मध्ये बेंचिंग व प्लँटेशन केल्याचे आढळून आले. याकरिता खरे तर आय.बी.एम. शासनाची परवानगी आवश्यक असते परंतु ही परवानगी घेण्यात आली नाही. त्यामुळे 4.22 हेक्टर जागेतून 9.34 लक्ष मेट्रीक टन लोहकणाचे उत्खनन करण्यात आल्याचे लक्षात आले. हा आकडा 1986 साली केलेल्या पूर्वेक्षणावर आधारित आहे. त्यावेळच्या सर्व्हेप्रमाणे आहे. आजच्या परिस्थितीत तो जास्त येईल. त्यावेळची आणि आजची टेक्नॉलॉजी यामध्ये फरक आहे. हा आकडा आणखी वाढू शकतो. हा अहवाल सादर झाल्यानंतर सचिव श्री.के.शिवाजी यांनी जिल्हाधिकारी, संचालक खनिकर्म व इंडियन ब्युरो ऑफ माईन्स यांना कारवाईचे आदेश देण्याबाबत टिप्पणी सादर केली होती. परंतु अद्यापपर्यंत चौकशीचे आदेश देण्यात आलेले नाही. उलटपक्षी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या प्रकरणाची चौकशी करण्याकरिता चौकशी समितीची नियुक्ती केली. एक चौकशी झाली. शिक्षा करावयाची नसेल तर अजून एक चौकशी समिती नेमा. प्रत्यक्ष त्यात वेळ काढायचा हे धोरण राबविले जात आहे हे वास्तव आहे.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

भद्रावती, जि.चंद्रपूर येथील कोळशाच्या अवैध उत्खननाबाबतचे प्रकरण आहे. भद्रावती,जि.चंद्रपूर येथील मायनिंगचे काम कर्नाटक एम्टा कोलमाईन्स या कंपनीला देण्यात आले आहे. मीडियातून आणि चॅनल्सवरुन हा सगळा प्रकार आपण पाहिला आहे. या कामामध्ये अवैध उत्खनन करुन 100 कोटीचा भ्रष्टाचार केला आहे ही बाब भद्रावती येथील तलाठी श्री. खोब्रागडे यांनी उघडकीस आणली. ज्या तलाठयाने ही बाब उघडकीस आणली त्याला बक्षिस म्हणून त्याचे निलंबन करण्यात आले. भ्रष्टाचार बाहेर काढणाऱ्यालाच निलंबित केले जाते असा हा कारभार आहे आणि असे हे सरकार आहे. व्हीसल ब्लोअरचा कायदा पंतप्रधान आणत आहेत त्याला संरक्षण दिले जात आहे. आपल्या प्रशासनातील तलाठी जी चोरी चालली आहे ती जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांच्या निदर्शनास आणून देतो. त्यावर काही कार्यवाही झाली नाही म्हणून मीडीयात जातो म्हणून त्याच्यावर कारवाई केली जाते. कुणाच्या आशीर्वादाने हे चालले आहे हे समजून घेतले पाहिजे. कुणाचे समर्थन आणि कुणाचा आशिर्वाद हा कुणामुळे आहे हे तपासले पाहिजे.कर्नाटक एम्टा कोलमाईन्स या  कंपनीवर कारवाई करावी असे पत्र देऊनसुध्दा कारवाई का झाली नाही ? हायवे, नदी,नाला शहर व गावठाण यापासून मायनिंगचे अंतर 500 मीटर दूर असले पाहिजे परंतु 500 मिटरच्या आत उत्खनन करण्यात आले आहे, कोळसा वाहतुकीमुळे रस्त्याचे नुकसान, परिसरातील प्रदूषण, अधिग्रहीत जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना न देणे अशा अनेक बाबी खोब्रागडे यांनी निदर्शनास आणून दिल्या आहेत. लिहून कळविले आहे. या बाबी तहसीलदारांच्या निदर्शनास आणल्यानंतर त्यांनी सुध्दा पुढे त्याबाबत पत्रे लिहिली. अवैध उत्खननाबाबत दि. 5.3.2011 रोजी श्री. खोब्रागडे यांनी तलाठी सजा क्र. 6 मौ. बरांज मोकासा येथील खोदकामासाठी कर्नाटका एम्टा कोलमाईन्स लि. या कंपनीने त्यांना दिलेल्या जागेव्यतिरिक्त भूखंड क्रमांक 356/1, 356/2, व 248/1 या जमिनीवरुन 1 लाख ब्रास मातीची उचल केली असल्याचे तहसीलदारांचे निदर्शनास आणले व याकरिता 32 कोटी रुपये वसूलीसाठी जप्तीनामा  सादर केला.

श्री. खोब्रागडे यांनी 15.4.2011 रोजी तहसीलदार यांना बरांज मोकासा रस्त्याच्या बाजूला अवैध खोदकाम केल्यामुळे 150 फूट खोल खड्डा पडल्याचे नमूद करुन कर्नाटक एम्टा कंपनीवर मानव वधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत पत्र पाठविले. हे खरे आहे किंवा नाही हे स्पष्ट करावे.

नंतर श्री. खर्चे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........
हे खरे आहे की काय याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच यासंदर्भात या तलाठ्याने पुन्हा एक स्मरणपत्र सुध्दा दिले होते. यामध्ये सर्वच शासकीय अधिकारी असतानाही खोब्रागडे यांना ही माहिती माहितीच्या अधिकाराचा वार करुन गोळा करावी लागते, कारण त्यांचेच वरचे अधिकारी हे विकलेले व कंपनीचे एजंट म्हणून काम करीत आहेत. अशा अधिकाऱ्यांच्या विरोधात जावयाचे असेल तर आपल्याकडे माहिती पाहिजे म्हणून त्यांनी अशा प्रकारे माहिती गोळा केली. त्यांना उत्तर असे मिळाले की, कर्नाटक एम्टा कंपनीबाबत 64 कोटीचा कारवाई रिपोर्ट केला असून त्यावरील माहिती मागविलेली असल्याने अशी माहिती देत येत नाही. 32 लाखाच्या दंडाबाबत कारवाई रिपोर्ट दिला व त्यासंदर्भात केलेल्या कारवाईबाबत रिपोर्ट केला व त्याची माहिती मागविली असता ती देता येत नाही असे त्यांना कळविण्यात आले.

प्रश्न असा आहे की, नियमित 7/12 हा कंपनीच्या नावावर केव्हा झाला याचा विचार करता तहसीलदार व प्रांताधिकारी यांनी दि. 26.6.2011 रोजी कायदेशीर फेरफार केला. तसेच अनियमितता म्हणजे मातीचे उत्खनन करुन ती एस.जी. इन्फ्रास्ट्रक्चर नावाच्या कंपनीला रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी विकण्यात आली. माती खणली आणि तेथेच ठेवले तर अडचण नाही, त्यात रॉयल्टीचा प्रश्न नाही पण ती माती उचलून कोठे वाहून नेली तर मात्र रॉयल्टीचा प्रश्न निर्माण होतो. या खाणीतून उत्खनन करुन दररोज 900 ट्रकच्या माध्यमातून मातीची वाहतूक केली जाते त्याची रॉयल्टी वसूल करण्याबाबतचा मुद्दा आहे. एका बाजूला सिंधुदुर्ग किंवा विदर्भातील खाणींचा प्रश्न असेल किंवा पश्चिम घाटातील टाऊनशीप असेल या सर्वच ठिकाणी पर्यावरणाचा विचार केलेला दिसत नाही.

तसेच हॉटेल सी-रॉकचा विषय मी सभागृहात सातत्याने मांडला होता व त्याला मंत्री महोदय श्री. सचिन अहिर यांनीच उत्तर दिले होते होते की, पुनर्बांधणी असेल तर सीआरझेडचा नियम लागू होत नाही. परवा अधिवेशनाच्या पूर्व संध्येला माननीय मुख्यमंत्र्यांच्या चहापानाच्या वेळेस त्यांच्या निदर्शनास आणले की, विधि मंडळात आम्ही जे मुद्दे मांडतो, त्यात व्हिसलिंग वूडचा प्रश्न असेल, सानंदा प्रकरण असेल, हिरानंदानी बिल्डरच्या संदर्भात विधानसभेत उपस्थित झालेले प्रकरण असेल अथवा सी-रॉकच्या संदर्भातील विषय असेल ही सर्व प्रकरणे शासनाने जरी फेटाळून लावली तरी कोर्टाने मात्र शासनाला जाबा विचारलेला आहे. नुकतीच कोर्टाने माजी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांना सी-

......2

श्री. विनोद तावडे .........

रॉक हॉटेल पुनर्बांधणीच्या मान्यतेबाबत नोटीस काढलेली आहे. अशा प्रकारे शासनाने पळवाटा काढून पर्यावरणाचा विचार न करता सोईनुसार निर्णय घेतले आहेत त्या सर्वच निर्णयांच्या संदर्भात कोर्टानेच पुढाकार घेतलेला दिसतो.

राज्यात सुध्दा वाळू माफियांचे प्रमाण वाढत चालले असून पर्यावरणाचा कोणताही विचार न करता अवैध वाळू उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरु आहे. आता तर त्या त्या भागातील तहसीलदारच वाळू माफिया होत आहेत की काय अशी शंका येऊ लागली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात तर अशा वाळूसाठी खून पडायला लागले आहेत. अनेक ठिकाणी नेते तसेच कार्यकर्त्यांचे सुध्दा रॅकेट दिसून येते. पर्यावरण विभाग मात्र याबाबत कठोर भूमिका घेत नाही तर त्यांच्याशी हात मिळवणी होताना दिसत आहे, याबाबत शासनाला कठोर भूमिका घ्यावी लागणार आहे. तसेच इचलकरंजी विभागातील मुद्यावर मी चर्चा करणार नाही, कारण त्या भागातील सन्माननीय सदस्य तो मुद्दा उपस्थित करतीलच. या भागात कावेरी नदीचा प्रश्न उपस्थित होत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विनायक मेटे )**

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, स्थानिक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कलेक्शन एजंटकडे देणे अथवा स्वत:हून अशा कचऱ्याची विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. तसेच असा कचरा नेहमीच्या कचऱ्यातून विभक्त करुन विशिष्ट रंगाच्या-सांकेतिक पिशव्यांमध्ये भरुन 900 अंश सेल्सीअस तापमानात त्याची विल्हेवाट लावावी लागते. परंतु आपण तसे करीत आहोत काय ? पर्यावरणासाठी जी काही काळजी घ्यावयाची असते त्यासाठी केंद्र शासनाचा पैसा वापरला जातो परंतु त्या पैशाचा उपयोग होतांना मात्र दिसत नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्राला ई-कचऱ्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. मोबाई, संगणक, आयपॉड दोन चार बदलले जात असल्यामुळे ई-कचऱ्याचे आपण नेमके काय करणार आहात ? आज महाराष्ट्रासमोर ई-कचऱ्याचा सर्वात मोठा प्रश्न उभा राहिलेला आहे. महाराष्ट्रात 20,270 मेट्रीक टन एवढा ई-कचरा दरवर्षी निर्माण होत असतो.

सभापती महोदय, काल माननीय मंत्री महोदय श्री. भास्कर जाधव यांनी,साध्या कचऱ्याच्या डम्पींग ग्राऊंडचा प्रश्न का उभा राहिला आहे याची माहिती सभागृहात दिली होती. पर्यावरण दिनाच्या दिवशी जी प्रदर्शनी लावण्यात आली होती त्याचा उल्लेख माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात केला होता. माऊंट एव्हरेस्टवर सुध्दा कचऱ्याचा ढीग उभा राहिलेला आहे. हे सर्व होत असतांना आपण अजूनपर्यंत ई-कचऱ्याचे धोरण बनविलेलेच नाही.

सभापती महोदय, आपल्याकडील दुष्काळ, अवर्षणाची स्थिती जी निर्माण झालेली आहे ती पर्यावरणाच्या ऱ्हासामुळेच झालेली आहे. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी आपण जी काही जागरुकता दाखवली पाहिजे ती जागरुकता आपण दाखवत नाही ही वस्तुस्थिती आहे. आपण केवळ शाहू महाराज व छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतो परंतु प्रत्यक्षात मात्र काहीच करीत नाही.

सभापती महोदय, अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी बजेट अधिवेशनात तावातावाने सांगितले होते की, अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याच्या संदर्भात पर्यावरण विभागाची मान्यता 3 महिन्यात घेऊन येईन व ठरल्या प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अरबी समुद्रात होणार म्हणजे होणारच.

..2...

श्री. विनोद तावडे ....

परंतु या विषयातील फाईल अजून पर्यंत त्याच ठिकाणी आहे. पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम व सामान्य प्रशासन विभागाकडे ही फाईल तशीच्या तशीच धूळ खात पडलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाविषयी या सरकारचे असे धोरण असेल तर या विषयावर अजून जास्त काय बोलावे ? या स्मारकाच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी व्यवहारी दृष्टिकोन ठेवून विचार मांडले होते त्यांनी सांगितले होते की, "असे काही होणार नाही, वाटले तर हे स्मारक आपण किनाऱ्यावर उभे करु, वरळीला केले तर ते चांगले राहील." त्यामुळे असे बोलणारे माननीय उप मुख्यमंत्री खरे की, छत्रपतींचे स्मारक अरबी समुद्रात उभे करण्यासाठी दिल्लीत जाऊन पर्यावरण विभागाची परवानगी आणू अशी घोषणा करणारे माननीय मुख्यमंत्री खरे ? दादा खरे की, बाबा खरे ?

सभापती महोदय, अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे जे स्मारक उभे राहणार आहे त्या फाईलचा मी फॉलोअप ठेवत होतो, आता ही फाईल कोठे गेलेली आहे याची माहिती घेत होतो परंतु ही फाईल अजिबात हलत नव्हती. सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य या विषयावर काही तरी बोलतील असे मला वाटले होते परंतु माझी अपेक्षा फोल ठरली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा करुन आतापर्यंत त्या फाईल मधील एक कागदही हलला नाही ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

ही आपली इफिशियन्सी लेव्हल असेल तर त्याला काय म्हणायचे ?

शिवाजी पार्कचा विषय मागच्या अधिवेशनात उपस्थित करण्यात आला होता. माननीय नगरविकास मंत्री श्री.भास्कर जाधव म्हणाले की, अधिवेशन संपल्यानंतर 15 दिवसाच्या आत बैठक घेतो. शिवाजी पार्कवर होणाऱ्या विविध राजकीय पक्षांच्या सभेसाठी वर्षातील 15 दिवस राखून ठेवण्यासंबंधी काही नियम करता येतो काय हे पाहू. यासाठी मुंबईतील सर्व आमदारांची बैठक घेतो असे माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी सभागृहात सांगितले होते. पण तशी बैठकच झाली. सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांना खाजगीत बोलाविले होते किंवा नाही हे मला माहीत नाही. यासंबंधी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ? त्यावेळी या सभागृहात जोरदार भाषणे झाली होती. शिवाजी पार्कवर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांच्या सभा झाल्या आहेत असा उल्लेख करण्यात आला होता. असा विषय आला की, सभागृहात सर्वजण तावातावाने बोलतात. अधिवेशन संपले की, त्या विषयाकडे कोणीच फिरकत नाही.

तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काय झाले आहे ? अजून काहीच झालेले नाही. राजकारणाच्या पलीकडे जाऊन सत्ताधारी पक्षातील आमदार, स्थानिक विकास निधी वाढवून मागतात तसा आग्रह याबाबत का धरत नाही ? शिवाजी पार्क येथे सभा घेण्यासाठी पर्यावरणाच्या अडचणी कशा दूर होतील याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

छत्रपती शाहू महाराजांनी 1897 मध्ये पर्यावरण विषयी मोठे पाऊल उचलले होते. पण 100 वर्षानंतर तसे आपल्याला करायला जमत नाही. आज कोल्हापूरची पंचगंगा नदी प्रदूषित झाली आहे. त्यासंबंधी अन्य माननीय सदस्य आपले विचार मांडतील.

मला येथे एक गोष्ट प्रामाणिकपणे मांडायची आहे. लवासासाठी आपण हायकमांडमधील चाणक्याला खूष कराल. परंतु, लवासाला दिलेली परवानगी आपण ताबडतोब रद्द करावी. पश्चिम घाटाच्या बाबतीत आता असे चालणार नाही. मग यामध्ये कोणीही हायकमांड येऊ दे. कोणालाही पटेल, न पटेल. कुठल्याही चाणक्याला परवानगी द्यायची नाही हे नक्की. मी पटेल न पटेल असे म्हटले आहे. मी हायकमांड चाणक्य असे म्हटले आहे. आपल्याला कदाचित श्री.अहमद पटेल वाटेल. मी पटेल न पटेल असे म्हटले आहे. शेवटी त्यांनी म्हटले की, सर्वांनाच पटेल. तेच तर झाले आहे. ही वस्तुस्थिती आहे. दिल्लीला कोण गेले होते, फोन कसा आला होता हे सर्व मला माहिती आहे. आम्ही सर्वजण पटेल आहोत पण चाणक्य श्री.अमहद पटेल नाही. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय श्री.अहमद पटेल हे राज्यसभेचे खासदार आहेत. त्यांचा येथे अशा प्रकारे उल्लेख करणे अयोग्य राहील. त्यामुळे ते कामकाजातून काढून टाकावे अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : जे अयोग्य असेल ते कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी तर श्री.अहमद पटेल यांचे नाव घेत नव्हतो. पण कोणी तरी खाली बसून पटेल, पटेल असा उल्लेख करीत होते. आपण पटेल, तुम्ही पटेल असा उल्लेख करीत होते. मी वापी पर्यंत गेलो आहे. त्याच्याही पुढे आमचे सन्माननीय सदस्य देखील जातील. त्यातून सगळे बाहेर पडणार आहे. ते बाहेर पडण्याच्या आधीच हे सर्व रद्द करावे म्हणजे किमान पुढच्या तरी भानगडी थांबतील, एवढेच मला सरकारला म्हणावयाचे आहे.

लवासासाठी एक विशेष बैठक घेण्याची हिंमत एक नेता दाखवतो तशी क्षमता बाकीच्या नेत्यांमध्ये नाही. एका बाजूला हिल स्टेशन्स आहेत, मायनिंग आहेत, वाळू आहे, कोळसा आहे, याकडे लक्ष दिले पाहिजे.

सदर चर्चा संपविताना मला एवढेच म्हणावयाचे आहे की, पर्यावरणासंबंधी शासनाने चुकीच्या गोष्टी केलेल्या आहेत. आदर्श पासून सर्व घटना आपल्या समोर आहेत. अशा प्रत्येक विषयात आपण कोणती भूमिका घेणार आहात ते समोर आले पाहिजे. आता जगात कार्बन फूट प्रिंटचा आग्रह सुरू झाला आहे.

यानंतर श्री.सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.

त्यामुळे या देशामध्ये आपण आता कार्बन फूट प्रिंटचा मुद्दा हळू हळू लागू केला पाहिजे. अगदी सोप्या भाषेत सांगावयाचे झाले तर तुम्ही व्यक्ती म्हणून किती कार्बन एमिशन करता याचे कार्बन फूट प्रिंट प्रत्येकाला दिले जाईल. एकीकडे पर्यावरणाची व्याप्ती वाढत असतांना पर्यावरण विभागामधील कर्मचाऱ्यांची संख्या 30 ते 40 पर्यंत आहे. आपण हे खाते कमकुवत करुन ठेवले असल्यामुळे येणाऱ्या आव्हानाना तोंड देता येईल अशी या खात्याची आजची स्थिती नाही. दुसऱ्या बाजूला कुठे काही झाले की, प्रदूषण नियंत्रण मंडळ डब्यातून भरुन आणलेल्या पाण्याचे संशोधन करते. परंतु पर्यावरण टिकविण्यासाठी काही दिशा, ध्येय, धोरणे ठरवावयाची असतील तर ते काम करण्यासाठी या खात्याकडे कर्मचाऱ्यांची पुरेशी स्ट्रेंग्थ नाही. हे खाते स्ट्रेंग्दन करीत असतांना धोरणात्मक बाब म्हणून कार्बन फूट प्रिंट या राज्यामध्ये आणली पाहिजे. तुम्ही जर त्यासाठी पैसे देऊ शकत नसाल तर आपण रेन वॉटर हार्वेस्टींगसाठी डी.सी. रुलमध्ये तरतूद करुन इन्सेंटिव्ह देतो त्याप्रमाणे इन्सेटिव्ह दिले पाहिजेत. ज्याप्रमाणे कॉलेज आणि शाळेमध्ये एन.सी.सी. चा मुलगा जात असेल तर त्याला 10 टक्के मार्क वाढवून मिळत असतात. त्याप्रमाणे अमुक गोष्टीखाली त्या मुलाची कार्बन फूट प्रिंट असेल, त्या कुटुंबाची असेल तर त्या कुटुंबाला ॲसेसमेंट टॅक्समध्ये 10 टक्के सूट मिळेल. त्या विद्यार्थ्याचे कार्बन फूट प्रिंट मोजण्याची पध्दत सुध्दा आपण इंटरनेटवर पहात असतो. आपण राज्यामध्ये प्रत्येक कुटुंबाला रेशन कार्ड दिले आहे त्या प्रमाणे राज्यातील प्रत्येक कुटुंबातील व्यक्तीचे कार्बन फूट प्रिंट काय, आणि त्या व्यक्तीने अमुक प्रमाणापेक्षा कमी कार्बन एमिशन ठेवले असेल तर त्याला अमुक प्रकारच्या सुविधा मिळतील, त्यांना विक्री करामध्ये सूट मिळू शकते, त्यांना कॉलेजमध्ये ॲडमिशन मिळू शकते. अशा धोरणात्मक गोष्टी आणून त्या प्रत्येक व्यक्तीच्या पातळीवर इम्प्लिमेंट करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, नगरपालिका व महानगरपालिकांच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर परवाच्या दिवशी पर्यावरण पुरस्कार देण्यात आले होते त्यामध्ये बाकीच्या लोकांकडून 50, 110, 150 एंट्री आल्या होत्या, परंतु महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या फक्त तीन एंट्री आल्या. म्हणजेच नगरपालिका आणि महानगरपालिका पर्यावरणाच्या विषयामध्ये इंटरेस्ट घेत नाहीत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पातळीवर यामध्ये किती इंटरेस्ट घेऊन हा विषय मार्गी लावला जात आहे याचाही विचार करण्याची गरज आहे. एका बाजूला पर्यावरणाच्या माध्यमातून चाललेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

प्रचंड भ्रष्टाचार, तसेच शासनाच्या ज्या ज्या प्रमुख गोष्टी केल्या गेल्या आहेत त्या पर्यावरणाच्या पडद्या आड केल्या गेल्या आहेत. त्यांना पायबंद कसा घालता येईल आणि पर्यावरणाकरिता आपण काही पॉझिटिव्हली गोष्टी धोरणात्मक बाब म्हणून घोषित करणार आहात काय? हे या चर्चेच्या माध्यमातून आपण या ठिकाणी आग्रहाने सांगावे अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी अत्यंत उपयुक्त असा ठराव आणला आहे. तवा तापवायचा आणि तापलेल्या तव्यावर तावा तावाने भाकरी भाजावयाची अशाप्रकारचा उद्योग भारतीय जनता पार्टी उत्तम प्रकारे करु शकते हे मला जमणार नाही ही वस्तुस्थिती मी स्वीकारल्यानंतर वसुंधरेच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यन्त पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे हे आपल्या लक्षात आल्याशिवाय रहात नाही. म्हणजे आपण इथपासून थेट चीन पर्यन्त आणि चीन पासून थेट अमेरिकेपर्यन्त गेलो तरी दूरदर्शनवर दाखविले जाणारे दृश्य व्याकुळ करणारे आहे. माणसांची प्रेते नदीच्या काठावर वहात येतात आणि त्या ठिकाणी माणसांना धाय मोकलून रडतांना आपण पहातो. हे कशाचे प्रतिक आहे? माझ्या मते पर्यावरणाचा समतोल ढासळण्याचे हे दुष्परिणाम आमच्या वाट्याला आले आहेत. त्यामधून अति भोग लालसा निर्माण झाली आहे. या भोग लालसेच्या पायी पर्यावरणावर आम्ही अतिक्रमणे केली त्याचे दुष्परिणाम आता भोगू लागलो आहोत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

एक काळ असा होता की, "पाय पडता पाण्यात पाणी शहारलं होतं, भारी शरमलं होतं, लई वरमलं होतं." आता पाणी शहारत नाही, शरमत नाही, वरमत नाही, कारण सर्व पाणी दूषित झालेले आहे.

सभापती महोदय, आपण ज्या भागातून येतो त्या भागातील नद्यांची स्थिती पाहिल्यानंतर आम्ही अतिशय व्याकूळ होतो, आम्हाला चिंता वाटते. आपण अनेक परिषदांमध्ये ही चिंता व्यक्त केलेली आहे. आता पाणी दूषित ठेवावयाचे की, दोषमुक्त ठेवावयाचे याचा विचार राज्यकर्ते म्हणून आणि समाजामध्ये काम करणारे सगळे समाजसेवक म्हणून आपण करण्याची गरज आहे. भारतीय संस्कृतीचे अधिष्ठान मुळात 4 पायांवर अवलंबून होते. पूर्वी ब्रम्हचर्याश्रमातून गृहस्थाश्रमामध्ये प्रवेश केला जात असे. त्यानंतर वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम होता. तुम्ही ब्रम्हचर्याचे पालन केले आहे मग आता संसाराचे सुख घ्या. संसाराचे सुख घेतले आहे तर मग थोडे वानप्रथाश्रमाकडे चालते व्हा. वानप्रथाश्रमाचा अनुभव घेतला आहे तर मग आता संन्यासाश्रमाकडे वाटचाल करण्यास हरकत नाही. ही आपली भारतीय संस्कृती पूर्वी सांगितली जात होती. कारण वय झाल्यानंतर घरामध्ये राहून तरी काय उपयोग आहे ? बाहेर जे काही वातावरण आहे ते प्रदूषणमुक्त आहे. वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम का स्वीकारावयाचा तर घरामध्ये वडीलधाऱ्यांकडून जे काही प्रदूषण व्हावयाचे त्यामुळे जंगलात गेल्यानंतर ओझोन, ऑक्सीजन वगैरे त्यांच्या वाट्याला यावा, त्यांना उत्तम हवा घेता यावी, काही काळ तरी त्यांनी त्या जंगलामध्ये राहावे, प्राण्यांच्या सानिध्यामध्ये राहावे, आपणही प्राणीसृष्टीच्याच वंशावळीतील आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करावा हा त्या काळातील प्रयत्न होता. त्या दृष्टीने निसर्गाच्या सानिध्यामध्ये लोक आपले आयुष्य जगत होते. पण आता निसर्गच राहिलेला नाही त्यामुळे माणसांनी कोठे जावयाचे हा मोठा प्रश्न आहे.

सभापती महोदय, आमचे काही सन्माननीय सदस्य काश्मीर, अरुणाचल, मेघालय या दिशेने जाऊ शकतील. त्या ठिकाणी वृक्षांची संख्या तसेच ओझोन आणि ऑक्सिजन हे उत्तम प्रकारे आहे. अरुणाचलमधील व्यक्तींचे आयुर्मान आपल्यापेक्षा अधिक आहे. मेघालयमधील व्यक्तींचे आयुर्मान आपल्यापेक्षा अधिक आहे. कारण ते त्या ठिकाणी प्रदूषणमुक्त जीवन जगतात. महाभारतामध्ये

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

पांडव जंगलामध्ये गेले. ते त्या दिशेला काही काळ राहिल्याच्या नोंदी आढळतात. त्यामुळे त्यांच्याही वाट्याला उत्तम आयुर्मान आले.

सभापती महोदय, आपण एकूण विचार केला तर पृथ्वीपासून दहा हजार किलोमीटर अंतरापर्यंत जे आवरण आहे ते हवेचे आवरण आहे. आपण पूर्वेकडे दहा हजार किलोमीटर गेला, पश्चिमेकडे दहा हजार किलोमीटर गेला, उत्तरेकडे दहा हजार किलोमीटर गेला किंवा दक्षिणेकडे दहा हजार किलोमीटर गेला तरी चारही बाजूला हवेचे आवरण आहे. त्यानंतर 80 किलोमीटरपर्यंत जे आवरण आहे ते उपयुक्त असे हवेचे आवरण आहे. त्याहीपेक्षा जीवसृष्टीला आवश्यक असणारे जे आवरण आहे ते 11 किलोमीटरपर्यंतच आहे. म्हणजे जीवसृष्टीला उपयुक्त असे वातावरण निर्माण करण्याची क्षमता ज्या हवेमध्ये आहे ती हवा फक्त 11 किलोमीटरपर्यंतच आहे. दुर्दैवाने ही हवा दूषित करण्याचे काम आम्ही करीत आहोत की काय अशा प्रकारची शंका निर्माण व्हावी असे वातावरण आम्ही तयार केले आहे. शेवटी यातून आपण मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पाहिले अशी विनंती मला राज्य शासनाला या निमित्ताने करावयाची आहे.

सभापती महोदय, गीतेमध्ये असे सांगितले आहे की, पिंड आणि ब्रम्हांड एकच आहे. जे पिंडामध्ये आहे ते ब्रम्हांडात आहे. जे ब्रम्हांडात आहे ते पिंडात सापडेल. पिंडे पिंडे ब्रम्हांडे असे सांगितले जाते. म्हणजे शरीरामध्ये जे आहे ते तुम्हाला ब्रम्हांडामध्ये सापडू शकेल. असे जर असेल तर हे ब्रम्हांड प्रदूषित करण्याचे काम आम्ही करीत आहोत. कारण शेवटी ही आमची तृष्णा आहे. उपनिषदामध्ये माणसांच्या व्युत्पत्तीविषयी जी मनोरंजक कथा सांगितलेली आहे ती मी सांगतो. कारण तृष्णा आणि क्षुधा यातून हे सर्व दुष्परिणाम निर्माण झालेले आहेत. ती कथा अशी आहे की, परमात्म्याला वाटले की, आता आपण काही जीवसृष्टी निर्माण करावी. त्यांनी काही जीवसृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्या जीवाची व्युत्पत्ती केल्यानंतर...

**तालिका सभापती** ( श्री. विनायक मेटे ) : सन्माननीय सदस्यांनी कथेऐवजी प्रदूषणाची व्यथा सांगावी.

..3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, कथा सांगितल्यानंतरच व्यथा लक्षात येईल. या व्यथेचे जे रहस्य आहे ते त्या कथेमध्ये दडलेले आहे, हे लक्षात आणून देण्यासाठी मी ही कथा सांगत आहे. परमात्म्याने त्या जीवाची व्युत्पत्ती केली आणि ते जीव समुद्राच्या तळाशी काही वर्षे पडून होते. ते जीव हजारो वर्षे पडून राहिल्यानंतर मग परमात्म्याला वाटले की आता आपण काही तरी करावे. मग परमात्म्याने त्या तृष्णा आणि क्षुधा यांचा संयोग त्या जिवाशी घडविला.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

ते घडविल्यानंतर त्या जिवांना चैतन्य प्राप्त झाले. ते जीव परमात्याकडे अशी मागणी करु लागले की, आता आम्हाला राहण्यासाठी वसतिस्थान द्यावे. त्यामुळे परमात्म्याने घोडा व बैल या प्राण्यांची निर्मिती केली. पण त्या जिवांनी घोडा व बैल या चार पायाच्या प्राण्यांच्या वसतिस्थानात आम्ही प्रवेश करणार नाही, असे सांगितले. शेवटी परमात्म्याने दोन पायाचा मनुष्य तयार केला. त्यानंतर त्या जिवांनी दोन पायाच्या मनुष्य प्राण्यामध्ये प्रवेश केला. पण तृष्णा व क्षुधा यांना मात्र वसतिस्थान मिळाले नाही. त्यामुळे तृष्णा व क्षुधा ह्या अशाच अतृप्त राहिल्या. आपण हे जे काही भोगत आहोत तो त्यांचा परिणाम आहे. माणसाची तृष्णा व क्षुधा शांत होण्यास तयार नाही. क्षुधा व तृष्णेमुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. त्यात आपल्याला सुधारणा करावी लागेल.

असे सांगितले जाते की, 650 वर्षांपूर्वी पृथ्वीवर एक उल्कापात झाला होता. त्याचे कण अवकाशात पसरले गेले. त्यानंतर जिवांची निर्मिती झाली. हा सर्व संशोधनाचा भाग झाला. आता देवकण कसा सापडला त्याची चर्चा सुरु आहे. त्याही दृष्टीकोनातून शासनाने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, चीन या देशातून भारतामध्ये प्लास्टिकच्या वस्तू येतात. चीनमधील भंगारात निघालेल्या वस्तुंपासून तयार तयार केलेल्या वस्तू भारतात येतात. भंगारात काढलेल्या वस्तू नष्ट करण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च येणार आहे. तो टाळण्यासाठी त्या सर्व वस्तू आपल्याकडे पाठवितात. आपण त्या वस्तू मोठ्या आनंदाने खरेदी करतो. या विषयावर समाजातील विविध राजकारणी व्यक्तींनी सामाजिक प्रबोधन घडवावे अशी मी आग्रहाची विनंती करतो.

काही दिवसांपूर्वी चीनमध्ये तयार केलेल्या मोबाईल फोनचा स्फोट एका मुलीच्या हातामध्ये झ ाला. त्यामुळे त्या मुलीचे तोंड व हात भाजले. हे वास्तव असल्यामुळे त्याच्यावर शासन काही प्रतिबंध घालणार आहे की नाही ? शासनाने या मुद्याबाबत साकल्याने विचार केला पाहिजे.

जगामध्ये भूकंपांची संख्या वाढलेली आहे, वादळे वारंवार येत आहेत. हिमवृष्टी सातत्याने होत आहे. या सर्व गोष्टींचा कार्यकारण भाव प्रदूषण हा आहे. हे प्रदूषण नष्ट करण्याचे काम आपण संयुक्तपणे करण्याची आवश्यकता आहे.

2...

प्रा.सुरेश नवले....

संयुक्त राष्ट्र संघाने 1972 साली स्विडनमधील स्टॉकहोम येथे एक बैठक घेतली होती. त्या बैठकीत लोकसंख्येवर नियंत्रण आणण्याचा संकल्प सोडण्यात आला. जगाची लोकसंख्या 800 कोटीच्याही पुढे जाते की काय असे चित्र उभे राहिलेले आहे. लोकसंख्येचा राक्षस जगाला गिळंकृत करील की काय असे चित्र उभे राहिलेले आहे. भारतातील लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी सामाजिक प्रबोधनाबरोबर राजकीय इच्छा शक्ती सुध्दा दाखविणे आवश्यक आहे. तरच लोकसंख्या आटोक्यात येण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील नद्यांमधून वाळूचा उपसा मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यावर नियंत्रण आणण्याची गरज आहे. त्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत अशी आग्रहाची विनंती मी या निमित्ताने करतो. सभापती महोदय, आपण मला या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

------

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये ज्या गोष्टींचा उल्लेख केलेला आहे त्या सर्व गोष्टी आजच्या समस्यांशी निगडित आहेत. हा प्रस्ताव इतका विस्तृत आणि व्यापक आहे की यातील प्रत्येक मुद्यावर या सभागृहामध्ये सविस्तर माहिती मिळेल आणि त्यानुसार माननीय मंत्री महोदय देखील प्रस्तावाला समर्पक असे उत्तर देतील असे अपेक्षित आहे. दोन वर्षापूर्वी मी या सदनामध्ये ई-कच-याविषयी अशासकीय विधेयक मांडले होते. राज्यामध्ये टी.व्ही., कॉम्प्युटर्स, रेफ्रीजरेटर्स इत्यादीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर शेकडो टन ई-कचरा निर्माण होत आहे. या ई-कच-याची भंगारामध्ये विल्हेवाट लावली जाते. यासाठी काय उपाययोजना करणे आवश्यक आहे, कोणती यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे याचे उत्तर आज आपल्याकडे नाही. माननीय मंत्री महोदयांनी माझ्या या अशासकीय विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना नजिकच्या भविष्यकाळात ज्या उपाययोजना करण्याचे त्यांनी सांगितले होते त्या उपाययोजना दुर्दैवाने झालेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. आपण यूज ॲण्ड थ्रो अशा गोष्टींचा मोठ्या प्रमाणावर वापर करतो.

माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, मुंबईमध्ये दरवर्षी 23211 टन कचरा जमा होतो. पिंपरी-चिंचवडमध्ये 19700 टन कचरा जमा होता. हीच परिस्थिती पुढे चालू राहिली तर 2015 मध्ये मुंबईमध्ये 50 हजार टनापेक्षा जास्त आणि पिंपरी-चिंचवडमध्ये 35 हजार टनापेक्षा जास्त कचरा निर्माण होईल. माननीय मंत्री महोदयांनी असेही सांगितले की, हजार्डस वेस्टच्या बाबतीत शासनाने पुढाकार घेतलेला आहे. 50 कोटी रु.पेक्षा जास्त खर्च करुन हा सर्व इलेक्ट्रॉनिक्स कचरा इंडस्ट्रीज डिपार्टमेण्ट कडून एकत्रित करुन त्याचे डिस्पोज करणारे सेंटर्स तळोजा, रांजणगाव, बुटीबोरी या ठिकाणी सुर करीत आहोत. पण हे सेंटर्स प्रत्यक्षात कोठे सुरु झाल्याचे दिसत नाही. माननीय मंत्री महोदयांनी असेही सांगितले होते की, कंपनीतून जे हजार्डस वेस्ट बाहेर कुठेतरी टाकले जाते त्याबाबतीत ट्रॅक डॉटकॉम टेक्नॉलॉजीचा वापर केला जाईल. या टेक्नॉलॉजीचा वापर सुरु झाला का ? हजार्डस् वेस्ट घेऊन जाणा-या वाहनांवर जीपीएस सिस्टिम बसवली असून ती सिस्टिम पोल्युशन बोर्डाच्या अखत्यारित आहे असे मंत्री महोदयांनी त्यावेळी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सांगितले. हे सर्व सांगितल्यानंतर त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी किती झालेली आहे हा खरा प्रश्न आहे. या ई-कच-याच्या संदर्भात या सभागृहामध्ये दिनांक 16.7.2010 रोजी चर्चा झाली होती. या चर्चेला दोन वर्षे झाली. या चर्चेच्या माध्यमातून शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ? कायद्याच्या कलम 15 नुसार हजार्डस् वेस्टच्या शेडयुलमध्ये ज्या गोष्टी आहेत त्याबाबतीत जर कोणी दोषी आढळून आले तर त्याला 1 लाख रुपये दंड आणि 5 वर्षे तुरुंगवासाची शिक्षा करण्याची तरतूद आहे. या तरतुदी प्रमाणे आतापर्यन्त किती लोकांना शिक्षा केली हे माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील नारिंग्रे, विरार, वसई, पालघर या ठिकाणी मोठया प्रमाणावर रेती उत्खनन होत आहे. त्याचे फोटोग्राफ देखील मी आणलेले असून ते मी माननीय मंत्री महोदयांकडे पाठवतो. आज देखील त्या ठिकाणी रेती उत्खनन सुरु आहे. रेती उत्खननाच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने असा निर्णय दिलेला आहे की, सक्शन पंप लावून रेतीचे उत्खनन करु नये. परंतु या बाबतीत कोणतेही निर्बंध पाळले जात नाहीत.

सभापती महोदय, आम्ही लहान असताना जुली बेटावर बोटीने जात होतो. फार सुंदर अशा प्रकारचे ते बेट होते. आज ते बेट अस्तित्वात नाही.

...नंतर श्री. नाईक...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..

त्या जुली बेटावर आज काहीही नाही. कारण तेथील वाळू आणि रेती मोठ्या प्रमाणावर झालेल्या उत्खननामुळे संपली आहे.

सभापती महोदय, मी यापूर्वी सभागृहात सांगितलेले आहे की, वाळू आणि रेती उत्खननामुळे वैतरणा पुलाला धोका आहे. रेल्वे प्रशासनाने सांगून देखील शासनाने हे उत्खनन थांबविलेले नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. बांधकामासाठी वाळू लागते याची मला कल्पना आहे. परंतु त्याचा उपसा किती करायचा याला देखील मर्यादा आहेत. ती कोपराने खणायची काय हा महत्वाचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, श्री.बानकर, सचिव, पब्लिक इन्फर्मेशन यांनी एक पत्र दिलेले आहे. त्या पत्रात त्यांनी असे म्हटले आहे की, "Reply to your application under Right to Information Act, I have to inform you that for year 2011-12 Environment department has not granted any permission or NOC for the land extraction by suction pump from the creeks or river." हे राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाचे उत्तर आहे. असे असताना त्या ठिकाणी यांत्रिक पध्दतीने म्हणजे सक्शन पंप लावून रेतीचे उत्खनन अव्याहतपणे सुरु आहे. तेव्हा आपण या संबंधी कोणता निर्णय घेणार आहात ?

सभापती महोदय, आज रेती उत्खनन करणाऱ्यांची दादागिरी इतकी वाढली आहे की, त्यांची तहसीलदार व पोलीस अधिकाऱ्यांवर हल्ले करण्यापर्यंत मजल गेली आहे.

सभापती महोदय, विभागाच्या जी.आर.मध्ये उल्लेख आहे की, "वाळू आणि रेती उत्खननासाठी सक्शन पंपचा वापर अनुज्ञेय नाही. फक्त अपवादात्मक परिस्थितीमध्ये सक्शन पंपचा वापर होऊ शकतो. नौकानयन सुकर करण्यासाठी याचा वापर करता येईल." परंतु त्या ठिकाणी नौकानयन होत नाही तर मग सक्शन पंप लावून रेती का काढण्यात येत आहे ? त्या ठिकाणची वाळू काढण्याचा ठेका महालक्ष्मी ट्रेडर्स कंपनीला दिलेला आहे.पालघरपासून नारिंग्रे-वसई विरारपर्यंत एकाच कंपनीला हा ठेका दिलेला आहे. शासनाने कोणालाही ठेका द्यावा त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही. परंतु जर कोणी सक्शन पंप लावून रेती काढत असेल तर त्यावर आपण बंदी घालणार काय असा माझा प्रश्न आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..

सभापती महोदय, वैतरणा पुलाला धोका असल्याचे रेल्वे प्रशासनाने देखील आपल्या विभागाला कळविले आहे. रेल्वे प्रशासनाने श्री क्षत्रिय साहेबांना लिहिलेल्या पत्रातील मजकूर वाचून दाखवितो "stoppage of illegal sand minining in surrounding area of railway bridge" तेव्हा आपण हे अनधिकृत उत्खनन केव्हा बंद करणार आहात याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात द्यावे

सभापती महोदय, बायो-मेडिकल वेस्ट मॅनेजमेंटचा महत्वाचा मुद्दा आहे. आपल्या येथे अनेक रुग्णालये आहेत. या रुग्णालयाचा कचरा कोठे टाकण्यात येतो ? रुग्णालय किंवा दवाखान्याची तपासणी करण्यासाठी अधिकारी येतात. त्यांना दवाखान्या बाहेर एखादी सुई सापडली तरी ते त्या डॉक्टराला दंड करतात आणि निघून जातात. नर्सिंग हॉस्पीटल्सना बायो-मेडिकल वेस्टचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना पुढील लायसन्सचे नूतनीकरण करता येत नाही. बायो-मेडिकल वेस्टच्या नावाखाली अधिकारी पैसे वसूल करीत आहेत. पण बायो-मेडिकल वेस्ट मात्र प्रॉपर्ली होत नाही.

सभापती महोदय, मी, काल या सभागृहात अर्भक सापडल्याचा मुद्दा मांडला होता. गर्भपात झ ााल्यानंतर जे वेस्ट प्रोडक्ट निघते ते बायो-मेडिकल वेस्ट समजायचे की त्याचा दफन विधी करायचा या बाबत आपल्याकडे कायदा नाही, म्हणूनच डॉ.सुदाम मुंडे केसमध्ये अर्भक रस्त्यावर फेकले, ड्रेनेजमध्ये फेकले असे ऐकायला मिळाले.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, जळगाव शहरातील एका गटारीत अर्भक सापडले, त्या अर्भकाची विल्हेवाट लावा असे डॉक्टरांना लिहून दिले होते. अर्भक डिस्पोजल कशा पध्दतीने करावयाचे ही माहिती घेण्यासाठी डॉक्टरांना मुंबई पर्यंत फोन करावा लागला. त्या अर्भकाची विल्हेवाट कशा पध्दतीने लावावयाची यासंबंधी कोणीही माहिती सांगू शकले नाही. गर्भपात करुन जे काही प्रॉडक्ट बाहेर निघेल, ते नेमके कोणत्या कॅटगरीमध्ये येते ? समजा 150 ग्रॅम वजनाचे अर्भक असेल, 20 आठवडयाच्या आतील अर्भक असेल, तर त्याला जमिनीत पुरावयाचे की बायो मेडीकल वेस्ट म्हणून त्याचे डिस्पोजल करावयाचे यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा निर्णय रुग्णालयांना घेता येत नाही. ऑपरेशन थिएटरमध्ये ऑपरेशन केल्यानंतर अनेक आतडया तसेच वेगवेगळे अवयव मोठया प्रमाणात बाहेर पडतात. त्या अवयवांचे डिस्पोजल वेगळया पध्दतीने करणे आवश्यक आहे. सध्या प्लॅस्टीकच्या पिशव्या दिलेल्या असतात, ते अवयव त्या पिशवीत टाकतात आणि कचऱ्याच्या व्हॅनमध्ये टाकून देतात. अवयवाचे डिस्पोजल करण्यासाठी वेगळा कायदा करण्याची आवश्यकता आहे. हयूमन ऑर्गन्स, हयूमन पार्ट, मसल्सचे कापलेले पार्ट त्याचे नेमके मॅनेजमेंट कसे करावयाचे हा मोठा प्रश्न आहे.

सभापती महोदय, नद्यांचे प्रदुषण हा देखील एक अतिशय गंभीर विषय झालेला आहे. कोल्हापूर जिल्हयात पंचगंगा नदीत दूषित पाणी सोडले जात असल्याने कावीळ या आजाराची साथ मोठया प्रमाणात आली. कावीळ बरोबर कॉलऱ्याची देखील साथ सुरु झाली, संपूर्ण जिल्हयात साथीच्या रोगाने हाहाकार उडाला होता. या साथींवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाला प्रयत्नाची पराकाष्टा करावी लागली. राज्यातील मोठ्या नद्यांमध्ये सांडपाणी सोडण्यात येते, त्यामुळे या नद्याचे पाणी पूर्णपणे दूषित झालेले आहे, नद्यांचे पाणी दूषित होऊ नये म्हणून शासनाला काही खास उपाययोजना कराव्या लागणार आहेत.

सभापती महोदय, मला साऊंड पोल्यूशनसंबंधी दुसरा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करावयाचा आहे. साऊंड पोल्यूशन हे किती डेसीबल नंतर होते यासंबंधी पुन्हा शासनाला आराखडा तयार करावा लागणार आहे. प्रदुषण मंडळाला साऊंड पोल्यूशन किती डेसीबल नंतर होते यासंबंधी अभ्यास करण्याचे आदेश महाराष्ट्र शासनाने दिले तर पोल्यूशन कमी होण्यासाठी मदत होऊ

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

शकेल. आपल्या जवळून वाहन गेले तरी ते वाहन बऱ्याच डेसीबलमध्ये आवाज करते. आपल्या कडील वाहने ही 70 डेसीबलच्यावर आवाज करतात. आपली 70 डेसीबल ही कमाल मर्यादा आहे. मुंबईतील प्रचंड प्रमाणातील ट्रॅफीक, मुंबईतील साऊंड पोल्यूशनमुळे लोकांना कर्णदोष होत आहेत. साऊंड पोल्यूशनवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य शासन कोणते प्रयत्न करणार आहे या बाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी. ध्वनी प्रदूषणाची संज्ञा बदलणे अत्यंत आवश्यक आहे असेही मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. मोठमोठया इमारतीचे शीट फायलींगचे काम चालू असते, त्यावेळी प्रचंड आवाज येत असतो. त्या आवाजाला कोणीही अडवित नाही. त्या बाबतीत शासन काय करणार आहे याचा देखील खुलासा या ठिकाणी झाला पाहिजे. रस्त्याने ट्रक जातात, ॲटोरिक्षा चालतात, त्या वाहनांमधून 70 डेसीबलपेक्षा जास्त ध्वनी प्रदूषण होते. पर्यावरणाचे कारण पुढे करुन शिवाजी पार्क येथे सभेसाठी वापरण्यात येणाऱ्या ध्वनीक्षेपकाला आपण बंदी घालता. या बंदीतून एक मोठा राजकीय प्रसंग निर्माण होत असतो.

सभापती महोदय, यापुढील पिढी सुदृढ, निरोगी आणि चांगली घडवावयाची असेल तर सर्व प्रकारचे पोल्यूशन थांबविले पाहिजे. पोल्यूशनच्या बाबतीत नवीन नियमावली तयार केली पाहिजे. राज्यात तयार होणाऱ्या ई-कचऱ्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी काही तरी तोडगा काढावा. पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास थांबविण्यासाठी कोणते प्रयत्न केले जाणार आहेत या संबंधी माहिती द्यावी अशा प्रकारची विनंती करुन मी माझे मनोगत पूर्ण करतो. धन्यवाद.

----------

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या विषयावर माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव सभागृहात मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, आज निसर्गाला वाचविण्याची सगळयात मोठी आवश्यकता आहे. जैवविविधतेने परिपूर्ण अशा पश्चिम घाटाचा जागतिक वारसा यादीमध्ये समावेश झालेला आहे ही आपल्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. आपण सर्व मिळून गेल्या 20 ते 25 वर्षापासून निसर्गाचा ऱ्हास करीत आहोत. हल्ली नावे ठेवणे खूप सोपे असते. पर्यावरणाचा समतोल राखण्याचे काम आपण आपल्या घरापासून केले पाहिजे. प्रत्येकाने समजले पाहिजे की, ही माझी जबाबदारी आहे. प्रत्येकाने किमान चार झाडे, पाच झाडे आपल्या घराभोवती लावली तरच पर्यावरणावर बोलण्यावर आपल्याला अधिकार आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

सभापती महोदय, आज आपण विकासाला कधी विरोध करीत नाही. विकास हा सर्वांनाच हवा आहे. परंतु तो पर्यावरणाला पूरक असा विकास असला पाहिजे. निसर्गाचे संवर्धन करणारा विकास आपल्याला अपेक्षित आहे. आपल्या देशातील वाढती लोकसंख्या आणि वाढत्या गरजा या दृष्टिकोनातून आपण आज निसर्गाला ओरबडून काढीत आहोत याचे भान कोणालाच राहिलेले नाही. दरवर्षी 18 लाख हेक्टर क्षेत्रामधील जंगल आपण नष्ट करीत आहोत. पृथ्वीच्या भूपृष्ठ भागावर 33 टक्के जंगल क्षेत्र असणे आवश्यक आहे. आपण झाडे तोडतो परंतु झाडे लावणे सक्तीचे करीत नाही. मुंबईसारख्या शहरांचा विचार केला तर सात बेटांनी वेढलेले हे शहर आहे. या शहरात संजय गांधी नॅशनल पार्कचा पूर्वी 20 चौ.कि.मी.लांबीचा परिसर होता तो आता 103 चौ.कि.इतका झालेला आहे. येथे मोठे मोठे डोंगर असूनसुध्दा ते फोडण्याचे काम सुरु आहे. केवळ मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्राच्या कोणत्याही भागात गेले तरी भरगच्च वेलींनी भरलेले डोंगर उजाड झालेले असून तेथे डोंगर फोडण्याचे काम मोठया प्रमाणात सुरु झालेले आहे. यामध्ये प्रचंड प्रदूषण सगळीकडे होत आहे. पाण्याचे प्रदूषण आहे, हवेचे प्रदूषण आहे, समुद्रामध्ये गेलो तरी प्रदूषण आहे. ज्या मीठी नदीचा वारंवार उल्लेख केला जातो आणि 900 कोटी रुपये यासाठी खर्च करतो ती मीठी नदी ही मीठी नदी आहे हे एमएमआरडीचे अधिकारीसुध्दा मानायला तयार नव्हते. समुद्रात जेथे मीठी नदी मिळते ती म्हणजे धारावीमधून येणाऱ्या घाणेरडया पाण्याचे गटार आहे असे समजले जात होते. एमएमआरडीएच्या लोकांनी घाणेरडे पाणी समुद्रात जाऊ नये म्हणून भिंत टाकण्याचे काम केले होते त्यावेळी मच्छीमारांनी आणि आम्ही लोकांनी भिंत तोडून तो मार्ग समुद्रात जाण्यासाठी पूर्ववत केला होता. प्रदूषण हे आपण सगळे मिळून करीत आहोत यासाठी ही वृत्ती बदलण्याची गरज आहे. कालच मुंबईतील कचऱ्यासंदर्भात लक्षवेधीवर याठिकाणी चर्चा झाली होती. तेव्हा मी सूचना केली होती. कचरा आपण निर्माण करीत आहोत. रोज 27 हजार कर्मचारी कचरा उचलण्याचे काम करीत आहेत. परंतु 1 कोटी 30 लाख लोकांचे हात कचरा जनरेट करीत आहेत. तो कचरा रस्त्यावर टाकतात आणि त्यातून घाणीचे साम्राज्य पसरले आहे. हे आपण शहराबाबत बोलतो. शहरामध्ये टोलेजंग इमारती आणि टॉवर्स बांधले जात आहेत परंतु या सिमेंटच्या जंगलामुळे शहरातील तापमान वाढत आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

कुठेही नियम केलेले नाहीत. इमारतीला परवानगी देताना इमारतीच्या सभोवताली झाडे लावणे सक्तीचे केले पाहिजे. ती होत नाही. त्यातून हे सगळे प्रश्न निर्माण झालेले आहे.

3/4 वर्षापूर्वी मुंबईतून चिमण्या गायब झाल्या होत्या. आज सांगायला आनंद वाटतो की चिमण्या आता दिसू लागल्या आहेत. आज मुंबईसारख्या शहरामध्ये अनेक चांगल्या जातीचे पक्षी बघायला मिळत होते परंतु त्यांचा सुध्दा आता ऱ्हास होताना दिसत आहे. पक्षांचे रक्षण करण्यासाठी स्वत:चे निसर्गप्रेम जागरुक केले पाहिजे. केरळ,कर्नाटक गोवा आणि महाराष्ट्र या 1600 कि.मी.परिसरामध्ये पश्चिम घाट पसरला आहे. त्यामध्ये कोयना अभयारण, चांदोली अभयारण्य, राधानगरी जंगले ही पूर्वीपासून पहायला मिळतात. राधानगरी हे जंगल छत्रपती शाहू महाराजांनी स्थापन केले होते. ते तेव्हा 20 कि.मी.चे होते. आज ते 351 चौ.कि.पर्यंत करण्यात आलेले आहे. याठिकाणी विविध वनस्पती आहेत, अनेक फुलांच्या जाती आहेत. फुलपाखरे,प्राणी आणि पक्षी आहेत. वाघ,सांबर,काळया बिबटया,हरीण आणि नीलगाय असे अनेक प्रकारचे वन्यप्राणी आहेत. आपण याचे संरक्षण कसे करणार हाच मोठा प्रश्न आहे. युनेस्कोने आपल्याला हा जो दर्जा दिलेला आहे तो सहजा-सहजी दिलेला नाही.

नंतर श्री. खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ........

कारण त्यांना सुध्दा आपण पर्यावरणाचा ऱ्हास जलद गतीने करतो त्याविषयी शंका होती म्हणून अशा जंगलांचे संवर्धन कसे करावयाचा हा प्रश्न आहे. त्यासाठी शासनाने जितकी काळजी घेता येईल तेवढी घेतली पाहिजे.

मघाशी लवासा लेक सिटीच्या संदर्भात सभागृहात उल्लेख करण्यात आला. पण या निमित्ताने मी तर वेगळ्या दृष्टीकोनातून विचार करता असे म्हणेन की, निसर्गरम्य परिसरात जाऊन राहणे ही हल्ली शहरातील लोकांची गरज बनली आहे. मुंबईसारख्या महाकाय शहरात 12-12 तास मान मोडून काम करणारे आणि महिन्याला 60 ते 70 हजार रुपये पगार घेणारे करदाते आठवड्यातील दोन दिवस तरी निसर्गाच्या सान्निध्यात राहण्यासाठी जातात व तसे गेलेच पाहिजे असे माझे मत आहे. पूर्वीच्या काळात ब्रिटीश लोकांनी सुध्दा अशी निसर्गरम्य शहरे विकसित केली होती. त्यात महाबळेश्वर आणि माथेरानचे उदाहरण देता येईल. पण गेल्या 50 ते 60 वर्षाच्या काळात हे काम झालेले नाही. उलट निसर्गाच्या कुशीत कोणी असा प्रयत्न केला तर त्याचे स्तोम माजविले जाते की, आदिवासींच्या बाबतीत शासनाने भयंकर काही तरी अन्याय केला की काय ? या निमित्ताने श्री. निळू दामले यांच्या पुस्तकाचा दाखला द्यावासा वाटतो. त्यांनी त्यांच्या पुस्तकात विस्तृतपणे वर्णन केलेले आहे. अशा गोष्टींचा विचार न करता केवळ टीकाच करीत रहायचे.

महोदय आपण सर्वच गोरगरीब जनतेबद्दल चर्चा करतो, गरिबांना सबसिडाईज्ड फूड मिळाले पाहिजे, त्यांना रेशनिंगचे वाटप झाले पाहिजे, मी सुध्दा अशाच लोकांसाठी काम करते. पण दुसऱ्या बाजूला 40 टक्के जनतेचा विचार करता या देशात क्रिमीलेयर वर्गात मोडणारा मध्यमवर्गीय माणूस, त्याचाही विचार करण्याची गरज वाटते. अशा मध्यमवर्गीय माणसाला कुटुंबासोबत दोन दिवस निसर्गाच्या कुशीत, निसर्गरम्य ठिकाणी रहावयास जावे असे वाटले तर ते अमेरिका, लंडन किंवा युरोप सारख्या देशांमध्ये जाऊ शकत नाहीत. अशा लोकांसाठी जर असे परिसर उपलब्ध करुन दिले तर त्याचे कौतुक न करता फक्त टीकाच करायची असा प्रकार सुरु आहे. मुंबईच्या जवळच असलेले कर्नाळा अभयारण्य असून तेथे दोन दिवस, वन्य प्राण्यांच्या सहवासात राहून आपला जीव रमवावा अशी इच्छा झाली आणि विरंगुळा मिळविण्याचा प्रयत्न केला तर त्यात वावगे काहीच नाही. पण अशा प्रकारे रक्षण न करता केवळ टीकाच करायची हे योग्य

......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ........

नाही. म्हणून माझी सूचना आहे की, पर्यावरणाचे जितके संवर्धन करता येईल आणि विकास करता येईल तेवढे करावे व त्यासाठी आवश्यक त्या कोणत्या उपाययोजना करणे गरजेचे आहे याचाही विचार केला पाहिजे.

महोदय, माझी तर अशीही सूचना राहील की, लहान मुलांच्या अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र आणि पर्यारवरण हा विषय किमान 50:50 मार्कांचा सक्तीचा केला पाहिजे. याचे कारण इंग्रजी, मराठी, गणित किंवा सायन्स असेल यातून वेगवेगळ्या क्षेत्रात जाऊन विद्यार्थी पुढे नाव कमावितात परंतु प्रत्येक नागरिक पर्यावरणाच्या बाबतीत जागरुक असला पाहिजे आणि त्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने रस्त्यात घाण टाकू नये, झाडे तोडू नये अशा प्रकारचे शिक्षण समाविष्ट केले तर लहान पणापासूनच तो पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यास शिकेल, याचाही विचार करावा अशी अपेक्षा करते आणि माझे भाषण पूर्ण करते.

-------

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी पर्यावरणाच्या विषयाच्या संदर्भात नियम 260 अन्वये चर्चा उपस्थित करुन सदनाचे व शासनाचे लक्ष वेधण्याचे काम केल्यामुळे मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, पाण्याचे दुर्भिक्ष्य व पाण्याचे प्रदूषण असे दोन विषय निर्माण झालेले आहेत. भरमसाठ जंगलतोडीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास झालेला आहे. कै.यशवंतराव चव्हाण साहेब म्हणायचे की, 27 नक्षत्रांमधून पावसाची 9 नक्षत्र सोडली तर बाकी सगळे शून्य रहाते. आता पावसाच्या 9 नक्षत्रांपैकी पावसाचे एकही नक्षत्र राहिलेले नाही.

सभापती महोदय, कोयना धरण बांधण्याच्या अगोदर या भागाचे सर्व्हेक्षण करण्यात आले होते, त्यावेळी असे दिसून आले होते की, 25 मे रोजी रोहिणी नक्षत्र लागल्यानंतर त्या भागातील 60 ते 80 कि.मी.च्या पट्टयात पाऊस पडावयास सुरुवात व्हायची व हा पाऊस 25 सप्टेंबर पर्यंत पडत असायचा. या चार महिन्यांमध्ये तेथे सूर्यदर्शन सुध्दा होत नसे. 25 मे रोजी रोहिणी नक्षत्र लागते. परंतु आता कोयना परिसराच्या भागात पाऊसच पडत नसल्यामुळे धरणात पाण्याचा साठा पाहिजे त्या प्रमाणात होत नाही. ज्या दिवशी धरण पूर्ण भरते तेव्हा आपण सुटकेचा निश्वास टाकतो. अशीच अवस्था इतर धरणांच्या बाबतीत सुध्दा होऊ लागली आहे. पर्जन्यमान घटत चालले असून कालचक्रात सुध्दा मोठे बदल झालेले आहेत.

सभापती महोदय, आपण विज्ञानाच्या पाठीमागे धावून अनेक सुधारणा केल्या परंतु या सुधारणा निसर्गास पायाभूत मानून करावयास पाहिजे होत्या परंतु त्याचा आपल्याला विसर पडल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला. यामध्ये केवळ शासनाचा दोष आहे असे नाही तर सर्वांच्या गरजा वाढत गेल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यामुळे, हळू हळू पर्जन्यमान घटत गेले.

सभापती महोदय, आज पाणी हा परवलीचा विषय झालेला आहे. इचलकरंजीला दूषित पाण्यामुळे 50-60 लोकांना कावीळ झाली. इचलकरंजीला मी गेलो होतो परंतु तेथे गेल्यानंतर मलाही कावीळ झाली. कावीळ झाल्यामुळे मी अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात सभागृहात उपस्थित राहू शकलो नव्हतो. आमच्या पंचगंगेच्या पाण्यात मैलामिश्रीत पाणी मिसळले जात असल्यामुळे आमच्या पंचगंगेचे पाणी दूषित झालेले आहे. दोन्ही नगरपालिकेच्या प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. या पाण्याच्या संदर्भात मोर्चे निघाले, सभागृहात सुध्दा हा प्रश्न उपस्थित झाला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ....

परंतु पंचगंगेचे पाणी काही शुध्द झाले नाही. इचलकरंजी नगर पालिकेचे उप मुख्याधिकारी काविळीच्या साथीला बळी पडले आहेत. या ठिकाणी अनेक लोकांना कावीळ झाली असून येथील काविळीची साथ आटोक्यात आलेली नाही. या ठिकाणचे 100-200 रुग्ण निरनिराळया रुग्णालयात उपचार घेत आहेत.

अशीच परिस्थिती सांगली, मिरज, कोल्हापूर व जयसिंगपूर व परिसरात आहे. पाण्याच्या संरक्षणाकडे आज आपले दुर्लक्ष होत आहे. अतिरिक्त रासायनिक खतांचा, अतिरिक्त कीटक नाशकांच्या वापरामुळे पाण्याचे प्रदूषण होत आहे. वेगवेगळया कारखान्यातील सांडपाणी नद्यामध्ये सोडू नये यासाठी त्यांना कागदोपत्री नोटीसा दिल्या जातात व हे कारखाने सुध्दा यासंदर्भात पूर्तता करण्यात आलेली आहे अशी माहिती कागदोपत्रीच देत असतात परंतु प्रत्यक्षात मात्र काहीही पूर्तता केली जात नाही. आज पश्चिम महाराष्ट्रातील एकाही नदीचे पाणी शुध्द राहिलेले नाही. दूषित पाण्यावर प्रक्रिया करुन ते पाणी आज शहरांना पिण्यासाठी पुरवले जात आहे. ज्या नगरपालिकेची पाणी शुध्द करणारी युनीट्स प्रभावी नाहीत अशा भागांमध्ये साथीच्या रोगांचा प्रभाव दिसून येत असतो. जो माणूस सांगलीतील पाणी पचवतो तो माणूस कुठल्याही भागाचे पाणी पचवू शकतो असे आज म्हटले जात आहे. सांगलीमध्ये कधी कॉलऱ्यांची तर कधी काविळीची तर कधी टायफॉईडची साथ असते. सांगलीमध्ये दोन चार महिन्यांनी निरनिराळया साथीचा फैलाव होत असतो व त्याचे कारण प्रदूषित पाणी हेच आहे. आमच्याकडील दूषित पाण्यामुळे किडनीचे विकार सुध्दा मोठया प्रमाणात होत आहेत. पर्यावरणाचा ऱ्हासामुळे अनेक प्रकारचे प्रदूषण होत असते. त्यामुळे प्रदूषित पाण्याच्या संदर्भात शासनाने व्यापक मोहीम हाती घेऊन त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. प्रदूषित पाण्याची मोहीम हाती घेतली नाही तर गंभीर आजाराच्या साथी फैलावतील व त्यांना नियंत्रण करणे अवघड होऊन जाईल असे मला वाटते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंके....

या प्रस्तावाच्या निमित्ताने मी शासनाचे लक्ष पाण्याच्या प्रदूषणाकडे वेधतो. आता दुसरा मुद्दा देखील पुढे आला आहे. तो म्हणजे पर्जन्यमान कमी होत असल्यामुळे पाण्याची पातळी घटत चालली आहे. त्यामुळे आज ग्रामीण भागातील पाण्याचे मूळ स्त्रोत देखील नामशेष होत चालले आहेत. काही स्त्रोत हे बुजवून टाकले आहेत. जे काही आहेत ते ऐतिहासिक पुरावे म्हणून शिल्लक राहिले आहेत. त्याचे जतनीकरण करण्याशिवाय कोणताही उपाय केलेला नाही.

आज पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट झाला आहे. टँकर मुक्त महाराष्ट्राचे स्वप्न आपण पाहिले होते. आज माझ्या सांगली जिल्ह्यामध्ये, सातारा जिल्ह्यामध्ये, सोलापूर जिल्ह्यामध्ये टँकरच टँकर दिसत आहेत. पाण्यासाठी पालक मंत्री श्री.पतंगराव कदम यांना कित्येक बैठका घ्याव्या लागल्या आहेत. स्वातंत्र्य मिळून एवढी वर्षे झाल्यानंतर देखील पाण्यासाठी पुन्हा तोच खटाटोप करावा लागत आहे. ते ही चित्र बदण्याची आवश्यकता आहे धन्यवाद.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पर्यावरणासबंधी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

मी येथे सिंधुदुर्ग जिल्ह्यात असलेल्या खाणींसंबंधी तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्याचे कोकणपण टिकविण्यासाठी लोकांकडून सातत्याने होत असलेली मागणी यावर बोलणार आहे. आज या बाबीकडे शासनाचे दुर्लक्ष होत चालले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात कळणे खाण प्रकल्प आहे. त्याची जनसुनावणी देखील झाली होती. खाणी पासून नदी 2 कि.मी.अंतरावर असल्याचे लोकांनी दाखवून दिले. पर्यावरणाला धोका पोहचविणाऱ्या बाबी पर्यावरणाच्या अहवालात दाखविल्या गेल्या नाही. ही वस्तुस्थिती त्या ग्रामीण भागातील पंचक्रोशीतील लोकांनी निदर्शनास आणली. तरीही त्या प्रकल्पास लोकांचा विरोध डावलून मंजुरी देण्यात आली आहे.

सावंतवाडी तालुक्यातील तिरोडा खाण प्रकल्प पर्यावरण दृष्ट्या हानीकारक असल्याचे लोकांनी दाखवून दिले. तेथील ग्रामस्थांच्या आग्रहामुळे तिरोडा खाण प्रकल्पास स्थगिती मिळाली. पण लोकांचा विरोध असून देखील कळणे खाण प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. सदर प्रकल्प पाच वर्षापासून सुरू आहे. गेल्या वर्षी एका शेतकऱ्याने तक्रार केल्यानंतर अवैध उत्खनन झाले आहे 999447 क्युबिक मीटर जादा उत्खनन होऊन लगतच्या सर्व्हे नंबरमध्ये परवानगी नसतना देखील उत्खनन झाल्याचा अहवाल दिनांक 7 जानेवारी 2012 रोजी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, यांच्या मार्फत प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाला मिळाला होता.

याबाबत मी दिनांक 18 एप्रिल 2012 रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता की, अशा प्रकारचा अहवाल प्राप्त झाला आहे काय ? माननीय राज्यमंत्र्यांना चुकीची माहिती दिली. माननीय राज्यमंत्र्यांनी अशा प्रकारचा अहवाल प्राप्त झाला नसल्याचे सभागृहात सांगितले व या सभागृहाचा अवमान केला. याबाबत त्यांनी फेरतपासणी करण्याचे आदेश देखील दिले. उप संचालकांनी तयार केलेला अहवाल संचालकांच्या माध्यमातून तपासणी करण्याची कार्यवाही सुरू झाली. हा अहवाल दिनांक 24 मे 2012 रोजी संचालकांनी शासनाला सादर केला आहे. या अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे की, संचालनालयाच्या भूवैज्ञानिक परिक्षणाच्या अहवाला नुसार खाणपट्टा क्षेत्राबाहेरील व खाणकाम झालेल्या क्षेत्रात अंदाजे 9 लाख 34 हजार मेट्रीक टन लोह खनिजाचे साठे अंदाजित असून उत्खनन झाले असल्याची शक्यता आहे.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

त्याचप्रमाणे लगतच्या सर्व्हे नंबरच्या सुमारे 4 हेक्टरमध्ये शासनाच्या परवानगी शिवाय उत्खनन झ ाल्याचे मान्य केले आहे.

या अहवालामध्ये शेवटी असे म्हटले आहे की, "खाण क्षेत्राबाहेर उत्खनन केल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे खाण खनिज अधिनियम 1957 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 अंतर्गत जिल्हाधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार कारवाई करणे गरजेचे आहे". 7 जानेवारीला आणि 24 मेला अहवाल सादर करुनही मधल्या काळात कोणतीही कारवाई केली नाही. मधल्या काळात माननीय राज्यमंत्र्यांनी दूर चित्रवाणीवर 15 दिवसात कारवाई करु असे आश्वासन दिले होते. तरी देखील खाण प्रकल्पावर अशाप्रकारची कारवाई न करण्याचे कारण काय हे मंत्री महोदयांनी सांगणे गरजेचे आहे. अशा प्रकारे खाण प्रकल्पामधून शासनाच्या अटी-शर्तींचा भंग होत आहे, त्या ठिकाण्‍ी विना परवानगी उत्खनन होत आहे. ज्या सर्व्हे नंबरमध्ये परवानगी दिलेली नाही अशा सर्व्हे नंबरमधून उत्खनन होत आहे त्या बद्दल पर्यावरण विभाग कोणती कारवाई करणार आहे याची माहिती मिळणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, साटेली बेडशे येथील 40.37 हेक्टर क्षेत्रामध्ये सन 2006 पासून विदर्भ मायनिंग प्रायव्हेट लिमिटेडचे उत्खनन सुरु आहे. त्याचप्रमाणे सन 2005 पासून 52.12 हेक्टरमध्ये डेक्कन मिनरल्स यांचे उत्खनन सुरु आहे. या सभागृहामध्ये या खनिज पट्टयाबाबत मी प्रश्न उपस्थित केला असतांना तत्कालीन मंत्र्यांनी 2 खनिज पट्टयांना स्थगिती दिली असल्याचे सांगितले. आज त्या गावातील माती सरकत असल्यामुळे लगतच्या गावांना धोका उत्पन्न होऊ शकतो म्हणून त्या दोन खनिज पट्टयांना स्थगिती दिल्याचे सांगितले. सन 2007-08 च्या दरम्यान या दोन खनिज पट्टयांमध्ये दोन मायनिंग कंपन्यांच्या वादामध्ये चोरीच्या प्रकरणामध्ये पोलिसांकडे तक्रारी नोंदविण्यात आल्या. या ठिकाणी 52.12 हेक्टर क्षेत्रामध्ये जन सुनावणी न होता त्या ठिकाणी विना परवाना उत्खनन केले जात आहे याची चौकशी संचालकांमार्फत करणार काय याचे सुध्दा मंत्री महोदयांनी याठिकाणी उत्तर देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, उच्च न्यायालयाने तेथील 49 खनिज पट्टयांना स्थगिती दिली आहे. उच्च न्यायालयाने ही स्थगिती कोणत्या कारणासाठी दिली आहे यासंबंधी पर्यावरण मंत्रालयाचे काय म्हणणे आहे याची माहिती देणे गरजेचे आहे. पर्यावरण प्रेमी संघटना उच्च न्यायालयामध्ये गेल्यामुळे दोडामार्ग आणि सावंतवाडी तालुक्यामध्ये झाड तोडीला बंदी करावी अशाप्रकारचे आदेश

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

उच्च न्यायालयाने पारीत करुन जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत का, असतील तर त्याची अंमलबजावणी करणार काय याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी मी विनंती करतो धन्यवाद.

----

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या ठिकाणी विरोधी पक्षाच्या वतीने माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी अतिशय महत्वाचा प्रस्ताव उपस्थित केला आहे.

खऱ्या अर्थाने महाराष्ट्राला प्रदूषणाचा शाप आहे. जशी या देशाची परिस्थिती आहे तशीच या राज्याची परिस्थिती आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या पातळीवर चंद्रपूर जिल्हा चौथ्या क्रमाकावर आहे तर महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर आहे. असे म्हटले जाते की, ज्या भागामध्ये मोठया प्रमाणात जंगल आहे त्या भागात प्रदूषण होत नाही. अशा परिस्थितीत चंद्रपूर जिल्हयात मोठे जंगल आहे, मोठया नद्या आहेत, सर्व व्यवस्था असून सुध्दा चंद्रपूर जिल्हा प्रदूषणाच्या बाबतीत महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर वर आहे. याचे कारण प्रदूषण मंडळाचे या गोष्टीकडे दुर्लक्ष झाले आहे हे मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

बल्लारशा पेपरमील येथे माननीय पर्यावरण मंत्री आणि आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी एक दौरा केला. माननीय मंत्री महोदयांनी मान्य केल्याप्रमाणे आम्ही बल्लारशा पेपरमीलमध्ये तपासणीसाठी गेलो. त्या ठिकाणी आम्ही त्यांना प्रत्यक्षात जेव्हा पाण्याचे प्रदूषण दाखविण्यासाठी जिथून या पेपरमीलचे वेस्ट पाणी निघते त्या ठिकाणी घेऊन गेलो तेव्हा अर्ध्या किलोमीटरपासून त्या पाण्याचा वास येण्यास सुरुवात झाली. त्या ठिकाणी गेल्यानंतर प्रचंड काळे पाणी पाहिल्यानंतर सगळेच एकदम अवाक झाले. एवढे घाणेरडे पाणी वर्धा नदीमध्ये सोडले जाते. बाजूला जी पाण्याची टाकी आहे त्या टाकीमध्ये ते पाणी मिसळते आणि अशा पध्दतीचे प्रदूषित पाणी बल्लारशा गावाला दिले जाते. ते प्रदूषित पाणी आजूबाजूच्या 30-40 गावांमध्येही जाते. कारण नदी एकच आहे आणि पाण्याचा प्रवाह एकच आहे.

सभापती महोदय, अशा पध्दतीने मोठ्या प्रमाणामध्ये पाण्याचे प्रदूषण होते त्यामुळे निरनिराळे रोग होतात. कावीळ, डिसेंट्री, डायरिया, गॅस्ट्रो हे रोग तर आहेतच पण याच्या व्यतिरिक्त ज्यांचा शोध लावणे सुध्दा आज कठीण झालेले आहे असे नवीन नवीन रोग आपल्याला बघावयास मिळतात. त्याचबरोबर त्या ठिकाणी स्लजमुळे हवेचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. मागे एका बैठकीमध्ये पेपरमीलवाल्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, स्लजवर आम्ही झाडे लावलेली आहेत, ग्रिनरी केलेली आहे. जेव्हा मी प्रत्यक्षात प्रदूषण मंडळाच्या सचिवाला घेऊन गेले, मंत्र्यांना घेऊन गेले तेव्हा त्यांना सांगितले की, स्लजवर झाडे कोठे लावलेली आहेत ते आम्हाला दाखवा. कारण चुनखडीमध्ये झाडे जगतात यावर माझा विश्वास नव्हता. त्या ठिकाणी जंगली खुरटी थोडी माती टाकून लावली होती. त्या खुरट्यांना प्रदूषण कमी करणारी झाडे म्हणावयाचे का ? झाडे म्हणजे मोठे वृक्ष लावले पाहिजेत. तेव्हाच प्रदूषण कमी होते.

सभापती महोदय, तेथील स्लज उडून संपूर्ण गावामध्ये पसरते. 20 वषापूर्वीचे स्लज हातात घेऊन मी त्यांना फोडून दाखविले असता ते सहज फुटून वाऱ्याने सगळीकडे उडत होते. 20 वर्षापूर्वीचे स्लज असे उडू शकते तर आजच्या स्लजचा काही प्रश्नच नाही. त्यांना पुन्हा

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

कारखान्याची परवानगी देताना ज्या दहा अटी घातल्या होत्या त्यामध्ये स्लजच्या भागाला संरक्षण भिंत घालावी असे सांगितले होते. त्या दहा अटींपैकी एकही अट त्या पेपरमीलवाल्यांनी पूर्ण केलेली नाही. त्यामुळे त्या दिवशी बैठकीमध्ये या सगळ्या गोष्टी निघाल्या. एकही अट त्यांनी पूर्ण न केल्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषण सुरु झालेले आहे.

त्याचबरोबर गेल्या पाच वर्षामध्ये राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या स्त्रोतांचा शोधच घेतला नसल्याचे उघडकीस आले. जेथून अशुध्द पाणी येते त्याची तपासणीच जर प्रदूषण नियंत्रण मंडळाने केली नसेल तर ते प्रदूषण मंडळ प्रदूषण दूर करण्यासाठी आहे की, प्रदूषण वाढविण्यासाठी आहे हा खरा प्रश्न या ठिकाणी उदभवतो. बल्लारशा पेपरमीलच्या प्रदूषित पाण्याचे दोन नमुने आम्ही दिले. एक नमुना मी दिला आणि दुसरा नमुना कमिटीने घेतला. त्या कमिटीने घेतलेला नमुना सदोष निघाला आणि माझा नमुना चांगला निघाला. ज्या दिवशी आमची कमिटी जाणार होती त्या दिवशीच्या पाण्याचा नमुना मी घेतला होता. मी ते पाणी कोठून घेतले या बाबत त्यांना शंका वाटल्यामुळे त्यांनी नंतर दुसरा नमुना घेतला. त्यांनी घेतलेला पाण्याचा नमुना सदोष निघाला. म्हणजे त्या ठिकाणी कमिटी जाणार असेल, प्रदूषण अधिकारी जाणार असेल तर पाणी शुद्ध ठेवले जाते आणि नंतर मात्र बाराही महिने अशुध्द पाणी लोकांपर्यंत जाते. याचा अर्थ काय ? आम्ही अधिकाऱ्यांना सांगितले की, तुम्ही अचानक व्हिजिट करा, सांगून जाऊ नका. पण ते कधीच घडत नाही.

सभापती महोदय, गेल्या पंधरा वर्षापासून एकच अधिकारी पूर्व आणि पश्चिम विदर्भामध्ये काम करीत आहे. पंधरा वर्षापासून सगळ्या कारखानदारांशी त्यांचे चांगले संबंध जुळलेले आहेत त्यामुळे त्यांच्या कारकिर्दीमध्ये प्रदूषण मंडळाला सदोष पाण्याचा, सदोष हवेचा एकही नमुना मिळेल यावर विश्वासच राहिलेला नाही. म्हणून त्या अधिकाऱ्याला मराठवाडा किंवा पश्चिम महाराष्ट्रात कोठेही पाठवा पण त्यांना विदर्भातून बाहेर काढा अशी आम्ही मागणी केलेली आहे.

पाणी प्रदूषणाशी संबंधित वेगवेगळ्या नियमांची आणि अधिनियमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची आहे. त्या मंडळाने असे म्हटले आहे की,

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

राज्यातील पाण्याचे मुख्य स्त्रोत असलेल्या नद्या, तलाव आणि छोट्या नद्या आणि पाणी साठे यांची नियमित तपासणी करणे अपेक्षित आहे. त्यासाठी राज्यातील सर्व नद्यांच्या पात्रांची सूची तयार करण्यासाठी नियंत्रण मंडळाने 2008 साली एक सर्वेक्षण करण्याचे ठरविले होते. त्या नुसार त्यांनी सहा प्रादेशिक विभागांना असा आदेश दिला होता की, अशा पध्दतीचे नमुने तुम्ही गोळा करा आणि एक सूची तयार करा परंतु 2008 पासून 2012 पर्यंत प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशाप्रमाणे काम झालेले नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

एकही सूची अद्यापपर्यंत तयार झालेली नाही. कोणकोणत्या नद्यांचे पाणी प्रदूषित आहे असे आम्ही विचारले तरी मंत्री महोदय सांगू शकणार नाहीत. त्याचे कारण असे आहे की, शासनाजवळ त्याची माहितीच उपलब्ध नाही.

भारताच्या महालेखापरीक्षकांनीही आपल्या अहवालात असे नमूद केले आहे की, "जल प्रदूषण कमी करण्याबाबतचा कृती आराखडा मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पडून आहे. राज्यातील पाण्याचा दर्जा कायम राखणे व सुधारणा करणे यासाठी महाराष्ट्र जलसंपदा नियमन प्राधिकरण आणि एम.पी.सी.बी.ने प्रयत्न करावे, अशा सूचनाही महालेखापरीक्षकांनी दिल्या आहेत. ज्या कारखान्यामधून अथवा संस्थांमधून सांडपाणी अथवा उत्सर्जन विहिरी, ओढे, गटारे अथवा जमिनीवर सोडण्यात येतात त्यांच्याकडील आवश्यक त्या यंत्रणांची तपासणी करुन मान्यता देण्याचे काम एम.पी.सी.बी.करीत असते. संबंधित उद्योग व संस्थेने अर्ज केल्यापासून 120 दिवसात त्यावर निर्णय न घेतल्यास मान्यता दिली गेल्याचे समजण्यात येते. दि.21 ऑगस्ट, 2011 पर्यंत एम.पी.सी.बी.कडे मान्यतेसाठी आलेल्या 10,156 निवेदनांवर 120 दिवसात निर्णयच घेण्यात आला नसल्याचे उघडकीस आले आहे." ज्यांच्याकडे हे काम सोपविलेले आहे ते जर काम करणार नसतील तर आम्ही सभागृहात केवळ चर्चा करावयाच्या काय ? प्रादेशिक प्रदूषण मंडळावर ही जबाबदारी असतानाही ते ती पार पाडत नाहीत. त्यामुळे सर्वसाधारण जनता बळी पडत आहे. त्याची चर्चा सभागृहात करीत बसणार. या परिस्थितीवर शासन नियंत्रण आणणार की नाही ? शासनाने प्रदूषण नियंत्रण मंडळाला जाब विचारण्याची वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, अनधिकृत कत्तलखान्यांमधून होणारे प्रदूषण हा एक मोठा विषय आहे. माझ्याकडे 'लोकसत्ता' या दैनिकातील एक कात्रण आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, "या राज्यात खाटीकखान्यातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यासाठी पर्यावरण संरक्षण अधिनियम,1986 अंतर्गत प्रमाणके निश्चित करण्यात आली आहेत. खाटीकखान्यात मांस धुण्यासाठी तसेच कत्तलीची जागा साफ करण्यासाठी पाण्याचा प्रचंड वापर केला जातो. केवळ शहरी भागातच नव्हे, तर ग्रामीण भागातही मोठ्या संख्येने खाटीकखाने उभे राहत असल्यामुळे खाटीकखान्यातून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात नाही." मग या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

कोणती यंत्रणा काम करीत आहे ? हे प्रदूषित पाणी नदीमध्ये सोडण्यात येते. या पाण्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होते. या प्रदूषित पाण्याचा वापर लोक पिण्यासाठी करीत आहेत. शासन या गोष्टीचा शासन विचार करणार आहे की नाही ?

राज्यामध्ये बायो-मेडिकल वेस्टसंबंधी नियम केलेला नाही. कत्तलखान्यातून जे बायो-मेडिकल वेस्ट बाहेर पडते त्याची विल्हेवाट लावण्याबाबत राज्यात कायदा अस्तित्वात नाही. यासंबंधी राज्यात 1996 मध्ये नियम प्रसिध्द करण्यात आला. 1998 मध्ये तो प्रॅक्टीसमध्ये आला. परंतु अजूनही त्या नियमानुसार कार्यवाही सुरु झालेली नाही. कत्तलखाने हे देखील प्रदूषणाचाच एक भाग आहे आणि तो भागच शासनाच्या यादीतून बाहेर पडलेला आहे असे मला वाटते. अशा प्रकारे या प्रदूषणाकडे दुर्लक्ष झालेले असल्यामुळे त्याचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणात होणार आहे.

सभापती महोदय, रस्त्यावर होणाऱ्या वाहतुकीमुळे सुध्दा हवा मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत आहे. चंद्रपूर शहरामधून कोळशाच्या, सिमेंटच्या व राखेच्या ट्रकची वाहतूक होत असते. ट्रकमधून कोळशाची किंवा कोणत्याही वस्तूची वाहतूक करीत असताना ती वस्तू संपूर्ण झाकलेली पाहिजे असा प्रचलित नियम आहे. पण या नियमांची दररोज पायमल्ली होत असल्याचे आम्ही पाहत असतो. या नियमांचे पालन करीत असल्याचे दाखविण्यासाठी त्या ट्रकवरील मालावर लंगोटी एवढा कपडा अंथरुन ट्रक झाकल्याचा आव आणला जातो, पण तो ट्रक पूर्णपणे उघडाच असतो. परिणामी त्या ट्रकवरील कोळसा किंवा तत्सम वस्तू रस्त्यात पडत असतात. त्याच्याबरोबर सगळीकडे धूळही पसरत असते. या सर्व परिस्थितीमुळे शहरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असते.

ओव्हर लोडमुळेही मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होत आहे. कर्नाटक राज्यात खाणीच्या अवैध उत्खननाचा प्रश्न आहे. तसा आपल्याकडे ओव्हर लोडचा प्रश्न जटील झालेला आहे. कोळशाच्या खाणीतून कोळशावरील माती व वेस्ट मटेरियल काढून टाकले जाते. हे नको असलेले मटेरियल आता रस्त्यावर टाकण्याची सुरुवात झालेली आहे. जोराच्या वाऱ्यामुळे हे मटेरियल सगळीकडे पसरत जाते. चंद्रपूर-नागपूर असा प्रवास करीत असताना कोळशाच्या राखेमुळे संपूर्ण

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

रस्ते काळे झाल्याचे दिसून येतात. त्या भागात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असताना त्याकडे शासकीय यंत्रणेकडून जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे. त्यासंबंधी आम्ही प्रश्न उपस्थित केला तर शासनाकडून त्या भागात प्रदूषण झालेले नाही असे उत्तर दिले जाते. मग प्रदूषण कशाला म्हणावयाचे ? कर्नाटक राज्यातील एम्टा प्रकल्पाचे पाणी कोंडा नाल्यात सोडले जाते. ते पाणी फिल्टर न करता भद्रावती शहरातील लोकांना पिण्यासाठी सोडले जाते. प्रदूषित पाणी लोकांना पिण्यासाठी दिले जात असेल तर त्याचाही विचार करण्याची गरज आहे.

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

डब्ल्यूसीएलच्या खाणी मधून पाण्याचे आणि हवेचे प्रदूषण फार मोठ्या प्रमाणावर होते. डब्ल्यूसीएलच्या परिसरामध्ये ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टाकी आहे त्या टाकीमध्ये एका तलावाचे पाणी सोडले जाते. त्या तलावामध्ये डुकरे, कुत्री मेलेली असतात, म्हशींचे तेथे वास्तव्य असते. असे पाणी फिल्टर केल्याच्या नावाखाली पिण्यासाठी दिले जाते. तेथील फिल्टर देखील बरोबर नाही. तेथे कशा प्रकारचे प्रदूषण आहे, लोकांना कशा प्रकारचे पाणी प्यावे लागते, याची व्हिडिओ कॅसेट मी जिल्हाधिका-यांना देखील दाखविलेली आहे. परंतु शासन एवढे ढिम्म आहे की, व्हिडिओ कॅसेट दाखवून, पाण्याचे नमुने दाखवून सुध्दा त्याबाबतीत काही कारवाई झालेली नाही. आजही त्या तलावातील पाण्यामध्ये मेलेली डुकरे, कुत्री असतात. अशा परिस्थितीमध्ये आम्ही रडावे तरी कोणापुढे आणि सांगावे तरी कोणाला अशी आमची स्थिती झालेली आहे. तेव्हा कृपा करुन आता प्रदूषण नियंत्रण मंडळाला जागृत करा, त्यांच्यातील माणुसकी आणि सहानुभूती जागृत करा. त्यांचे काय काम आहे आणि त्यांनी काय काम केले पाहिजे याची जाणीव त्या मंडळाला करुन द्या. ज्या दिवशी प्रदूषण नियंत्रण मंडळ चांगले काम करील त्या दिवशी 50 टक्के प्रदूषण कमी होईल एवढे सांगून आणि माझ्या भाषणामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांना माननीय मंत्री महोदय उत्तर देतील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपविते.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, पर्यावरणाच्या संदर्भात शासन आपल्या धोरणामध्ये आणि कृतीमध्ये काही सुधारणा करील अशी या प्रस्तावाच्या निमित्ताने मी अपेक्षा व्यक्त करते. लवासासंबंधीचा उल्लेख पुन्हा पुन्हा केला जातो. जेव्हा शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाचे सरकार होते त्यावेळी गिरीस्थान विषयक कायदा करण्यात आला. राज्यामध्ये नवीन हिलस्टेशन्स व्हावीत, सामान्य लोकांना, मध्यमवर्गीय लोकांना, उच्च मध्यमवर्गीय लोकांना परदेशामध्ये कुठे लांब जाण्याऐवजी तेथे पर्यटन करता यावे हा कायदा करण्यामागे उद्देश होता. लवासासंबंधीचे मतभेद वारंवार या ठिकाणी वर्णिलेले असले तरी प्रामुख्याने दोन मुद्यांकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधीत आहे. एक म्हणजे गेट असलेली हिल स्टेशन्स किंवा पर्यटन स्थळे असावीत की नाही या बाबतीत मतभेद आहे. ॲम्बी व्हॅलीला युतीच्या सरकारने मान्यता दिली असली तरी ॲम्बी व्हॅली असेल किंवा लवासा असेल, अशा स्थळांच्या ठिकाणी तेथे कुणीही फ्लॅट विकत घेऊ शकतो, जाऊन राहू शकतो. परंतु स्थानिक लोकांच्या जमिनी संपादन केल्यानंतर त्या ठिकाणचा स्थानिक विकास करण्याची ॲथॉरिटी जर खाजगी कंपन्यांना दिली गेली आणि ग्रामपंचायतीच्या ऐवजी हीच ॲथॉरिटी तेथील कारभार करणार असेल तर लवासा हीच एक मोठी ग्रामपंचायत किंवा पंचायत समिती होईल आणि स्थानिक ग्रामपंचायतीचे, पंचायत समितीचे आणि लोकांचे अस्तित्वच हळूहळू नष्ट होईल. अशा प्रकारचे मतभेद आहेत. स्थानिक विकास करण्यासंबंधीचे अधिकार लवासाला द्यावेत की न द्यावेत यासंबंधी कोर्टामध्ये केस सुरु आहे. विकासाच्या प्रत्येक प्रकल्पाला विरोध करण्याची आमची भूमिका नाही.

आता देखील जी तीन गिरीस्थाने तत्वत: मंजूर केलेली आहेत त्यातील एकाचे रेगुलेशन्स मी वाचलेली आहेत. केन्द्रीय पर्यावरण बोर्डाने देखील हेच सांगितलेले आहे की, जाण्या-येण्यासाठी गेट असला पाहिजे. तुमच्या मनाप्रमाणे तुम्हाला वाटेल तेवढयाच लोकांना आत प्रवेश देणार असाल आणि इतर सामान्य लोकांना प्रवेश नाकारणार असाल तर ते योग्य होणार नाही. अशा प्रकारची जी हिलस्टेशन्स आहेत त्या ठिकाणी फक्त धनदांडगे लोक जाऊ शकतात. त्यामुळे गिरीस्थानांचा विकास करण्याचा मूळ उद्देशच साध्य होणार नाही.

..3..



MSS/ MMP/ D/ 16:00

डॉ. नीलम गो-हे...

सभापती महोदय, महाबळेश्वर आणि माथेरान ही हिल स्टेशन्स आहेत. माथेरानच्या संदर्भात मला एक गोष्ट माननीय मंत्री महोदयांच्या आवर्जून निदर्शनास आणावयाची आहे ती म्हणजे माथेरान येथे नियम धाब्यावर बसवून गाड्यांच्या स्पर्धा "महामान्सून मोडनेस 2012" घेण्यात आल्या. 58 महिंद्रा जीप्स तेथे स्पर्धांसाठी वापरण्यात आल्या. आपणाला हे माहीत आहे की, माथेरान येथे वाहन घेऊन जाण्यास बंदी आहे. असे असताना या स्पर्धांमुळे तेथे संपूर्ण चिखल करण्यात आला, तेथील झाडे उद्‌ध्वस्त करण्यात आली. या स्पर्धा घेण्याच्या पाठीमागे एका मोठ्या महिला उद्योगपतीचा सहभाग असून त्याकडे कानाडोळा करण्यात आला. या निमित्ताने मी एवढेच सांगेन की, अशा प्रकारे पर्यावरणाचा समतोल बिघडविणा-या स्पर्धा घेतल्या जात असतील तर त्याबाबतीत गुन्हेगारी कलमे लावली पाहिजे, दंड आकारला पाहिजे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

माथेरान येथे गाड्या नेण्यात येत असतील तर मग गाड्यांच्या निर्बंधाला काही अर्थच राहत नाही. लोकांनी पर्यावरणाचे नियम मोडल्यानंतर त्याची पाहणी करायची एवढीच भूमिका पर्यावरण मंत्र्यांची किंवा प्रदूषण नियंत्रण मंडळाची नाही.

सभापती महोदय, सन 2011 ते 2020 हे जैवविविधतेचे दशक म्हणून घोषित झालेले आहे. या सप्टेंबर महिन्यात हैद्राबाद येथे दहा दिवसांचे संमेलन होत आहे. जैवविविधतेसंबंधी राज्य सरकारने कोणती सकारात्मक पावले उचलली आहेत, किती ठिकाणी बायोडायव्हरसिटी पार्क किती आहेत, पुणे सारख्या शहरांमध्ये टेकड्यांवर बायोडायव्हरसिटीसारखे पार्क करावेत यासाठी तेथील नागरिकांचा गेली दहा वर्षे लढा सुरु आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी वारंवार स्पष्ट केलेले आहे की, "बायोडायव्हसिटीसाठी निधी देण्याची आमची तयारी आहे, परंतु राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे मागणी होत नाही."

सभापती महोदय, पश्चिम घाटाच्या संदर्भात गाडगीळ समितीचा अहवाल आलेला आहे. पश्चिम घाटाच्या संदर्भात स्थानिक लोकांचे म्हणणे ऐकून घेतले आहे काय ? आमच्या माहिती प्रमाणे आता त्या ठिकाणी नागरीकरणाच्या संदर्भात प्रचंड निर्बंध येणार आहेत. पर्यावरण वाचविले पाहिजे यात वाद नाही, परंतु तेथील स्थानिकांचे काय म्हणणे आहे ते आपण जाणून घेतले पाहिजे. या संदर्भात माझे असे म्हणणे आहे की, पश्चिम घाट परिसरातील गावांमध्ये लोकाधिकार सनद केली पाहिजे. अन्यथा या गरीब लोकांच्या जमिनी धनाढ्य लोक घशात घालतील.

सभापती महोदय, राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेसाठी केंद्र सरकारकडून राज्य सरकारला 4 हजार 85 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. भारतातील 150 नद्यांपैकी 28 प्रदूषित नद्या महाराष्ट्रात आहेत. या दूषित नद्यांच्या संदर्भात श्री.अभिजित घोरपडे आणि लातूरचे संशोधक श्री.अतुल देऊळगावकर यांनी दैनिक लोकसत्तामध्ये वारंवार लिखाण केलेले आहे. उत्तर प्रदेशमध्ये दहा प्रदूषित नद्या आहेत. या नद्यांतील प्रदूषण दूर करण्यासाठी त्या राज्याला केंद्र सरकारकडून 1 हजार 50 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला. तामिळनाडू राज्याला 868 कोटी रुपयांचा निधी प्राप्त झ ाला. आपल्या राज्यातून कृष्णा, गोदावरी, तापी आणि पंचगंगा या चार नद्यांचे प्रस्ताव पाठविण्यात आले होते. महाराष्ट्रातील भीमा, मुळा, मुठा, पवना, वैनगंगा, पातळगंगा, इंद्रायणी, कोयना,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

कुंडलिका, काळू कन्हान, कोलार, मिठी, तापी, गिरणा, निरा या प्रदूषित नद्या आहेत. केंद्र सरकारकडे या प्रदूषित नद्यांचे प्रस्ताव पाठविले नाहीत तर त्या नद्यांतील प्रदूषण आपण कसे थांबविणार आहोत ? नद्यांतील प्रदूषण कमी करण्यासाठी केंद्र सरकारकडून निधी मिळत असताना सरकार मार्फत सकारात्मक पावले उचलली जात नसल्यामुळे आपणास निधी प्राप्त होत नाही. आपल्याकडे पाण्याचे सॅम्पल तपासण्यासाठी मंत्रालय नाही. तेव्हा हैद्राबाद येथे होणाऱ्या संमेलनामध्ये शासन कोणती सकारात्मक भूमिका मांडणार आहे हे येथे त्यांनी स्पष्ट करावे.

सभापती महोदय, सन 1992 मध्ये पर्यावरणाच्या संदर्भात रिव्हो येथे परिषद झाली त्यास आता वीस वर्षे झाली आहेत.

सभापती महोदय, बायोडायव्हरसिटी पार्क बरोबरच पश्चिम घाटाच्या संदर्भात स्थानिक लोकांची फार नाराजी आहे. आपण त्या लोकांचे म्हणणे ऐकून घेतले नाही तर तेथे हिंसक परिस्थिती निर्माण होणार आहे. कोणाचा पर्यावरणाला विरोध नाही. परंतु तेथे निर्बंध आणले जात असताना स्थानिकांचे काय म्हणणे आहे हे राज्याने केंद्र सरकारकडे पोहोचविले नाही तर फक्त एकतर्फीच म्हणणे मांडले जाणार आहे. दहा वर्षानंतर अशी परिस्थिती निर्माण होईल की, तेथील लोक स्थलांतर करतील, मुंबई आणि पुणे शहरात जाऊन मजूर म्हणून काम करतील. लवासाला विरोध करण्याचा प्रश्न नाही. लवासाला वीज मिळते परंतु त्या बाजूच्या गावाला वीज मिळत नाही. या संदर्भात बैठक होऊन गेल्या वर्षी तेथील गावांना एमएसईबीने वीज पुरविली. गेल्या आठवड्यात तहसीलदारांनी सात आदिवासींना त्यांच्या जमिनी परत दिल्या. चुकीच्या पध्दतीने जमिनी संपादित केल्या जात असतील तर ते बरोबर नाही.

सभापती महोदय, या संदर्भात विभागाकडून एक कृती कार्यक्रम जाहीर झाला पाहिजे. या कृती कार्यक्रमामध्ये पश्चिम घाटातील लोकांचे काय म्हणणे आहे ते ऐकून त्यानुसार तेथील पर्यावरणाचे कसे रक्षण करणार आहात याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

..3..



AJIT/ पूर्वी श्री.शिगम.. 16:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, मी या ठिकाणी 22 प्रदूषित नद्यांची नावे वाचून दाखविली. या नद्यांच्या संदर्भात पुढील सहा महिन्यात प्रस्ताव तयार करुन केंद्र सरकारकडे निधीची मागणी करणार आहात काय याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.अजित 16:10

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, तिसरा मुद्दा असा आहे की, नवी मुंबईला जात असताना बऱ्याच टेकडया होत्या. पूणे येथून बोगदेव घाटातून सासवडकडे निघालात तर उजवीकडे नजर टाकली तर तेथील टेकडयांची उंची ही कमी कमी झालेली दिसते. पुढच्या वर्षी ती टेकडी भूईसपाट झालेली आपल्याला दिसून येईल. सरळ सरळ लोक टेकडया फोडून माती, दगड घेऊन जात आहेत, या संदर्भात पर्यावरण विभागाकडे माहिती दिली तर माहिती देणाऱ्या लोकांना धमकाविले जाते खडकवासल्याजवळ उत्खनन चालले होते त्या बाबीकडे दैनिक सकाळ या वृत्तपत्राने लक्ष वेधले होते. स्थानिक ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात यासंबंधी वाद झाल्याने तेथे खुनासारखे प्रकार झालेले आहेत. म्हणून मला शासनाला सांगावयाचे आहे की, आपले राज्य जगाच्या स्तरावर पर्यावरणाचा समतोल राखणारे राज्य आहे, पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून अशा प्रकारच्या उपाययोजना शासनाने केलेल्या आहेत व त्या योग्य पध्दतीने राबविल्या जात आहेत, या बाबत पुढील वर्षापर्यंत चार उदाहरणे शासनाने दाखविली पाहिजेत. मी या ठिकाणी बायो डायव्हर्सिटी पार्कचे उदाहरण दिले. 22 नद्यासंबंधी प्रकल्प सांगितले. जी कुठली हिल स्टेशन्स असतील तेथे सर्व सामान्य गरीब लोकांना प्रवेश असला पाहिजे, त्या ठिकाणी ग्रामपंचायतीचे अस्तित्व असले पाहिजे, अशा प्रकारची बंधने आपण घातली पाहिजे.लोकांच्या व कामाच्या दृष्टीकोनातून जे चांगले प्रकल्प आहेत, त्या प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यास दहा-दहा वर्षे एवढा कालावधी लावला जातो. हे प्रकल्प पूर्ण होईपर्यंत प्रकल्प बाधित लोक व लाभधारक हे वयोवृध्द होऊन, त्यांचे आयुष्य संपायला येते अशी सध्या परिस्थिती आहे. या प्रकल्पांमध्ये स्थानिक भूमिपुत्राना न्याय मिळाला पाहिजे, अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, ध्वनी प्रदूषणाबद्दलचा माझा शेवटचा मुद्दा आहे. शिवाजी पार्क येथील सभांच्या बाबतीत ध्वनी प्रदुषणाचा बाबतीत शासन भूमिका घेत असते. आजच सभागृहामध्ये मी विशेष उल्लेखा संबंधीचे पत्र दिलेले आहे. कुर्ल्या सारख्या ठिकाणी एक-एक, दीड-दीड कि.मी.अंतरावर दिवसातून सात वेळेला एका धर्माची ध्वनीक्षेपकाव्दारे प्रार्थना होते, त्यामुळे मोठया प्रमाणात ध्वनी प्रदूषण होते, ते का थांबविले जात नाही यासंबंधी व आम्ही केलेल्या इतर सूचनासंबंधी शासनाने सकारात्मक उत्तर द्यावे, अशी मी विनंती करते आणि माझे मनोगत पूर्ण करते.

--------

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे ) :** आता माननीय पर्यावरण राज्यमंत्री यांनी प्रस्तावाच्या उत्तरास सुरुवात करावी.

श्री.दिवाकर रावते : माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात उपस्थित नाहीत, त्यामुळे सदर प्रस्तावावरील उत्तर सोमवारी ठेवावे. अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. या प्रस्तावावरील उत्तर सोमवारी घेण्यात येईल.

श्री.सचिन अहिर : सोमवारी फक्त उत्तर होईल की आणखी काही सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी संधी दिली जाणार आहे याचा कृपया खुलासा व्हावा.

**तालिका सभापती** : सोमवारी कोणाही सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली जाणार नाही. फक्त या प्रस्तावावरील उत्तर होईल. आता शासकीय विधेयके चर्चेला घेण्यात येतील.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ प्रथम श्री.अजित 16:10

**पृ.शी.**: परावैद्यक परिषद विधेयक

L.A. BILL NO. LXVI OF 2011.

(A BILL TO PROVIDE FOR THE ESTABLISHMENT OF A PARAMEDICAL COUNCIL TO REGULATE CERTAIN MATTERS IN THE STATE PERTAINING TO REGISTRATION OF PARAMEDICAL PRACTITIONERS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

डॉ.विजयकुमार गावित ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 66 राज्यातील परावैद्यक व्यवसायींची नोंदणी करण्यासंबंधी विवक्षित बाबींचे नियमन करण्यासाठी परावैद्यक परिषदेची स्थापना करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक मांडतो

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 66 राज्यातील परावैद्यक व्यवसायींची नोंदणी करण्यासंबंधी विवक्षित बाबींचे नियमन करण्यासाठी परावैद्यक परिषदेची स्थापना करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, सदर विधेयक आणण्या मागचा उद्देश असा आहे की, आपल्या राज्यात पॅरामेडीकलचे कोर्सेस मोठ्या प्रमाणात चालतात. वेगवेगळया संस्था वेगवेगळे मेडीकलचे कोर्सेस पाठ्यक्रम, डिप्लोमा आणि डिग्री कोर्सेस चालवितात. सदर कोर्सेस चालवितांना त्यांच्यावर नियंत्रण रहावे, त्याच्यात सुसूत्रता राहिली पाहिजे, त्या संस्था चालकांनी काही चुकीचे केले तर त्यांचे विरुध्द कारवाई करता आली पाहिजे अशा पध्दतीची या राज्यात व्यवस्था नाही. त्या संबंधी कोठेही नोंदणी होत नाही. त्या संबंधी नोंदणी करण्यासाठी कौन्सील करीत आहोत.

यानंतर श्री. कानडे..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ पूर्वी श्री.गिते 16:15

डॉ. विजयकुमार गावीत....

सभापती महोदय, ज्या काही अनेक संस्था आहेत त्या संस्थांना शासनाने मान्यता दिल्यानंतरच त्यांना पॅरामेडिकलचे कोर्सेस सुरु करता येतील. परंतु त्यासाठी संस्थांना प्रथम अर्ज करावा लागेल आणि कोर्सेसला शासनाची मान्यता घ्यावी लागेल. मग त्या संस्थांना मान्यता दिली जाईल आणि कोर्सेससाठी करीक्युलम फायनल केला जाईल. त्यामध्ये सुसूत्रता आणली जाईल. ती सुसूत्रता आणण्यासाठीच या विधेकाच्या माध्यमातून सुधारणा सुचविण्यात आलेली आहे. याठिकाणी एक गोष्ट सदनाच्या लक्षात आणून देणे आवश्यक असून ती अशी आहे की, जे प्रॅक्टीशनर्स मोठया प्रमाणात वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत त्या व्यवसायासाठी पॅरामेडीकल लोकांचे सहाय्य देखील त्यांना आवश्यक आहे. त्यांची मदत घेतल्यानंतर हे डॉक्टर्स चांगल्या प्रकारे सेवा देऊ शकतात. पुढील 10 वर्षात 25 लाख टेक्नीशीअन्सची गरज भासणार आहे. यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आणि काही संशोधन करण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आले आहे.

सभापती महोदय, या विधेयकावर सदस्यांनी आपले मत व्यक्त करुन शासनाला मार्गदर्शन आणि सूचना कराव्यात अशी अपेक्षा आहे. परावैद्यक परिषद स्थापन केली जाणार आहे. महाराष्ट्रातील जवळजवळ 50 हजार लॅब टेक्नीशीअन्स सोडून इतर सुध्दा सुमारे 1 लाख टेक्नीशीअन्सवर परिणाम करणारे असे हे विधेयक आहे. जे डॉक्टर्स आणि संस्था या क्षेत्रात सेवा देत आहेत त्यांना या विधेयकानंतर अधिक मदत होऊ शकेल असे मला वाटते. यादृष्टिकोनातूनच शासनाने हे विधेयक सभागृहात चर्चेसाठी मांडलेले आहे. या बिलावर माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त करावेत अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक-66 राज्यातील परावैद्यकीय व्यवसायाच्या संदर्भात नोंदणी करण्यासाठी आणि पॅरावैद्यकीय परिषदेची स्थापना करण्यासाठी हे विधेयक शासनाने सदनात आणलेले आहे.

सभापती महोदय, पॅरावैद्यकीय म्हणजे परामेडिकलचे भाषांतर केलेले आहे. परंतु पॅरामेडिकल यासाठी मराठीत नेमका शब्द कोणता आहे हे शोधून काढले पाहिजे. पॅरामेडिकलसाठी परावैद्यकीय हा पर्यायी शब्द होऊ शकत नाही. त्यासाठी दुसरा शब्द शोधून काढण्याची गरज आहे. म्हणून या विधेयकाचे टायटलच चुकीचे आहे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, अशा प्रकारचे जे पॅरामेडिकल म्हणून जे काही कोर्सेस आहेत ते पूर्वी अवैध पध्दतीने चालविले जात होते. आज देखील हॉस्पीटलमधून अनेक लोक काम करतात ते त्यांना त्याक्षेत्रामधून जे ट्रेनिंग मिळालेले आहे त्याच्या अनुभवातून काम करतात. दोन वर्षापूर्वी आरोग्य विज्ञान विद्यापीठाने निर्णय घेतला की पॅरामेडिकल हा वेगळा विभाग सुरु करावा. त्यासाठी मेडिकल कौन्सिल आणि मी देखील प्रयत्नशील होतो. सभागृहात देखील यासंदर्भात प्रश्न उपस्थित झाला होता. सभापती महोदय, आज जो विषय चर्चेला आहे तो इतका गहन आहे की, बिलाच्या माध्यमातून चर्चा झाली तर आणि अनेक मुद्दे समाजासमोर आले तर समाजामध्ये हे जे लोक काम करतात त्यांचे अनेक प्रश्न पुढे येतील.

आजही हॉस्पीटलमध्ये किंवा सरकारी हॉस्पीटलमध्ये एक्स-रे टेक्नीशीअन असतो त्यासाठी डीएमएलटी ही बेसिक शैक्षणिक अर्हता मानली जाते. आपण शासनाच्या जाहिराती पाहिल्या तर डीएमएलटी हे बेसिक क्वॉलिफिकेशन आणि त्यानंतर त्या क्षेत्रातील त्यांचा अनुभव यावर त्यांची आतापर्यंत नेमणूक होत होती.

नंतर श्री. खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ........

आता डीएमएलटी म्हणजे "Diploma in Medical Laboratory Technician" अशी शैक्षणिक अर्हता तुम्ही पॅरॉमेडीकल टेक्नीशिअन मध्ये आणली. पूर्वी या पॅरा मेडिकल मध्ये मग ईसीजी टेक्निशियन असले तरी त्यांना तीच अर्हता लागत होती, एक्स-रे टेक्निशियन्स, एमआरआय टेक्निशियन, ऑपरेशन थिएटर इन्चार्ज अशा सर्वांसाठीच ही अर्हता लागत होती.

मी आजच लिलावती हॉस्पिटलमध्ये गेलो असता काही पर्सजनिस्ट लोक मला भेटले. ते परक्युजनिस्ट म्हणून ऑपरेशन थिएटरमध्ये काम करतात. त्यांचे काम बाय-पास सर्जरी, एन्जियोग्राफी करतांना शरिरात किती द्रव्ये टाकता त्याचे ॲनालिसिस करुन ते प्रमाण द्यावयाचे असे आहे. हा टेक्नीकल जॉब आहे. परंतू यासाठी कोणताही कोर्स डिझाईन केलेला नाही. ही दुर्दैवाची गोष्ट आपल्या मेडिकल सायन्समध्ये आहे. अशा प्रकारचे 600 ते 800 परक्युजनिस्ट संबध देशभर असून ते परक्युजनिस्ट ऑपरेशन थिएटरमध्ये अव्याहतपणे काम करीत आहेत. मी काल त्यांना विचारले की, आपण कोणत्या प्रकारचे प्रशिक्षण घेतले आणि या पदापर्यंत कसे पोहचलात, त्यावर त्यांच्याकडे काहीच उत्तर नव्हते, पण ते ऑपरेशन थिएटरमध्ये काम करतात. बायपास सर्जरी, नेफ्रॉलॉजी म्हणजे किडनी ट्रान्सप्लांट असेल अशा सर्व ठिकाणी या लोकांना हजर रहावे लागते. इतक्या महत्वाच्या शस्त्रक्रियासांठी जर ते काम करतात तर या लोकांना बेसिक ट्रेनिंग कोण देणार, कोणत्या भागामध्ये त्यांची बेसीक ट्रेनिंग होणार हा आपल्यासमोर प्रश्न आहे. या लोकांना ट्रेनिंग देताना त्यांना कोणते विषय त्यात असणार हा देखील आपल्यासमोरचा प्रश्न आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाने हे कोर्सेस ज्यावेळी डिझाईन केले तेव्हा मी हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांना बायोकेमिस्ट्री, फारमकॉलॉजी, ॲनाटॉमी शिकविणार, कोणते विषय शिकविणार. कारण त्यांचा अभ्यास हा शरिराशी निगडीत आहे. आता त्यांची पुढील महिन्यात मान्यतेसाठी कॉन्फरन्स आहे. आता जे जुने 600 ते 800 परक्युजनिस्ट देशभर आहेत त्यांचे पुढे काय होणार, त्यांना आपण या पॅरा मेडिकलच्या संज्ञेत सामावून घेणार आहात काय हा प्रश्न महत्वाचा आहे. असे अनेक जुने एक्स-रे टेक्निशियन आहेत. आपल्याकडे ग्रामीण भागात रेडिऑलॉजिस्टच्या हाताखाली काम केलेले लोक एक्स-रे टेक्निशियन म्हणून वर्षानुवर्षे काम करतात. त्यांना त्याबद्दलचे नॉलेज काहीच नसते, फक्त मशिन कशी हँडल करावयाची, एक्स-रे कसा काढावयाचा

....2

डॉ. दीपक सावंत ........

हे टेक्निकल ज्ञान त्यांना असते. मी त्यावेळी असे म्हटले होते की, परावैद्यकीय व्यावसायिकांची नोंदणी करण्यासाठी राज्यात कोणताही कायदा नाही. त्यांनी कायद्याप्रमाणे पॅरा मेडिकलची अर्हता धारण केलेली नाही असे मोठ्या संख्येने लोक या क्षेत्रात काम करतात व आपण त्यांची नोंदणी करतो. तशी यांचीही नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच त्यांना सद्याच्या सायन्समध्ये "Continuous medical education" प्रमाणे जगामध्ये काय नवीन नवीन गोष्टी येत आहेत त्याबाबत देखील ट्रेनिंग देणे आवश्यक आहे. आपण जर त्यांची पात्रता बघितली तर 12 वी झालेले लोक कमी आहेत. पूर्वी डीएमएलटीचा कोर्स एसएससी नंतर सुरु होत होता. यात बेसिक प्रश्न असा आहे की, प्रॅक्टिकली काम करणे ठीक आहे, युरिन ॲनॉलिसीस करणे त्यामध्ये शुगर आहे की नाही हे बघणे, ब्लड सेंट्रिफ्युज करणे, हिमोग्लोबिन बघणे ठीक आहे. पण ज्यावेळी बेसिक अर्हता एसएससी नंतर असेल व त्याला फिजीक्स, केमिस्ट्री, झुऑलॉजी, बॉटनी याचे ज्ञान नसेल त्याला तुम्हाला अपग्रेड करणे आवश्यक आहे. याबाबत शासनाची काय भूमिका राहील हा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे रेडियोग्राफी टेक्निशियन, रेडियो थेरेपीस्ट, कार्डियोलॉजी टेक्निशियन, न्युरॉलाजी टेक्निशियन, ब्लड ट्रान्स्फुजन टेक्निशियन, ऑप्ट्रीमेट्री टेक्निशियन, प्लास्टर टेक्निशियन ॲनेस्थीशिया टेक्निशियन, परक्युजनिस्ट, ऑपरेशन थिएटर टेक्निशियन, मेडिकल ट्रान्सक्रिपशन टेक्निशियन, सायको टेक्निशियन, हिस्टोपॅथोलॉजि टेक्निशियन, ट्रान्स्फुजन मेडिसीन टेक्निशियन क्लिनिकल सायकॉलाजिस्ट, एन्डोस्कोपिक टेक्निशियन, कम्युनिटी मेडिसीन, हेल्थ इन्स्पेक्टर, इर्मजन्सी आणि फॉरेन्सीक सायन्स हे कोर्सेस आहेत. ते प्युअर टेक्नीकल आहेत.

यानंतर जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ प्रथम श्री. खर्चे... 16:25

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. परशुराम उपरकर )**

डॉ.दीपक सावंत ....

हे कोर्सेस सर्व मेडीकल कॉलेजमध्ये सुरु आहेत. हे कोर्सेस शिकवणाऱ्या स्टाफची फार मोठया प्रमाणात कमतरता आहे. न्युरॉलॉजीकल टेक्नीशियन्स केवळ इ.सी.जी. काढणार, सीटी स्कॅन करतांना हजर राहणार. हे टेक्नीकल विषय अतिशय क्लिष्ट असल्यामुळे त्यासाठी वेगळे सेंटर असणे आवश्यक आहे असे मला वाटते.

रेडिओ ग्राफिक टेक्नीशियन्स व रेडियो थेरपी टेक्नीशियन्स असा उल्लेख विधेयकात करण्यात आलेला आहे. मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, आपल्याला केमो-थेरपी एक्सपेक्टेड आहे की, एमआरआय टेक्नीशियन एक्सपेक्टेड आहेत ?ऑप्टीमेट्री टेक्नीशियन कोठल्याही चष्म्याच्या दुकानात दिसून येतात. त्यांच्याकडे गेल्यानंतर ते आपल्याला चष्म्याचा नंबर काढून देतात. त्यांनी काढून दिलेला नंबर बरोबर आहे की, चुकीचा आहे ते माहीत नसते. ज्यांनी यासंदर्भातील कोर्सेस न करताही दुकान थाटलेले आहे त्यांच्यावर आपण बंदी आणणार आहात काय ? मध्यंतरी शासनाने त्यांच्यावर बंदी आणली होती. जर अशा प्रकारे डोळे तपासणारे ऑप्ट्रीमेट्रीस्ट असेल तर त्याच्याकडे कोणते सर्टीफिकेट आहे, कोठे काम केलेले आहे हे आपण तपासणार आहात की, नाही ? रिफ्रॅक्शनीस्ट लोक अनेक वेळा डोळयांच्या कॅंपमध्ये जात असतात. परंतु त्या व्यक्तीला डोळयाचे नॉलेज आहे की, नाही याची आपल्याला माहिती नसते. परंतु नंतर लोक सांगतात की, शिबीरामध्ये जे चष्मे आम्हाला देण्यात आले होते त्यामुळे आम्हाला कमी दिसू लागले आहे, डोके दुखते, डोळयातून पाणी येते अशा तक्रारी नंतर करीत असतात. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात कंट्रोल ठेवणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, ॲनेस्थेशिया टेक्नीशियन हा फार महत्वाचा विषय आहे. हॉस्पिटलमध्ये ग्रीन कपडे घालून फिरला म्हणजे तो माणूस ॲनेस्थेशिया टेक्नीशियन होत नाही. या लोकांना थेरॉटीकल व प्रॅक्टीकल नॉलेज असण्याची फार आवश्यकता असते. आपण मुंबईतील कोणत्याही हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर त्या ठिकाणी आपल्याला केवळ 10 टक्के ट्रेन्ड ॲनेस्थेशिया टेक्नीशियन दिसतील. फाईव्ह स्टार हॉस्पिटलमध्ये सुध्दा हीच परिस्थिती आहे. हॉस्पीटलमधील टेक्नीशियन्स बाय एक्सपिरियन्सनेच वरपर्यंत गेलेले असतात.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, एन्डोस्कोपी टेक्नीशियन्सचा विषय सुध्दा फार महत्वाचा आहे. एन्डोस्कोपी टेक्नीशियन्सना आपण प्रॅक्टीकल ट्रेनिंग कोणते व कसे देणार आहात ? शासनाच्या अनेक हॉस्पिटलमध्ये एन्डोस्कोपीची सोयच नाही. अनेक हॉस्पिटल्समध्ये सीटीस्कॅन, एमआरआय मशिनच उपलब्ध नाही. एक्सरे मशीन असले तर ते बदं अवस्थेत आहे अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, ट्रान्स्फ्यूजन मेडीसीन टेक्नीशियनचा विषय सुध्दा महत्वाचा आहे. हे फिल्ड सुध्दा प्रिसाईड फिल्ड आहे. ट्रान्स्फ्यूजन मेडीसीन टेक्नीशियनचा कोर्स हा पर्टीक्युलर सब्जेक्टशी निगडीत आहे. ट्रान्स्फ्यूजन मेडीसीन टेक्नीशियनचे शिकवणारे प्रोफेसर, लेक्चरर्स आपल्याकडे आहेत काय ? या या कॉलेजेसमध्ये हे हे कोर्सेस सुरु आहेत व ते कोर्सेस शिकवणारे लेक्चरर्स हे हे आहेत याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, MUHS ने माननीय मंत्री महोदयांच्या प्रेशरमुळे हे कोर्सेस सुरू केले. पण त्यांनी आपल्याकडे अशा कोर्सेससाठी प्रोफेसर्स आहेत किंवा नाही हे बघितले नाही. माझ्या माहिती प्रमाणे 33 रूग्णालये आहेत. त्यापैकी किती रूग्णालयांमध्ये आपण कोर्सेस सुरू केले आहेत किंवा जागा भरल्या आहेत ? एवढे जरी सांगितले तरी आपण खूप मोठी अचिव्हमेंट केली असे मी मानेन.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे फंड. मी तांत्रिक बाबीवर बोललो. आता बेसिक बाबीवर बोलणार आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, "केंद्र शासनाकडून किंवा राज्य शासनाकडून मिळणारे कोणतेही अंशदान, फी, द्रव्य दंड, या पासून मिळालेल्या उत्पन्नासहित सर्व स्त्रोतापासून मिळणारे परिषदेचे उत्पन्न, सर्व देणग्या, दान या पासूनचे उत्पन्न, अनुदाने, परिषदेला मिळालेल्या इतर सर्व रकमा." एखादे कौन्सिल चालवायचे असेल तर त्यासाठी ठराविक फंड लागतो. त्याशिवाय कौन्सिल रन होत नाही. आपण यामुळे एक वेगळा पायंडा पाडत आहोत असे मला वाटते. आपण सर्व देणग्या असा उल्लेख केला आहे. आपण त्यांना देणग्या घेण्याची परवानगी दिली आहे काय ? दान घेण्याची परवानगी दिली आहे काय ? परिषदेला मिळालेल्या इतर रकमा म्हणजे नेमके काय ? या सगळ्याचा उलगडा होणे आवश्यक आहे.

मध्यंतरी आपण नर्सिंग कौन्सिल आणि पॅरामेडिकल कौन्सिल एक करण्याचे चालविले होते. यास भरपूर विरोध झाला. ते आता बारगळले आहे असे दिसते. नर्सिंग कौन्सिलकडे खूप पैसा होता. नर्सिंग कौन्सिल खूप वर्षापासून सुरू होते म्हणून त्या कौन्सिलवर हे कौन्सिल चालते काय असा राज्य शासनाचा विचार होता. यातून मिळणारी फी ही फार मोठी नसेल अशी माझी आशा आहे. कारण हे सर्व तांत्रिक कोर्सेस आहेत. त्यासाठी बारावी किंवा बी.एससी. अर्हता असेल. आपली MBBS ची फी देखील जास्त नाही. प्रायव्हेटमध्ये कितीही घेऊ दे. आपली बेसिक फी फार कमी आहे. त्यातूनच कसाबसा खर्च वैद्यकीय महाविद्यालयातून चालतो, याची मला कल्पना आहे. यातून निदान प्रोफेसरचा, लॅबोरेटरीचा खर्च तरी निघाला पाहिजे, तत्सम खर्च निघाला पाहिजे. तेव्हा परिषदेला निधी लागणार आहे तो कसा येणार आहे ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

सभापती महोदय, नावाच्या रजिस्ट्रेशनच्या वेळी कौन्सिलमध्ये खूप घोटाळे केले जातात. आयुर्वेदिक कौन्सिलमध्ये अशा प्रकारचा घोटाळा काही वर्षा पूर्वी झाला होता. मृत व्यक्तिंची नावे देखील नोंदवहीमध्ये नोंद केल्याचे आढळून आले होते. जे MBBS नाहीत त्यांची देखील नावे रजिस्टरमध्ये मिळाली होती. कोणाचे तरी दुसऱ्याचे सर्टिफिकेट, तिसऱ्याचा फोटो असा एक माणूस आपल्याला मुंबई रूग्णालयात काम करताना सापडला होता. त्याचे रजिस्ट्रेशन या नोंदवहीमध्ये होते. हे सगळे अनुभव बघून आपल्याला आणखी काही कडक उपाययोजना करता येईल काय, हे पहावे. या नोंदवहीमध्ये आपण जुन्या लोकांचा समावेश करणार आहात. या जुन्या लोकांमध्ये खरे कोण, खरा टेक्निशियन कोण आणि खोटा कोण कसा ओळखणार आहात ? फिजिओथेरीपीच्या कौन्सिलमध्ये असेच झाले आहे. हाड वैद्य ट्रीटमेंट करतात. त्यांना देखील या फिजिओथेरीपीच्या कौन्सिलमध्ये घेण्याचे ठरले होते. आता यामध्ये आपल्याला मोठी सावधानता बाळगावी लागेल. या मेडिकल लॅबोरेटरीमध्ये मी टेक्निशियन म्हणून काम केल आहे, एक्सरे टेक्निशियन म्हणून काम केले आहे असे तो सांगू शकतो. एवढेच नव्हे तर यासाठी क्ष-किरण तज्ज्ञांकडून माझ्या रूग्णालयामध्ये हे गृहस्थ काम करीत होते त्यांना इतक्या वर्षाचा अनुभव आहे असे प्रमाणपत्र त्याने आणले तर त्याची आपण नोंद करून घेणार आहात काय ?

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

तुम्ही नोंदवहीमध्ये एंट्री करण्यासाठी कोणते मापदंड लावणार आहात, हा माझ्यासमोर मोठा प्रश्न आहे. याचे कारण या मधून बोगस गोष्टी होण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, खंड 32 मध्ये म्हटले आहे की, "जर नोंदणीकृत परावैद्यक व्यवसायी नसलेली कोणतीही व्यक्ती, परावैद्यक व्यवसायीची किंवा सल्लागाराची पध्दत अनुसरील किंवा तिचा वापर करील किंवा मान्यताप्राप्त परावैद्यकीय अर्हता धारण न करणारी कोणतीही व्यक्ती, अशी परावैद्यकीय अर्हता दर्शविणाऱ्या किंवा अभिप्रेत करणाऱ्या पदवीचा किंवा पदविकेचा किंवा संक्षेपाक्षरांचा वापर करील तर, तिला अपराधसिध्दीनंतर (क) पहिल्या अपराधासाठी, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, आणि (ख) नंतरच्या अपराधासाठी, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्हीही शिक्षा होतील". खरे म्हणजे या ठिकाणी करण्यात आलेली शिक्षा फार सौम्य आहे. याचे कारण हे लोक नोंदणीकृत झाल्यानंतर ते लोकांच्या जीवाशी खेळणार आहेत. या करिता आपण शिक्षेमध्ये वाढ केली पाहिजे. मी जर चुकीच्या पध्दतीने रजिस्ट्रेशन केले तर मला मोठी शिक्षा होऊ शकते, त्याच्यावर शिक्षेचा बडगा उगारला जाऊ शकतो अशाप्रकारची भीती त्याला वाटली पाहिजे. त्यांनी केलेले सर्व अपराध हे दखलपात्र आणि अजामीनपात्र आहेत ही गोष्ट खरी असली तरी त्यामध्ये शिक्षेचा अवलंब केला गेला पाहिजे.

सभापती महोदय, मी सी.एम.एल.टी. च्या बाबतीत मंत्री महोदयांकडून स्पष्टीकरणाची अपेक्षा व्यक्त करतो. सी.एम.एल.टी. म्हणजे सर्टिफिकेट इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन हे आज खेडोपाडी सर्वत्र पसरले आहेत. कोकणामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आहेत त्याचप्रमाणे मराठवाडयात देखील आहेत. या सी.एम.एल.टी. डॉक्टरसाठी शासनाने एक नवीन कायदा केला आहे. They can work under the consulting pathologist. याचा अर्थ त्यांच्याकडे एम.डी. पॅथॉलॉजीचे प्रमाणपत्र पाहिजे. सी.एम.एल.टी. हा फक्त प्रयोग, चाचण्या करुन त्यांचे रिझल्ट देऊ शकतो. परंतु सही मात्र एम.डी. डॉक्टरांची करावी लागते. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये एम.डी. पॅथॉलॉजी झालेले लोक पाहिले तर त्यांची संख्या अतिशय कमी आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये हाताच्या बोटावर मोजण्याइतके एम.डी. पॅथॉलॉजिस्ट आहेत. परंतु सी.एम.एल.टी. यांची संख्या खूप जास्त आहे. तेव्हा या सी.एम.एल.टी. च्या लोकांना प्रॅक्टिस करण्याची परवानगी देणार काय,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

त्याबाबत आपण नक्की काय करणार आहात याचा खुलासा करावा. हा अतिशय ज्वलंत प्रश्न असल्यामुळे ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, हॉस्पिटल्समध्ये रक्ताच्या, लघवीच्या चाचण्या केल्या जातात, बायोकेमिस्ट्री केली जाते ही कामे सी.एम.एल.टी. लोक करीत असतात. त्या ठिकाणी एम.डी. पॅथॉलॉजी या डॉक्टरांवर अवलंबून रहावे लागत नाही. या करिता आपण ज्या प्रमाणे होमियोपॅथी आणि आयुर्वेदिक डॉक्टरांच्या बाबतीत निर्णय घेतला त्याप्रमाणे या लोकांच्या बाबतीत देखील निर्णय घेणे आवश्यक आहे. या बाबतीत आज तत्काळ निर्णय घेण्यात आला नाही तरी भविष्यात राज्य शासनाने विचार करणे आवश्यक आहे. आज महाराष्ट्रामध्ये 2 लाखापेक्षा अधिक सी.एम.एल.टी. लोक प्रॅक्टिस करीत आहेत.

सभापती महोदय, माझी आपणास दुसरी विनंती आहे की, आपण सर्वांना बी.पी.एम.टी. म्हणजे बॅचरल ऑफ पॅरामेडिकल टेक्निशियन अशी एकच डिग्री दिलेली आहे. परंतु डिग्रीनंतर कंसामध्ये त्यांनी स्पेशालिटी लिहिणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे त्यांच्या प्रमाणपत्रामध्ये देखील नमूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शेवटी मी एका धोरणात्मक बाबीसंबंधी मंत्री महोदयांकडून खुलाशाची अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपविणार आहे. आजपर्यन्त टेक्निशियनसाठी आपली शैक्षणिक अर्हता बी.एस्सी. किंवा सी.एम.एल.टी. अशी होती. या अर्हतेवर आपण अनेक लोकांना शासकीय नोकरीमध्ये सामावून घेतले आहे. मुंबई किंवा इतर ठिकाणच्या महानगरपालिकांमध्ये सुध्दा आपण त्यांना प्रवेश देऊन नोकरीमध्ये रुजू करुन घेतले आहे, हे आपण आता थांबविणार काय? तसेच महाराष्ट्रामध्ये नवीन कोर्सेसची पहिली बॅच केव्हा येणार आहे?

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

त्यांच्यासाठी इंटर्नशीपचा प्रकार आपण ठेवणार आहात का ? त्यांना आपण डायरेक्ट फिल्डमध्ये पाठविणार का ? त्यांनी कोठे तरी इंटर्नशीप करणे आवश्यक आहे. सगळ्याच गोष्टी कोर्समध्ये अवलंबित नसतात. कोर्समध्ये ज्यावेळी आपण शिकतो त्यावेळी प्रॅक्टीकल नॉलेज अतिशय कमी मिळते. एमबीबीएस झाल्यानंतर कमीतकमी सहा महिन्याची इंटर्नशीप केल्याशिवाय त्यांना डिग्री सर्टिफिकेट देत नाही तशा प्रकारची काही व्यवस्था आपण या बाबतीत करु इच्छिता का ? तशी जर व्यवस्था केली तर आपल्याला टेक्निशियन म्हणून ॲडिशनल फोर्स शासकीय रुग्णालयांमध्ये मिळेल. यादृष्टीने आपण विचार करावा अशी मी विनंती करतो. मी या बिलाचे स्वागत करतो. मात्र मी ज्या काही त्रुटी सांगितल्या त्यावर माननीय मंत्री महोदयांनी जरुर विचार करावा.

यामध्ये जास्तीत जास्त लोकांची नोंदणी करुन खाजगी संस्थांना देखील आपण अशा प्रकारचे कोर्सेस देणार आहात. खाजगी संस्थांना कोर्सेस देताना पॅरामेडिकलचे जे पॅरामीटर्स आहेत ते त्या संस्था पाळतात की नाही हे पाहिले पाहिजे. नाही तर सिटीस्कॅन मशीन नसताना देखील सिटीस्कॅन टेक्निशियन किंवा रेडिऑलॉजी टेक्निशियन दिला जाईल. या दृष्टीने शासनाने काळजी घ्यावी. मुंबईमध्ये असे जे अवैध कोर्सेस आहेत ते आधी बंद करावेत. लोकांची दिशाभूल होऊ नये म्हणून वर्तमानपत्रातून किंवा मीडियाच्या माध्यमातून जाहिरात करावी की या राज्य शासनाच्या मान्यताप्राप्त संस्था नाहीत आणि त्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, शासनाच्या वतीने महाराष्ट्र परावैधक परिषद विधेयक सादर केल्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे आभार व्यक्त करतो आणि या विधेयकाचे स्वागतही करतो.

सभापती महोदय, या विधेयकाच्या प्रकरण एक मध्ये कलम 2 मधील (ज) मध्ये अशी व्याख्या दिलेली आहे की, " "मान्यताप्राप्त परावैद्यकीय अर्हता" याचा अर्थ, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक किंवा कायद्याव्दारे स्थापन केलेले इतर कोणतेही विद्यापीठ किंवा या बाबत राज्य शासनाने मान्यता दिलेली इतर कोणतीही संस्था यांच्याव्दारे देण्यात येणारी, कोणत्याही परावैद्यकीय अर्हतेमधील पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा पाठ्यक्रम, मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो,असा आहे." सभापती महोदय, डीएलएमटी, पीजीडीएलएमटी, ॲडव्हान्स डीएलएमटी व बीएलएमटी हे कोर्स मुंबई विद्यापीठ, एमएसबीटी व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ यांच्याशी संलग्न आहेत तसेच एलएमटी हे महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभागाकडे आहे. या कोर्सेसची नावे विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 17 वरील अनुसूचीमध्ये समाविष्ट केलेली नाहीत. या अभ्यासक्रमांना या अनुसूचीमध्ये समाविष्ट करावे अशी विनंती करतो. आपण हे विधेयक या ठिकाणी मांडले त्याबद्दल पुन्हा एकदा माननीय मंत्री महोदयांचे आभार व्यक्त करतो व या बिलाचे स्वागत करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मला या विधेयकावर बोलण्यास परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो. या ठिकाणी राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री माननीय डॉ. विजयकुमार गावित यांनी जे विधेयक मांडलेले आहे त्या विधेयकाचे स्वागत आणि समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. वैद्यकीय क्षेत्रामध्ये गैरप्रकार करणाऱ्या किंवा नोंदणीकृत नसणाऱ्या पण या क्षेत्रामध्ये व्यवसाय करणाऱ्यांना चाप लावण्यासाठी, त्यांच्यावर बंधने घालण्यासाठी अशा प्रकारचे विधेयक अत्यंत आवश्यक होते. त्याचा गांभीर्याने विचार करुन हे बिल या ठिकाणी आणलेले आहे त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, आताच या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे यांनी एक मुद्दा उपस्थित केला. या विधेयकामध्ये कलम 2 च्या (घ) मध्ये अशी व्याख्या दिलेली आहे की, " "परावैद्यकीय अर्हता" याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा पाठ्यक्रम, मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो - आणि आधुनिक शास्त्रोक्त औषधवैद्यकशास्त्र, आयुर्वेदीक पध्दत, युनानी पध्दत आणि होमिओपॅथिक वैद्यक पध्दत शिकविण्यात किंवा तसा व्यवसाय करण्यास सहाय्यभूत असणाऱ्या अथवा सहायक म्हणून आवश्यक असलेल्या सेवा देणाऱ्या व्यक्तीच्या प्रशिक्षणासाठी तयार केलेली कोणतीही मान्यताप्राप्त अर्हता किंवा शासन मान्यताप्राप्त परावैद्यकीय अर्हता म्हणून, वेळोवेळी अधिसूचित करील अशी इतर कोणतीही अर्हता, असा आहे" तसेच मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हतेमध्ये सुध्दा उल्लेख केलेला आहे की, विद्यापीठाची मान्यता असावी किंवा शासनाची मान्यता असावी.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

सभापती महोदय, आज महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक ठिकाणी वैद्यकीय क्षेत्रामध्ये काही लोक काम करीत आहेत. शासनमान्य विद्यापीठाकडून किंवा शासनमान्य संस्थांमधून त्यांनी डीएमएलटी, पीजीडीएमएलटी, ॲडव्हान्स डीएमएलटी किंवा बीएमएलटी किंवा एमएसबीटी असे काही अभ्यासक्रम पूर्ण केलेले आहेत. या अभ्यासक्रमापैकी काही अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहेत. त्यांना मुंबई विद्यापीठाची मान्यता आहे. काही अभ्यासक्रम यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाशी संलग्न आहेत. त्या विद्यापीठाची मान्यता असलेले अभ्यासक्रम आहेत. परंतु शासनाने या विधेयकाला जोडलेल्या अनुसूचीमध्ये 21 व्यवसायिकांची यादी दिलेली आहे. पण क्र.22 मध्ये असे नमूद केले आहे की, उपरोक्त क्र.1 ते 21 मध्ये नमूद केलेल्या पाठ्यक्रमातील पदविका" पदविकांमध्ये मी मघाशी त्या अभ्यासक्रमांचा उल्लेख केलेला आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी त्याला दुजोरा दिलेला आहे. ती अर्हताधारक किंवा पदविकाधारक आहेत किंवा मान्यताप्राप्त कोर्स पूर्ण केलेले वैद्यकीय क्षेत्रात व्यवसाय करणारे आहेत त्यांचा यामध्ये समावेश केला जाणार आहे काय ? त्यांच्यासाठी हा कायदा लागू होणार आहे का याबाबतचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 3 वर यासंबंधीच्या समितीच्या रचनेचा मसुदा नमूद केलेला आहे. या समितीमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील सहा संचालक आहेत. म्हणजे या समितीमध्ये शासकीय अधिकारी असतील. त्याच प्रमाणे याच पानावर (सात) मध्ये "नोंदणीकृत परावैद्यक व्यवसायींमधून प्रत्येक महसुली विभागातून एक या प्रमाणे विहित करण्यात येईल अशा रितीने निवडून द्यावयाचे सहा सदस्य" असे नमूद केलेले आहे. हे सहा सदस्य त्या समितीमध्ये समाविष्ट असतील. या समितीचा कालावधी 5 वर्षांचा असणार आहे. या विधेयकाची प्रत्यक्षात अंमलबजावणी होत असताना प्रत्येक महसुली विभागातून त्या क्षेत्रातून निवडून येणार आहेत. मग त्यांच्या निवडणुकीची प्रक्रिया कशी असणार आहे, त्यांना कोण निवडून देणार आहेत, त्या संदर्भातील माहिती मंत्री महोदयांनी मला द्यावी.

2...

NTK/

श्री.रामनाथ मोते....

दुसरा एक महत्वाचा मुद्दा असा आहे की, या समितीचा कालावधी 5 वर्षांचा असणार आहे. पण त्या सहा सदस्यांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण कधी होणार, तोपर्यंत ती परिषद अपूर्ण राहणार आहे. कायद्याच्या दृष्टीने ती परिषद परिपूर्ण होणार नाही. या कलमामध्ये असे नमूद केले आहे की, "हे सहा सदस्य निवडून येईपर्यंत, परिषदेची रचना पूर्ण होण्यासाठी सहा सदस्य पहिल्या सत्रासाठी किंवा हा कायदा लागू झाल्याबरोबर हे सहा सदस्य निवडून देण्याचे अधिकार किंवा त्यांना नामनिर्देशित करण्याचे अधिकार शासनाने स्वत:कडे ठेवलेले आहेत." म्हणजे सहा संचालक व सहा सदस्यांची निवड होईपर्यंत या कायद्याची अंमलबजावणी सुरु होण्याचे थांबणार नाही किंवा त्याची अंमलबावणी थांबणार नाही. परिषदेची रचना थांबणार नाही. ते सहा सदस्य शासनाकडून नामनिर्देशित होणार आहेत. ते सदस्य 5 वर्षे काम करणार आहेत. ते सदस्य 5 वर्षे काम करणार असतील तर त्यांची निवडणूक प्रक्रिया केव्हा पूर्ण होणार आहे ? खऱ्या अर्थाने परिषदेची रचना पूर्ण होण्यासाठी त्या क्षेत्रात काम करणाऱ्यांचे प्रतिनिधीत्व दिलेले आहे. हे सहा सदस्य निवडून येण्यासाठी शासनाला ती प्रक्रिया लवकर पूर्ण करावी लागेल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:50

श्री. रामनाथ मोते...

निवडून येणा-या संदस्यांच्या संदर्भात जरी 5 सदस्य नामनिर्देशित केले असले तरीही या परिषदेवर सदस्य लवकरात लवकर निवडून येण्यासाठी आपण काय करणार हे माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. गैरमार्गांना, गैरव्यवहारांना, गैरव्यवसाय करणा-यांना आळा घालण्यासाठी, त्यांच्यावर बंधन घालणारे एक चांगल्या प्रकारचे विधेयक शासनाने आणलेले आहे. हे विधेयक आणल्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचे आणि शासनाचे अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2011चे वि.स.वि.क्रमांक 66 - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयकावर बोलण्याची मला संधी दिली त्याबद्दल सर्वप्रथम मी आपले आभार मानते.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात मी फकत एकच मुद्दा उपस्थित करणार आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा आपण काही उपयोग करुन घेणार का ? नसेल तर तो करुन घ्यावा अशी माझी सूचना आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये या कामाचे प्रशिक्षण देता येईल, या कामाचे ते नियमन करु शकतील. आयुर्वेदाच्या संदर्भात काम करणारे, पॅरामेडिकल व्यवसाय करणारे जे लोक आहेत, विशेषत: पंचकर्मसारखी चिकित्सा करणारे जे लोक आहेत त्यांच्यासाठी देखील एखादा सर्टिफिकेट कोर्स किंवा त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करणे आवश्यक आहे याकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधून माझे भाषण संपविते.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन 2011चे वि.स.वि. क्रमांक 66 - महाराष्ट्र परावैद्यक परिषद विधेयकावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे आणि सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी भाग घेऊन अतिशय चांगल्या सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सांवत यांनी टेक्निशियन्सचा उल्लेख केला. ग्रॅज्युएशन झालेल्या टेक्निशियनच्या संदर्भात त्यांनी यादी दिली. त्यासंदर्भातील पदविकांना आपल्याला रजिस्ट्रेशन देता येईल असे त्यांनी सांगितले. जे डिप्लोमा आणि डिग्री होल्डर्स आहेत त्यांना आपण रजिस्ट्रेशन देणार आहोत. या ठिकाणी प्रमाणपत्र आणि पाठ्यक्रमाचा उल्लेख यासाठी केला नाही कारण तो कोणता अभ्यासक्रम आहे हे व्यवस्थित पहावे लागेल. त्यानंतर त्यांचे इन्क्युजन करता येईल. सन्माननीय सदस्यांनी बोगस सर्टिफिकेटचा देखील उल्लेख केला. एखाद्या रेडिओलॉजिस्टकडे अमुक इतकी वर्षे काम केले म्हणून त्याला सर्टिफिकेट दिले गेले असेल तर ते सर्टिफिकेट आपल्याला ग्राह्य धरता येणार नाही. काही सर्टिफिकेट कोर्सेस आहेत. सीएमएलटी कोर्स केलेल्यांना आपण प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये किंवा अन्य ठिकाणी सहायक म्हणून घेण्यात येते. कोणत्याही पदावर नोकरी देताना ती रिक्रुटमेंट रुल्स प्रमाणे दिली जाते. आता आपण नव्याने बीएमटी कोर्स सुरु केला. या कोर्सला फार कमी प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. याबाबतीत आपल्याला रिक्रुटमेंट रुल्समध्ये बदल करणे आवश्यक आहे. दहावी, बारावी पास झालेल्या उमेदवारांना आपण असिस्टंट म्हणून नेमतो. परंतु जे बी.एससी. झालेले असतील, लॅब टेक्नीशियन, रेडियोलॉजिस्ट, केमोथिअरेपीस्ट हे डिप्लोमा किंवा डिग्री होल्डर्स असतात. यांना मुख्य टेक्निशियन म्हणून नोकरीवर घेण्यात येते. या अभ्यासक्रमाची वेगवेगळया कॉलेजेसमध्ये सोय आहे.

सन्माननीय सदस्यांनी पर्सजनिस्टचा उल्लेख केला. ही गोष्ट खरी आहे की, देशामध्ये फार कमी पर्सजनिस्ट आहेत. एक पर्सजनिस्ट सकाळी एका ठिकाणी तर दुपारी दुस-या ठिकाणी काम करीत असतो. मुंबईमध्ये मोठमोठी हॉस्पिटल्स असली तरी केवळ केईएम रुग्णालयामध्येच ही सोय आहे. अशा प्रकारचे कोर्सेस जेथे सुपरस्पेशॅलिटी हॉस्पिटल आहे तेथे आपल्याला सुरु करता

..4.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येतील आणि त्यांना रजिस्ट्रेशन देता येईल. सन्माननीय सदस्यानी  सीटी स्कॅन, एमआरआय टेक्निशियन्सचा उल्लेख केला. ज्या कॉलेजमध्ये सोय आहे अशा ठिकाणी हे डिप्लोमा कोर्सेस सुरु करण्याची व्यवस्था करता येईल.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित...

संस्थांची तपासणी करुनच त्यांना परवानगी दिली जाणार आहे. त्यासाठी संस्थेची नोंदणी करणे आणि त्यासाठी शासनाची मान्यता घेणे या प्रोसिजर त्यासाठीच ठेवलेल्या आहेत. तेव्हा सर्व संस्थांना परवानगी देण्यापूर्वी त्यांची व्यवस्थित तपासणी केली जाईल. कौन्सिलमार्फत तपासणी केली जाईल. डायरेक्टर ऑफीसच्या मार्फत केली जाईल. त्यानंतर दोन इन्स्पेक्शन केल्यानंतर त्यास मान्यता देणार आहोत. त्यामुळे बोगस संस्थांना संधी मिळणार नाही.

सभापती महोदय, आधुनिक वैद्यकीय सेवा तंत्रज्ञ आरोग्य व्यावसायिकांच्या मदतीशिवाय पुरवली जाऊ शकत नाही. जेथे सुपरस्पेशालिटी सेवा पुरविण्यात येईल तेथे तंत्रज्ञ असणे आवश्यक आहे. असे तंत्रज्ञ असल्याची तपासणी केल्यानंतरच मान्यता देण्यात येणार आहे. अशा प्रकारे आज आम्ही त्यांना प्रमोट करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आज राज्यात मोठ्या प्रमाणावर टेक्निशिअन्सची गरज आहे. परंतु, ते आपण देऊ शकलो नाहीत.

सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते आणि निरंजन डावखरे यांनी सांगितले त्यांचे रजिस्ट्रेशन करणे गरजेचे आहे. शिक्षणामध्ये सुसुत्रता आणण्याची गरज आहे. या विधेयकात आपण शिक्षेची तरतूद देखील प्रस्तावित केली आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये डीएमएलडी धारक आहेत. ही गोष्ट खरी आहे की, आपण जो कोर्स किंवा पदवी घेतली आहे त्याच्या कक्षात राहून प्रॅक्टीस केली पाहिजे. त्याच्या बाहेर जाऊन कोणतीही सेवा आपल्याला करता येणार नाही. टेक्निकल कोर्स एमएसबीटीच्या माध्यमातून राबविले जातात. नर्सिंग कौन्सिल आणि पॅरामेडिकल कौन्सिल यांचा उल्लेख करण्यात आला. आता आम्ही नर्सिंग व पॅरामेडिकल बोर्ड करणार आहोत. या गोष्टीस थोडा उशीर लागेल. परंतु तसे बोर्ड होईल. कारण आज त्याची गरज आहे. सुसूत्रता आणायची असेल तर आपणास तसे करावे लागेल.

सभापती महोदय, कोणतेही कौन्सिल सुरु करायचे असेल तर त्यासाठी आम्ही 10 लाख रुपये देतो. त्यानंतर त्यांनाच निधीची तरतूद करावी लागेल. वेगवेगळ्या फॉर्मास्युटिकल कंपन्या, दानशूर व्यक्ती यांच्याकडून देणग्या घेऊ शकतात. त्यामुळे कौन्सिल निश्चितपणे चांगल्या प्रकारे चालू शकेल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित...

सभापती महोदय, यामध्ये डिग्री आणि डिप्लोमाचा समावेश यामध्ये केला आहे हे मी सुरुवातीलाच सांगितले आहे.

सभापती महोदय, आपण रिक्रुटमेंट रुल्स करणार आहोत. येथे इंटर्नशीपचा मुद्दा मांडण्यात आला. तसे पाहिले तर हा डिग्री आणि डिप्लोमा कोर्स आहे. ज्या कॉलेजेमध्ये चांगली असते तेथे मोठ्या प्रमाणावर कोर्सेस चालतात. तेथे विद्यार्थ्यांना रेग्युलर प्रॅक्टीस करावी लागते. तेव्हा इंटर्नशीपची गरज आहे असे मला वाटत नाही. तरी सुध्दा पुढील काळात एकंदर परफॉर्मन्स पाहून त्या संबंधी निश्चितपणे विचार करता येईल.

सभापती महोदय, आता काही महाविद्यालये,संस्था पुढे येतील. त्यांचा एकंदर परफॉर्ममन्स व तेथील शिक्षणाची ॲव्हेबिलिटी पाहून त्यांना मान्यता देणार आहोत.

सभापती महोदय, या ठिकाणी निवडणुकीचा मुद्दा मांडण्यात आला. त्याबाबत सांगू इच्छितो की, शासनातर्फे निवडून येणाऱ्या सदस्यांची नियुक्ती करण्यात येईल. एक-दोन वर्षात कौन्सिल व्यवस्थितरित्या सुरु झाले की, मग त्याच्या निवडणुका घेण्यात येतील. या निवडणुकांमध्ये ज्या संस्था रजिस्ट्रर्ड असतील त्यांनाच मतदान करता येईल आणि त्यांच्या मधीलच उमेदवार निवडणुकीसाठी उभा राहील अशी आपणास तरतूद करता येईल. आपण वैद्यकीय क्षेत्रामध्ये चांगले काम करण्याचा प्रयत्न करीत आहोत. हे एक चांगले विधेयक आहे. तेव्हा हे विधेयक सभागृहाने मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 42 (दोन्ही सम्मिलित) व अनुसूची विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 66 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2011 चे वि.स.वि.क्र. 66 संमत झाले आहे.

-------

यानंतर श्री.गिते..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी** : श्रीमती कमलाबाई चव्हाण या आत्महत्या केलेल्या शेतकरी महिलेच्या कुटुंबीयास करावयाची मदत या संदर्भात श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय महसूल राज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आज औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर आपले निर्देश होते की, या औचित्याच्या मुद्यासंदर्भात निवेदन करावे. त्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने पुढील निवेदन करीत आहे.

सभापती महोदय, काल शेतकऱ्याच्या आत्महत्येच्या संदर्भात तारांकित प्रश्न चर्चेला आलेला असताना श्रीमती चव्हाण यांचा स्वभाव चीडचीडा होता असा उल्लेख त्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात होता. सन्माननीय सभापतींनी आदेशित केल्याप्रमाणे "चीडचीडा" हा शब्द उत्तरातून काढण्याचे शासनाने मान्य केले आहे. त्याच बरोबर तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये तीन शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या तिन्ही आत्महत्येच्या संदर्भात फेर तपासणी करावी असेही माननीय सभापतींनी आदेश दिले होते. या तिन्ही आत्महत्या झालेल्या आहेत, त्या संदर्भात संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून फेर तपासणी करुन घेण्यात येईल. फेर तपासणीत आणि सद्य:स्थितीत काही वेगळेपणा आढळून तर त्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अशा घटनांची चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, तहसीलदार जातात आणि त्यांच्या कुटुंबीयातील लोकांना विचारतात की, ते दारु पीत होते काय ? दारु पिणे आणि दारुडया असणे यामध्ये बराच फरक आहे. परंतु त्यांच्या कुटुंबीयांना संबंधित अधिकाऱ्यांनाकडून विचारले जाते ते दारु पीत होते काय, ते कधी कधी पीत होते असे सांगतात. अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारची विचारणा केली जाते ती गोष्ट अतिशय वाईट आहे. त्या शेतकऱ्यावर बँकेचे कर्ज असेल, त्याने विष पिऊन आत्महत्या केली असेल तर त्याचे कुटुंबीय तरले पाहिजे. जेव्हा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आपण भेटावयास जातो त्यावेळी भयानक

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

अशी माहिती प्राप्त होत असते. त्यांची परिस्थिती पाहून आपल्याला देखील वाईट वाटते. त्यांची लहान मुले, रडणारी पत्नी यांच्याकडे बघितले जात नाही. शेतकऱ्यांना मदत द्यावयाची नाही असे ठरवूनच ते चौकशी करीत असतात. शासन करोडो रुपये घालवित असते. शेतकऱ्याला 1 लाख रुपयांची मदत केली तर त्यात वाईट काय आहे ? त्याचे कुटुंब उध्वस्त झालेले असते, त्याच्या घरी 1 लाख रुपयांची मदत गेली तर त्याचे कुटुंबीय उदरनिर्वाह करु शकतात. माणुसकीच्या भावनेतून शासनाने त्यांना आर्थिक मदत देण्याचे काम करावे.

सभापती महोदय, आपल्या आदेशाप्रमाणे "चीडचीड" हा शब्द शासनाने काढून टाकण्याचे मान्य केले आहे. श्रीमती चव्हाण यांची आत्महत्या विष पिऊन झाली असे सिध्द होते. कोणत्याही चौकशीपेक्षा सदनाचा शब्द मोठा आहे. श्रीमती चव्हाण यांनी विष पिऊन आत्महत्या केली असे उत्तरामध्ये शासनाने म्हटले आहे. त्या महिलने नवऱ्या बरोबर फारकत घेतली असेल व तिच्या नवऱ्याकडे चौकशी केली तर तो त्या महिले विषयी विरुध्द माहिती सांगेल. तिच्यावर कर्ज होते त्यामुळे तिने विष पिऊन आत्महत्या केली ही गोष्ट सत्य आहे. तुमच्या निकषाप्रमाणे श्रीमती चव्हाण यांच्या कुटुंबीयांना 1 लाख रुपयांची आर्थिक मदत करा आणि इतर शेतकऱ्यांच्या घटने बाबत चौकशी करा.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याप्रकरणाची फेरतपासणी करण्याचा शब्द मी शासनाच्या वतीने दिलेला आहे. त्यानुसार निश्चितपणाने जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून फेरतपासणी केली जाईल. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत शासनाचे निकष ठरलेले आहेत. त्यानुसार नापिकी झाल्यामुळे, बँकेने सहाय्य न केल्यामुळे, मान्यताप्राप्त सावकाराच्या कर्जाची परतफेड न झाल्यामुळे तसेच परतफेडीचा तगादा असे मदत करण्याबाबतचे निकष आहेत....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकऱ्याला मानसिक आजार होता हा निकष दाखवून मदत नाकारण्यात आली आहे. काल आपण सदनात जे उत्तर दिले आहे ते तपासून पहावे. मानसिक आजारामुळे मृत्यू झाला हे कारण असू शकते काय ? कर्जाच्या निकषामध्ये तो बसत होता परंतु त्याला ते द्यावयाचे नव्हते म्हणून मानसिक आजारामुळे मृत्यू झाला असे कारण दाखविण्यात आले. खरे पाहता चारच निकष ठरविले पाहिजेत. या चार निकषांच्या बाहेर जाऊन चौकशी करु नये.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, शेतकऱ्याला मदत करण्यासाठीचे निकष कोणते आहेत ते मी वाचून दाखविलेले आहेत. त्या निकषांच्या आधारे फेरतपासणी निश्चितपणाने केली जाईल आणि जर तो मदतीस पात्र ठरल्याचे आढळून आले तर संबंधित शेतकऱ्याला तातडीने शासनाकडून मदत केली जाईल.

श्री. पाशा पटेल :सभापती महोदय, माझ्या वडिलांच्या नावावर शेती आहे. चार मुले कारभारी आहेत. एकाने आत्महत्या केली तर त्याच्या नावावर शेत नाही म्हणून त्याला मदत मिळत नाही. याचाही विचार शासनाला करावा लागणार आहे. बीड जिल्हयामध्ये मी स्वत: जाऊन आलो आहे. बापाच्या नावावर शेती आहे. पोरगा कारभारी आहे. पोरगा मेला तरी त्याच्या नावावर शेत नाही म्हणून मदत मिळत नाही. मानसिक आजाराचे कारण दाखवून मदत नाकारली जाते. दारु पिऊन मेला म्हणून मदत दिली जात नाही. माणूस दारु ही वैतागून पितो. मदत करण्याचे शासनाचे निकष चुकीचे आहेत. त्यात बदल होणे आवश्यक आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी जी काही सूचना केलेली आहे त्याबाबतीत शासनाकडून अतिशय सकारात्मकपणाने विचार केला जाईल.

------

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ठाणे येथील रेल्वे अपघात व मुंबईतील मोनोरेलच्या दुर्घटनेबाबत</u>**

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आज सकाळी माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी काल ठाणे येथील रेल्वे अपघात आणि मुंबईमधील मोनोरेलच्या बाबतीत झालेली दुर्घटना यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. या दोन्ही अपघातांबाबातची सद्यस्थिती काय आहे याची माहिती सभागृहाला द्यावी अशी विनंती केली होती. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, सदनाचे आजचे कामकाज संपण्यापूर्वी याबाबतची संपूर्ण माहिती घेऊन ती सदनासमोर ठेवली जाईल. केवळ आठवणीकरिता मी हा मुद्दा उपस्थित केला आहे.

**उपसभापती** : विरोधी पक्षनेते सदनात आल्यानंतर यावरील निवेदन होईल.

-----

नंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XXIII OF 2012

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958.)

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्र. 23-मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक सभागृहासमोर मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि. क्रमांक 23 - मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, 1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, हे विधेयक मांडत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, मुंबई मोटार वाहन कर अधिनियम 1958 अंतर्गत किंमतीवर आधारित कर आकारण्याची तरतूद होती. पण मधल्या काळात म्हणजेच दि. 25.4.2012 रोजी त्यात बदल करण्यात आला. त्यानुसार पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांच्या किंमतीनुसार 10 लाखापर्यंत 9 टक्के कर, 10 ते 20 लाखापर्यंतच्या गाड्यांवर 10 टक्के आणि त्यापेक्षा जास्त किंमतीवर 11 टक्के कर आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. डिझेलवर चालणाऱ्या वाहनांवर अनुक्रमे 11, 12 व 13 टक्के सीएनजी वर चालणाऱ्या नवीन वाहनांच्या किंमतीवर 5, 6 व 7 टक्के कर आकारण्यात आलेली आहे. कंपनीच्या नावावर वाहन आयात केलेल्या वाहनांवर यापूर्वी दुप्पट कर आकारण्यात येत होता पण आता 25.4.2012 पासून यात झालेल्या बदलानुसार आणि इंधनाशी मोटार वाहन कर निगडित केल्यामुळे कंपनीच्या नावावर दुप्पट कर आकारला जातो आणि हा जवळपास 26 टक्क्यापर्यंत टॅक्स जाणार होता. हा जास्तीचा टॅक्स होणार होता म्हणून 20 टक्क्यापर्यंत सीमीत

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर ........

करण्याची तरतूद आपण यात करीत आहोत, म्हणून अधिनियमात समाविष्ट नसलेल्या एलपीजी वरील वाहनांवर सुध्दा सीएनजी प्रमाणे 5, 6 व 7 टक्के पर्यंत कर आकारण्याचे धोरण ठरविले. वरील सर्व तरतूद 26 जून, 2012 च्या आदेशात समाविष्ट आहे आणि या आदेशाचे रुपांतर या विधेयकात करण्याचे प्रस्तावित आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

----

....3

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मंत्री महोदयांनी सभागृहात विधेयक मांडताना हे देखील सांगण्याची आवश्यकता होती की, अर्थसंकल्पात 22 ते 26 टक्के इतका मोटार वाहन कर वाढविला पण आता शासनाच्या लक्षात आल्यामुळे 4 टक्क्याची कपात करीत आहोत. त्यामुळे हा कर 20 टक्क्यापर्यंत सरसकट करीत आहात. याचा अर्थ असा की आपण काही तरी चूक केली आहे पण सध्याची परिस्थिती अशी आहे की, मुंबई आणि महाराष्ट्रात वाहनांच्या खरेदीचा वेग प्रचंड वाढत आहे आणि परिवहन खात्याच्या नोंदींमध्ये एक लाखाच्या वर दरवर्षी वाहनांची नोंद होत असते. वास्तविक गाड्यांच्या किंमती 50 ते 60 लाख पर्यंत सरसकट आहेत. तसेच गाडीचा मालक 4-5 लाख रुपये अंतर्गत सजावटीवर खर्च करीत असतात पण आपण मात्र अशा लोकांचा विचार करुन शासनाचे प्रत्येक गाडीमागे 5-50 हजाराचे करापोटी नुकसान करीत आहात हे योग्य आहे की नाही मला माहीत नाही पण विधेयकात आपण असेही म्हटले आहे की, सीएनजी कीट बसविलेल्या संपीडित नैसर्गिक गॅसवर चालणाऱ्या मोटार गाड्यांच्या किंवा ओम्नी बस गाड्यांच्या बाबतीत द्यावयाच्या एकवार कराच्या दरात ज्याप्रमाणे 2 टक्क्यापर्यंत घट करण्यात आली आहे, त्याच धर्तीवर निर्माणकाने एलपीजी कीट बसविलेल्या द्रवरुप पेट्रोलियम गॅसवर चालणाऱ्या गाड्यांवर 2 टक्क्याने कपात केली आहे, ही कपात कशासाठी केली हे मात्र सांगितले नाही.

याचे कारण आपण ठरविले असेलच पण वाहनांमुळे प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली व त्यात न्यायालयाने हस्तक्षेप करुन शासनाला दट्टया मारला व सर्व टॅक्सीज बंद करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पेट्रोलवर चालणाऱ्या सर्व जुन्या टॅक्सीजना 25 हजारापर्यंत सबसिडी देऊन सीएनजीमध्ये कन्व्हर्ट करण्याचे आदेश शासनाने दिले.

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री. दिवाकर रावते ....

टॅक्सी सीएनजीवर करण्यासाठी आपण 25 हजार रुपयांची सबसिडी दिली होती ही आनंदाची बाब आहे. मुंबई शहरातील बहुतेक वाहने सीएनजीवर झाल्यामुळे मुंबई शहराचे प्रदूषण कमी झालेले आहे. अगोदर सीएनजी गॅस मर्यादित ठिकाणीच मिळत होता परंतु आता तो सगळीकडे उपलब्ध होऊ लागला आहे. पुणे-मुंबई महामार्गावर सुध्दा सीएनजी गॅसची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आता रिक्षांमध्ये सुध्दा सीएनजी कीट बसवले जात आहे व ही चांगली बाब आहे. पूर्वी रिक्षा व टॅक्सीजमध्ये पेट्रोल वापरले जात होते व पेट्रोलचे दर वाढले की, रिक्षा व टॅक्सीचे दर दुसऱ्याच दिवशी वाढले जात होते. मीटरचे दर पत्रक छापून यायचे त्यामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात बनवाबनवी होत असे.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, पूर्वी रिक्षा व टॅक्सीमध्ये पेट्रोल वापरले जात होते त्यामुळे टॅक्सी दिवसभरात 150 कि.मी. फिरली तर पेट्रोलवर एकंदर किती खर्च होतो, मेन्टेनन्सवर किती खर्च होतो यावरुन दर ठरवले जात होते. परंतु आता सीएनजी गॅस पेट्रोलच्या दरापेक्षा अत्यल्प किमतीत मिळत असतानांही पूर्वीपेक्षा टॅक्सीचे भाडे आता जास्त आहे. आता दिवसभर टॅक्सी 150 कि.मी. चालली तर त्यासाठी सीएनजीला किती खर्च येतो, मेन्टेनन्ससाठी किती खर्च येतो हे पाहून टॅक्सीचे भाडे आता का ठरवले जात नाही ? पूर्वी पेट्रोलचे दर वाढल्या बरोबर टॅक्सी युनीयनचे लिडर टॅक्सीचे दर वाढवून द्या नाही तर टॅक्सीचा संप केला जाईल अशा धमक्या देत होते, त्यावेळेस विभागाच्या अधिकाऱ्यांना रात्री 12-12 वाजेपर्यंत बसून निर्णय घ्यावा लागत होता. पेट्रोलची भाव वाढ झाल्याबरोबर दुसऱ्या दिवशी विभागाकडून भाव वाढ करुन दिली जात होती. मग आता सीएनजीमुळे टॅक्सीला कमी पैसे लागत असतांना सुध्दा टॅक्सीचे दर वाढलेले का आहेत ? सीएनजीचा खर्च पेट्रोलपेक्षा कमी होत असतांना तुम्ही टॅक्सीचे दर का कमी केले नाहीत ? अगोदर टॅक्सीचे जेवढे बील होत होते त्यापेक्षा आता सीएनजी असतांनाही बील जास्त होते. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये, प्रदूषण वाढू नये यासाठी आपण टॅक्सींना सूट दिली असेल असे मी मानतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, टॅक्सी व रिक्षाच्या युनीयन्स दीड-दोन महिन्यांनी दरवाढ करुन द्यावी म्हणून मागणी करीत असतात. युनियनला यासंदर्भात चर्चा करण्याचा अधिकार आहे त्याबाबत मला काही बोलावयाचे नाही. परंतु आता रिक्षावाले शासनाकडे पेन्शनची मागणी करीत आहेत. आपण हात ढिल्ला सोडल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, परराज्यातून आपल्या राज्यात वाहने येतात. परंतु परराज्याच्या गाडया आपल्या राज्यात डिझेल भरतच नाहीत. ते आपल्या राज्यात येतांना जास्त डिझेल भरुन येतात. आपल्या राज्यात डिझेलचे दर इतर राज्यांपेक्षा जास्त असल्यामुळे परराज्याच्या गाडया आपल्या राज्यात डिझेल भरतच नाहीत ही वस्तुस्थिती आहे. खरे म्हणजे हा दोष तुमच्या खात्याचा नाही. शिवशाहीच्या काळात शिवशाही सरकारने फ्लाय ओव्हर बांधले होते. इतर ठिकाणी रस्ता किंवा ब्रीज झाले की, आमच्याकडून टोल घेता परंतु मुंबई करांचे काय ? यासंदर्भात आंदोलने करण्यात आली होती.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्यावेळी आम्ही टोल बसविला नाही. मुंबई शहरामध्ये डिझेल व पेट्रोल मागे एक रूपया वाढविला. यातून 300 कोटी रूपये जमा होतील असा आम्ही अंदाज केला होता. हे 300 कोटी रूपये MSRDC ला त्यांचे कर्ज फेडण्याकरिता द्यायचे असे ठरले होते. महाराष्ट्रातील लोकांची अशी भावना होती की, मुंबईतील लोकांसाठी उड्डाण पूल बांधले आहेत त्यामुळे ती रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी. पण आता प्रश्न निर्माण झाला आहे. तो आपल्या विभागाच्या पुरवणी मागण्यांमध्ये देखील नव्हता म्हणून विचारता आला नाही. आता आपण जे टोल नाके बसविले आहेत त्यावरून ओरड होत आहे. आम्ही मुंबई शहरातील लोकांसाठी डिझेल व पेट्रोल मागे एक रूपया जादा कर बसविला होता तो आजही वर्षानुवर्षे चालू आहे तो आपण कमी केलाच पाहिजे. प्रतिवर्षी 300 या प्रमाणे 12 वर्षामध्ये 3600 कोटी रूपये वसूल केले आहेत. ही रक्कम सर्व पुलांच्या किंमती पेक्षा तिप्पट झाली आहे. केंद्र शासनाने देखील सांगितले की, जेथे काँग्रेसची सत्ता आहे त्या राज्यातील पेट्रोल व डिझेलच दर एक रूपयाने कमी करण्यात यावेत. हा दर आपण कमी केला तर थोडा फार रिलीफ मुंबईतील लोकांना नक्की मिळेल. आपण अव्वाच्या सव्वा कर लावले आहेत. दारूच्या बाबतीत असे करू नका. आता अर्थ खात्याचे मंत्री उपस्थित नाहीत. दारूवर अव्वाच्या सव्वा कर लावले तरी लोकांना ती परवडते.

वाहनांच्या किंमतीपेक्षा 20 टक्क्यापेक्षा अधिक कर असणार नाही. त्यामुळे किती महसूल बुडणार आहे हे आपण सांगितले पाहिजे. या विधेयकामुळे अर्थसंकल्पीय तरतुदीवर काय परिणाम होणार आहे हे सांगितले पाहिजे होते. माननीय वित्त मंत्र्यांनी सदनामध्ये अधिकचा अर्थसंकल्प मांडलेला आहे. दरवर्षी तुटीचा अर्थसंकल्प असतो. या वर्षी अधिकचा मांडला आहे. या विधेयकामुळे महसूल किती कमी होणार आहे हे सांगितले पाहिजे. आमच्या सदनात मांडलेला अर्थसंकल्प किती तुटीचा जाणार आहे हे पण आम्हाला कळले पाहिजे, तरच या विधेयकाला अर्थ आहे. आज सकाळी एका तारांकित प्रश्नावर चर्चा झाली आहे. काही ठिकाणी निधी खर्च होत नाही, तर काही ठिकाणी निधी खर्च करण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत असे सांगितले आहे. माननीय वित्त मंत्री श्री.अजित पवार यांनी अधिकचा अर्थसंकल्प मांडला आहे. पण या विधेयकाच्या तरतुदीमुळे तो तुटीचा होणार आहे. त्यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा फसवणुकीचा आहे. तो परत तुटीत जाणार आहे. तेव्हा यासंबंधी देखील मार्गदर्शन झाले तर बरे होईल. धन्यवाद.

====



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी फार चांगल्या सूचना केल्या आहेत, चांगले प्रश्न उपस्थित केले आहेत. परप्रांतातील वाहनांवर, खाजगी वाहनांवर आपण दुपटीने कर लावत होतो. पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांवरील एकवार द्यावयाच्या करात 18 ते 22 टक्क्यांपर्यंत आणि डिझेलवर चालणाऱ्या वाहनांवरील एकवार द्यावयाच्या करात 22 ते 26 टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली होती. त्यामुळे असे मोटार वाहन मालक महाराष्ट्र राज्या बाहेर असलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर आपल्या मोटार वाहनांची नोंदणी करीत होते. त्यामुळे राज्याच्या महसुलाचा तोटा होत होता. त्यामुळेच आता हा कर 20 टक्क्यांपर्यंत सीमित करण्याचा प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून केला आहे. अशाने बाहेरच्या राज्यात वाहनांचे रजिस्ट्रशेन करण्याचा कल कमी होऊ शकेल, असा उद्देश आहे.

आपण सीएनजीला सवलत दिलेली आहे. ती का दिली आहे अशी विचारणा केली आहे. यामध्ये प्रमुख उद्देश प्रदूषण कमी झाले पाहिजे हे आहे. मुंबई, पुण्यासह राज्यातील मोठ्या शहरात वाहनांची संख्या प्रचंड पटीने वाढलेली आहे. त्यामुळे रस्त्यावर चालताना नाकाला रूमाल बांधून चालावे लागते. ही परिस्थिती प्रदूषणामुळे निर्माण झाली आहे.

यानंतर श्री.सरफरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर....

यामध्ये उत्पन्न मिळवीत असतांना आपण लोकांच्या आरोग्याचा विचार केला नाही तर ते सुध्दा बरोबर होणार नाही. त्यामुळे प्रदूषण कमी करणे हा सुध्दा यामध्ये महत्वाचा उद्देश होता, तो बऱ्यापैकी साध्य होत आहे.

आपण मुंबई शहरामध्ये पहातो की, बी.ई.एस.टी. बसेस, रिक्षा आणि ट्रक हे सी.एन.जी. वर चालविले जात आहेत. त्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण कमी व्हावयास लागले आहे. या पुढील काळात पेट्रोल व डिझेलचे साठे कमी होणार आहेत. पेट्रोल आणि डिझेलचा सध्या मोठया प्रमाणात उपसा सुरु होत असल्यामुळे यावर आपण आणखी किती दिवस खर्च करावा हा प्रश्न आहे? त्याची देशाला आणि राज्याला सुध्दा मोठया प्रमाणामध्ये आवश्यकता भासते ती या पुढील काळात कमी होणार आहे. आज सुध्दा दर दोन महिन्यांनी आपण पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीमध्ये वाढ करीत आहोत. कच्च्या मालाचा पुरवठा कमी व्हावयास लागल्यामुळे पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा भासू लागल्यामुळे त्यांच्या किंमतीमध्ये वाढ करावी लागत आहे. या करिता पर्यायी व्यवस्था करुन पेट्रोल आणि डिझेलच्या वापरावर नियंत्रण आणता आले पाहिजे. म्हणून सी.एन.जी. आणि एल.पी.जी. चा एक चांगला पर्याय आपल्यासमोर आलेला आहे. आपण हा पर्याय शोधत असतांना त्याचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. ते काम आपण या ठिकाणी केले आहे.

सभापती महोदय, पेट्रोल कारच्या किंमतीवर 2 टक्के वाढीव दर लावला आहे आणि डिझेल कारच्या किंमतीवर 4 टक्के वाढीव दर लावला आहे. यामध्ये आपण एकूण वार्षिक उत्पन्नाचा विचार केला तर आपल्याला 300 कोटी रुपयांचे जादा उत्पन्न मिळणार आहे. तसेच, सी.एन.जी. आणि एल.पी.जी. वाहनांच्या किंमतीमधून 2 टक्के दर कमी केल्यामुळे 15 ते 20 कोटी रुपयांनी कमी उत्पन्न मिळणार आहे. या पुढील काळात याचे प्रमाण वाढले तर निश्चितपणे त्यामध्ये जास्त फरक पडेल. परंतु तेलाच्या साठयावर नियंत्रण राहिले पाहिजे यासाठी आज ही गोष्ट करण्याची आवश्यकता आहे. रिक्षाच्या भाडयांबाबत आपण या ठिकाणी सांगितले. सध्या सी.एन.जी. ची किंमत व ॲव्हरेज विचारात घेऊन टॅक्सीचे भाडे ठरविले जाते. त्याचप्रमाणे पेट्रोलवरील रिक्षांचे भाडे दर हे सी.एन.जी. वरील रिक्षाच्या भाडे दरापेक्षा वेगळे आहेत. पेट्रोल रिक्षाचा पहिल्या टप्प्याचा प्रति कि.मी. दर 9.50 पैसे इतका आहे आणि त्यानंतर 15 रुपये आहे, सी.एन.जी. रिक्षासाठी पहिल्या टप्प्याचा प्रति कि.मी. दर 7 रुपये आहे आणि त्यानंतर 12 रुपये आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर....

यामध्ये प्रति कि.मी. अडीच रुपयांचा फरक आहे आणि टप्प्यामध्ये 3 रुपयांचा फरक आहे. त्याचप्रमाणे सी.एन.जी. टॅक्सीचा प्रति कि.मी. दर 10.50 पैसे आणि किमान पहिला टप्पा 17 रुपये आहे अशा पध्दतीने दर पत्रक केले आहे. अशाप्रकारे सी.एन.जी. आणि पेट्रोलमध्ये 2 ते 3 रुपयांचा फरक ठेवला आहे. आपण यामधून ग्राहकाला किती रिलिफ देणार आहात असा प्रश्न उपस्थित करण्यात आला? वाहनांच्या किंमतीच्या प्रपोर्शनमध्ये आपण रिलिफ देण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, दिनांक 1 मे 2012 पासून मोटार वाहन कराच्या दरामध्ये इंधनावर आधारीत कर प्रणाली लागू केली असून एप्रिल ते जून या कालावधीमध्ये मागील वर्षीच्या तुलनेत झालेली मोटर वाहन कर वसुली पुढीलप्रमाणे आहे. 2011 मध्ये जून अखेर 88 हजार 368 इतकी कर वसूली झाली आहे. 2012 मध्ये 10 लाख 74 हजार 72 एवढी वाढ कर वसुली झाली आहे. यामध्ये झालेली वाढ 19 हजार 104 प्रमाणे झालेली आहे. 1 मे 2012 पासून कराच्या दरामध्ये वाढ केल्यामुळे मोटर वाहन कर वसुलीमध्ये अंदाजे 460 कोटी रुपये वार्षिक वाढ अपेक्षित आहे, प्रत्यक्षात 191 कोटी रुपये इतकी वाढ झाली आहे. सी.एन.जी. आणि एल.पी.जी. च्या बाबतीत अगोदर सांगितल्याप्रमाणे 18 कोटीपर्यंत आपल्याला भार सहन करावा लागेल. अशाप्रकारचे धोरण आपण स्वीकारले आहे. एका बाजूला अशाप्रकारे वाढ करीत असतांना आपल्या उत्पन्नामध्येही वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे 15 ते 18 कोटी दरम्यान सवलत देखील दिलेली आहे. त्या प्रमाणात ग्राहकांना रिलिफ देण्याचे शासनाचे धोरण आहे. अशाप्रकारे सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 4, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XXII OF 2012**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)

श्री. प्रकाश सोळंके ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 22 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 22 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील कलम 42 मध्ये कृषी विषयक प्रयोजनासाठी वापरात असलेल्या कोणत्याही जमिनीचा जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय बिगरशेती प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही अशा प्रकारची तरतूद आहे. प्रस्तुत अधिनियमाच्या कलम 42 (2) अंतर्गत ग्रामीण भागात स्वत:च्या शेतजमिनीमध्ये वैयक्तिक निवासी प्रयोजनासाठी अकृषक परवानगी घेण्याची जी अट आहे ती आपण शिथिल केलेली आहे. ग्रामीण भागामध्ये आज आपण पाहिले तर बऱ्याच ठिकाणी शेतजमिनीमध्ये आणि गावठाणातील निवासी वापरात असलेल्या जागांमध्ये छोटी दुकाने, पिठाची गिरणी, किराणा दुकान, कांडप मशीन अशा उपक्रमांसाठी निवासी अधिक वाणिज्यिक वापर होत असतो. कायद्याप्रमाणे त्यांना अकृषिक परवानगी घेणे बंधनकारक ठरते. या छोट्यामोठ्या उपक्रमांच्या माध्यमातून त्यांचा जीवन चरितार्थ चालत असतो आणि त्यांना अकृषिक परवानगी घेताना जो काही त्रास होतो त्या त्रासातून त्यांची मुक्तता करण्याच्या दृष्टीने कलम 42(2) मध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे.

सभापती महोदय, यामध्ये प्रामुख्याने निवासी वापरातील अशा इमारतीमध्ये 40 चौरस मीटर म्हणजे 430 चौरस फुटापेक्षा जास्त नाही असे क्षेत्रफळ वापरात येणारे जे छोटे उपक्रम आहेत

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ....

त्यांचा समावेश यामध्ये केलेला आहे. ही सुधारणा झाल्यानंतर अशा छोट्या उपक्रमांना अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. परंतु या जमिनीचा असा अकृषिक वापर सुरु केल्यानंतर त्यांनी त्या दिनांकाची पूर्व सूचना व संबंधित माहितीसह विहित नमुन्यामध्ये 30 दिवसांच्या कालावधीमध्ये ग्राम अधिकाऱ्यामार्फत तहसीलदार यांना देणे तसेच त्यांची एक प्रत जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविणे आवश्यक राहील आणि उपरोक्त अकृषिक परवान्यातून सूट दिली तरी संबंधित जमिनीच्या अकृषक आकारणी तसेच रुपांतर करामधून त्याला सूट मिळणार नाही. कोणत्याही प्रकारे रेव्हेन्यूचे नुकसान होऊ न देता सर्वसामान्य माणसांना कायद्याने निर्माण केलेल्या छोट्या मोठ्या कारणासाठी कचेऱ्यांमध्ये जाऊन जे हेलपाटे मारावे लागतात त्यापासून सर्वसामान्य माणसाची आणि विशेषत: ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या माणसांची सोडवणूक करावी या उद्देशाने हे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. मला निश्चितपणे खात्री आहे की, सर्व सन्माननीय सदस्य या विधेयकाचे स्वागत करतील आणि या विधेयकाला मान्यता देतील.

प्रश्न पस्तुत झाला

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मांडलेल्या विधेयकाचे स्वागत करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये शेतीमध्ये रस्त्याला लागून असलेल्या भागामध्ये एक दुकान स्थापन करण्याची मुभा देणे एवढ्या मर्यादित स्वरुपाचे हे विधेयक आहे असे मंत्री महोदयांनी स्पष्ट केलेले आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बदलण्याचे प्रचंड सामर्थ्य या विधेयकात आहे असे मला वाटते. सरकारच्या इच्छा शक्तीमधून हे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे. या विधेयकाकडे मी वेगळ्या पध्दतीने पाहत असल्यामुळे त्यावर बोलण्यासाठी उभा राहिलो आहे.

शेतीची सर्वच जमीन एन.ए.केली जात नाही. परंतु शेताच्या जागेत 400 फूटाचे दुकान सुरु करता आले तर ते या विधेयकातील तरतुदीमुळे करता येणार आहे. परंतु माझ्यासमोर वेगळाच प्रश्न आहे. या योजनेचा योग्य प्रकारे प्रचार झाला पाहिजे. ग्रामीण भागात रोजगार व स्वयंरोजगार खात्याच्या माध्यमातून व्यवसायिक प्रशिक्षणाची व्यवस्था निर्माण करण्यात यावी. ग्रामीण भागातील बेरोजगार युवक शहरात येऊन कोठे तरी राहतात. येथे आल्यानंतर हमाली करुन कसे तरे पोट भरतात. त्यापेक्षा स्वत:च्या जमिनीमध्ये दुकान सुरु केले तर त्यापेक्षा चांगली दुसरी गोष्ट असू शकणार नाही.

काल मी सांगली जिल्ह्यातील एका बेकार युवकाची बातमी टी.व्ही.वर पाहिली आहे. त्या मुलाला आपण काय करावे ते कळत नव्हते. परंतु त्या मुलाने भंगारातून फुलाचा व्यवसाय सुरु केला. त्याचा माल आता एक्सपोर्ट होऊ लागला आहे. ते सर्व बघण्यासारखे होते आणि चकित करणारे होते. काही पदार्थांची टरफले टाकून देत असतो, कापसाची बोंडे टाकून देत असतो, मका काढून झाल्यावर त्याचा राहिलेला भाग टाकून देत असतो, या सर्व टाकाऊ वस्तूंचा त्यांने फुलांच्या शेतीसाठी कल्पकतेने वापर करुन एक्सपोर्ट क्वॉलिटीचा माल तयार केला आहे. त्याच्या मालाला एक्सपोर्ट ऑर्डर मिळू लागली आहे. त्याच्या व्यवसायामुळे त्या गावातील 100 महिलांनाही रोजगार मिळाला आहे. ती क्षमता या विधेयकात आहे. हे विधेयक मंजूर झाल्यावर त्याची अंमलबजावणी सुरु होईल एवढ्या पुरता हा विषय नाही. अशा प्रकारचे रोजगार निर्माण

2...

श्री.दिवाकर रावते...

करण्यासाठी जर प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी ग्रामविकास विभाग व रोजगार स्वयंरोजगार विभागांचा एकमेकांशी समन्वय असावयास पाहिजे.

सभापती महोदय, त्याच्या पुढे जाऊन मी असे म्हणेन की, दुकान सुरु करणाऱ्यासाठी एक वर्षासाठी, तीन वर्षासाठी अकृषिक करावर सबसिडी देण्याचा विचार केला तर तो निर्णयही योग्य होईल. हा कर भरता आला नाही तर दुकान सुरु केल्यावर ते दुकान जर त्याने भाड्याने दिले तर तो त्याचा व्यवसाय होणार नाही. तो स्वत: त्या दुकानाचा मालक असेल, स्वत:च्या शेती मालावर प्रक्रिया करुन त्या दुकानात जर व्यवसाय करीत असेल आणि त्याला जर अकृषिक करात सूट दिली तर स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करण्याला हातभार लागेल. ग्रामीण अर्थव्यवस्थेत ग्रामपंचातीकडे कर जमा होत असतो. त्या ग्रामपंचायतीकडे कमी पैसा जमा झाला तरी चालेल. त्याला अकृषिक करामध्ये 3 वर्षांसाठी, 5 वर्षांसाठी सूट दिली तर तो स्वत: व्यवसाय करील. ग्रामीण युवक इकडे तिकडे भटकंती करीत असतो त्याऐवजी स्वत:च्या गावी राहून व्यावसायिक बनेल. मी स्वत: व्यवसाय करु शकतो असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाल्यावर ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चित्रच बदलून जाईल.

आपण दरवर्षी महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या अहवालामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील व मुंबईतील दरडोई उत्पन्नाची माहिती वाचतो. त्यामध्ये खूप फरक आढळून येतो. या विधेयकात जिल्ह्यांचे, तालुक्यांचे व गावांचे दरडोई उत्पन्न मोठ्या प्रमाणात बदलण्याचे सामर्थ्य आहे. शासन याप्रमाणे कार्यवाही करणार आहे का की केवळ हे विधेयक मंजूर झाल्यानंतर दुकाने सुरु करण्याची परवानगी देणार आहात ?

सभापती महोदय, मला या निमित्ताने तिसरी सूचना करावयाची आहे. शेतकऱ्याला पिकासाठी एक लाख रुपये किंवा 2 लाख रुपये 4 टक्के व्याजाच्या दराने कर्ज देण्याचे ठरविलेले आहे. तसे कृषी व्यवसाय करण्यासाठी जे युवक पुढे येतील त्यांनाही 4 टक्के व्याजाच्या दराने कर्ज दिले जाईल अशी संकल्पना राबविली तर त्या युवकांना आणखी मदत होईल.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, या दुकानांमध्ये कोणालाही देशी दारुचे दुकान सुरु करता येणार नाही. असे बंधन घालण्यात यावे. ग्रामीण भागामध्ये अर्थव्यवस्था निर्माण करणारे प्रचंड सामर्थ्य या विधेयकात असल्यामुळे मी या विधेयकाचे स्वागत करतो. ही कल्पना अनेक सन्माननीय सदस्यांनी मांडल्यानंतर सरकारने ती स्वीकारली त्याबद्दल मी सरकारला धन्यवाद देतो. जनतेचा आवाज शासनाला ओळखता आला तर विरोधकांना नको ते बोलण्याची वेळ येणार नाही आणि असे चांगले बोलण्याची संधी मिळेल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:40

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2012 चे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाचे मी मन:पूर्वक स्वागत करतो. या विधेयकामध्ये "सूक्ष्म उपक्रमाकरिता आणि अशा लघु वाणिज्यिक प्रयोजनाकरिता अशा जागांचा वापर करणारी, व चाळीस चौरस मीटरपेक्षा अधिक नसलेले क्षेत्र अशा उद्देशासाठी व्यापणारी व्यक्ती, ज्या दिनांकास जमिनीच्या वापरात असा बदल करील त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात ग्राम अधिका-यामार्फत तहसीलदाराला असा बदल केल्याच्या दिनांकाची सूचना देईल आणि इतर माहिती सादर करील आणि त्याची एक प्रत जिल्हाधिका-याला देखील अग्रेषित करील" अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. राज्य शासनाच्या दोन यंत्रणा ग्रामीण भागामध्ये काम करीत असतात त्यापैकी एक ग्रामसेवक आणि दुसरा तलाठी आहे. ग्रामसेवकाकडे विहित नमुन्यात अर्ज दिल्यानंतर तो तहसीलदार आणि जिल्हाधिका-यांपर्यंत पोहोचता करण्याची जबाबदारी त्यांनी घेतली तर तहसीलदार किंवा जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये सामान्य माणसाची होणारी पिळवणूक थांबू शकेल. या दृष्टीने विधेयकात आवश्यक ती सुधारणा करावी अशी सूचना करुन आणि या विधेयकाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2012चे वि.स.वि.क्रमांक 22 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयकावर मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानते.

सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत आहे. जसजसे रस्त्यांचे जाळे वाढत चालले आहे तसतसे गृह उद्योग करणा-यांची संख्याही वाढत चालली आहे. रस्त्याच्या बाजूने अंजीर, पेरु अशी फळे लोक विकत असतात. जेथे रस्त्याच्या बाजूने छोटया छोटया झोपड्या आहेत त्या ठिकाणी देखील पर्यटक हौसेने उतरताना दिसतात. अशा लोकांच्या दृष्टीने हे विधेयक उपयुक्त आहे.

दुसरे असे की, आपण जातीव्यवस्था मानत नसलो तरी इतर मागासवर्गातील कुंभार समाजाचे लोक मातीची मडकी तयार करुन विकत असतात. अशा लोकांना कायद्यातील या तरतुदीमुळे त्यांनी तयार केलेल्या वस्तू विकण्यासाठी जागा उपलब्ध होऊ शकते. पंढरपूरमध्ये वारीच्या वेळी प्रत्येक दुकानातून काहीना काही वस्तू विकली जात असते. कुणी उपासाचे पदार्थ विकत असतात, कुणी हळद-कुंकू विकत असतात तर कुणी फुलांचे हार, वेण्या विकत असतात. अशा प्रकारचे छोटे व्यवसाय करणा-यांसाठी ही तरतूद अतिशय उपयुक्त अशी आहे.

सभापती महोदय, आणखी एक गोष्ट मी निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, एखादा उद्योग किंवा व्यवसाय सुरु करण्यासाठी कर्ज घ्यावे लागत असेल तर त्यासाठी जागा नावावर असेल तरच कर्ज दिले जाईल असे बँकाकडून सांगितले जाते. तेव्हा घरगुती व्यवसाय करण्यासाठी त्यांना त्यांची जागा वापरता येईल अशा प्रकारचे प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केली तर त्यांच्या स्वत:च्या जागेचा एक भांडवल म्हणून वापर करता येईल.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, स्त्रीला घरातील मुले सांभाळावी लागतात, गुरे सांभाळावी लागतात. अशा परिस्थितीत घर बंद करुन माल विकण्यासाठी लांबवर जाणे स्त्रीला शक्य होत नाही. तेव्हा या तरतुदीमुळे स्त्रियांना घरगुती व्यवसाय करण्यास प्रोत्साहन मिळू शकेल. तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे या तरतुदीचा उपयोग अवैध स्वरुपाचे व्यवसाय करण्यासाठी केला जाणार नाही हे पहाण्याची जबाबदारी तहसीलदारांनी घेणे आवश्यक आहे.

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

सर्वसाधारणपणे माल विकण्यास प्रत्येकाची रस्त्याच्या बाजूला येण्याची आणि अतिक्रमण करण्याची प्रवृत्ती असते. या तरतुदीमुळे तसे होणार नाही. कायद्यामध्ये झालेला हा बदल ग्रामीण भागातील अधिकाधिक लोकांना माहीत होणे गरजेचे आहे. एकंदरीत हे विधेयक स्वागतार्ह आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) :सभापती महोदय, सन 2012चे वि.स.वि. क्रमांक 22 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधाणा) विधेयकावर सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विधेयकाला अतिशय व्यापक स्वरुप देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या निमित्ताने मला हे नजरेस आणून द्यावयाचे आहे की, सूक्ष्म उद्योगासाठी 25 लाख रुपयापर्यन्त गुंतवणूक करता येते आणि सेवा देणा-या सूक्ष्म उद्योगासाठी 10 लाख रुपयापर्यंत गुंतवणूक करता येते. अशा सर्व गोष्टींचा समावेश या विधेयकामध्ये केलेला आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय राज्य मंत्री महोदयांनी येथे सूक्ष्म उद्योग आणि सूक्ष्म सेवा उद्योग या संदर्भातील मर्यादा सांगितली. आपण यामध्ये नॅशनल हाय-वे, स्टेट हाय-वे, गावातील रस्ते, शेत रस्ते घेतलेले आहेत. नॅशनला हाय-वे आणि स्टेट हाय-वेवर धाब्याचे प्रस्थ फार वाढले तर पुढे त्यातून बारचे प्रस्थ वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे दारुच्या दुकानाला बंदी असली पाहिजे. नॅशनल आणि स्टेट हाय-वे वर वाहनांची दिवस-रात्र वर्दळ सुरु असते. तेव्हा या गोष्टीचा विचार झाला पाहिजे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या विधेयकाला प्रसिध्दी द्यावी आणि त्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुण-तरुणींना उद्योग करण्यासाठी उद्युक्त करावे अशी सूचना येथे करण्यात आली. मी त्या सूचनेचे निश्चितपणे स्वागत करतो.

सभापती महोदय, आज शेतकऱ्यांना फक्त शेतीवर अवलंबून राहून चालणार नाही. तर त्यांनी शेतीबरोबर अन्य व्यवसाय देखील केला पाहिजे तरच त्याला जीवनामध्ये उभे राहता येईल. या विधेयकाच्या माध्यमातून अशाप्रकारच्या उद्योगाला निश्चितपणे चालना मिळेल.

सभापती महोदय, मी महसूल विभागाचा राज्यमंत्री या नात्याने उत्तर देत नाही. परंतु माझ्याकडे पणन विभागाचा कार्यभार असल्यामुळे ज्या काही कृषी, औद्योगिक संस्थेच्या माध्यमातून छोट्या छोट्या उद्योगांना कशाप्रकारे चालना मिळू शकेल याचा आम्ही गांभीर्याने विचार करु. जेणेकरुन त्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुणांना स्वयंरोजगार प्राप्त होईल. त्यांना स्वत:चा उद्योग उभा करता येईल त्याच बरोबर आपली शेती सुध्दा चांगल्या पध्दतीने करता येईल अशी ग्वाही मी या निमित्ताने देतो.

सभापती महोदय, या ठिकाणी शंका व्यक्त करण्यात आली की, त्या ठिकाणी देशी दारुची दुकाने होतील, धाबे संस्कृती वाढेल,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..2..

<u>**पश्चिम रेल्वेची सेवा पूर्णपणे ठप्प असल्याबाबत पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन**</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. पश्चिम रेल्वेचे मोटरमन अचानक संपावर गेल्यामुळे पश्चिम रेल्वे सेवा पूर्णपणे ठप्प झालेली आहे. त्यामुळे मुंबईत हाहाकार उडाला आहे. लोकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय झालेली आहे. पश्चिम रेल्वेची सेवा पूर्णपणे बंद असल्यामुळे प्रवाशांच्या सुविधेसाठी शासन एस.टी. व बेस्ट सेवा उपलब्ध करुन देणार आहे काय ? आता सभागृह सुरु आहे. तेव्हा या संदर्भात निवेदन झाले पाहिजे म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण दहा मिनिटांकरिता सभागृह तहकूब करुन या संबंधी माहिती घ्यावी.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे परिस्थिती निर्माण झाली असेल तर या संदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे याचे निवेदन झाले पाहिजे. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात येऊन मार्गदर्शन करावे असा त्यांना निरोप पाठवावा. आपणास थांबण्यास काही हरकत नाही. परंतु आपण तोपर्यंत आपण माननीय मंत्री महोदयांचे भाषण पुढे सुरु ठेवू.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक मंजूर झाल्यानंतर सभागृहापुढे कोणतेही कामकाज नाही. त्यानंतर सभागृह स्थगित होईल. मी उपस्थित केलेल्या पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनची माहिती मिळणार नाही.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहात निवेदन होईपर्यंत मी या विधेयकाच्या मंजुरीची शेवटची स्टेप वाचणार नाही.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.अजित 17:50

**पृ. शी.** : जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XXII OF 2012**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)

(चर्चा पुढे सुरु.....

श्री. प्रकाश सोळंके ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी शंका व्यक्त केली की, राष्ट्रीय महामार्ग, राज्य रस्ते महामार्ग यांच्या कडेला मोठ्या प्रमाणात धाबे आहेत. ग्रामीण भागातही धाबे संस्कृती दिवसें दिवस वाढते आहे. मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, 1966 चा जमीन महसूल अधिनियमाच्या 42 (2) मध्ये ग्रामीण भागात निवासी कारणासाठी शिथिलता दिलेली आहे. आपण त्यात अपवाद केलेले आहेत. यामध्ये प्रामख्याने राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, जिल्हा मार्ग, गाव रस्ते नियंत्रण रेषेच्या आत कोणत्याही प्रकारे येण्याची परमीशन अलावू करणार नाही, अशी कायद्यामध्ये तरतूद आहे आणि म्हणून त्या बाबतीत विशेष काळजी करण्याचे कारण नाही. या बाबतीत कायदेशीर तरतूद अतिशय स्पष्ट आहे. या नियंत्रण रेषेच्या आत कोणालाही अकृषक परवानगी देता येणार नाही. इको सेन्सीटिव्ह झोन असतीत त्याच्यामध्ये सुध्दा अशी परवानगी कोठल्याही अकृषक कारणासाठी देता येणार नाही, असा अपवाद 42(2) मध्ये असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत चिंता करण्याचे कारण नाही. मी पुन्हा सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो की, त्यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने अतिशय चांगल्या सूचना केल्या आहेत. ग्रामीण भागात उद्योगाला चालना देण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी महत्वपूर्ण् सूचना दिलेल्या आहेत, त्याच्यावर शासन गांभीर्याने विचार करुन निर्णय घेईल असा शब्द या निमित्ताने देतो. सर्व सदस्यांनी एकमताने हे विधेयक मंजूर करावे, अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खंड 2 व 3, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे विधानसभा विधेयक क्रमांक 22 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 22 संमत झाले आहे.

----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पश्चिम रेल्वेच्या लोकल ट्रेनच्या मोटरमन यांनी अचानक केलेला संप**

**उप सभापती** : एक अतिशय महत्वाची आणि तातडीची बाब सभागृहात उपस्थित झालेली होती. त्या बाबतीत शासनाने निवेदन करावे अशा प्रकारची इच्छा सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी व्यक्त केली. ती बाब खरी आहे की, पश्चिम रेल्वेच्या लोकल ट्रेनच्या मोटारमन यांनी संप पुकारल्यामुळे पश्चिम रेल्वेची लोकल वाहतूक पूर्णपणे बंद झालेली आहे. आपली आपत्कालीन व्यवस्था आहे, तिच्या माध्यमातून जनतेची वाहतूक करण्यासाठी काही पर्यायी व्यवस्था केली आहे काय याचा खुलासा झाला पाहिजे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा सभागृहात उपस्थित केलेला आहे. त्याची माहिती घेण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. ती माहिती प्राप्त झाल्या बरोबर ती सभागृहाला सांगण्यात येईल.

**उप सभापती** : सभागृहाचे कामकाज संपत आलेले आहे..

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपला निरोप मिळाला. या संबंधी माहिती मिळविण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. ती माहिती प्राप्त झाल्यानंतर ती सभागृहाला अवगत केली जाईल. व्यवस्था आणि माहिती एकत्रितपणे सभागृहाला सांगितली जाईल. या बाबतीत शासन गांभीर्याने माहिती गोळा करीत आहोत आणि वाहतुकीची पर्यायी व्यवस्था करण्याच्या बाबतीत सुध्दा निश्चितपणे पाऊले उचलली जातील.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पश्चिम रेल्वेच्या मोटरमन लोकांनी संप केला असल्यामुळे रेल्वेसेवा ठप्प झालेली आहे. विधानभवनात मोठया प्रमाणात कर्मचारीवर्ग अधिवेशन काळासाठी उशिरापर्यंत थांबतो. त्यांच्या जाण्याची व्यवस्था कशी होणार आहे याबाबत शासनाकडून काही व्यवस्था होणार आहे काय ?

**उप सभापती** : शासन याबाबतीत गंभीर आहे.

सोमवारी म्हणजे 23 जुलै,2012 रोजी सकाळी 10.00 ते 11.30 पर्यंत सभागृहाची विशेष बैठक होईल आणि त्यामध्ये विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी राज्यातील सहकारी बँका याविषयावर नियम 97 अन्वये जो प्रस्ताव दिला आहे त्यावर चर्चा होईल......

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हायवेवर अपघात झाला असल्यामुळे आम्ही वेळेवर पोहोचू शकणार नाही. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर आज चर्चा झालेली आहे तेव्हा त्याचे उत्तर सकाळी 10.30वाजता ठेवावे आणि रेग्युलर कामकाज 11 वाजता सुरु करावे. सहकारी बँकांबाबत दिलेल्या प्रस्तावावर चर्चा दुपारी सुरु करावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, 10.30 वाजता सदनाची विशेष बैठक ठेवावी त्यामध्ये नियम 260 अन्वये आज झालेल्या प्रस्तावावरील चर्चेला मंत्रीमहोदय उत्तर देतील. त्यानंतर 11.00 वाजता नियमित बैठक ठेवावी. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर 1 तासाच्या वेळेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर चर्चा ठेवावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : ठीक आहे.

**उप सभापती** : सोमवार दिनांक 23 जुलै,2012 रोजी सकाळी 10.30 वाजता सदनाची विशेष बैठक होईल. त्यामध्ये आज नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील आजच्या चर्चेला मंत्रीमहोदय उत्तर देतील. त्यानंतर 11.00 वाजता सभागृहाचे नियमित कामकाज सुरु होईल.प्रश्नोत्तरानंतर माननीय सभापतींच्या संमत्तीने विरोधी पक्षनेत्यांनी नियम 97अन्वये दिलेल्या प्रस्तावावर चर्चेची वेळ निश्चित करण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सोमवार,दिनांक 23 जुलै 2012 रोजी सकाळी 10.30 ते 11.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल व 11.00 वाजता सभागृहाचे नियमित कामकाज सुरु होईल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 59 मिनिटांनी सोमवार,दिनांक 23 जुलै,2012 च्या सकाळी 10.30 पर्यंत स्थागित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही